सोलापूर
# तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | गुरुवार, २६ सप्टेंबर २०२४ | युगाब्द ५१२५ | वर्ष ४० वे अंक ३२६ | पाने १२ | किंमत रु. ६/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com





सोलापूर – **भवानी पेठ** – राठी सिमेंट, **नई जींदगी** – एस.ए.बडेपीर, **वि.डी घरकुल** – वैष्णवी स्टील, **न्यु पाच्चा पेठ** – हारूण स्टील, **होटगी रोड** – एम.आर.सेल्स, **शेळगी** – शहा ट्रेडर्स, **सिध्देश्वर पेठ** – बेसकर अॅण्ड कंपनी, **कुर्डुवाडी** – श्री.गणेश स्टील, **सांगोला** – महालक्ष्मी स्टील सेंटर, **माढा** – तांबोळी स्टील अॅण्ड हार्डवेअर, **पिंपळनेर** – डिमांड ट्रेडर्स, **नातेपुते** – पोतेकर एंटरप्रायजेस, **पंढरपूर** – दुर्गा स्टील, **मांडवे** – बालाजी ट्रेडर्स, **टेंभुर्णी** – श्री साई ट्रेडर्स, **बार्शी** – भराडीया स्टील, **करमाळा** – शिवम स्टील, **अक्कलकोट** – माशाळे स्टील, **मोहोळ** – तलफदार स्टील, **कुरूल रोड** – श्री.भैरवनाथ स्टील ट्रेडर्स, **अकलुज** – चकेंश्वरा स्टील, **वैराग** – गांधी एजन्सी, **दहिताने** – एस. एस. मकंदर स्टील कॉर्पोरेशन, **जेऊर** – तांबोळी सिमेंट अॅण्ड मार्बल, **मरवडे** – सह्याद्री ट्रेडर्स, **मोडलिंब** – शिवाई ट्रेडर्स, **करकंब** – लक्ष्मी स्टील, **मंगळवेढा** – महालक्ष्मी ट्रेडर्स, **बेगमपूर** – सिध्दनाथ ट्रेडर्स, **वेळापूर** – रॉयल बिल्डींग सोल्युशन, **टाकळी** – गुरूकृपा ट्रेडर्स, **कंदलगाव** – श्री.केदारेश्वर हार्डवेअर अॅण्ड सिमेंट, **मुळेगाव** – आदित्य ट्रेडर्स, **महुद** – शेवाळे हार्डवेअर, **हुन्नूर** – लक्की ट्रेडर्स, **साळमुख** – त्रिमूर्ति स्टील, **माळसिरश** – अभिनंदन टाईल्स्, **मैंदर्गी** – खलील ट्रेडर्स, **वसंत विहार** – पूजा स्टील, **श्रीपुर** – शक्ती स्टील अँड किसान मॉल, **भोसे (क)** – पटेल स्टील, **कुरुल** – जगदंबा हार्डवेअर, **सोड्डी** – ओम ट्रेडर्स, **तडवळ** – स्वामी समर्थ ट्रेडर्स, **टाकळी सिकंदर** – लक्ष्मी टाईल्स, **नारखेड** – राहुल एंटरप्रायझेस.

आयकॉन स्टील
टीएमटी बार


## महत्त्वाचे

### पंतप्रधान मोदी आज महाराष्ट्र दौऱ्यावर

मुंबई : पंतप्रधान मोदी गुरुवारी पुणे येथे भेट देणार आहेत. या दौऱ्यात ते अनेक प्रकल्पांची पायाभरणी आणि लोकार्पण करतील. संध्याकाळी ६ वाजता जिल्हा न्यायालय मेट्रो स्थानक येथून स्वारगेटला जाणाऱ्या मेट्रो रेल्वेला झेंडा दाखवून ते या सेवेची सुरुवात करतील. त्यानंतर साडेसहा वाजता त्यांच्या हस्ते



२२ हजार ६०० कोटी रुपयांहून अधिक खर्चाच्या विविध प्रकल्पांची पायाभरणी तसेच लोकार्पण करण्यात येणार आहे. पुण्यातील भिडेवाडा येथे क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांनी स्थापन केलेल्या पहिल्या कन्या शाळेच्या स्मरणार्थ उभारल्या जाणाऱ्या स्मारकाच्या कार्याची कोनशिला पंतप्रधानांच्या हस्ते ठेवण्यात येईल. महासंगणकीय तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात भारताला स्वावलंबी करण्याप्रति पंतप्रधानांच्या वचनबद्धतेच्या अनुषंगाने, या दौऱ्यादरम्यान पंतप्रधानांच्या हस्ते तीन परम रुद्र महासंगणकांचे लोकार्पण करण्यात येईल.

### मनोज जरांगे नवव्या दिवशी 'थांबले'

**जालना :** मराठा आरक्षणासाठी आंदोलन करणाऱ्या मनोज जरांगे यांनी नवव्या दिवशी त्यांचे उपोषण थांबवले आहे. त्यांची तब्येत खालावल्याने त्यांनी उपोषण स्थगित करावे, अशी मागणी अंतरवाली सराटीमध्ये जमलेल्या मराठा बांधवांनी केली होती. त्यानंतर आत मनोज जरांगे यांनी आंदोलन स्थगित केले. अंतरवालीमध्ये आंदोलक म हिला आणि बांधवांच्या हस्ते पाणी पिऊन जरांगेंनी हे आंदोलन स्थगित केले. मनोज जरांगे यांच्यावर आता छत्रपती संभाजीनगरमधील रुग्णालयात उपचार केले जाणार आहेत. मनोज जरांगे यांची प्रकृती खालावल्याने त्यांनी उपचार घ्यावे, असा आग्रह बांधवांनी केला होता.


# आरक्षणाची कायदेशीर तपासणी झालीच पाहिजे

**● देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन**

**ठाणे, २५ सप्टेंबर**

महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीपूर्वी मराठा आरक्षणाबाबत राजकीय वाद सुरू आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी राज्य सरकारने मराठा समाजासाठी उचललेल्या महत्त्वाच्या पावलांची माहिती दिली तसेच आरक्षणाची कायदेशीर तपासणी करण्याची गरज व्यक्त केली.

कोर्टातही आरक्षण कायम राहील याची काळजी घेतली पाहिजे, असे ते म्हणाले. मराठा समाजाला कायदेशीर चौकटीत आरक्षण देण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचेही फडणवीस म्हणाले. पोलिस भरतीम ध्ये मराठा समाजासाठी महत्त्वाच्या संधी निर्माण होत आहेत. सारथी उपक्रमाने म राठा समाजातील १२ आयएएस, १८ आयपीएस आणि ४८० एम पीएससी अधिकारी तयार केले आहेत.



नवी मुंबईत दिवंगत अण्णासाहेब पाटील यांच्या जयंतीनिमित्त आयोजित माथाडी कामगारांच्या म ळाव्याला संबोधित करताना फडणवीस यांनी ही माहिती दिली. माथाडी कामगारांच्या हितासाठी अनेक निर्णय घेतले आहेत.

#### क्रांतिसूर्य अण्णासाहेब पाटील महामंडळ

आर्थिक आघाडीवर राज्य सरकारच्या कामगिरीवर प्रकाश टाकत माथाडी कामगारांच्या घरांचे प्रश्न सोडविण्याची गरज असल्याचे फडणवीस यांनी सांगितले. महामंडळाच्या माध्यमातून ८,४०० कोटी रुपयांहून अधिक उत्पन्न मिळवून दिल्याचे नमूद केले. महामंडळाला क्रांतिसूर्य अण्णासाहेब पाटील यांचे नाव देण्याची घोषणाही त्यांनी केली.


# 'मेक इन इंडिया'मुळे भारत अजेय

**● १० व्या वर्धापन दिनानिमित्त पंतप्रधानांनी केले कौतुक**

**नवी दिल्ली, २५ सप्टेंबर**

तुम्ही प्रत्येक जण एक नेता, दूरदर्शी आणि नवोदित आहात. तुमच्या अथक प्रयत्नांनी 'मेक इन इंडिया'च्या यशाला चालना दिली आहे आणि त्यामुळे आपला देश जागतिक कुतूहलाचा केंद्र बनला आहे. तुमच्या अथक प्रयत्नामुळे एका स्वप्नाचे एका शक्तिशाली चळवळीत रूपांतर केले आहे. 'मेक इन इंडिया'चा प्रभाव भारत अजेय असल्याचे दर्शवितो, असा गौरवपूर्ण उल्लेख पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केला आहे.

'मेक इन इंडिया' उपक्रमाच्या १० व्या वर्धापन दिनानिमित्त नरेंद्र मोदींनी लिंक्डइन या सोशल मीडिया साईटवर ब्लॉग लिहून भारतातील जनतेचे अभिनंदन केले. २०१४ मध्ये संपूर्ण देशात आमच्याकडे फक्त दोन मोबाईल उत्पादन युनिट्स होते. आज ही संख्या २०० हून अधिक झाली आहे. आमची मोबाइल निर्यात केवळ १,५५६ कोटी रुपयांवरून १.२ लाख कोटी रुपयांपर्यंत वाढली




आहे. ही आश्चर्यकारक ७,५०० टक्के वाढ आहे. भारतात वापरल्या जाणाऱ्या ९९ टक्के मोबाईल फोन भारतात बनवले जातात.

**स्टील उत्पादनात वाढ**

पंतप्रधान मोदींनी विविध क्षेत्रांतील काही महत्त्वाच्या कामगिरीवरही प्रकाश टाकला. पंतप्रधानांनी लिहिले, पोलादाच्या बाबतीत, भारत तयार पोलादाचा निव्वळ निर्यातदार बनला आहे, ज्याचे उत्पादन २०१४ पासून ५० टक्क्यांहून अधिक वाढले आहे. सेमीकंडक्टर उत्पादन क्षेत्राने १.५ लाख कोटी रुपयांहून अधिक गुंतवणूक आकर्षित केली आहे.

#### जगात मोहर

- खेळण्यांच्या क्षेत्रात भारताची निर्यात २३९ टक्क्यांनी वाढली.
- वंदे भारत ट्रेन, ब्रह्मोस क्षेपणास्त्र आणि मोबाईलचा उल्लेख.
- सर्व भारतीय वस्तूंवर 'मेक इन इंडिया'ची मोहर.
- इलेक्ट्रॉनिक्स ते अंतराळात भारतीय प्रतिभा.
- भारतात जगातील तिसऱ्या क्रमांकाचे सर्वात मोठे तंत्रज्ञानावर चालणारे स्टार्टअप.
- भारत जगातील उत्पादन आणि नावीन्यपूर्ण महासत्ता बनण्याच्या मार्गावर.

# अखेर सोलापूर विमानतळाला लायसन्स मंजूर : जिल्हाधिकारी

**मोदींच्या हस्ते आज पुण्यातून लोकार्पण**

**● नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाकडून हिरवा कंदील**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ सप्टेंबर-**

डिजिसीए म्हणजेच नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाकडून सोलापूर विमानतळाला लायसन्स मंजूर झाल्याने सोलापूरच्या होटगी रोड विमानतळावरून विमानसेवा सुरु होण्याचा मार्ग अखेर मोकळा झाला आहे. नूतनीकरण केलेल्या सोलापूर विमानतळाचे लोकार्पण गुरुवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते पुण्यातून ऑनलाईन पध्दतीने होणार आहे.



सोलापूर विमानतळावरून विमान सेवा सुरू करण्याच्या अनुषंगाने नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाच्या (डिजिसीए) पथकाने दि. ११ व १२ सप्टेंबर २०२४ रोजी विमानतळाची पाहणी केली होती. यामध्ये विमानतळाचे नियमन आणि सुरक्षा निरीक्षण प्रणालीद्वारे सुरक्षितता आणि हवाई सक्षमता तपासणी डीजीसीए कडून करण्यात आली होती. विमान वाहतूक सुरू करण्याच्या अनुषंगाने असलेली सर्व मानके सोलापूर विमानतळ प्राधिकरणाकडून पूर्ण करण्यात आल्यामुळे बुधवार, २५ सप्टेंबर रोजी डीजीसीएकडून सोलापूर विमानतळावरून विमान उडणे व उतरण्याचे परवाना (लायसन्स) मंजूर करण्यात आला आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिली. तत्पूर्वी ब्युरो ऑफ सिविल एव्हिजन सिक्युरिटी (नागरी विमान वाहतूक सुरक्षा ब्युरो) च्या अधिकाऱ्यांनी होटगी रोड सोलापूर विमानतळाची सुरक्षेच्या दृष्टिकोनातून विविध पातळीवर अत्यंत काटेकोरपणे तपासणी केली. विमानतळ प्राधिकरणकडून सुरक्षेच्या त्रुटींची पूर्तता केल्यानंतर पुन्हा ब्युरो ऑफ सिविल एव्हिएशन सिक्युरिटीचे अधिकारी तपासणीसाठी आले होते. त्यांची तपासणी झाल्यानंतर नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाची टीम विमानतळाच्या विविध सुरक्षा मानके याबाबत तपासणी करण्यासाठी आली होती. तपासण्याची सर्व प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर डीजीसीएकडून सोलापूर विमानतळाला आज विमान लँड होणे आणि टेकऑफ करण्याचे लायसन्स प्राप्त झालेले आहे. त्यामुळे सोलापूर विमानतळ येथून विमानसेवा सुरू होण्याची कार्यवाही लवकरच करण्यात येईल, अशी माहिती जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी दिली.

#### सोलापूरकरांचे स्वप्न होणार पूर्ण!

सोलापूरच्या होटगी रोड विमानतळावरून विमानसेवा सुरु होती. परंतु कंपनीकडून ती बंद झाली होती. विमानसेवा सुरु नसल्याने सोलापूरचा औद्योगिक विकास होत नसल्याची ओरड सातत्याने होत होती. दरम्यान विमानसेवा सुरु होण्यासाठी लगतच्या साखर कारखान्याची को-जनची अनधिकृत चिमणी अडथळा ठरत होती. म हापालिकेच्या अनेक आयुक्तांनी अनधिकृत चिमणी पाडण्याचे धाडस दाखवले नव्हते. अखेर चिमणी पडली अन् विमानसेवा सुरु होण्यासाठी परवाना देखील मिळाला. त्यामुळे सोलापुरातून विमानसेवा सुरु करण्याचा भाजपाने दिलेला शब्द अखेर पूर्ण करण्यासाठीचे यशस्वी प्रयत्न सुरु केले आहेत. सोलापूरकरांसह व्यापारी, उद्योजकांची मागणी अखेर पूर्ण होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

# हा एन्काउंटर कसा होऊ शकतो?

**● अक्षय शिंदे प्रकरणी उच्च न्यायालयाची विचारणा**

**तभा वृत्तसेवा । जमीर काझी**
**मुंबई, दि.२५ सप्टेंबर :**

बदलापूर लैंगिक शोषण प्रकरणातील आरोपी अक्षय शिंदे याला ज्या पद्धतीने मारण्यात आले .तो एन्काऊंटर कसा होऊ शकतो?, अशा शब्दात उच्च न्यायालयाने राज्य सरकारला बुधवारी खडसावित विचारणा केली.यासंबंधातील सर्व सीडीआर, सीसीटिव्ही फुटेज आणि सर्व पुरावे ३ आक्टोबरच्या सुनावणीवेळी सादर करण्याचे निर्देशही दिले.

बदलापूर प्रकरणातील पुरावे नष्ट करण्यासाठी माझ्या मुलाची हत्या करण्यात आल्याचा आरोप अक्षयचे वडील अण्णा शिंदे यांनी करून याप्रकरणी न्यायालयीन चौकशी करण्यासाठी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे.



त्याबाबत न्या.रेवती मोहिते -ढेरे व न्या. पृथ्वीराज चव्हाण यांच्या खंडपीठासमोर बुधवारी सुनावणी झाली. यावेळी या एन्काऊंटरप्रकरणी एका मागोमाग एक प्रश्नांची सरबत्ती करीत सरकारी वकिलांना धारेवर धरले. त्यामुळे या प्रकरणात विरोधकांच्या टीकेला अधिक जोर आला आहे. अण्णा शिंदे यांच्यावतीने वकील अमित कटारनवरे यांनी बाजू मांडताना या प्रकरणातील सहा आरोपी अद्यापही फरार असून तेदेखील तितकेच जबाबदार आहेत. माझ्या मुलावर खोटे आरोप लावण्यात आले आणि तो राजकारणाचा बळी ठरल्याचे सांगितले. हा एन्काउंटर फेक असल्याचा आरोप करून नजीकच्या काळात निवडणुका असल्याने हे सत्ताधाऱ्यांचा आदेशामुळे खून केल्याचा आरोप अक्षयच्या वडिलांच्या वकिलांनी केला आहे. ते पुढे म्हणाले, अशा पद्धतीच्या घटनांमुळे आपण पोलिसांना या प्रकारच्या गोष्टी करण्यासाठी पाठिंबा देतो, असा त्याचा अर्थ निघतो. मग कायदा आणि सुव्यवस्था कशासाठी आहे. देवाचा न्याय अशा पोस्ट सध्या सोशल मीडियावर फिरत आहेत. अशा घटनांमुळे पोलिसांना प्रोत्साहन दिलं जात आहे. जे न्यायव्यवस्थेसाठी अत्यंत घातक असल्याचे सांगण्यात आले.

#### अक्षय शिंदेच्या अंत्यसंस्काराला विरोध

एन्काऊंटरमध्ये मारला गेलेल्या अक्षय शिंदेवर बदलापुरातील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यास स्थानिक नागरिकांनी विरोध केला.त्यामुळे मंगळवारी रात्री मृतदेह कळवा रूग्णालयात ठेवण्यात आला. बुधवारी पोलीस बंदोबस्तात त्याच्यावर मोजक्या नातेवाईकांच्या उपस्थितीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

# उद्याचा सोलापूर बंद मागे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ सप्टेंबर-**

सोलापूर शहर व जिल्ह्यातील सर्व नागरिकांना अस आवाहन करण्यात येत आहे की, मनोज जरांगे पाटील यांचं उपोषण स्थगित झाल्यामुळे व मनोज जरांगे यांनी केलेल्या आवाहन नुसार उद्या जो आपण त्यांच्या समर्थनार्थ सोलापूर शहर व जिल्हा बंद पुकारला होता तो रद्द करण्यात येत आहे.

या बंदच्या निमित्ताने जिल्हयातील शेतकरी, कष्टकरी, सर्व समाजघटक , तसेच व्यावसायिक, शाळेतील व कॉलेजमधील विद्यार्थी व इतर सर्व व्यापारी संघटना यांची जी गैरसोय होणार होती. त्याबद्दल दिलगिरी व्यक्त करत आहोत, तसेच उद्याच्या बंद मध्ये सहभाग नोंदवणाऱ्या शहर व जिल्ह्यातील रिक्षा संघटना,विद्यार्थी वाहतूक संघटना, व्यापारी संघटना, शाळा महाविद्यालये, सोलापूर चेंबर ऑफ कॉमर्स, खासगी व शासकीय आस्थापना, व सर्व व्यवसायिक संघटना, पोलिस प्रशासनाचे आभार मानले.


## तातडीने पाहिजेत

सोलापूर, पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाड्यासह महाराष्ट्रातील लोकप्रिय **दैनिक सोलापूर तरुण भारत**मध्ये तातडीने खालील पदांची भरती करावयाची आहे.

| | |
|---|---|
| १) डेस्क उपसंपादक | २ पदे |
| २) बातमीदार | ४ पदे |
| ३) डिटीपी ऑपरेटर | २ पदे |
| ३) मार्केटिंग प्रतिनिधी | ४ पदे |

किमान तीन वर्ष कामाचा अनुभव आवश्यक आहे. संगणकावर स्वतंत्रपणे काम करता येणे आवश्यक आहे. आकर्षक पगार. इच्छुकांनी ७ दिवसांत अर्जासह कार्यालयात समक्ष भेटावे.

**संपर्क: ९८८११९१४४३**

पत्ता- १९/२०, दैनिक तरुण भारत कार्यालय, होटगी रोड, सोलापूर.



## संक्षिप्त वृत्त

### शिक्षक सामुहिक रजेवर; अक्कलकोटमधील शाळा बंद

**अक्कलकोट, दि.२५ सप्टेंबर-**

सोलापूर जि. प. शिक्षक समन्वय समितीने पुकारलेल्या आक्रोश मोर्चामध्ये सहभागी होण्यासाठी अक्कलकोट शहर-तालुक्यातील शिक्षक गेले होते. यामुळे जिल्हा परिषदेचे ८६९ व नगरपालिकेचे ४३ असे ९१२ शिक्षक सामुदायिक रजेवर गेल्याने शहर-तालुक्यातील जिल्हा परिषद व नगरपालिकेच्या सर्व शाळा बंद होत्या. अक्कलकोट शहर-तालुक्यात जिल्हा परिषदेचे ९५० शिक्षक व ४७ नगरपालिकेचे शिक्षक असे एकूण ९९७ शिक्षक कार्यरत आहेत. त्यापैकी जिल्हा परिषदेचे ८६९ शिक्षक व नगरपालिकेचे ४३ शिक्षक असे एकूण ९१२ शिक्षक सामुदायिक रजेवर गेले. फक्त ८५ शिक्षक सेवक कार्यरत होते. बहुतांशी सर्व नियमित शिक्षक रजेवर गेले होते. मोर्चाद्वारे विविध मागण्या मांडण्यात आल्या. शहर तालुक्यातील २५६ पैकी फक्त ४७ शाळा सुरू होत्या. शहर तालुक्यातील २०९ शाळा बंद होत्या. गटशिक्षणाधिकरी प्रशांत अरबाळे यांनी जि. प. व नगरपालिकेच्या ९९७ शिक्षकांपैकी ९१२ शिक्षक सामुदायिक रजेवर असल्याने शहर तालुक्यातील २०९ शाळा बंद होत्या. फक्त ४७ शाळा सुरु होत्या, असे सांगितले.

### बदलापुरा, शिंदेच्या एन्काऊंटरनंतर फडणवीसांच्या व्हायरल पोस्टरची चर्चा!

**मुंबई,दि.२५ सप्टेंबर:**

बदलापुरातील चिमुरड्यांवरील अत्याचारातील आरोपी अक्षय शिंदे याच्या एन्काऊंटरनंतर देशभरातून विविध प्रकारच्या प्रतिक्रिया उमटत आहेत. पोलिसांनी स्वसंरक्षणार्थ अक्षयवर गोळ्या झाडल्या आणि यात त्याचा मृत्यू झाल्याचे सरकारकडून सांगण्यात येत असताना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे बदला पुरा असे पोस्टर्स महानगरात लावण्यात आले असून सोशल मीडियावरही ते व्हायरल झाले आहेत. या पोस्टरमध्ये देवेंद्र फडणवीसांचा पिस्तुल हातात घेतलेला फोटो आहे. त्या पोस्टरवर बदला पूरा असे लिहिले आहे. या पोस्टरवर फडणवीस यांच्या फोटोशिवाय पक्षाचे किंवा कोणत्याही नेत्याचे, पदाधिकाऱ्यांचे नाव नाही. त्यामुळे भाजपा व फडणवीस यांच्या समर्थकांनी हे पोस्टर्स लावले असलेतरी ते नेमकी कोणी लावले? हे स्पष्ट झालेले नाही. त्यामुळे त्याबाबत प्रश्न उपस्थित केले जात आहे. अक्षय शिंदेच्या एन्काऊंटरनंतर मुंबईत ठिकठिकाणी हे पोस्टर्स पाहायला मिळत आहेत.तर काही ठिकाणी महाविकास आघाडीवर निशाणा साधत भारतीय जनता पक्षाचे काही बॅनर लावले आहेत. ज्यानुसार, महाविकास आघाडीच्या काळात पोलीस सरकारसाठी वसुलीचे काम करीत होती आणि आता पोलीस जनतेची सुरक्षा करीत असल्याचा उल्लेख त्यावर करण्यात आला आहे.

### चित्रपट निर्मात्या मधुरा पंडित यांचे निधन

**मुंबई,दि. २५ सप्टेंबर-**

चित्रपट निर्माते डॉ. व्ही. शांताराम यांच्या कन्या चित्रपट निर्मात्या, लेखक आणि संगीत प्रेमी मधुरा पंडित जसराज (वय ८६) यांचे बुधवारी (दि.२५) निधन झाले. यांच्या पार्थिवावर आज संध्याकाळी ओशिवरा स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. मधुरा यांनी त्यांचे पती पंडित जसराज यांच्यासोबत अनेक माहितीपट आणि नाटकांचं दिग्दर्शन केले. यासोबतच त्यांनी पंडित जसराज यांचं चरित्रही लिहिले. गेल्या काही महिन्यांपासून मधुरा यांची प्रकृती ठीक नव्हती. होत्या.



मधुरा पंडित जसराज यांनी दोन चित्रपट केले होते. त्याचबरोबर अनेक माहितीपट चित्रपटांचं दिग्दर्शनही त्यांनी केलं होतं. इतकंच नव्हे तर मधुरा यांनी काही पुस्तके लिहिली आहेत. यात मॅन हू चेंज्ड इंडियन सिनेमा आणि शांताराम यांचे ५५० पानांचे मराठी चरित्र या पुस्तकांचा समावेश आहे. मधुरा यांनी २०१० मध्ये आई तुझा आशीर्वाद हा पहिला मराठी चित्रपट दिग्दर्शित केला. वयाच्या ७३ व्या वर्षी दिग्दर्शक म्हणून पदार्पण करणाऱ्या त्या पहिल्या महिला ठरल्या. त्यामुळे त्यांची लिम्का बुक ऑफ रेकॉर्ड्समध्ये भारतीय चित्रपटसृष्टीतील सर्वात वयस्कर आणि नवोदित दिग्दर्शिका म्हणून नोंद झाली. या चित्रपटात पंडित जसराज आणि दिवंगत लता मंगेशकर यांची मराठी गाणी आहेत. त्यांचा विवाह १९६२ मध्ये पंडित जसराज यांच्याशी झाला. १९५४ मध्ये एका संगीत कार्यक्रमात दोघांची भेट झाली. पंडित जसराज यांचं ऑगस्ट २०२० मध्ये हृदयविकाराच्या झटक्याने निधन झालं.

# देशमुख सूत गिरणी सोलार प्लँट उभारणार

## चेअरमन डॉ. प्रभाकर माळी यांचे प्रतिपादन

### डॉ. भाई गणपतराव देशमुख शेतकरी सहकारी सूत गिरणीची सर्वसाधारण सभा




**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.२५ सप्टेंबर-**

कापसाचे दर हे चढेच राहिल्यामुळे त्यातुलनेत सूताला दर मिळत नसल्याने सूत गिरण्या चालवणे अतिशय जिकिरीचे झाले आहे. बहुतांश कामगार स्थानिक असून गिरणीच्या वाटचालीत त्यांचे योगदान बहुमोल असल्याने त्यांची रोजी रोटी चालू राहिली पाहिजे, या उद्देशाने आर्थिक अडचणीच्या काळातही सूत गिरणी चालू ठेवली आहे. भविष्यकाळात सूत गिरणीला माफक दरात वीज मिळावी म्हणून सुरुवातीला ३.२ मेगावेटचा सोलार प्लँट उभारणार आहे. ९ रिंगफ्रेम मशिनला कॉम्पॅक्ट सिस्टीम बसविण्याचे काम चालू आहे. यामुळे सूताला प्रति किलो ५ ते ७ रूपये दर ज्यादा मिळणार आहेत. व्याजातील बचत, सोलार प्रकल्पामुळे वीज खर्चातील बचत तसेच कॉम्पॅक्ट मशिनरीमुळे सूत गिरणीचा तोटा कमी होण्यास मदत होणार आहे, असे चेअरमन डॉ. प्रभाकर माळी यांनी सांगितले. डॉ. भाई गणपतराव देशमुख शेतकरी सहकारी सूत गिरणी मर्यादित, सांगोले या संस्थेची ४५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा मंगळवार दि.२४ सप्टेंबर रोजी संस्थेच्या कामगार भवनमध्ये चेअरमन डॉ. प्रभाकर माळी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली, यावेळी ते बोलत होते. स्व. डॉ. भाई गणपतराव देशमुख यांच्या प्रतिमेस डॉ. प्रभाकर माळी यांच्या हस्ते पुष्पार्पण करण्यात आले. यावेळी रतनताई देशमुख, डॉ. बाबासाहेब देशमुख, डॉ. अनिकेत देशमुख, अण्णासाहेब देशमुख, नितीन गव्हाणे, दादाशेठ बाबर, विठ्ठलराव शिंदे, रमेश जाधव, अरूण पाटील, बाळासाहेब काटकर, मारुतीआबा बनकर, सुरेश माळी, किशोर बनसोडे, सचिन देशमुख, संगम धांडोरे, लक्ष्मण माळी, गोविंद माळी, भारत माळी, शहाजीराव नलवडे, अवधूत कुमठेकर, रामचंद्र लवटे, विशालदिप बाबर, कल्पनाताई शिंगाडे, विद्याताई बाबर, उषाताई देशमुख, प्रतिभाताई माळी उपस्थित होते.

डॉ. प्रभाकर माळी यांनी प्रास्ताविकात संस्थेच्या कामकाजाचा आढावा सभेपुढे सादर केला. यावेळी डॉ. अनिकेत देशमुख यांनी आपले मनोगत व्यक्त केले. विषय वाचन व स्पष्टीकरण चीफ अकौंटंट आर. बी.पाटील, अकौंटंट डी. आर. शिरदाळे व संस्थेचे अंतर्गत लेखा परीक्षक के. एस. माळी यांनी केले. सर्व विषय सभेत एकमताने मंजूर झाले. त्यानंतर किशोर बनसोडे, शिवाजी शिंदे, बाळासाो वाळके, बाळासाहेब काटकर, सचिन देशमुख, दिघे गुरूजी, बशीरभाई तांबोळी, चंद्रकांत पाटील यांनी सूचना मांडल्या. चार्टर्ड अकौंटंट के. एस. माळी यांनी सभासदांनी मांडलेल्या सूचनांचे निराकरण केले. सूत्रसंचालन लेबर ऑफिसर विजय वाघमोडे यांनी तर बाळासाहेब बनसोडे यांनी आभार मानले.

# श्रीमंत गोपिकाबाई ह्या कणखर राजकारणी : इतिहास अभ्यासक कौस्तुभ कस्तुरे

### इतिहास कट्ट्याच्या गोष्ट तीचीचा दुसरा भाग संपन्न

**तभा वृत्तसेवा,**
**मुंबई, दि. २५ सप्टेंबर-**

''नानासाहेब पेशव्यांची पत्नी व थोरल्या बाजीरावाची लाडकी सून असलेल्या श्रीमंत गोपिकाबाई ह्या कणखर राजकारणी, लष्करी मोहिमा आखण्याच्या कामात वाकबगार व करारी कुटुंब प्रमुख होत्या,'' असे प्रतिपादन इतिहास अभ्यासक व लेखक कौस्तुभ कस्तुरे यांनी बोरीवलीतील इतिहास कट्ट्यावर बोलताना व्यक्त केले.



भारतीय इतिहास संकलन समिती कोकण प्रांत बोरीवली भाग व बोरीवली सांस्कृतिक केंद्रा तर्फे आयोजित केलेल्या बोरीवली (प.) येथील सांस्कृतिक केंद्राच्या ज्ञानविहार ग्रंथालयात इतिहास कट्टा या उपक्रमा अंतर्गत गोष्ट तीचीच्या दुसऱ्या भागातील गोष्ट दुसरी श्रीमंत गोपिकाबाई सांगताना ते बोलत होते. कस्तुरे यांनी श्रीमंत गोपिकाबाई या विषयावर अभ्यासपूर्ण व इतिहासातील अनेक भ्रामक समजुतींना छेद देणारे व्याख्यान सादर केले. ते म्हणाले की '' नानासाहेब पेशव्यांची पत्नी व थोरल्या बाजीरावांची लाडकी सूनबाई असलेल्या गोपिकाबाईंचे चित्र अनेक ऐतिहासिक बखरींमधून, एक खलनायकी, आतल्या गाठीची, फक्त आपल्या पतीच्याच यशासाठी आसुसलेली स्त्री म्हणून रंगवले गेले आहे. पण अनेक ऐतिहासिक कागदपत्रे नीट पाहिली तर श्रीमंत गोपिकाबाई या खमक्या, कणखर, लष्करी मोहिमांच्या आखणीत वाकबगार व करारी अशा स्त्रीचे चित्र आपल्या डोळ्यांसमोर येते. पानिपतात आपल्या नवऱ्याचा व भावासारख्या लाडक्या दीराचा सदाशिवराव भाऊ यांचा मृत्यू व नंतर आपल्या पाचही पुत्रांच्या झालेल्या मृत्यूंचे दुःख पचवून ही बाई उभी राहिली. सवाई माधवराव या आपल्या नातवाला राज्यकारभाराचे योग्य शिक्षण मिळावे म्हणून अखेरपर्यंत प्रयत्नशील राहिली. त्यासाठी पुण्याच्या शनिवार वाड्यातील सारे वैभव सोडून, दूर गंगापूरला आयुष्याच्या अखेरच्या क्षणापर्यंत प्रयत्नशील राहून मानाने जगली, हे गोपिकाबाईंचे खरे जीवन चरित्र कौस्तुभ कस्तुरे यांनी जमलेल्या इतिहास प्रेमी स्त्रीपुरुष श्रोत्यांसमोर उदाहरणांसह मांडले. प्रायोजक श्रीधर साठे, संस्कार भारती कोकण प्रांताचे प्रचारक उदयजी शेवडे यांच्यासह अनेक इतिहास प्रेमी चोखंदळ श्रोते उपस्थित होते.

# रेडे परिसरात दमदार पाऊस

**तभा वृत्तसेवा,**
**सदशिवनगर, दि. २५ सप्टेंबर-**

रेडे (ता. माळशिरस) येथे आज परतीच्या पाऊसाने दमदार हजेरी लावल्याने शेतकऱ्यांमधून समाधान व्यक्त होत आहे.

जून महिन्यात झालेल्या पावसानंतर पावसाने या भागाकडे पाठ फिरवली होती. जून महिन्यात झालेल्या पाऊसाने व नंतर वेळोवेळी झालेली रिमझिम पाऊसने पिके जोमात आली. त्यामधील काही पिकांची काढणी झाली. परंतु काही पिके अद्याप काढायची आहेत. आज झालेल्या परतीच्या पावसाने या भागातील नाले, ओढे ओसंडून वाहिले असून सर्व बंधारेही भरले आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांची चिंता मिटली आहे. परंतु परतीच्या पावसाने उभ्या पिकांचे मात्र नुकसान होणार आहे.


**तालुका कार्यकारी दंडाधिकारी तथा अपर तहसिलदार मंद्रुप, ता. दक्षिण सोलापूर यांचे न्यायालयात**

**संकलन-जमीनबाब**

दूरध्वनी क्र. (०२१७) २२५५५५१ Email- tahmandrup@gmail.com

जा.क्र. जमीनबाब/जन्म-मृत्यू दाखला/एस.आर.-९१/२०२४
मंद्रुप, दि. २३/०९/२०२४.

**जाहीर प्रसिध्दीकरण**

**श्री. बसप्पा कुमठेकर,** - अर्जदार
वय-४९ वर्षे, धंदा-नोकरी,
रा. मंद्रुप, ता.दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर.
विरूध्द
**ग्रामसेवक, ग्रामपंचायत मंद्रुप,** - सामनेवाला
**ता. दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर.**

ज्याअर्थी, यातील अर्जदार श्री. बसप्पा कुमठेकर हे वर नमूद पत्यावरील कायमचे रहिवासी असून अर्जदार यांची आजी कै. काशिबाई लक्ष्मण कुमठेकर यांचा मृत्यू दि.२०/०९/१९८४ रोजी गाव-मंद्रुप, ता. दक्षिण सोलापूर येथे झालेला आहे, परंतु सदर मृत्यूची नोंद मंद्रुप ग्रामपंचायतीस झालेली नाही. तरी सदर मृत्यूची नोंद होऊन तसा मृत्यू दाखला मिळणेकामी जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम २०२३ चे कलम १३ (२) (३) अन्वये ग्रामपंचायत मंद्रुप यांना आदेश होणेकामी इकडील न्यायालयात प्रस्तुत अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी, तमाम लोकांना या जाहीर नोटीसीने कळविणेत येते की, कै. काशिबाई लक्ष्मण कुमठेकर यांच्या मृत्यूची नोंद होऊन तसा मृत्यू दाखला मिळणेकामी कोणाची काही हरकत असल्यास अथवा सदर अर्जाचे पृष्ठ्यर्थ अथवा विरूध्द कोणाचे काही म्हणणे असल्यास ही नोटीस प्रसिध्द झालेपासून १५ दिवसांच्या आत स्वतः अथवा आपल्या विधिज्ञामार्फत हजर राहून आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाचीही काही हरकत अथवा म्हणणे न आल्यास कोणाचीही काहीही हरकत नाही, असे समजून अर्जाच्या चौकशीअंती कै. काशिबाई लक्ष्मण कुमठेकर यांच्या मृत्यू तारखेची नोंद होऊन तसा मृत्यू दाखला देण्याचा आदेश मंद्रुप ग्रामपंचायतीस या कोर्टाकडून देण्यात येईल. मुदतीनंतर येणाऱ्या हरकती, तक्रारी अथवा म्हणणे विचारात घेतले जाणार नाही. हे आज दि. २३/०९/२०२४ रोजी आमचे सहीने व कोर्टाच्या शिक्याने प्रसिध्दी केले असे.

शिक्का

सही/-
(सुजित नरहरे)
तालुका कार्यकारी दंडाधिकारी
तथा अपर तहसिलदार मंद्रुप,
ता. दक्षिण सोलापूर.


# कुरनूर मध्यम प्रकल्प भरला

### २१० क्युसेस पाणी सोडले



**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २५ सप्टेंबर-**

अक्कलकोट तालुक्याची वरदायनी म्हणून ओळख असलेले कुरनूर धरण बुधवारी रात्री ८ वाजता १०० टक्के भरले आहे. या प्रकल्पाच्या तीन दरवाजातून २१० क्युसेसने पाणी बोरी नदीपात्रात सोडण्यात आले आहे.

कुरनूर धरण कधी भरणार याची तालुकावासीयांना प्रतिक्षा होती. ही प्रतिक्षा संपली. कुरनूर धरणावर पावसाचे प्रमाण वाढल्यास धरणात येणारा प्रवाह वाढतो. सांगवी, बणजगोळ, गौडगाव गोडगाव खुर्द, मिरजगी, रुद्देवाडी, संगोगी ब, बबलाद, सातनदुधनी हे आठ बंधारे या सोडलेल्या पाण्याने भरण्याची अशा निर्माण झाली आहे. कुरनूर धरणावर तालुक्यातील ५१ गावांचा व अक्कलकोट, मैंदर्गी, दुधनी शहराचा पाणीपुरवठा प्रश्न यामुळे सुलभ झाला आहे. पाणी टंचाई दूर होण्यास मदत होणार आहे.


**उपविभागीय अधिकारी पंढरपूर विभाग पंढरपूर यांचे कार्यालय**

(पद्मावती तळे, एमटीडीसीच्या पाठीमागे, स्टेशन रोड, पंढरपूर)
(अपील - संकलन)

Phone No. 2186-223229 Email - sdopandharpur@gmail.com

आरटीएस/अपिल क्र./२७३/२०१८ आरटीएस/अपिल क्र./२७३/२०१८

**पंढरपूर येथील उपविभागीय अधिकारी पंढरपूर विभाग पंढरपूर यांचे कोर्टात**

**जाहीर नोटीस**

| वादीचे नाव व पत्ता | प्रतिवादींचे नाव व पत्ता |
|---|---|
| **१. हरीभाऊ माधव शिंदे,**<br><br>**२. नारायण माधव शिंदे,**<br>दोघे रा. कोंढार चिंचोली.<br>ता. करमाळा, जि. सोलापूर.<br><br>**३. तुकाराम माधव शिंदे,**<br>रा. सुनिता नगर, स.नं. ४७,<br>वडगांव शेरी, पुणे-१४.<br><br>**४. ज्ञानदेव माधव शिंदे,**<br>रा. घर नं. १३, साई समर्थ प्लाझा,<br>एस.टी. स्टॅन्ड जवळ, भिगवण,<br>ता. इंदापूर, जि. पुणे. | **१. भास्कर विठोबा गवळी**<br>I. महादेव भास्कर गवळी<br>II. पौर्णिमा ऊर्फ सत्यभामा भास्कर गवळी<br>III. सिताबाई भास्कर गवळी<br>IV. गिताबाई भास्कर गवळी<br>V. रुक्मिणी भास्कर गवळी<br>सर्व रा. अर्धनारी, ता. मोहोळ,<br>जि. सोलापूर.<br>**२. अशोक मुरलीधर जगताप (चौधरी),**<br>**३. ज्ञानेश्वर मुरलीधर जगताप (चौधरी),**<br>**४. राजू मुरलीधर जगताप (चौधरी).**<br>नं. २ ते ४ रा. कोष्टी गल्ली.<br>बारामती, जि. पुणे.<br>**५. शैला सुधाकर भोसले.**<br>रा. बारामती रोड, इंदापूर, जि. पुणे.<br>**६. बबन शंकर तावरे,**<br>**७. सुभाष शंकर तावरे,**<br>**८. हनुमंत शंकर तावरे,**<br>**९. मनोहर शंकर तावरे,**<br>**१०. मिराबाई जालिंदर भापकर,**<br>**११. रेखा विठ्ठल साळुखे,**<br>**१२. कल्पना ज्ञानेश्वर जगताप,**<br>नं. ६ ते १२ सर्व रा. कोंढार चिंचोली<br>ता. करमाळा, जि. सोलापूर.<br>**१३. सत्यभामा रामदास भापकर,**<br>रा. कारखेल, ता. बारामती जि. पुणे.<br>**१४. मुक्ताबाई उत्तम भोसले,**<br>रा. खराडेवाडी, ता. बारामती जि. पुणे.<br>**१५. बंडू अर्जुन शिंदे,**<br>रा. सातववस्ती, बारामती जि. पुणे.<br>**१६. बाळू अर्जुन शिंदे,**<br>रा. सातववस्ती, बारामती जि. पुणे.<br>**१७. सुमन ज्ञानेश्वर चौधरी,**<br>रा. कोष्टी गल्ली, बारामती जि. पुणे.<br>**१८. अंजना नवनाथ वाळके,**<br>रा. काळेवाडी ता. दौंड, जि. पुणे.<br>**१९. रंजना विश्वनाथ मोटे,**<br>रा. पारगाव, ता. श्रीगोंदा, जि. अहमदनगर<br>**२०. खंडू शिवाजी गवळी,**<br>रा. अर्धनारी, ता. मोहोळ, जि. सोलापूर |

**महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६६ चे कलम २४७ अन्वये**

मौजे अर्धनारी, ता. मोहोळ येथील गट नं. ३७/२/ब/३ फेरफार नं. १९४९ संदर्भात मंडळ अधिकारी वाघोली ता. मोहोळ यांनी दिनांक ३०/०४/२०१२ रोजी दिलेल्या निर्णयाविरुध्द अपिलार्थी यांनी सदरचे अपिल दाखल केले आहे.

प्रस्तुतचे अपीलामध्ये वादी व प्रतिवादी यांना रितसर नोटीसा काढुन त्यांची बजावणी करणेत आली आहे. परंतु प्रतिवादी नं.१ मयत आहेत. त्यांच्या वारसांचा पत्ता अपुर्ण असलेने ते अनुपस्थित राहीले आहेत.

त्याअर्थी तुम्हास या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, सदर कामातील प्रकरण हे निर्णयासाठी प्रलंबित ठेवण्यात आहे. तरी तुम्ही व्यक्तीशः अथवा तुमचे विधिज्ञांमार्फत सदर कामी १५ दिवसाच्या आत हजर रहावे अन्यथा तुम्हास या कामी काहीही सांगावयाचे नाही असे समजुन तुमचे गैरहजेरीत अपिल चौकशीचे काम पुर्ण केले जाईल याची नोंद घ्यावी.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस असे. ता. १८/०९/२०२४.

शिक्का

सही/-
(सचिन इथापे)
उपविभागीय अधिकारी
पंढरपूर विभाग, पंढरपूर



**जाहीर नोटीस**

दि. कि. अर्ज नं. १९८/२०२४
निशाण क्र. ०७

**सोलापूर येथील मे. जिल्हा न्यायाधिश सो. (श्री. योगेश अ. राणे साहेब) यांचे कोर्टात**

**गंगाधर पिता भिमाशंकर शेरी**
वय ४२ वर्षे, धंदा- शेती,
रा. मु.पो. खजुरगी, ता. आळंद,
जि. गुलबर्गा, (कर्नाटक राज्य)
कु. जान्हवी पिता मल्लिकार्जुन कापसे
वय १४ वर्षे, धंदा- शिक्षण
हिचे प्रत्यक्षात प्रतिपालक म्हणून रा. वरीलप्रमाणे
मु.पो. खजुरगी, ता. आळंद, जि. गुलबर्गा — **अर्जदार**
विरुध्द
**संगनबसप्पा उर्फ संगप्पा चनबसप्पा कापसे** - **सामनेवाला**
वय ५१ वर्षे, धंदा शेती
रा. मु.पो. तोळणूर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर

ज्याअर्थी, अर्जदार यांची मोठी सख्खी बहिण व अज्ञान जान्हवी हिची आई नामे लक्ष्मी हिचा विवाह सन २०१० पूर्वी मयत मल्लिकार्जुन चनबसप्पा कापसे यांचेबरोबर झालेला होता. त्यांचे लग्नसंबंधातून कु. जान्हवी हिचा जन्म दि. २४/१०/२०१० रोजी झाला आहे. अज्ञान जान्हवीच्या जन्मानंतर तिचे वडील नामे मल्लिकार्जुन चनबसप्पा कापसे यांचे दि. २७/०६/२०११ रोजी आजारपणामुळे मार्कंडेय हॉस्पिटल, सोलापूर येथे निधन आले. मल्लिकार्जुन चनबसप्पा कापसे हे मल्लिकार्जुन चनबसप्पा श्रीगी उर्फ कापसे या नावाने देखील ओळखले जात होते. तद्नंतर कु. जान्हवी हिची आई नामे लक्ष्मी मल्लिकार्जुन कापसे हिचे दि. ०४/०५/२०२० रोजी निधन झाले आहे, तिचे निधनाचे वेळी ती व कु. जान्हवी हे दोघेही त्यांचे भावाकडे म्हणजेच यातील अर्जदाराकडे राहणेस होते. अज्ञान जान्हवी मल्लिकार्जुन कापसे हिचे नांवे खालील मिळकत आहे.

मिळकतीचे वर्णनः - जिल्हा सोलापूर पैकी तालुका अक्कलकोट पैकी मौजे तोळणूर येथील शेतजमीन यासी गट नं. ६/३ याचे एकुण क्षेत्र ०३ हेक्टर ०१.६० आर यासी आकार रु. ११-४० पैसे यासी चतुःसिमा पूर्वेस गट नं. ६/४, पश्चिमेस गट नं. ६/२, दक्षिणेस गट नं. ४ व ५ व उत्तरेस गट नं. १२१

यातील सामनेवाला हा कु. जान्हवी हिचा काका म्हणजेच कु. जान्हवी हिचे वडीलांचा भाऊ आहे. सामनेवाला हा गेल्या दोन वर्षापासून जोरजबरदस्तीने सदरील शेतजमीन त्यांचे ताब्यात घेवून त्यात ऊसाची लागवड करुन त्याचे उत्पन्न मिळवित आहे, त्यामुळे अज्ञान जान्हवी हिचे आर्थिक फार मोठ्या प्रमाणात नुकसान होत करीत आहे.

तसेच अर्जदार हा त्याचे बहिण लक्ष्मी हिचे मयतानंतर अज्ञान कु. जान्हवी मल्लिकार्जुन कापसे या मुलींचा आजतागायत सर्व शिक्षणाचा व पालनपोषणाचा सर्व खर्च करत आलेला आहे व करणेस तयार आहे. त्यामुळे अर्जदाराने अज्ञान मुलगी जान्हवी हिचा शरीर सांभाळ करणारा व तिची मालमत्तेची व्यवस्था पाहण्यास प्रतिपालक म्हणून अर्जदाराची नेमणूक होणेकरिता गार्डीयन ॲण्ड वॉर्डस ॲक्ट १८९० चे कलम ७ व ८ अन्वये अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी, याबाबत कोणाची काही तक्रार/ हरकत अथवा इतर कांही म्हणणे असल्यास, त्यांनी स्वतःच्या अथवा वकीलामार्फत या मे. कोर्टात तारीख २५/१०/२०२४ अथवा नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसात लेखी म्हणणे मांडावयाचे असल्यास मांडावे. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास, कोणालाही म्हणणे मांडावयाचे नाही, असे समजून मे. कोर्ट पुढील योग्य ते आदेश करतील याची नोंद घ्यावी. ही जाहीर नोटीस दिली ता.२७/०९/२०२४

सही/-
लिपीक

शिक्का

हुकूमावरून
सही/-
अधिक्षक
जिल्हा न्यायालय, सोलापूर


# पर्यावरणपूरक 'ग्रीन स्टील' निर्मिती ही भविष्यातील गरज

## मुंबईतील आयफा 'स्टीलएक्स प्रदर्शनात आठशे स्टील उद्योजक सहभागी

**मुंबई, दि. २५ सप्टेंबर-**

आयफा स्टीलएक्स २०२४ प्रदर्शन मुंबई एक्झिबिशन सेंटर येथे पार पडला. संपूर्ण भारतातून ८००हून अधिक स्टील उद्योजक, बांधकाम व्यावसायिक आणि तज्ज्ञ सहभागी झाले होते. यावेळी केंद्रीय स्टील व अवजड उद्योग मंत्री एच. डी. कुमारस्वामी, सन्माननीय राज्य मंत्री (स्टील व अवजड उद्योग) भूपती राजू श्रीनिवास वर्मा, स्टील मंत्रालयाचे सचिव संदीप पोंडरिक आणि सहसचिव अभिजित नरेंद्र हे उपस्थिती होते. या परिषदेमध्ये केवळ भारतातीलच नव्हे तर नेपाळ, श्रीलंका आणि इथिओपिया यांसारख्या शेजारील देशांतील उद्योजकांचा सहभाग होता, ज्यामुळे या कार्यक्रमाचे जागतिक महत्त्व वाढले.




> ''स्टीलएक्स २०२४'' हा शाश्वत स्टील उत्पादक संघटना आयफाद्वारे आयोजित वार्षिक कार्यक्रम आहे. जो स्टील क्षेत्रातील उद्योजक, शासकीय अधिकारी आणि नवकल्पक उद्योजक यांच्यातील सहकार्याला प्रोत्साहन देतो. कार्यक्रमाचा उद्देश उद्योगातील शाश्वत नवकल्पना आणि प्रगतीवर लक्ष केंद्रित करणे आहे, ज्यामुळे उद्योगाच्या भविष्यातील वाटचाल ठरवली जाते.
>
> **-योगेश मानधनी, अध्यक्ष, आयफा**

आयफाचे अध्यक्ष योगेश मानधनी, महासचिव कमल अग्रवाल यांच्या नेतृत्वात हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. शाश्वतता आणि स्टील उद्योगाच्या भविष्यासाठी आव्हानांचा सामना करण्यावर या कार्यक्रमात विशेष भर दिला गेला. योगेश मानधनी यांनी त्यांच्या भाषणात स्टील उद्योगातील शाश्वततेच्या महत्त्वावर प्रकाश टाकला आणि सेंकडरी स्टील क्षेत्राच्या मोठ्या योगदानाचा उल्लेख केला, ज्याचा भारताच्या एकूण स्टील उत्पादनात ५३ टक्के वाटा आहे. त्यांनी सरकारला लहान, मध्यम आणि मोठ्या उद्योगांसाठी कच्चा माल आणि विशेषतः लोह धातूचा साठा मिळवून देण्यासाठी समर्पित खाणी प्रदान करण्याचे आवाहन केले. तसेच स्क्रॅपिंग धोरण, ग्रीन स्टील नवकल्पना आणि उद्योगवाढीसाठी बीआयएस नियमांचे अद्ययावत करण्याची गरजही मांडली. त्यांनी स्टील आयातीवर निर्बंध घालण्याचाही मुद्दा उपस्थित केला. स्टील मंत्रालयातील मंत्री आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या सर्व मुद्द्यांवर सहकार्याची ग्वाही यावेळी दिली, जेणेकरून या क्षेत्राचा शाश्वत विकास सुरू राहील. दोन दिवस चाललेल्या या कार्यक्रमात आठ विशेष सत्रे आयोजित करण्यात आली, ज्यात युवा, दुसऱ्या पिढीतील तरूण उद्योजकांनी शाश्वतता, संसाधन कार्यक्षमता आणि तंत्रज्ञानातील नवकल्पनांवर विचारमंथन केले. १००हून अधिक प्रदर्शनकर्त्यांनी सहभाग घेतला, ज्यांनी स्टील उत्पादनाच्या भविष्याला आकार देणारे प्रगत तंत्रज्ञान आणि उपाय येथे सादर केले. आयफा स्टीलएक्स २०२४ चा समारोप प्रतिष्ठित 'इस्पात उद्योग रतन पुरस्कार' देऊन करण्यात आला.

सोलापूर तरुण भारत
https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

## अग्रलेख...

# हिंदू मंदिरांच्या मुक्तीचा मार्ग

महाराष्ट्र शासनाने एकापाठोपाठ एक नवनव्या योजनांना मंजुरी देण्याचा सपाटा लावला असून त्यातून लोकमन जिंकण्याचा सिलसिलाही कायम ठेवला आहे. एकंदरीत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे त्यांना मिळालेला अडीच वर्षांचा सत्ताकाळ सार्थकी लावण्याचा प्रयत्न करीत आहेत. गेल्या काही महिन्यात त्यांच्यासह उपमुख्यमंत्रिद्वय देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांच्या नेतृत्वात घेण्यात आलेल्या निर्णयांकडे बघता हे सरकार अडीच वर्षांचा विकास कामांचा राहिलेला बॅकलॉग येत्या काळात पूर्ण करतील, असा विश्वास वाटायला लागला आहे. मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेत पार पडलेल्या राज्यस्तरीय शिखर समितीच्या बैठकीत महाराष्ट्रातील तीर्थक्षेत्रांच्या विकासासाठी ३०५ कोटींच्या आराखड्यास मंजुरी देण्यात आली आहे. हा निर्णय राज्याच्या धार्मिक क्षेत्रातील मागासलेपण दूर करणारा ठरणार आहे. यातून राज्य शासनाने गेल्या अनेक दिवसांपासूनच्या जनतेच्या मागणीची पूर्तता केली आहे. भरीव निधी उपलब्ध करून देण्यात आल्यामुळे तीर्थक्षेत्र आणि पर्यटन स्थळांच्या विकासासाठी तत्परतेने पावले उचलली जातील. या योजनेंतर्गत श्री क्षेत्र पंढरपूर येथील दर्शन मंडप व दर्शन रांगेच्या सुविधेसाठी १२९ कोटींचा खर्च केला जाणार आहे. सोबतच भगूर येथील स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या जीवनावर आधारित थीम पार्कसाठी ४० कोटींचा तर अंमळनेर येथील मंगळग्रह देवस्थानाच्या विकासासाठी २५ कोटींचा निधी खर्च केला जाणार आहे. याच बैठकीत अमरावती जिल्ह्यातील दर्यापूर येथील संत गाडगेबाबा यांची कर्मभूमी ऋणमोचन येथील १८ कोटींच्या विकास आराखड्यालाही मान्यता देण्यात आली आहे. एकीकडे शासन तीर्थस्थळांचा विकास करीत असल्याने भक्तगणांचे चेहरे उजळून निघाले असताना, देशभरातील अनेक मंदिरांच्या झालेल्या सरकारीकरणामुळे धार्मिक क्षेत्राच्या प्रगतीला खीळ बसली असल्याची वस्तुस्थिती नाकारली जाऊ शकणार नाही, याकडे विश्व हिंदू परिषदेने लक्ष वेधले आहे. अनेक ठिकाणांच्या निधीचा गैरव्यवहार होत असून मंदिरांमधील देवतांसाठी अर्पण झालेला पैसा अन्य कामांसाठी खर्च केला जात आहे. याबाबत विहिंपचे नेते डॉ. सुरेंद्र जैन यांनी आक्षेप नोंदवून, मंदिरांचे सरकारीकरण नको तर सामाजिकीकरण व्हावे, अशी केलेली मागणी स्वागतार्हच म्हणायला हवी. मंदिरांचे सामाजिकीकरण झाल्यास प्रसादामध्ये होणारी भेसळ, मंदिर परिसरात दर्शनार्थींची होणारी गैरसोय, आरतीसाठी होणारी रेटारेटी, दर्शनार्थींच्या वाहनांसाठी वाहनतळ उपलब्ध नसणे, पूजेची हेळसांड, मंदिराला प्राप्त होणाऱ्या देणग्यांची होणारी उधळपट्टी आदींवर तोडगा काढला जाऊ शकतो.

तिरुपती बालाजी मंदिरातील प्रसादाची पवित्रता हिंदूंच्या आस्थेशी निगडित आहे. तेथील लाडूमध्ये जनावरांची चरबी मिसळली गेल्याने जगभरातील बालाजी भक्तांच्या आस्थेला तडा गेला असून सारा हिंदू समाज संतप्त झाला आहे. या मंदिराचे व्यवस्थापन आंध्रप्रदेश सरकारतर्फेकेले जाते. तेथील प्रसादामध्ये झालेल्या भेसळीसाठी त्या मंदिरात काम करणारे अन्य धर्मीय कंत्राटदार आणि त्यांचे कर्मचारीच जबाबदार असू शकतात, असा निष्कर्ष काढला जात आहे. भाविकांकडून मिळणाऱ्या देणग्यांचा राजकीय नेते मोठ्या प्रमाणात गैरप्रकार करीत असल्याचेही निदर्शनास आले आहे. मंदिराच्या झालेल्या सरकारीकरणामुळे ही सारी परिस्थिती उद्‌भवली आहे. तामिळनाडू, केरळ, कर्नाटकामध्ये मंदिराच्या देणग्यांचा दुरुपयोग धर्मांतरासाठी होत असल्याच्या बाबीही निदर्शनास आल्या आहेत. विश्व हिंदू परिषदेने अद्याप याबाबत आंदोलनाची घोषणा केलेली नाही. तथापि, भविष्यात असे प्रकार वाढले तर निश्चितच संघटनेचे देशभरातील नेते आणि कार्यकर्ते रस्त्यावर उतरल्याशिवाय राहणार नाहीत. दरम्यान, तिरुपती मंदिरातील प्रसादाची नॅशनल डेअरी डेव्हलपमेंट बोर्डाने तपासणी केली असता त्यात गोवंश आणि डुकराची चरबी आढळल्यामुळे हिंदूंच्या मंदिरांमध्ये धुडगूस घालण्याचे मोठे कट-कारस्थान तर आखले जात नाही ना, अशी शंका व्यक्त केली जाऊ लागली आहे. देशाच्या विविध प्रांतातील धर्मगुरूंनी या प्रकाराबद्दल तीव्र शब्दात नापसंती व्यक्त करून मंदिरे सरकारच्या नियंत्रणातून मुक्त करण्याची आणि अन्य धर्मीयांप्रमाणेच हिंदू व्यवस्थापन मंडळ स्थापन करण्याची मागणी केली आहे. आंध्रचे उपमुख्यमंत्री पवन कल्याण यांनी तर याबाबत ११ दिवसांचे प्रायश्चित्त घेण्याची घोषणा केली आहे. आपल्या देशात मुस्लिम आणि ख्रिश्चनांच्या धार्मिक स्थळांसाठी स्वतंत्र कायदे आहेत. त्यामुळे या धार्मिक स्थळांच्या व्यवस्थापनात सरकारला कुठलाही हस्तक्षेप करता येत नाही. येथे मोठ्या प्रमाणात देशविरोधी शिकवणीचा प्रचार-प्रसार केला जात असल्याची अनेक प्रकरणे पुढे आली आहेत. अशा अहिंदू धार्मिक स्थळांमध्ये पूजेसाठी जाणाऱ्या भाविकांना हिंदूविरुद्ध उकसावले जाण्याचे प्रकारही नवे राहिलेले नाहीत. हीच बाब ध्यानात घेऊन आर्ट ऑफ लिव्हिंगचे श्री श्री रविशंकर, बागेश्वर धामचे धीरेंद्रकृष्ण शास्त्री आणि सद्‌गुरू जग्गी वासुदेव यांनी हिंदू मंदिरांचे व्यवस्थापन आता धर्मप्रवण हिंदूंकडे देण्याची ठोस मागणी केली आहे. त्यांच्या मागणीला मोठ्या प्रमाणात समर्थनही मिळत आहे. काडतुसांतून गाय आणि डुकराची चरबी वापरल्यामुळे इंग्रजांविरुद्ध १८५७ चा उठाव झाला होता, हे धर्मभावनेशी खेळणाऱ्यांनी कदापि विसरू नये. हिंदूंची मंदिरे हिंदूंच्याच ताब्यात असावी, अशी मागणी श्री श्री रविशंकर यांनी केली आहे. हिंदू भाविक पराकोटीच्या श्रद्धेने तिरुपतीचा लाडू ग्रहण करतात आणि त्यांना नंतर कळते की, त्यात गायीची चरबी मिसळली आहे. त्यामुळे यापुढे हिंदूंच्या मंदिरांचे व्यवस्थापन सरकार नव्हे तर हिंदूच बघतील, अशी घोषणा सद्‌गुरू जग्गी वासुदेव यांनी केली आहे. देशातील सनातन धर्मीयांच्या विरोधात हे सुनियोजित कारस्थान आहे, याबाबत चौकशी व्हावी आणि दोषींना देहान्त प्रायश्चित्त व्हावे. यासाठी दुसरी कोणतीही शिक्षा योग्य ठरणार नाही, अशी भूमिका बागेश्वर धामचे धीरेंद्र शास्त्री यांनी घेतली आहे. या संतांचा संताप व्यवहार्यच म्हणायला हवा आणि त्यांच्या भावनांची दखल घेऊन योग्य ती कारवाई केली जावी. प्रसंगी यातील न्यायालयीन अडथळेदेखील दूर केले जावे. १९४७ पासून देशात बहुतांशी काँग्रेसची सरकारे होती, तरी भारतीय राज्यव्यवस्था ही वामपंथी विचारधारेची राहिली. या व्यवस्थेने सदैव मुस्लिमांचे तुष्टीकरण केले, हिंदू संस्कृती नष्ट कशी होईल, याची काळजी घेतली. या व्यवस्थेने शरिया कायद्यात कधीच लुडबूड केली नाही आणि मुस्लिमांनीही त्यांना तसे वागू दिले नाही. ख्रिश्चनांच्या बाबतीतही तसाच प्रकार होत आहे. सारे चर्च कंपनी कायद्याप्रमाणे नोंदणीकृत असल्याने ती धर्मादाय आयुक्तांच्या अधिकार कक्षेत येत नाहीत. पण शासनाच्या ताब्यात भारतातील सुमारे चार लाख मठ-मंदिरे असून त्यावर सुमारे १८ राज्य सरकारांचे नियंत्रण आहे. सरकारी नियंत्रणाखाली गेल्याने ही लुटीची केंद्रे बनली आहेत. प्रत्येक मंदिराचे एक स्वतंत्र वैशिष्ट्य असते. स्थळ, धर्म, परंपरा, देवता यानुसार प्रत्येक मंदिराचे स्वरूप आणि ओळख वेगवेगळी असू शकते. एकच नियम सर्वांना लागू होत नाही. एका ठिकाणी यज्ञाहुती अर्पण केली जात असेल तर दुसऱ्या ठिकाणी मद्य, मद्यपान निषिद्ध मानले जाते. मंदिरांचे हे वैविध्यपूर्ण वैशिष्ट्य ते त्यांना एक वेगळेपणा प्रदान करते. काही कारणास्तव कुणी व्यवस्थापनात हस्तक्षेप केला तर त्या मंदिराचे माहात्म्य, पावित्र्य नष्ट होते. त्यामुळे मंदिरांची मालकी कोणाकडे असावी, यावर समाजमाध्यमांवर सातत्याने चर्चा झडत असतात. हिंदूंना आपल्या मंदिर आणि मठांवर सरकारचे नियंत्रण असणे, ही चेष्टाच वाटते. काही जण विचारतात की शिखांची गुरुद्वारे, मुस्लिमांच्या मशिदी आणि ख्रिश्चनांच्या चर्चमध्ये अन्य धर्मीयांची लुडबूड खपवून घेतली जाऊ शकेल का? मग हिंदूंनीच इतरांची लुडबूड का सहन करावी? अनेक हिंदू तर आता, विनंत्या अर्ज खूप झाले; रस्त्यावर येऊनच साऱ्या समस्या सोडवाव्या लागतील, असे विचार व्यक्त करीत आहेत. तिरुपतीच्या मंदिरात विश्वस्तांमध्येच नव्हे तर मुस्लिम आणि ख्रिस्ती कर्मचाऱ्यांनीही घुसखोरी केली आहे. ही बाब ध्यानात घेता, त्यांच्याकडून हिंदूंची सेवा होण्याची अपेक्षाच व्यक्त केली जाऊ शकत नाही. या पोटार्थींना बाहेरचा रस्ता दाखवून हिंदू मंदिरांच्या मुक्तीचा मार्ग मोकळा करावा लागणार आहे. यातूनच सरकारीकरणातून सामाजिकीकरणाचा मार्ग प्रशस्त होणार आहे.

## इतस्ततः

**डॉ. विवेक राजे**

# अहल्याबाई : राजधर्माची जाण...

अहल्याबाई होळकर यांना राजधर्माचे मर्म निश्चितच कळले होते. मागील लेखात 'राजधर्म' हा शब्द अहल्याबाईंनी घातलेली राजकारण आणि धर्मकारणाची सांगड या संदर्भात आला होता. जीवनाचा वेगवान प्रवाह प्रत्येकच गोष्टीला बदलणे भाग पाडतो. प्रजेला या बदलणाऱ्या जगाची धग सगळ्यात आधी जाणवत असते. प्रजेचे मन भूतकाळात रमत असते. कारण माणूस आणि माणसांचा समूह स्थितिशील असतो. बदलांचा वेग समाजाच्या बदलण्याच्या वेगापेक्षा नेहमीच जास्त असतो. होळकरांच्या राज्याला स्थैर्य प्राप्त झाले, याची जाणीव कदाचित मल्हाररावांपेक्षा अहल्यादेवींनाच लवकर झाली असावी. खाजगीकडील कारभार अहल्यादेवीच पाहात होत्या. होळकरांच्या राज्यात खाजगीची गादी अर्थात दिवाणगिरी चालू होती. ही खाजगीची गादी म्हणजे दिवाणगिरी मल्हारराव होळकरांच्या कारकीर्दीपासून अहल्याबाईंच्या सासू गौतमाबाई यांच्या नावे होती. ती, गौतमाबाईंच्या निधनानंतर नैसर्गिकरीत्या अहल्यादेवींकडे चालत आली. खाजगीचे उत्पन्न दौलतीहून वेगळे ठेवले जात असे. या खाजगी मिळकतीचाच वापर अहल्याबाईंनी विविध प्रकारांच्या धर्मकार्यासाठी केला. धर्म स्थापना व जोपासना करण्यासाठी केला.

अहल्याबाई होळकर यांचे अनेक गुण त्यांच्या लहानपणीच दृगोचर होत होते. अर्थात असे दिसणारे गुण, लक्षात येण्यासाठीदेखील, तशीच दृष्टी असलेली, वडीलधारी माणसं अवतीभोवती असावी लागतात. ती तशी लाभली की, व्यक्तिमत्त्वाला सहजपणे पैलू पाडले जातात. अहल्याबाई या दृष्टीने नशीबवान म्हणाव्या लागतात. कारण त्यांना असे पारखी दृष्टी असलेले सासू-सासरे गौतमाबाई आणि मल्हारराव यांच्या रूपाने मिळाले. अहल्याबाईंच्या विवाहाची, खरी की खोटी सांगता येत नाही, पण एक गोष्ट सांगितली जाते. त्यांचे वडील माणकोजी शिंदे चौंडी गावचे पाटील होते. त्या चौंडी गावात नदीकिनारी एक महादेवाचे मंदिर होते. त्या मंदिराजवळ नदीकाठी एकदा थोरल्या बाजीराव पेशव्यांच्या सैन्याचा तळ पडला होता. त्या मंदिरात लहानगी अहल्या कुणाबरोबर दर्शनासाठी गेली होती. तिथे तिने नदीकाठच्या वाळूत वाळूचीच महादेवाची पिंड बनवली. त्याच वेळी पेशव्यांच्या सैन्यातील एक घोडा उधळला. मंदिर परिसरात पळापळ झाली. अहल्येबरोबर असलेल्या मैत्रिणी, मोठी माणसे सुरक्षित जागी पळून गेली. लहानगी अहल्या मात्र आपण तयार केलेल्या शिवपिंडीचे रक्षण करण्यासाठी, त्यावर आपल्या शरीराची ढाल करून तेथेच ओणवी पडून राहिली. उधळलेला घोडा नियंत्रित केला गेला. मात्र, ती तेथे तशीच पडून असतानाच दोन घोडेस्वार तिच्या जवळ आले. त्यापैकी एकाने तिला थोडे दरडावूनच विचारले, ''काय गं, अशा वेळी पटकन पळून स्वतःची सुरक्षा करण्याऐवजी इथेच काय पडून राहिलीस? तुला जिवाची भीती नाही का वाटली?'' प्रश्न विचारणाऱ्या घोडेस्वाराच्या डोळ्याला डोळा भिडवत अहल्येने उत्तर दिले, ''मीही गेली असती, पण कदाचित माझी महादेवाची पिंड या प्रकारात उद्‌ध्वस्त झाली असती, म्हणून मी इथेच थांबले.''



घोडेस्वार म्हणाला, ''उद्‌ध्वस्त झाली असती तर असं काय मोठंस बिघडलं असतं?'' त्यावर लहानगी अहल्या उत्तरली, ''आपली संस्कृती, आपल्या परंपरा आणि आपण केलेल्या नवनिर्माणाचे प्राणपणाने रक्षण करणे हे आपले कर्तव्य असते, असे वडीलधारी माणसं सांगतात. मी माझं कर्तव्य करीत होती...''

असं सांगतात की, प्रश्न विचारणाऱ्या घोडेस्वाराला तिचे कौतुक वाटले. प्रश्न करणारा घोडेस्वार म्हणजे थोरले बाजीराव पेशवे होते आणि त्यांच्या बरोबर असलेला घोडेस्वार म्हणजे मल्हारराव होळकर होते. गोष्ट खरी की खोटी सांगता येत नाही; पण पुढे अहल्येचे खंडेराव या होळकर पुत्राशी लग्न ठरले. त्यात थोरल्या बाजीराव पेशव्यांचा पुढाकार होता आणि लग्न शनिवारवाड्यात लागले. यावरून प्रत्येकाने आपल्या मते खरे-खोटे ठरवावे. मात्र, आपण व्यक्ती म्हणून किंवा समाज म्हणून जे जे समाज हितकारक असे निर्माण करतो, त्याचे संरक्षण करणे आपले कर्तव्य असते, याची अहल्याबाईंना त्या वयातही जाणीव होती, हे सांगणारी ही गोष्ट आहे.

राजधर्म असं सांगतो की, आपल्या देशात जे जे म्हणून आपल्याला वारसाने मिळाले आहे, त्या वारसाचे प्राणपणाने रक्षण आणि संवर्धन केले पाहिजे. काळानुरूप त्यात बदलही केलाच पाहिजे. मात्र, हा बदल करताना त्याचा गाभा किंवा मूल्यांची मात्र जपणूक केलीच पाहिजे. आपल्या संस्कृतीची, परंपरांची प्रसंगी प्राणांचे मोल देऊनही जपणूक केली पाहिजे. ही जाणीव-दृष्टी अहल्यादेवींना एका वेगळ्या स्तरावर घेऊन जाते. त्यांचं आराध्य दैवत जरी शिव असले, तरी त्यांनी विविध तीर्थक्षेत्री सोयी-सुविधांची निर्मिती केली. ही निर्मिती करताना त्यांनी नेहमीच हिंदू धर्माचा विशाल दृष्टिकोन ठेवला. कोणताही पंथ, आराध्य दैवत, प्रदेश, भाषा वा सत्ता यावर आधारित आपपर भाव न ठेवता फक्त हिंदू तीर्थस्थाने एवढेच डोळ्यांसमोर ठेवून धर्मशाळा, मंदिरं, रस्ते, अन्नक्षेत्र यांचे निर्माण केले आणि एकदा का निर्मितीचे, जीर्णोद्धाराचे कार्य पूर्ण झाले की, त्या त्या प्रदेशातील लोकांवरच त्याची जबाबदारी दिली. पुन्हा आवश्यक त्या ठिकाणी निधी पुरवठा करण्यासाठी वर्षासने लावून दिली. राजधर्माचे एक प्रमुख तत्त्व म्हणजे आपण विश्वस्त आहोत, ही मानसिकता. अहल्याबाई होळकर या विश्वस्त पदाला (ट्रस्टिशिप) आयुष्यभर जागल्या. प्रत्येक ठिकाणी जरी निधी होळकरांच्या खाजगीकडून खर्च करण्यात आला तरी त्या ठिकाणच्या कामात वा व्यवस्थापनात त्यांनी ढवळाढवळ कधी केली नाही. अर्थात आवश्यक तेव्हा अपप्रवृत्तींना लगाम लावण्यासदेखील कधी कमी केले नाही.

सत्ता, पैसा, संसाधने, प्रदेशांचा विकास हे सगळं भौतिक इतिहास कसा घडला, हे दाखविणारे निकष असतात. तर विचारवंतांनी आणि संवेदनशील राज्यकर्त्यांनी सद्‌सद्‌विवेक बुद्धीने निर्माण केलेल्या तत्त्वज्ञानावर आधारित असलेला धर्म, संस्कृती, वाङ्मय, निर्मिती स्वातंत्र्य यातूनच एक आध्यात्मिक इतिहास निर्माण होत असतो. भारताला अशा भौतिक आणि आध्यात्मिक इतिहासाची फार मोठी परंपरा लाभलेली आहे. हिंदूंचे कोणतेही मंदिर हे मशीद किंवा चर्च पाडून त्यावर बांधलेले आढळणार नाही. कोणत्याही संरचनेच्या मुळाशी ती संरचना निर्माण करणाऱ्या व्यक्तीची वैचारिक, तात्त्विक आध्यात्मिक बैठक असते. ही वैचारिक आणि तात्त्विक बैठक त्या व्यक्तीला लाभलेल्या तरल आणि संवेदनशील बुद्धिमत्ता, त्याला लाभलेले आर्थिक, सामाजिक, कौटुंबिक वातावरण यावर अवलंबून असते. अहल्याबाई त्यांच्या जीवनात विरागी वृत्तीने प्रजेची सेवा करीत राहिल्या. सुभेदारांची सून या नात्याने त्यांनी सत्ता राबवताना अस्सल हिंदु तत्त्वज्ञानावर आधारित हिंदू धर्माचे दृश्य रूप असलेली विविध मंदिरे, नदीघाट, धर्मशाळा, रस्ते बांधून हिंदू संस्कृतीच्या कलाविष्काराचे, विचार स्वातंत्र्याचे संवर्धन करण्यात आपली संपूर्ण हयात खर्ची घातली. राजधर्म म्हणजे फक्त ठरावीक प्रदेशावर सत्ता स्थापन करणे नसून त्या प्रदेशातील आध्यात्मिक सांस्कृतिक जाणिवांचे, तत्त्वज्ञानाचे संवर्धन आणि जपणूक करणे असते. तोच खरा राजधर्म असतो. आपल्याला मिळालेल्या वारशाचे, संस्कृतीचे, आत्मिक ज्ञानाचे आणि त्यासाठी आवश्यक असलेल्या आध्यात्मिक स्वातंत्र्याचे प्राणपणाने करावयाची जपणूक, त्यासाठी जिवापाड केलेले प्रयत्न म्हणजेच राजधर्म. आजही अहल्याबाईंना असलेल्या राजधर्माची उमज आणि जाणिवेची साक्ष या देशात विविध तीर्थक्षेत्री त्यांनी उभारलेल्या मंदिर, घाट, अन्नक्षेत्र यांच्या रूपाने देणारी जिवंत स्मारकंच नव्हेत काय?

९८८१२४२२२४

## वेध

**नंदकिशोर काथवटे**

# बुलेट आणि बॅलेटने नक्षल चळवळ खिळखिळी

सुमारे चार दशकांपासून गडचिरोलीच्या जंगलात आपल्या दहशतीच्या बळावर लोकांवर अधिराज्य गाजविणारी नक्षल चळवळ पार खिळखिळी झाली आहे. दरम्यानच्या काही वर्षांत बुलेट आणि बॅलेटचा योग्य वापर करत पोलिस व जिल्हा प्रशासनाने हत्तीएवढे बळ एकवटलेल्या नक्षल चळवळीची पाळेमुळे खोदून काढली आहेत. हिंसाचार, जाळपोळ आणि हत्यासत्राने गडचिरोली जिल्हा राज्याच्या पटलावर धगधगत होता. रोज कुठे ना कुठे, कुणाची ना कुणाची हत्या होत होती. निष्पाप लोकांचे बळी घेत नक्षल चळवळ गेल्या २५ वर्षांत गडचिरोली जिल्ह्यात चांगलीच फोफावली. मात्र, नंतरच्या काही वर्षांत गडचिरोली जिल्ह्यात येणाऱ्या आयपीएस अधिकाऱ्यांनी नक्षलवादाला समजून घेतले आणि त्या दिशेने ॲक्शन प्लॉन तयार करून नक्षल्यांविरोधात आपले पाऊल उचलले. त्याचीच फलश्रुती आता दिसू लागली असून बुलेट आणि बॅलेटच्या प्रभावी वापराने नक्षल चळवळ तिथरबिथर झाली, असेच म्हणावे लागेल. नक्षल्यांच्या दहशतीपोटी निवडणुकांमध्ये लोकांचा सहभाग कमी नोंदवला जात होता. जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या निवडणुका नक्षल्यांच्या दहशतीखाली घेतल्या जात होत्या. या निवडणुकांवर त्यांचा प्रभाव स्पष्टपणे जाणवत होता. मात्र, जिल्हा प्रशासनाने व पोलिस प्रशासनाने एकत्र येत मागील १० वर्षांत नक्षल चळवळीविरुद्ध जनजागृती घडवून आणत लोकांच्या मनातील भीती घालवून शासनाप्रती विश्वास निर्माण केला आणि नक्षल चळवळीत सामील झालेल्या बड्या नक्षल्यांनासुद्धा आत्मसमर्पण करायला भाग पाडले. जे नक्षली शरण आले, त्यांच्या पुनर्वसनासाठी शासनाने पुढाकार घेतला आणि त्यांना समाजात मानाने जीवन जगण्यासाठी सहकार्य केले. पोलिसांनी अतिदुर्गम भागात जनजागरण मेळावे आयोजित करून लोकांच्या समस्या जाणून घेतल्या. त्यानंतर दादालोरा खिडकीच्या माध्यमातून आदिवासींच्या समस्या सोडविण्यासाठी प्रशासनाच्या मदतीने पोलिसांनी अतिशय मोलाची कामगिरी बजावली. आदिवासींच्या मुला-मुलींना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न केले. त्यांच्यासाठी सहल व इतर कौशल्य विकास कार्यक्रम आयोजित करून त्यांना प्रशिक्षण दिले. याशिवाय जी तरुण मुलं नोकरीच्या शोधात आहेत, अशा मुलांना विविध कंपन्यांमध्ये नोकऱ्या मिळवून दिल्या. यामुळे पोलिसांप्रती जनतेच्या मनात असलेला रोष कमी झाला. याशिवाय त्यांच्याबद्दलचा विश्वासही पोलिसांना आत्मसात करता आला. तत्कालीन पोलिस अधीक्षक राजवर्धन यांच्यानंतर आलेल्या बहुतांश पोलिस अधिकाऱ्यांनी सोशल पोलिसिंगचा उत्तम वापर केला आणि गेल्या १० वर्षांत नक्षल चळवळ खिळखिळी करण्यात यश आले. गडचिरोलीत पोलिसांनी घेतलेल्या आक्रमक भूमिकेमुळे जे नक्षली गडचिरोली जिल्ह्याच्या सीमावर्ती भागात हिंसाचाराच्या घटना घडवत होते, त्यांनी इतर राज्यांच्या दिशेने धूम ठोकली असल्याचे आता दिसू लागले आहे. सोमवारी छत्तीसगडमध्ये झालेल्या चकमकीत २५ लाख रुपयांचे बक्षीस असलेला रूपेश नामक गडचिरोलीचा नक्षलवादी ठार झाला आहे. गडचिरोली जिल्ह्यातील पोलिसांच्या नक्षलविरोधी अभियानामुळे नक्षल चळवळ आता कमजोर झाली आहे. दोन महिन्यांपूर्वी गडचिरोली पोलिसांनी अख्खे नक्षल्यांचे दलम उद्‌ध्वस्त करून १२ नक्षल्यांना यमसदनी धाडले होते. या घटनेनंतर नक्षल्यांच्या मनात पोलिसांविषयी धडकी भरली असून धानोरा तालुक्यातील नक्षल्यांचे दलम जवळपास संपुष्टात आले आहे. गडचिरोली पोलिस प्रशासनातील सी-६० पोलिस पथकाच्या जांबाज कामगिरीमुळे नक्षल चळवळ आता संपण्याच्या मार्गावर आहे. निवडणुकीदरम्यान असणारी नक्षल्यांची भीती आता संपली असून मतदानाची टक्केवारी इतर जिल्ह्यांच्या तुलनेत वाढली आहे आणि याचे श्रेय खऱ्या अर्थाने पोलिस विभागाचे आहे. अतिशय दुर्गम भागात प्रतिकूल परिस्थितीत पोलिसांनी लोकशाही जिवंत ठेवण्यासाठी बंदोबस्त उभारला आणि निवडणुकीत होणारे घातपात उधळून लावले. त्यामुळे मागील १० वर्षांत गडचिरोली जिल्ह्यातील निवडणुकादेखील सुरळीत होऊ लागल्या आहेत. जी गडचिरोली नक्षल्यांच्या दहशतीमुळे राज्याच्या पटलावर उमटली जात होती, ती गडचिरोली आता विकासाच्या नावाने राज्यभरात ओळखली जाऊ लागली आहे. सुरजागडसारखे लोह प्रकल्प गडचिरोलीत सुरू झाल्यामुळे गडचिरोलीच्या विकासाची नांदी सुरू झाली असून नक्षल चळवळ मात्र हळूहळू खिळखिळी होऊ लागली आहे. जनतेलाही आता नक्षलवाद हा विकासाला मारक असल्याचे जाणवू लागले आहे. पोलिसांनी गोळीचे उत्तर गोळीने दिले व जे शरण आले, अशा नक्षल्यांना मुख्य प्रवाहात आणून माणुसकी आणि औदार्याचा प्रत्यय दिला आहे.

९९२२९९९५८८

## दिल्ली वार्तापत्र

**श्यामकांत जहागीरदार**

# 'एक देश एक निवडणूक' शक्य आहे का?

'एक देश एक निवडणूक'च्या प्रस्तावाला केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता मिळाल्यामुळे सरकार या मुद्यावर किती गंभीर आहे, ते दिसून आले आहे. २०२९ च्या लोकसभा निवडणुकीसोबत देशातील सर्व राज्यांच्या विधानसभा निवडणुका घेण्याचा मार्ग यामुळे काही प्रमाणात प्रशस्त झाला आहे. लोकसभा तसेच विधानसभांच्या निवडणुका वेगवेगळ्या होत असल्यामुळे पैशाचा तर चुराडा होतोच, पण देशात वर्षभर कोणत्या ना कोणत्या राज्यात आचारसंहिता लागू असते. यामुळे प्रशासन ठप्प होते. विकास कामेही रखडली जातात. एकत्र निवडणुका घेतल्यामुळे पैशाची तर मोठ्या प्रमाणात बचत होईल तसेच विकास कामेही ठप्प होणार नाहीत. राजकीय पक्ष आणि त्यांचे नेते वर्षभर निवडणुकीच्या मोडमध्ये राहतात. त्यातून ते बाहेर येतील आणि लोकहिताच्या मुद्यांवर विचार करू शकतील.

देशात एकाच वेळी लोकसभा आणि विधानसभेच्या निवडणुका झाल्या तर तीन लाख कोटी रुपयांची बचत होणार असल्याचा दावा संरक्षणमंत्री राजनाथसिंह यांनी नुकताच जम्मूत केला आहे. यावरून 'एक देश एक निवडणूक'ची आवश्यकता अधोरेखित होते. 'एक देश एक निवडणूक'बाबत व्यापक विचार करून अहवाल सादर करण्यासाठी केंद्र सरकारने माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या अध्यक्षतेत एक उच्चाधिकार समिती स्थापन केली होती. या समितीने लोकसभा निवडणुकीपूर्वी आपला अहवाल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना सादर केला होता. कोविंद समितीने एक देश एक निवडणूकच्या मुद्यावर देशातील ६२ राजकीय पक्षांशी संपर्क साधला; यापैकी ३२ राजकीय पक्षांनी याला पाठिंबा दिला. १५ राजकीय पक्षांनी विरोध केला. अन्य १५ राजकीय पक्षांनी या मुद्यावर कोणतीही भूमिका घेतली नाही. एक देश एक निवडणूकबाबत सरकारच्या निर्णयाला इंडिया आघाडीतील काँग्रेस आणि अन्य काही विरोधी पक्षांनी विरोध दर्शवला आहे. मोदी सरकारच्या कोणत्याही निर्णयाला विरोध करण्याची काँग्रेस आणि अन्य विरोधी पक्षांना सवय झाली आहे. मोदी सरकारचा निर्णय जनतेच्या आणि देशाच्या व्यापक हिताचा असला, तरी काँग्रेस त्या निर्णयाला विरोध करते, हे आतापर्यंत अनेक उदाहरणांवरून दिसून आले आहे. १९५१-५२ पासून १९६७ पर्यंत देशात लोकसभेसोबतच विधानसभेच्याही निवडणुका होत होत्या. त्यामुळे असा प्रकार भारताच्या इतिहासात पहिल्यांदाच होत आहे, असे नाही. १९६७-६८ मध्ये तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी राजकीय कारणाने काही राज्य सरकारे बरखास्त केल्यामुळे तसेच लोकसभाही १९७० मध्ये कार्यकाळ संपण्याच्या आधीच बरखास्त करावी लागल्यामुळे लोकसभेसोबत विधानसभेच्या निवडणुका होण्याचा क्रम खंडित झाला. त्यानंतर तो आजतागायत रुळावर आला नाही. आजही लोकसभेसोबत चार राज्यांच्या विधानसभांच्या निवडणुका होत आहेत. यात ओडिशा, आंध्रप्रदेश, अरुणाचल प्रदेश यांचा समावेश आहे. लोकसभा आणि विधानसभा निवडणुका एकत्र घ्यायला ज्या कारणावरून काँग्रेस आणि अन्य विरोधी पक्ष विरोध करत आहे, त्याच कारणावरून या दोन राज्यातील काँग्रेसच्या राज्य शाखांनी कधीच विरोध केल्याचे दिसले नाही. याचाच अर्थ 'एक देश एक निवडणूक'च्या मुद्यावर काँग्रेस पक्षाची भूमिका दुटप्पीपणाची आहे, असे म्हणायला हरकत नाही. जगातील अनेक देशांत लोकसभेसोबत विधानसभांच्या निवडणुका होतात. स्वीडन, फ्रान्स, कॅनडा, अमेरिका आदी देशांत अजूनही एकत्र निवडणुका घेतल्या जातात. १९५१-५२ मध्ये झालेल्या पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीत ११ कोटी रुपये खर्च झाले होते. २०२४ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीत किती खर्च झाला, ते नेमके समजू शकले नाही. २०१९ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीवर ६० हजार कोटी रुपये खर्च झाले होते. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीचा खर्च निश्चितच यापेक्षा जास्त असेल. लोकसभा तसेच विविध राज्यांच्या विधानसभा निवडणुकीत सगळे राजकीय पक्ष जो खर्च करतात, तो पैसा यापेक्षा वेगळा असतो. अनधिकृत अंदाजानुसार हा खर्च १ लाख कोटी रुपयांवर नक्कीच जात असेल. केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत एक देश एक निवडणूकबाबतच्या प्रस्तावाला मंजुरी मिळाली असली, तरी देशात एकाच वेळी लोकसभेच्या तसेच विधानसभेच्या निवडणुका घेता येतील, असे नाही. या मार्गात अनेक कायदेशीर आणि घटनात्मक अडचणी आहेत. यासाठी कायद्यात सुधारणा कराव्या लागतील तसेच घटनादुरुस्तीही करावी लागेल. विशेष म्हणजे संसदेत ही घटनादुरुस्ती दोन तृतीयांश बहुमताने पारित करावी लागेल. लोकसभेत यासाठी ३६१, तर राज्यसभेत १५६ मतांची आवश्यकता आहे. लोकसभेत भाजपाचे २४० सदस्य आहेत. रालोआतील मित्रपक्ष पकडून ही संख्या २९३ वर जाऊ शकते. इंडिया आघाडीतील पक्षांचे संख्या २३७ आहे. ११ अन्य आहेत. ११ अन्यांनी रालोआला पाठिंबा दिला तरी रालोआचे संख्याबळ ३०४ च्या वर जात नाही. म्हणजे रालोआला बहुमतासाठी ५७ सदस्य कमी पडतात. राज्यसभेत रालोआचे १२१ तर इंडिया आघाडीचे संख्याबळ ८७ आणि अन्य २५ आहेत. अन्य २५ रालोआसोबत आले तरी संख्याबळ १४६ होते. तरीसुद्धा रालोआला १० मतांची गरज पडते. त्यामुळे लोकसभा आणि राज्यसभेत यासंदर्भातील घटनादुरुस्ती विधेयक पारित करून घेण्यासाठी भाजपाला वा मोदी सरकारला काही राजकीय पक्षांना आपल्या बाजूला वळवावे लागणार आहे. ही बाब कठीण असली तरी अशक्य नक्कीच नाही. एक देश एक निवडणूकबाबतचा आग्रह मोदी सरकारने धरला असला, तरी १९८२ मध्ये सर्वप्रथम निवडणूक आयोगानेच तसा प्रस्ताव पारित केला होता. विशेष म्हणजे देशात लोकसभेसोबत विधानसभेच्या निवडणुका घेणे शक्य आहे का, अशी विचारणा मोदी सरकारने २०१५ मध्येच निवडणूक आयोगाकडे केली होती. ओ. पी. रावत तेव्हा मुख्य निवडणूक आयुक्त होते, त्यावेळी निवडणूक आयोगाने या प्रस्तावाच्या सर्व पैलूंचा अभ्यास करून देशात एकाच वेळी लोकसभेच्या तसेच विधानसभेच्या निवडणुका घेणे शक्य असल्याचे म्हटले होते. एकप्रकारे आयोगाने एकत्र निवडणुकीचे आव्हान स्वीकारले होते. एक देश एक निवडणूक संकल्पना प्रत्यक्षात आणणे मोदी सरकारसाठी कठीण असले तरी अशक्य नाही. मोदी सरकार जम्मू-काश्मीरला विशेष दर्जा देणारे ३७० कलम रद्द करू शकते तर देशात लोकसभेसोबत सर्व राज्यांच्या विधानसभांच्या एकत्र निवडणुकाही घेऊ शकते... 'मोदी है तो मुमकिन है.'

९८८१७१७८१७

## तरुण पिढी व्यसनाच्या आहारी

व्यसन मग ते कोणतेही असो वाईटच. व्यसनांच्या आहारी जाणारी व्यक्ती स्वतःबरोबर इतरांनाही व्यसनात ओढते. यामुळे त्या व्यक्तीसोबत कुटुंब, समाज, मित्रपरिवार या सर्वांची अतोनात हानी होते. आज या देशातील तरुण वर्ग मोठ्या प्रमाणात व्यसनाच्या आहारी जाताना दिसत आहे. शाळा-महाविद्यालयातील तरुण मुलं मौजमजा म्हणून या व्यसनांना बळी पडत आहेत. देशाची फार मोठी युवाशक्ती वेगवेगळ्या प्रकारांच्या व्यसनांच्या आहारी जात असल्यामुळे या देशाचे व समाजाचे नुकसान होत आहे. व्यसनाधीन तरुण निष्क्रिय बनतो, आळशी बनतो. एक तरुण व्यसनाच्या आहारी गेला की, तो समाजातील इतरांनाही व्यसनाच्या विळख्यात गुंफतो. पिढ्याच्या पिढ्या व्यसनाधीन होतात. कुटुंबातील ज्येष्ठ व्यक्तींनी आपल्या पाल्यासमोर कोणत्याही प्रकारचे व्यसन करू नये. देशाला २०५० पर्यंत महासत्ता बनवायचे असेल तर युवकांना व्यसनापासून परावृत्त करणे, ही प्रमुख जबाबदारी कुटुंब, समाज व देशाची आहे. देशात मोठ्या प्रमाणात बेकारी आहे. उद्योग-व्यवसायाला पाहिजे तशा सोयी-सवलती नाहीत, शेती-उद्योग ठप्प होत आहेत, छोटे-मोठे गृह व लघु उद्योग बंद पडलेले आहेत. युवकांच्या हाताला काम नाही. अशा स्थितीत निराश, हताश तरुण व्यसनाचा मार्ग स्वीकारतो. यासाठी सरकारने तरुण वर्गाला उद्योग-व्यवसाय उभा करण्यास आर्थिक हातभार लावावा. नोकरी उपलब्ध करून द्यावी. त्यांच्यावर जबाबदारीची सरकारी कामे योग्य मोबदला देऊन सोपवावी. छोटे उद्योग उभारणीसाठी आर्थिक हातभार लावल्यास आजचा तरुण व्यसनापासून मुक्त होईल व रोजीरोटीला लागेल. युवकांनीही संयम व सामंजस्य राखावे. लगेच व्यसनांच्या आहारी जाऊन स्वतःचे भविष्य विस्कळीत करून घेऊ नये.

**धोंडीरामसिंह राजपूत**/९४२१३१२२४४

## वाचक पत्रे


## 'असे केले तर हे होईल...!'

भक्ती प्रवचन-कीर्तन हे जीवनाला आनंदाकरिता आहे. पूर्वी सर्व भक्तांनी आपल्या मतानुसार भक्ती केली, परंतु नव्याने इलेक्ट्रॉनिक्स माध्यम प्रगत झाल्यापासून घरपोच भक्ती कशी करावी व अनेक महाराजांचे प्रवचन-कीर्तन घरीच ऐकायला मिळतात. त्यामध्ये जे महाराज ज्या देवाचे भक्त आहे ते त्यांची कथा सांगतात; परंतु सोबत असे केले तर हे फळ तुम्हाला मिळेल, वारंवार सांगतात त्यामुळे भक्ती ही फळाकरिता आहे, असे सांगणे चुकीचे आहे. त्यामुळे श्रद्धा कमी व फळाकडे जास्त लक्ष असते. फळ मिळाले नाही तर भक्ती मार्ग देवसुद्धा बदलतात. तेव्हा असे केले तर हे होईल यानुसार भक्ती ही नकोच.

**मुकुंद काकीरवार**/८८०६९९२७७८

## देशाला गरज आहे स्वयंसेवकाची!

सेवक आणि स्वयंसेवक यामध्ये अंतर आहे. सेवक ज्याच्याकडे काम करत असतो, त्यांनी दिलेले आदेश पालन करीत असतो. ते आदेश योग्य आहे की नाही, याचा विचारदेखील करीत नाही. अलिकडे राजकीय पक्षाचे कार्यकर्ते, त्या राजकीय पक्षाचे सेवक होऊन कार्य करतात. आपल्याला दिलेले आदेश योग्य आहे की नाही, याचा विचार न करता ते त्याचे पालन करीत असतात. त्याचप्रमाणे सेवकांना आदेश दिले तर ते त्याचे पालन करतात. अन्यथा कोणतेही सामाजिक काम ते आपल्या मनाने करीत नाही; परंतु स्वयंसेवक आपल्या बुद्धीने योग्य विचार करून योग्य काम करतात आणि ज्यांना गरज आहे त्यांना मदत करतात. कोणत्याही आदेशाची प्रतीक्षा करीत नाही. एखादा लहान मुलगा, माणूस आपलं घर विसरला असेल तर त्याला त्याच्या घरी घेऊन जातात. कोणाचा अपघात झाला असेल तर त्याला दवाखान्यात घेऊन जातात. त्याचे घरचे लोक दवाखान्यात पोहोचेपर्यंत वाट पाहत तिथेच त्यांची सेवा करतात. गावात पूर आला किंवा रोगाची साथ आली तर कशाचीही पर्वा न करता मदत करतात. सरकारने गरीब लोकांसाठी तयार केलेल्या योजना त्यावर केवळ टीका करीत न बसता त्या योजनेची माहिती घेऊन लोकांना माहिती देऊन सहभागी करून घेण्याचा प्रयत्न करतात. हे सर्व कार्य ते समाजकार्य, राष्ट्रकार्य म्हणून करीत असतात. प्रसिद्धीसाठी नाही. अशा स्वयंसेवकाची आज देशाला गरज आहे. राष्ट्रीय



स्वयंसेवक संघ हे काम करीत आहे. पूर्वी सेवादल हे काम करीत होते. अशा सेवा देणाऱ्या संघटना देशात निर्माण झाल्या पाहिजे. अशा संघटनांमधून राजकीय पक्ष निर्माण झाले पाहिजे, राष्ट्रहितासाठी मनापासून काम करणारे! अशाच सेवा संघटनेतून जे राजकीय पक्ष निर्माण झाले ते खरे राष्ट्रीय पक्ष आहेत. इतर पक्ष फक्त राजकीय पक्ष आहेत.

**शशिकांत पांडे**/७५८८७४१९९६

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com

# झेडपीच्या ३७ निवृत्त हजेरी सहाय्यकांना पेन्शन

**● न्यायालयाच्या आदेशानंतर विभागीय समितीचा निर्णय, सीईओ जंगम यांची माहिती**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ सप्टेंबर-**

महसूल विभागाने नेमलेल्या व नंतर जिल्हा परिषदेकडे प्रतिनियुक्ती दिल्यावर निवृत्त झालेल्या ३७ हजेरी सहाय्यकांना निवृत्ती वेतन मिळणार आहे. अनेक वर्षांच्या न्यायालयीन लढाईनंतर विभागीय आयुक्तांच्या समितीने त्यांना पेन्शन देण्याचा निर्णय घेतला आहे.

जिल्हा परिषद प्रशासनाने कार्यवाही सुरू केल्याने लवकरच त्यांना त्याचा लाभ मिळणार आहे. महसूल विभागाकडील रोजगार हमी योजना खात्याने जिल्ह्यात ९५ हजेरी नसे सहाय्यकांची नेमणूक केली होती. ख त्यापैकी ३७ जणांना जिल्हा परिषदेच्या विविध विभागांकडे प्रतिनियुक्ती देण्यात आली होती. त्यांचे वेतन महसूल विभागाकडून दिले जात होते. मात्र, ३१ मार्च १९९५ रोजी त्यांना जिल्हा परिषदेकडे वर्ग केल्यांनतर त्यांनी उच्च न्यायालयात धाव घेतली होती. उच्च न्यायालयाने त्यांना निवृत्ती वेतन देण्याचा आदेश दिला होता. तर सहा महिन्यापूर्वी सर्वोच्च न्यायलयानही तस आदेश दिला होता. २३ मे २०२३ रोजी नियोजन विभागाने निवृत्ती दिवस हा मानवी सेवा ग्राह्य धरुन त्यांना १९९७ पासून निवृत्ती वेतन देण्याचा आदेश दिला होता. न्यायालयाचा आदेशआणि एक डिसेंबर १९९५ च्या सरकारी निर्णयानुसार जिल्हा परिषदेने विभागीय आयुक्तांच्या समितीकडे त्यांच्या निवृत्ती वेतनाचा प्रस्ताव पाठविला होता. पाच ऑगस्ट रोजी त्याला मंजुरी देत समितीने त्यांची सेवा जिल्हा परिषदांकडील पंचायत समित्यांकडे ग्राह्य धरून निवृत्ती वेतन देण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार १० वर्षे सेवा पूर्ण झालेल्या हजेरी सहाय्यकांना आता निवृत्तीवेतन मिळणार आहे.

> विभागीय आयुक्तांच्या समितीने निर्णय दिल्यानंतर गेल्या दोन आठवड्यांपासून पंचायत समित्यांकडून हजेरी सहाय्यकांच्या निवृत्ती वेतनाचे प्रस्ताव मागविले आहेत. त्यापैकी सहा प्रस्ताव आल्यानंतर त्यांना मंजुरी दिली आहे. उर्वरित प्रस्ताव आल्यानंतर त्यांनाही मंजुरी दिली जाईल. तसेच येत्या आठवडाभरात हा प्रश्न पूर्णपणे मार्गी लागून सर्वांना पेन्शनचा लाभ मिळणार आहे.
>
> **- कुलदीप जंगम,**
> **मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर**

## सहा पेन्शन प्रस्ताव मंजूर

विभागीय आयुक्तांच्या समितीच्या निर्णयानंतर जिल्हा परिषदेच्या प्रशासन विभागाच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील यांनी सर्व पंचायत समित्यांकडून संबंधित ३७ हजेरी सहाय्यकांच्या निवृत्ती वेतनाचे प्रस्ताव मागविले आहेत. त्यानुसार सहाजणांचे प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर त्यांना मुख्य कार्यकारी अधिकारी जंगम यांनी मंजुरी दिली आहे. उर्वरित प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर त्यांना मंजुरी दिली जाणार आहे.

## तिघांचा मृत्यू; वारसांना मिळणार लाभ

निवृत्ती वेतनासाठी न्यायालयीन संघर्ष केलेल्या ३७ पैकी तीन हजेरी सहाय्यकांचा मृत्यू झाला आहे. त्यामुळे त्यांच्या पत्नीला व ते दोघे हयात असेपर्यंतच्या निवृत्ती वेतनाचा त्यांच्या वारसांना लाभ मिळणार आहे.

## घरगुती गॅस सिलिंडरचा काळा बाजार; गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. २५ सप्टेंबर -** घरगुती गॅस सिलिंडरचा काळा बाजार करून ॲटो रिक्षामध्ये इंधन म्हणून भरणाऱ्याविरुध्द सलगर वस्ती पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात येऊन ७३ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याबाबत पोलिस उपनिरीक्षक सुरज कुतवळ यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन हरिदास शंकर गायकवाड (वय ५२, रा. मंजुनाथ नगर, लिमयेवाडी, मशिदीच्या पाठीमागे, सोलापूर) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हरिदास गायकवाड हा २५ सप्टेंबर रोजी सकाळी नऊच्या सुमारास मंजुनाथ नगर येथील घरासमोरील मोकळ्या जागेत पत्राशेडमध्ये घरगुती वापराच्या गॅस सिलिंडरमधील गॅस इंधन म्हणून एमएच १३ सीटी ७७४५ क्रमांकाच्या रिक्षामध्ये इलेक्ट्रिक मोटारीच्या मदतीने भरताना मिळून आला. यावेळी पोलिसांनी ॲटो रिक्षा, गॅस टाकी, इलेक्ट्रिक मोटार, इलेक्ट्रिक वजनकाटा, पाण्याची इलेक्ट्रिक मोटार असा ७३ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला. याबाबत सलगर वस्ती पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस निरीक्षक शिंदे पुढील तपास करीत आहेत.

## विहिरीतील पाण्यात बुडून वृध्देचा मृत्यू

**सोलापूर, दि. २५ सप्टेंबर -** सोलापूर - जुना विडी घरकुल परिसरातील सागर चौकात असलेल्या म्हाडा विहिरीतील पाण्यात बुडून वृध्देचा मृत्यू झाला.रुक्मिणीबाई दशरथ बुटला (वय ७४, रा. डी ग्रुप, जुना विडी घरकुल, सोलापूर) असे मरण पावलेल्या वृध्देचे नाव आहे. बुधवारी सकाळी दहाच्या पूर्वी म्हाडा विहिरीतील पाण्यामध्ये रुक्मिणीबाई या तरंगताना मिळून आल्या. त्यामुळे नागरीकांनी त्यांना बाहेर काढून बेशुध्दावस्थेत शासकीय रुग्णालयात दाखल केले. त्यावेळी डॉ. विजय सुरवसे यांनी त्यांना मृत घोषित केले. सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

## मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना मेळावा उद्या

**सोलापूर, दि. २५ सप्टेंबर-** मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेचे व शिकाऊ उमेदवारी योजनेअंतर्गत मेळाव्याचे आयोजन औद्योगिक प्रशिक्षण संस्था, सोलापूर येथे केले आहे. आय. टी. आय. उत्तीर्ण तसेच १२ वी पास, डिप्लोमा, पदवीधर उत्तीर्ण प्रशिक्षणार्थ्यांसाठी या मेळाव्याचे आयोजन २७ सप्टेंबर रोजी १० वाजता केले आहे.


## नावात बदल

माझे जुने नाव - **मनोज लक्ष्मण उमदी** असे होते ते बदलून मी माझे नवीन नाव - **मनोज लक्ष्मण उमदी** या दोन्ही नावाचा व्यक्ती एकच आहे. (पत्ता- मित्र नगर, मजरेवाडी, जि. सोलापूर)

**ऑफि. नं. २०१९/२०२४**
**दि. २३/०९/२०२४**

## BARSHI MUNICIPAL COUNCIL

**(Dist-Solapur)**

Phone No-02184-222205/222218 Email:- bnpbarshi@gmail.com
Fax No- 02184-222538 Web:- barshimunicipalcouncil.org
Outward No. Ced/Tp4640 Date. 25/09/2024

### Public disclosure

All the citizens of Barshi city are officially informed that, the applicants mr. Ujjwal Ramchandra Somani have submitted the proposal in this office. Regarding CTS 2556/B part, as the said property CTS 2556/B part belongs to their ownership, and as is affected by 12.00m wide D.P. road; have informed municipal council to transfer the same for the said purpose in lieu of Transferable Development Right (T.D.R)

**Property description**

Road Affected Area -CTS 2556/8/20
Total Affected Area: 5050.74 Sqm
Applicants Affected Area By Road: 1067.35 Sqm
Part 2 12.00m wide road running north south to the west of part 1
North: Eastwest Running DP 12.00 M Wide Road Part 3 Remaining
East: DP 12.00 m wide road part 1 remaining, cts no.2556/B/18, 2556/B/19, 2556/B/14, 2556/B/15, 2556/B/16, 2556/B/17, 2556/B/7
West: CTS NO 2556/4, 2556/B/12
South:CTS NO.2556/a remaining, 12.00 wide DP road
Part 3 east west running property north side
North: barshi textile mill land East: CTS No.2556/b part land
West: CTS No 2556/a South:CTS No 2556/B/13, DP 12.00 m wide part 2 remmaing road CTS NO. 2556/B/12

Hence, the obiections/complaints, if any, Regarding grant of Transferable development Rights by this office, according to the Sanctioned Development control and promotion Regulations, shall be Submitted in written along with documentary Evidences, in the office of chief officer, Barshi Municipal Council within days of publication of this disclosure, by the peoples having any kind of interest, Rights in the said property, or the Judicial disputs regarding the ownership of land/ if there is a mortgage with any bank. If no

one's Objection/complaint received within prescribed time; it will be considered that there is objection/ complaint regarding the said transfer transaction and further action will be taken as per rules in the said case. Also, it shall be noted that objections/complaints received after the prescribed time in the said case will not be considered.

sd/-
(Balasaheb Chavhan)
Chief Officer
Barshi Municipal Council

## बार्शी नगरपरिषद, बार्शी

**(जि. सोलापूर)**

दूरध्वनी नं. 02184-222205/222218 फॅक्स. 02184-222538
Email- civil.bnpbarshi@.gmail.com Web :- barshimunicipalcouncil.org
जा.क्र. स्थापत्य/4640 बार्शी, दि. 25/09/2024

### जाहिर प्रकटन

बार्शी शहरातील सर्व नागरिकांना जाहिररित्या कळविण्यात येते की, येथील सि.स.नं 2556/ब पैकी बार्शी साठी अर्जदार श्री उज्वल रामचंद्र सोमाणी यांनी या कार्यालयात अर्ज करून प्रस्ताव सादर केला आहे की, मिळकत सि.स.नं. 2556/ब पैकी त्यांच्या मालकीची असून ती 12.00 मी. रुंद विकास योजना रस्त्याने बाधित असल्यामुळे बाधित क्षेत्राचेबाबत विकास हक्क हस्तांतरण (Transfer of Development Right) च्या मोबदल्यात नगरपरिषदेस उक्त प्रयोजनासाठी हस्तांतरित करण्याकरीता कळविलेले आहे.

**मालमत्तेचे विवरणः**
रस्ता बाधित क्षेत्राचा सि.स.नं 2556/ब/20
एकूण रस्ता बाधित क्षेत्रः 5050.74 चौमी
अर्जदार यांचे रस्त्याने बाधित क्षेत्रः 1067.35 चौमी

**भाग-२ :- भाग १ चे पश्चिमेस उत्तर दक्षिण चालीचा १२.०० मी रूंदीचा रस्ता**

पूर्व वि यो 12.00 मी रुंदीचा रस्ता भाग-1 पैकी, सिसनं 2556/ब/18, 2556/ब/19, 2556/ब/14, 2556/ब/15, 2556/ब/16, 2556/ब/17, 2556/ब/7
पश्चिमेस-तिसनं 2556/4, 2556/ब/12
दक्षिणेस - सिसनं 2556/अ पैकी 12.00 मी. रुंदीचा वि यो रस्ता
उत्तरेस - पूर्व पश्चिम चालीचा विकास योजनेचा 12.00 मी. रस्ता भाग-3 पैकी

**भाग-३ :- पूर्वपश्चिमे चालीचा मिळकतीचे उत्तर बाजूकडील**

पूर्व - सिसनं 2556/ब पैकी जागा
पश्चिमेस - सिसनं 2556/अ
दक्षिणेस - सिसनं 2556/ब/13, विकास योजना 12.00 मी. रुंदीचा भाग-2 पैकी रस्ता, सिसनं 2556/ब/12
उत्तरेस - बार्शी टेक्स्टाईल मिलची जागा

सदर जमिनीबाबत या कार्यालयाने मंजूर विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीनुसार विकास हस्तांतरण (T.D.R) देण्यास कोणत्याही प्रकारचा हितसंबंध, हक्क असणा-या व्यक्तीचा सदरच्या हस्तांतरण व्यवहारास काही आक्षेप/उजर/तक्रार इत्यादी असल्यास तसेच मालकी हक्काचा न्यायालयीन वाद असल्यास / कोणत्याही बँकेकडे तारण असल्यास सदर प्रकरण प्रसिध्द झाल्यापासून 7 दिवसांच्या आत लेखी स्वरूपात मा. मुख्याधिकारी, बार्शी नगरपरिषद कार्यालयात कागदोपत्री पुराव्यांसह सादर करावयात. विहीत मुदतीत कुणाचा आक्षेप/उजर/तक्रार प्राप्त न झाल्यास सदरच्या हस्तांतरणाच्या व्यवहारास कुणाचाही आक्षेप/उजर नाही, असे समजण्यात येऊन सदर प्रकरणात नियमाप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात येईल. तसेच सदर प्रकरणात विहीत मुदतीनंतर आलेले आक्षेप/उजर/तक्रार इत्यादी विचारात घेतले जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

सही/-
बाळासाहेब चव्हाण)
(मुख्याधिकारी)
बार्शी नगरपरिषद, बार्शी

## कर्ज वसुली न्यायाधिकरण पुणे

FORM NO. 3.
[See Regulation 15(2)(a)]/16(3)

युनिट नं.३०७ ते ३१० तिसरा मजला, काकडे बिझ आयकॉन बिल्डिंग, शिवाजी नगर, पुणे - ४११००५

केस नं. **OA/272/2018**

अधिनियमाच्या कलम १९ च्या उप कलम (४) अंतर्गत समन्स, कर्ज वसुली न्यायाधिकरण (प्रक्रिया) नियम, १९९३ च्या नियम ५ च्या उप कलम नियम (2A) सह वाचा

Exh. No. : 9723

**कॅनरा बँक**
विरुध्द
**साजन रमेश हावळे**

प्रति,
**१) साजन रमेश हावळे**
बी-४४५, रमाकांत कर्णिक नगर, वालचंद कॉलेजच्या पाठीमागे, सोलापूर महाराष्ट्र ४१३००६
तसेच मु.
ए-७०५, रुबी नगर, मंगल रेसिडेन्सी, महावीर मंदिर जवळ, जुळे सोलापूर, सोलापूर महाराष्ट्र - ४१३००५

**समन्स**

जेथे, OA/269/2018 हे ०२/०८/२०२४ रोजी माननीय पीठासीन अधिकारी / निबंधक यांच्यासमोर, सूचीबुध्द केले गेले होते.

तर या माननीय न्यायाधिकरणाला अधिनियमाच्या कलम १९(४) अन्वये (OA) तुमच्या विरुध्द रु.११,२७,५८०/- च्या कर्जाच्या वसुलीसाठी दाखल केलेल्या उक्त अर्जावर समन्स / सूचना जारी करण्यात येत आहे. (अर्जासह कागदपत्रांच्या प्रती इ. संलग्न)

अधिनियमाच्या कलम १९ च्या उपकलम (४) नुसार, तुम्हाला, प्रतिवादींना खालीलप्रमाणे निर्देश दिले आहेत.

i) समन्स बजावल्यापासून तीस दिवसांच्या आत कारणे दाखविणे, ज्यासाठी प्रार्थना करण्यात आलेली मदत मंजूर केली जाऊ नये.

ii) मूळ अर्जाच्या अनुक्रमांक 3A अंतर्गत अर्जदाराने निर्दिष्ट केलेल्या मालमत्ता आणि मालमत्तेव्यतिरिक्त इतर मालमत्ता किंवा मालमत्तेचे तपशील उघड करणे,

iii) मूळ अर्जाच्या अनुक्रमांक 3A अंतर्गत उघड केलेल्या सुरक्षित मालमत्तेचे व्यवहार किंवा विलेव्हाट लावण्यापासून तुम्हाला प्रतिबंधित केले आहे, प्रलंबित सुनावणी आणि मालमत्ता संलग्न करण्याच्या अर्जाची विलेव्हाट लावणे.

iv) तुम्ही जी मालमत्ता तारण ठेवलेली आहे आणि/किंवा मुळ अर्जाचा अनुक्रमांक 3A अंतर्गत निर्दिष्ठ किंवा उघड केलेले इतर मालमत्ता न्यायाधिकरण्याच्या पुर्व परवानगी शिवाय विक्री, भाडेपट्ट्यानी किंवा इतर मार्गाने हस्तांतरीत करु शकणार नाही.

v) सुरक्षित मालमत्ता किंवा इतर मालमत्ता आणि मालमत्तेच्या विक्रीद्वारे प्राप्त झालेल्या विक्रीतून मिळालेल्या उत्पन्नासाठी तुम्ही जबाबदार असाल आणि अशा मालमत्तेवर सुरक्षा व्याज असलेल्या बँक किंवा वित्तीय संस्थांकडे ठेवलेल्या खात्यात विक्रीची रक्कम जमा करा.

तुम्हाला अर्जदाराला दिलेल्या प्रतसह लिखित विधान दाखल करण्याचे आणि दि. ११/१०/२०२४ रोजी सकाळी १०.३० वाजता रजिस्ट्रार समोर हजर राहण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसे न केल्यास तुमच्या अनुउपस्थितीत अर्जावर सुनावणी होऊन निर्णय घेतला जाईल.

दि.१२/०८/२०२४ रोजी माझ्या हाताखाली आणि न्यायाधिकरणाचा शिक्का मारला

टिप :- जे लागू नसेल ते काढून टाका

(मजकूरात संदिग्धता असल्यास इंग्रजी मजकूर ग्राह्य धरावा)

शिक्का

सही/-
समन्स जारी करण्यासाठी अधिकृत अधिकाऱ्याची स्वाक्षरी
**निबंधक**
कर्ज वसुली न्यायाधिकरण, पुणे

## Classifieds

### शेतीविषयक

**नर्सरी (शेती) काम करणारे जोडपे, ड्रायव्हर पाहिजेत. राहण्याची उत्तम सोय. पगार : १८ ते २२ हजार महिना जोडीला.**

**संपर्क**
**9922004242**

**दै. सोलापूर तरुण भारत मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसारच प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही मजकुराच्या सत्यतेबाबत दै. सोलापूर तरुण भारत हमी घेऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.**

## जाहीर समन्स

**मा.उपनिबंधक सहकारी संस्था, शहर सोलापूर, सोलापूर यांचे समोर**

सोलापूर जिल्हा महसूल कर्मचारी सहकारी पतसंस्था, नियमित सोलापूर
सिटी सर्व्हे नं. ८४१३, दुसरा मजला, जुने जिल्हाधिकारी आवार, सोलापूर-४१३००३

**लोकमंगल नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, सोलापूर - अर्जदार**
**विरुद्ध**
(खालील तपशिलातील नमुद केलेले थकबाकीदार सभासद) **- जाब देणार**

| अ. क्र. | दावा क्र. | दावा रक्कम | प्रतिवादी नंबर | प्रतिवादीचे नाव व पत्ता |
|---|---|---|---|---|
| १ | १०७/२०२४ | २,५१,९४१/- | १ | **श्री. पोगूल राजेश रमेश** रा. वालचंद मुलांची वसतीगृह ३४/ए/३ जी ८ प्रणिती कॉम्प्लेक्स, सोलापूर. जि. सोलापूर |
| | | | २ | **श्री. बांगी अब्दुलरहीमान अमिनोद्दीन** रा. डी. ब्लॉक रुम नं. २० सिव्हिल हॉस्पिटल कंपाऊंड सोलापूर, जि. सोलापूर |
| | | | ३ | **श्री. निरंज मिथुन शंकरसा** रा. ५५ ज्योती नगर, आकाशवाणी केंद्रजवळ, द. सोलापूर, जि. सोलापूर |
| २ | १०८/२०२४ | ५,०९,४६८/- | १ | **श्री. जमादार वशिमोद्दीन अ. गफूर** रा. एस/ओ. अ. गफूर तोळणूर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर |
| | | | २ | **श्री. सुतार फय्याज नसिरोद्दीन** रा. एस/ओ. अ.गफूर तोळणूर ता. अक्कलकोट, जि. सोलापूर |
| ३ | १०९/२०२३ | ४,६१,४०९/- | १ | **श्री. जाधव मंगेश लक्ष्मण** रा. मु.पो. किणी, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर |
| | | | २ | **श्री. पवार अनिल बळीराम** रा. मु.पो. खंडळी, ता. मोहोळ, जि. सोलापूर |
| | | | ३ | **श्री. बागडे किरण प्रल्हाद** रा. मु.पो. इटकळ, ता. तुळजापूर, जि. उस्मानाबाद |
| ४ | ११०/२०२३ | २,२३,९१५/- | १ | **श्री. चव्हाण अमोल काशिनाथ** रा. मु.पो. ४२१/६२, केगाव, ता. उ. सोलापूर, जि. सोलापूर |
| | | | २ | **श्री. कापसे महाकला रमेश** रा. मु.पो. विश्व किरण पार्क डी-मार्ट शेजारी, जुळे सोलापूर, जि. सोलापूर |
| | | | ३ | **श्री. रणश्रृंगारे अमोल दिनकर** रा. रा.मु. १४६, मिलिंद नगर, बुधवार पेठ, सोलापूर |
| ५ | १११/२०२४ | २,२९,५८९/- | २ | **श्री. सरवदे विजय दिगंबर** रा. मु.पो. प्लॉट नं. २०६, संजय नगर, दत्तराज फोटो स्टुडिओ, कुमठा नाका, जिल्हा न्यायालय, सोलापूर, ता. उ. सोलापूर, जि. सोलापूर |
| | | | ३ | **श्री. झुंजे स्वामिनाथ बाबासाहेब** रा. मु.पो. २२४, दक्षिण कसबा, सोलापूर, ता. उ. सोलापूर, जि. सोलापूर |
| ६ | ११२/२०२४ | १,५३,१९१/- | ३ | **श्री. भांगे राजू लक्ष्मण** रा. मु.पो. चार भाई मंजीलजवळ, सोमराय नगर, मोहोळ, ता. मोहोळ, जि. सोलापूर |
| ७ | ११४/२०२४ | २,५७,७९३/- | १ | **श्री. पवार नेताजी जनार्धन** रा. मु.पो. सह्याद्री प्राथमिक शाळा ४४१/अ देशमुख-पाटील वस्ती, सोलापूर जि. सोलापूर |
| | | | २ | **श्री. देशमुख किरण बाळासाहेब** रा. मु.पो. एमएसईबी कोयना नगर, देगाव रोड, ता. उ. सोलापूर, जि. सोलापूर |
| | | | ३ | **श्री. सुरवसे नारायण त्रिंबक** रा. रा.मु. २अ/२६, अभिमानश्री जुना पुना नाका, मुरारजी पेठ, ता. सोलापूर, जि. सोलापूर |
| ८ | ११५/२०२४ | १,०२,२५३/- | १ | **सौ. शेवगार उज्वला सिध्दाराम** रा. मु.पो.नं. १२८, गावठाण मारुती मंदिर, मजरेवाडी, सोलापूर, जि. सोलापूर |
| | | | २ | **श्री. खुपसंगे रेवप्पा तुकाराम** रा. मु.पो. घर नं. ९ बेघर वसाहत मजरेवाडी, ता. उ. सोलापूर, जि. सोलापूर |
| | | | ३ | **सौ. गदले रुपाली महेशकुमार** रा. मु.पो. गीता नगर, गोली टॉवरजवळ ३३/२/८ न्यू पाच्छा पेठ, सोलापूर, जि. सोलापूर |
| ९ | ११७/२०२४ | ३,७६,१९२/- | १ | **श्री. महादेव सत्यवान काळे** रा. २ नं. झोपडपट्टी संजय गांधी नगर, सुशील मराठी विद्यालयजवळ भैरू वस्ती, सोलापूर |
| | | | २ | **श्री. विजय दिगंबर सरवदे** रा. दत्तराज फोटो स्टुडिओजवळ प्लॉट नं. २०६, संजय नगर, कुमठा नाका, सोलापूर ०३ |
| | | | ३ | **श्री. सुनिल नानासाहेब शिंगाडे** रा. १२३३ गरीबी हटाव झोपडपट्टी नं. २, रामवाडी, सोलापूर |
| ११ | ११९/२०२४ | २,४४,०९३/- | १ | **श्री. अबिंगर मयुर अशोक** रा. मु.पो. ५५, जवाहरलाल हौसिंग सोसायटी, सिरत नगर, सोलापूर, जि. सोलापूर |
| | | | २ | **श्री. जोशी नयन सुनिल** रा. मु.पो. प्लॉट नं. १०, ०२ मजला वर्धमान अपार्टमेन्ट, भवानी पेठ, सोलापूर |
| | | | ३ | **श्री. सुर्यवंशी परशुराम युवराज** रा. रा.मु. महिला मेडिकल कॉलेज ३१, ओंकार सोसायटी, मजरेवाडी, सोलापूर |
| १२ | १२०/२०२४ | ३,५५,५२१/- | १ | **श्री. माने विष्णू चंद्रकांत** रा. मु.पो. प्लॉट नं. ०७, स्वामी समर्थ नगर, मजरेवाडी, ता. उ. सोलापूर, सोलापूर |
| | | | ३ | **श्री. जाधव विष्णू विमलेश** रा. रा.मु. १/२ पुनम नगर, जुळे सोलापूर, जि. सोलापूर |
| १३ | १२१/२०२४ | ७,२९,८०३/- | १ | **श्री. यलगोंडे महानिंग म्हाळप्पा** रा. मु.पो. कंदलगाव, ता. द. सोलापूर, जि. सोलापूर |
| | | | २ | **श्री. बिराजदार संगोडा भिमराया** रा. मु.पो. राजूर, ता. द. सोलापूर, जि. सोलापूर |
| | | | ३ | **श्री. गिते धनंजय बाबूराव** रा. रा.मु. तळे हिप्परगा, ता. उ. सोलापूर, जि. सोलापूर |
| १४ | १२२/२०२४ | ३,९४,७०९/- | १ | **श्री. शेखजी रमजान अ.रहिमान** रा. मु.पो. ६९८, स्वामी विवेकानंद नगर, होटगी रोड, सोलापूर |
| | | | २ | **श्री. चौधरी कैलास महादेव** रा. मु.पो. प्लॉट नं. ४५४ ओम नमः शिवाय नगर, हत्तुरे वस्ती, सोलापूर |
| | | | ३ | **श्री. कोरे प्रकाश बंडप्पा** रा. मु.पो. होटगी गाव, ता. द. सोलापूर, जि. सोलापूर |
| १५ | १२३/२०२४ | २,२१,०२९/- | १ | **श्री. सुर्यवंशी परशुराम युवराज** रा. मु.पो. महिला मेडिकल कॉलेज ३१ ओंकार सोसायटी, मरजेवाडी, सोलापूर |
| | | | २ | **श्री. केकडे सदानंद कुमिंद** रा. मु.पो. प्लॉट नं. २१, स्वामी समर्थ नगर, मजरेवाडी, सोलापूर |
| | | | ३ | **श्री. नागटिळक स्वप्निल हणमंत** रा. मु.पो. गरीबी हटाव ०२ झापेडपट्टी, विजापूर रोड, सोलापूर |
| १६ | १२४/२०२४ | ८७,०३२/- | १ | **श्री. वाघमारे प्रविण दत्ता** रा. मु.पो. १४८ अवशे वस्ती, आमराई आंबेडकर रोड, जि. सोलापूर |
| | | | २ | **श्री. खताळ औदुंबर महादेव** रा. मु.पो. सी. २१, सिध्देश्वर नगर, विजापूर रोड, जि. सोलापूर |
| | | | ३ | **श्री. जाधव महादेव नागनाथ** रा. रा.मु. ग्रामपंचायत लगत ३५, कासेगाव, ता. सोलापूर, जि. सोलापूर |
| १७ | १२५/२०२४ | १,२७,४९८/- | १ | **श्री. रेड्डी सुनिल मधुकर** रा. मु.पो. कुंभारी, ता. द. सोलापूर, जि. सोलापूर |
| | | | २ | **श्री. स्वामी विजय रमेश** रा. मु.पो. २६९ लक्ष्मी नगर, हत्तुरे वस्ती, होटगी रोड, ता. उ. सोलापूर, जि. सोलापूर |
| | | | ३ | **श्री. चौगुले मारुती बाबूराव** रा. रा.मु. भवानी पेठ, मड्डी वस्ती, तुळजापूर रोड, सोलापूर, जि. सोलापूर |
| १८ | १२६/२०२४ | १,८५,५०५/- | १ | **श्री. पाटील शुभम रेवणसिध्द** रा. मु.पो. ४२, कांचन सोसायटी, शेळगी, ता. उ. सोलापूर, जि. सोलापूर |
| | | | ३ | **श्री. समदुर्ले बसवराज गंगाधर** रा. मु.पो. कणबस गवंडी गल्ली, ता. द. सोलापूर, जि. सोलापूर |
| १९ | १२७/२०२४ | ९९,५५७/- | १ | **श्री. वग्गू नागमणी पुरुषोत्तम** रा. रेगल बेकरीजवळ १८३, तेलंगी पाच्छा पेठ, ता. उ. सोलापूर, जि. सोलापूर |
| | | | २ | **श्री. दोरनाल रामय्या दिगंबर** रा. अ/१०१/३ जी.पी.एम. विडी घरकूल कुंभारी, द. सोलापूर, जि. सोलापूर |
| २१ | १२९/२०२४ | ९४,०८४/- | १ | **श्री. एम.डी. गौस अब्दुलरशिद रिसालदार** रा. अब रशीद हन्फिया मस्जिद १३/२४७, शास्त्री नगर, सोलापूर, जि. सोलापूर |
| | | | २ | **श्री. गायगवळी दयानंद शंकर** रा. महात्मा फुले प्रशालेच्या पाठीमागे ६१२ हरळय्या नगर, विजापूर रोड, सो. जि. सोलापूर |
| | | | ३ | **श्री. तोरट रविंद्र कृष्णा** रा. एस.ओ. कृष्णा जुना विजापूर नाका घर नं. ५६२ डॉ. बाबासाहेब नगर, इंदिरा नगर, सोलापूर, जि. सोलापूर |
| २२ | १३०/२०२४ | ४,९१,४९७/- | ३ | **श्री. माशाळ शहाजी जालिंदर** रा. छत्रपती रंगभवनजवळ यशवंत नगर, सिव्हील लाईन, उ. सोलापूर, जि. सोलापूर |

यात वादी पतसंस्था यांनी दाखल केलेल्या अर्जातील वर नमूद केलेल्या प्रतिवादी यांचे पत्ते उपलब्ध होत नसल्यामुळे / पत्त्यावर आढळून येत नसल्याने / अपुरा पत्ता असल्याने सदरचे जाहीर समन्स देणेत येत आहे.

**प्रतिवादी यांना जाहीर समन्सद्वारे कळविणेत येते की, उपनिर्दिष्ठ अर्जासंबंधी आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वतः जातीने अथवा वकिलामार्फत दिनांक : १०/१०/२०२४ रोजी दुपारी १२.०० वाजता कागदपत्रासह या कार्यालयात हजर रहावे.**

प्रतिवादी यांनी तारखेस वेळेवर हजर न राहिल्यास त्यांच्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल व पुढील योग्य तो निर्णय केला जाईल.

आज दि. २४/०९/२०२४ रोजी माझी सही व कार्यालयाचे मुद्रेसह हे जाहीर समन्स दिले आहे.

**स्थळ - सोलापूर**
**दिनांक : २४/०९/२०२४**

शिक्का

**सही/-**
**(डॉ. पी.ए. बागल)**
**उपनिबंधक**
**सहकारी संस्था, सोलापूर शहर, सोलापूर**

## महत्त्वाचे

### विनेश फोगटला नाडाची नोटीस



**नवी दिल्ली** : नॅशनल अँटी-डोपिंग एजन्सीने (नाडा) बुधवारी कुस्तीपटू व राजकारणी झालेल्या विनेश फोगटला नोटीस बजावली आणि १४ दिवसांत स्पष्टीकरण मागितले. विनेशच्या ५० किलो वजनी गटाच्या सुवर्णपदक लढतीपूर्वी १०० ग्रॅम जास्त वजनामुळे अपात्र ठरलेल्या २९ वर्षीय विनेशने समाजमाध्यमावर निवृत्तीचा निर्णय जाहीर केला होता. स्पर्धेनंतर नाडाच्या नोंदणीकृत सर्व खेळाडूंनी डोप चाचणीसाठी उपलब्ध असणे व नमूने देणे आवश्यक असते. यात विनेश एक भाग आहे. जर ती चाचणीसाठी उपलब्ध नसेल, तर ती डोपिंग चाचणीत अयशस्वी ठरली असे मानले जाते. ९ सप्टेंबर रोजी सोनीपतमधील खारखोडा गावात विनेशच्या घरी नाडाचे पथक गेले होते, परंतु ती डोप चाचणीसाठी उपलब्ध नव्हती, त्यामुळे ती डोपिंग चाचणीत स्पष्टपणे अपयशी ठरली, असे नाडाने आपल्या नोटीसमधून कुस्तीपटू विनेशला कळवले. विनेश व बजरंग पुनिया यांनी अलीकडेच काँग्रेस पक्षात प्रवेश केला आणि ती जुलाना मतदारसंघातून आगामी हरयाणा विधानसभा निवडणूक लढवत आहे. त्या सध्या जुलाना मतदारसंघात प्रचारात व्यस्त आहेत.

### श्रेयस अय्यरकडून महागड्या घराची खरेदी

**मुंबई** : भारतीय क्रिकेटपटू श्रेयस अय्यर व त्याची आई रोहिणी अय्यर यांनी मुंबईत एका आलिशान अपार्टमेंटची खरेदी केली. मुंबईच्या वरळी परिसरात त्यांनी २.९० कोटी रुपयांना एक अपार्टमेंट खरेदी केले. मालमत्तेच्या नोंदणीच्या कागदपत्रांनुसार वरळीच्या आदर्श नगर भागात त्रिवेणी इंडस्ट्रियल सीएचएसएलच्या दुसऱ्या मजल्यावर हे अपार्टमेंट ५२३ चौरस फूट आकाराचे अपार्टमेंट ५५,२३८ प्रति चौरस फूट दराने खरेदी केल्याचे कळते. या व्यवहाराची नोंदणी १९ सप्टेंबर २०२४ रोजी करण्यात आली होती. घर खरेदीमुळे या आधी सुद्धा अय्यर चर्चेत आला होता. रिअल इस्टेट व्यवहारांमुळे श्रेयस अय्यर चर्चेत येण्याची ही पहिलीच वेळ नाही. खरे तर मुंबईतील सर्वात उंच इमारतींपैकी असलेल्या लोढा वर्ल्ड टॉवर्समध्येही अय्यरचे घर आहे. सप्टेंबर २०२० मध्ये श्रेयस अय्यरने द वर्ल्ड टॉवर्सच्या ४८व्या मजल्यावर २३८० चौरस फुटांचे अपार्टमेंट विकत घेतले होते. या अपार्टमेंटमध्ये तीन कार पार्क होतात. दरम्यान, वरळी हा मुंबईतील एक प्रतिष्ठित परिसर आहे. येथील घरांच्या किंमती सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेर चित्र पाहायला मिळते.

### पंतला शांत ठेवण्याची गरज : कमिन्स

**नवी दिल्ली** : ऑस्ट्रेलियामध्ये सलग दोन कसोटी मालिका जिंकण्याच्या भारताच्या मोहिमेत ऋषभ पंतचा 'मोठा प्रभाव' आहे आणि त्यानंतर होणाऱ्या पाच कसोटी सामन्यांच्या मालिकेत त्याने महत्त्वाची भूमिका बजावली आहे. या वर्षी धमाकेदार यष्टिरक्षक-फलंदाज ऋषभ पंतला 'शांत' ठेवण्याची गरज आहे, असे प्रतिपादन ऑस्ट्रेलियाचा कर्णधार पॅट कमिन्सने केले आहे. २६ वर्षीय पंतने २०१८-१९ व २०२०-२१ मध्ये ऑस्ट्रेलियामध्ये भारताच्या ऐतिहासिक कसोटी विजयांमध्ये महत्त्वाची भूमिका बजावली होती. त्याने डिसेंबर २०२२ मध्ये बांगलादेशविरुद्धच्या पहिल्या कसोटीत एका भीषण कार अपघातात जखमी झाल्यानंतर कसोटी क्रिकेटमध्ये शानदार पुनरागमन केले. आठवड्यात दुसऱ्या डावात शतक ठोकले. पंत एक उत्तम खेळाडू असून त्याने गत काही मालिकांमध्ये खूप प्रभाव पाडला आहे व आम्हाला त्याला शांत ठेवण्याचा प्रयत्न करावा लागेल, असे कमिन्स म्हणाला. पंतने ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या आपल्या शेवटच्या दोन कसोटी मालिकेत महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे.

### शाकिब अल हसन दुसऱ्या कसोटीच्या निवडीसाठी पात्र

**कानपूर** : स्टार अष्टपैलू खेळाडू शाकीब अल हसन कानपूरमध्ये भारताविरुद्ध होणाऱ्या दुसऱ्या कसोटी क्रिकेट सामन्यासाठी निवडीसाठी पात्र आहे, अशी बांगलादेशचे मुख्य प्रशिक्षक चंडिका हथुरुसिंघे यांनी बुधवारी पुष्टी केली. भारत-बांगलादेशदरम्यानच्या पहिल्या कसोटी सामन्यात, कर्णधार नजमुल हुसेन शांतोने शाकिबला आक्रमणात आणल्यानंतर अष्टपैलू खेळाडूने तिसऱ्या दिवशी सात षटके टाकली, परंतु वाईट स्पेलमध्ये ऋषभ पंतने सहा चौकार आणि दोन षटकार मारले. हे वर्ष ३७ वर्षीय खेळाडूसाठी कठीण गेले आहे, त्याने सर्व फॉरमॅटमध्ये १८ डावांमध्ये १९.६६ च्या सरासरीने केवळ २९५ धावा केल्या एका अर्धशतकासह त्याने ३९.८८ च्या सरासरीने ४-३५ च्या सर्वोत्तम आकड्यांसह केवळ १८ बळींची नोंद केली आहे.

# मोदींनी केले बुद्धिबळपटूंचे कौतुक

◆ **नवी दिल्ली, २५ सप्टेंबर**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बुधवारी बुडापेस्ट येथील ४५ व्या बुद्धिबळ ऑलिम्पियाडमध्ये भारताच्या युवा बुद्धिबळपटूंचे ऐतिहासिक कामगिरीबद्दल कौतुक केले. या स्पर्धेत भारताच्या पुरुष आणि महिला या दोन्ही संघांनी आपले पहिले सुवर्णपदक जिंकले.

भारताने रविवारी पुरुष संघाने स्लोव्हेनियाला पराभूत केले आणि महिला संघाने अंतिम फेरीत अझरबैजानवर विजय मिळवून प्रतिष्ठित स्पर्धेत पहिले-वहिले सुवर्णपदक जिंकले व इतिहास घडवला.

पुरुषांच्या स्पर्धेत, डी गुकेश, अर्जुन एरिगाईसी आणि आर. प्रज्ञानंदने ११व्या आणि अंतिम फेरीत निर्णायक विजय मिळवला. महिला संघाने अझरबैजानचा पराभव करून सुवर्णपदक मिळवले. महिला संघात नागपूरची दिव्या देशमुख, आर. वैशाली, डी. हरिका, तानिया सचदेवचा समावेश होता. यावेळी मोदींनी विदित गुजराथी, अर्जुन एरिगायसी व आर. प्रज्ञानंदसोबत संवाद साधला.




पंतप्रधान मोदी यांना बुद्धिबळाचा पट भेट देताना खेळाडू

या स्पर्धेतील स्टार खेळाडू डी. गुकेशने खुल्या गटात ११ पैकी १० फेऱ्या जिंकून भारताच्या विजयात महत्त्वाची भूमिका बजावली.

संवादादरम्यान, खेळाडूंनी पंतप्रधानांना बुद्धिबळाचा बोर्ड सादर केला, त्यानंतर प्रज्ञानंद व अर्जुनने बुद्धिबळाचा वेगवान खेळ खेळला. त्यामुळे पंतप्रधान मोदी भारावले.

क्रीडा मंत्रालयाने बुद्धिबळ संघ पंतप्रधान मोदी यांना भेटण्यासाठी जात असल्याचा व्हिडीओ शेअर केला होता. (वृत्तसंस्था)

### मोदींना भेटण्यासाठी गुजराथीने सोडली बाकूमधील स्पर्धा

**नवी दिल्ली** : अलीकडील बुद्धिबळ ऑलिम्पियाडमधील सुवर्णपदक विजेत्या भारतीय पुरुष बुद्धिबळ संघातील खेळाडू विदित गुजराथीने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना भेटण्यासाठी अझरबैजानमध्ये आयोजित १० व्या वुगर गाशिमोव्ह स्मृती बुद्धिबळ सुपर स्पर्धेत अनुपस्थित राहण्याचा निर्णय घेतला आहे. ग्रॅण्डमास्टर विदित गुजराथी गतवर्षी झालेल्या या स्पर्धेचा विजेता असून त्याने देशबांधव अर्जुन एरिगायसीला पराभूत करून अझरबैजान स्पर्धा जिंकली होती. वास्तविक विदित या स्पर्धेत भाग घेण्यासाठी बाकू, अझरबैजानला पोहोचला आहे, परंतु त्याला कळले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी बुधवारी बुद्धिबळ ऑलिम्पियाड विजेत्या खेळाडूंचा सत्कार करणार आहे. या समारंभाबद्दल जाणून घेतल्यावर पंतप्रधान मोदींना भेटण्यासाठी भारतात परतण्याचा निर्णय घेतला.

# हॅरी ब्रुकचे शतक, इंग्लंड विजयी

**ऑस्ट्रेलियाची घोडदौड रोखली**

**इंग्लंडचे मालिकेत आव्हान कायम**

**ऑस्ट्रेलिया २-१ ने आघाडीवर**

◆ **चेस्टर-ले-स्ट्रीट, २५ सप्टेंबर**

येथे खेळल्या गेलेल्या तिसऱ्या एकदिवसीय आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामन्यात कर्णधार हॅरी ब्रूकने झळकावलेल्या दमदार शतकाच्या बळावर इंग्लंडने ऑस्ट्रेलियावर डकवर्थ लुईस नियमानुसार ४६ धावांनी विजय नोंदविला. या विजयाबरोबरच इंग्लंडने ऑस्ट्रेलियाची १४ सामन्यांतील विजयाची घोडदौड थांबविली आणि पाच वन-डे सामन्यांच्या मालिकेत आपले आव्हान कायम ठेवले आहे. मालिकेत ऑस्ट्रेलियाने २-१ अशी आघाडी मिळविली आहे.

प्रथम फलंदाजी करणाऱ्या ऑस्ट्रेलियाने मर्यादितत ५० षटकांत ७ बाद ३०४ धावा उभारल्या. विजयासाठी ३०५ धावांचा पाठलाग करताना इंग्लंडने ३७.४ षटकांत ४ बाद २५४ धावांपर्यंत मजल मारली



धावा ११०
चेंडू ९४
चौकार १३
षट्कार १

शतकवीर हॅरी ब्रुक सामनावीर

असता, पावसाने हजेरी लावली व त्यामुळे खेळ थांबला. त्यावेळी हॅरी ब्रूक नाबाद ११० धावांवर होता. मुसळधार पावसामुळे इंग्लंडचा संघ पुन्हा मैदानात उतरला नाही व इंग्लंड धावगतीच्या दृष्टीने ऑस्ट्रेलियापेक्षा खूप पुढे होता. नंतरत डकवर्थ लुईसच्या नियमानुसार सामना निकाली काढण्यात आला व यात इंग्लंडला ४६ धावांनी विजयी घोषित करण्यात आले. या पाच सामन्यांच्या मालिकेत साऊदम्पटन व लीड्स येथील सामन्यात वर्चस्व गाजवणाऱ्या ऑस्ट्रेलियाची आघाडी २-१ अशी कमी झाली. ऑस्ट्रेलिया संमघाने गत वर्षी भारतात क्रिकेट विश्वचषक जिंकला. या मालिकेतील चौथा वन-डे सामना शुक्रवारी लॉर्ड्स येथे खेळला जाणार आहे.

इंग्लंडच्या विजयात हॅरी ब्रूकची शतकी व विल जॅक्सची अर्धशतकी खेळी महत्त्वपूर्ण ठरली. या दोघांनी तिसऱ्या गड्यासाठी १५६ धावांची जबरदस्त भागीदारी केली. ब्रूकने ९४ चेंडूत १३ चौकार व २ षट्कारांसह नाबाद ११० धावांची, तर विल जॅक्सने ८२ चेंडूंत ९ चौकार व एका षट्कारसह ८४ धावांची विजयी खेळी केली. हॅरी ब्रूक सामनावीर पुरस्काराचा मानकरी ठरला.

ऑस्ट्रेलियाकडून अॅलेक्स केरीने ६५ चेंडूंत ७ चौकार व एका षट्कारसह नाबाद ७७ धावंची खेळी केली, तर स्टीव्ह स्मिथने ८२ चंडूंत ५ चौकारांसह ६० धावांची खेळी केली.

अॅरॉन हार्डीने २६ चेंडूत ४४ धावांची, तर कॅमेरून ग्रनने ४९ चेंडूंत ४२ धावांची भर घातली. (वृत्तसंस्था)

# वैयक्तिक इव्हेंट म्हणून ऑलिम्पियामध्ये खेळलो : गुकेश

◆ **चेन्नई, २५ सप्टेंबर**

एक वैयक्तिक स्पर्धा म्हणून मी बुद्धिबळ ऑलिम्पियाडमध्ये भाग घेतला होता. नोव्हेंबरमध्ये बहुप्रतिक्षित जागतिक बुद्धिबळ स्पर्धेपूर्वी आपल्या कामगिरीबद्दल समाधानी आहो, असे भारतीय ग्रॅण्डमास्टर डी. गुकेश म्हणाला.

जागतिक बुद्धिबळ स्पर्धेतील आव्हानवीर १८ वर्षीय डी. गुकेशने ऑलिम्पियाडमध्ये भारताच्या ऐतिहासिक विजयात मोलाची भूमिका बजावली. पुरुष संघाने स्पर्धेत प्रथमच सुवर्णपदक जिंकले.

गुकेशने अव्वल फळीवर भारतासाठी चमकदार कामगिरी केली आणि त्याच्या १० डावांमध्ये नऊ गुण मिळवले. त्याने आठ सामने जिंकले, तर दोन अनिर्णीत राहिले. या कामगिरीमुळे त्याने वैयक्तिक सुवर्णपदकही पटकावले.

आम्ही योग्य भावनेने खेळत होतो. आपण बऱ्याच गोष्टी बरोबरत करत होतो, याचा निकाल हाच पुरावा आहे. बुडापेस्टमध्ये जे काही घडले त्यामुळे मी खूप आनंदी आहे, असे तो म्हणाला.

आता गुकेशचे लक्ष नोव्हेंबर-डिसेंबरमध्ये गतविजेता चीनचा ग्रॅण्डमास्टर डिंग लिरेनविरुद्ध होणाऱ्या जागतिक बुद्धिबळ अजिंक्यपद स्पर्धेवर आहे.

भारतीय खेळाडूने एप्रिलमध्ये कॅण्डिडेट स्पर्धा जिंकली होती आणि वयाच्या १७ व्या वर्षी जागतिक विजेतेपदासाठी तो सर्वात तरुण आव्हानकर्ता बनला होता. मे महिन्यात तो १८ वर्षांचा झाला.

गुकेश आणि लिरेन २० नोव्हेंबर ते १५ डिसेंबर या कालावधीत सिंगापूरमध्ये प्रतिष्ठित शीर्षक आणि २.५ दशलक्ष बक्षीस रकमेसाठी लढतील. (वृत्तसंस्था)

# पंतचे कसोटी क्रमवारीत पुनरागमन

**अपघातानंतर सहाव्या स्थानावर परतला**

◆ **दुबई, २५ सप्टेंबर**

गंभीर कार अपघातानंतर ऋषभ पंतने बांगलादेशविरुद्धच्या मालिकेतून आंतरराष्ट्रीय कसोटी सामन्यात पुनरागमन केले व आपल्या फलंदाजीची चमक दाखवत आपल्या दर्जेदार श्रेणीवर शिक्का मारला. बांगलादेशविरुद्धच्या कसोटी मालिकेतील पहिल्या सामन्यातील आपल्या वेगवान खेळीत पंतने दुसऱ्या डावात शानदार शतक झळकावून आयससी कसोटी क्रमवारीत पुनरागमन केले व तो सहाव्या स्थानावर आहे.

आयसीसीने जाहीर केलेल्या कसोटी क्रमवारीत अव्वल दहा क्रमवारीत चढ-उतार दिसून आले. यशस्वी जस्वाल (७५१) पाचव्या क्रमवारीत पोहोचला आहे, त्याने बांगलादेशविरुद्धच्या पहिल्या सामन्याच्या पहिल्या डावात अर्धशतक झळकावले. पंत ७३१ रेटिंग गुणांसह त्याच्या मागे आहे.



रोहित शर्माने पहिल्या दहा फलंदाजांमध्ये आपले स्थान कायम ठेवले, परंतु बांगलादेशच्या दोन सामन्यांच्या मालिकेतील पहिल्या कसोटीत त्याच्या एक-अंकी धावसंख्येसह तो पाच स्थानांनी खाली गेला आहे.

कसोटी गोलंदाजीच्या क्रमवारीत, श्रीलंकेच्या प्रभात जयसूर्याने खेळातील सर्वोत्तम फिरकीपटूंपैकी एक म्हणून आपली प्रतिष्ठा मजबूत केली, गॉल कसोटीत न्यूझीलंडविरुद्ध नऊ गड्यांनी पराभव केल्यानंतर पाच स्थानांनी आठव्या क्रमांकावर पोहोचला. जयसूर्या (७४३) आता आयसीसी कसोटी क्रमवारीत सर्वोच्च क्रमांकाचा खेळाडू आहे आणि असिथा फर्नांडो १३व्या स्थानावर आहे.

कसोटी फलंदाजी क्रमवारीत तीन स्थानांनी पुढे सरकणारा कामिंदू मेंडिस १८ व्या स्थानावर पोहोचला आहे. श्रीलंकेच्या क्रमवारीत लक्षणीय सुधारणा झाली आहे.

एकदिवसीय क्रिकेटमध्ये अफगाणिस्तानचा युवा स्टार रहमानउल्ला गुरबाजने सातवे शतक ठोकल्यामुळे त्याने १० स्थानांनी झेप घेत आठव्या स्थानावर मजल मारली आहे. आयसीसी पुरुषांच्या वन-डे फलंदाजी क्रमवारीत अफगाणिस्तानच्या फलंदाजाने पहिल्या १० स्थानांवर पोहोचण्याची ही पहिलीच वेळ आहे.

एकदिवसीय क्रमवारीत देशासाठी यापूर्वी सर्वोत्तम कामगिरी करणारा इब्राहिम झद्रान हा १२व्या क्रमांकावर पोहोचला होता. या तरुणाने ट्रॅव्हिस हेडला मागे टाकले. अफगाणिस्तानचा लेग-स्पिनर रशीद खान, रहमानउल्लाला अव्वल क्रमवारीत सामील करून, एकदिवसीय गोलंदाजी क्रमवारीत आठ स्थानांनी तिसऱ्या स्थानावर आहे.

यूएईमध्ये दक्षिण आफ्रिकेविरुद्ध संघाच्या दोन विजयांमध्ये त्याने सात बळी टिपलेत. या जोडीच्या योगदानामुळे अफगाणिस्तानला एकदिवसीय मालिका जिंकण्यात मदत झाली. (वृत्तसंस्था)

# ग्लोबल चेस लीग संघांच्या जर्सीचे अनावरण


◆ **नवी दिल्ली, २५ सप्टेंबर**

आगामी ३ ते १२ ऑक्टोबर दरम्यान लंडनमध्ये ग्लोबल चेस लीग द्वितीय हंगाम स्पर्धेला प्रारंभ होणार आहे. त्या पृष्ठभूमीवर बुधवारी हंगाम सुरू होण्यापूर्वी सर्व सहभागी सहा फ्रॅन्चायझींच्या अधिकृत जर्सींचे अनावरण करण्यात आले.

बुडापेस्ट, हंगेरी येथे अत्यंत यशस्वीरीत्या ४५ व्या फिडे बुद्धिबळ ऑलिम्पियाड स्पर्धा पार पडल्यानंतर आता लंडनमध्ये दहा दिवसीय जागतिक बुद्धिबळ साखळी स्पर्धेच्या दुसऱ्या हंगामाला सुरुवात होणार आहे.

प्रत्येक संघाची जर्सी त्यांच्या फ्रॅन्चायझीच्या भावनेचे आणि जागतिक स्तरावर बुद्धिबळ खेळण्यास प्रोत्साहित करते. अशाच पद्धतीने या जर्सीची डिझाईन तयार करण्यात आली आहे.

अलीकडील बुद्धिबळ ऑलिम्पियाड सुवर्णपदक विजेते आर. प्रज्ञानंद, विदित गुजराथी, अर्जुन एरिगाईसी व आर. वैशाली यांच्यासह ग्लोबल चेस लीगमध्ये



नवीन जर्सी परिधान करून विविध संघांच्या खेळाडूंनी अशी पोज दिली

वैशिष्ट्यपूर्ण अव्वल बुद्धिबळपटूंनी आपापल्या संघांच्या जर्सी परिधान केल्या. स्पर्धेदरम्यान खेळाडू आपापल्या फ्रॅन्चायझी संघांसाठी एकमेकांविरुद्ध खेळतील. या स्पर्धेमुळे जगभरातील चाहत्यांमध्ये उत्साह निर्माण होईल.

ग्लोबल चेस लीगच्या दुसऱ्या सत्राला सुरुवात होण्यासाठी केवळ एक आठवडा शिल्लक आहे. भारतीय बुद्धिबळ ग्रॅण्डमास्टर निहाल सरीन हा पीबीजी अलास्कन नाईट्स संघाचे प्रतिनिधीत्व करणार आहे.

मी या ग्लोबल चेस लीग. स्पर्धेत पुनरागमन करण्यास खूप उत्सुक आहे. सर्व अव्वल खेळाडू या वर्षी खेळत आहे व त्यामुळेच मी या स्पर्धेची वाट पाहत आहे, असे निहाल म्हणाला.

ग्लोबल चेस लीग ही एक मनोरंजक संकल्पना आहे, कारण सांघिक स्वरूपाच्या खेळाचे असे होते की कधीकधी आपल्याला इतर पटांवरील संधी लक्षात घेऊन खेळावे लागते. ती गतिशीलता नेहमीच गुंतागुंतीची असते व गुणांचे मूल्यांकन संघाच्या रणनीतीवर अवलंबून असते. ते कसे बाहेर पडते याचा कोणीही अंदाज लावू शकत नाही, त्यामुळे ग्लोबल चेस लीग रोमांचक होते, असेही तो म्हणाला.

ग्लोबल चेस लीगच्या पहिल्या हंगामाने बुद्धिबळ खेळात क्रांती घडवून आणली. अशा प्रकारच्या पहिल्या फ्रॅन्चायझी-आधारित लीगमध्ये प्रत्येक संघात सहा खेळाडूंचा समावेश असतो व असे एकूण सहा संघ आहेत. प्रत्येक संघात एक आयकॉन खेळाडू, दोन सुपरस्टार पुरुष खेळाडू, दोन सुपरस्टार महिला खेळाडू व एक वयाने लहान खेळाडू असतो. (वृत्तसंस्था)

# द्विपक्षीय मालिकेमुळे दिल्लीत हॉकीचा उत्साह वाढेल : हरमनप्रीत

**भारत-जर्मनी हॉकी मालिका २३ ऑक्टोबरपासून**

◆ **नवी दिल्ली, २५ सप्टेंबर**

आगामी २३ व २४ ऑक्टोबर रोजी नवी दिल्ली येथे भारत आणि जर्मनी यांच्यादरम्यान द्विपक्षीय मालिका खेळली जाणार आहे. एका दशकानंतर मेजर ध्यानचंद स्टेडियमवर होणाऱ्या या छोटी मालिकेमुळे या मालिकेमुळे नवी दिल्लीत हॉकीचा उत्साह वाढेल, असे भारताचा हॉकी कर्णधार हरमनप्रीत सिंग म्हणाला.

२०१४ मध्ये नवी दिल्लीत हिरो हॉकी वर्ल्ड लीग फायनल-पुरुषांच्या चौथ्या फेरीत भारतीय हॉकी संघ आपला अखेरचा सामना खेळला होता.

ही मालिका केवळ दोन संघ खेळण्यापुरती नाही, या प्रदेशातील हॉकीची भावना पुनरुज्जीवित करण्याबद्दल आहे. या मालिकेमुळे या प्रदेशातील अधिकाधिक तरुण



कर्णधार हरमनप्रीत सिंग

खेळाडूंना हा खेळ खेळण्याची प्रेरणा मिळेल, असे तो म्हणाला.

इतक्या वर्षांनंतर दिल्लीत घरच्या चाहत्यांसमोर खेळणे आमच्यासाठी एक संघ म्हणून खरोखरच खास आहे. मेजर ध्यानचंद नॅशनल स्टेडियममध्ये खूप इतिहास व आठवणी आहेत. या ठिकाणी संघाचे नेतृत्व करणे हा मोठा सन्मान असेल, असेही तो म्हणाला. या महिन्याच्या सुरुवातीला चीनमध्ये झालेल्या आशिया चॅम्पियन्स चषकामध्ये विजेतेपद पटकावल्यानंतर ही मालिका संघाची आणखी चाचणी घेण्याची संधी असेल असे ड्रॅग-फ्लिकर हरमनप्रीत सिंग म्हणाला.

**जर्मनीविरुद्ध खेळणे मोठे आव्हान**

जर्मनी हा जागतिक हॉकीमधील अव्वल संघांपैकी एक आहे आणि त्यांच्याविरुद्ध खेळणे हे आमच्यासाठी मोठे आव्हान असेल. पुढील स्पर्धेसाठीच्या तयारीसाठी ही मालिका आमच्यासाठी खूप महत्त्वाची आहे. या मालिकेसाठी आम्ही कठोर परिश्रम करत आहोत. या मालिकेमुळे आम्हाला अतिशय मजबूत प्रतिस्पर्ध्याविरुद्ध आत्मपरीक्षण करण्याची संधी मिळेल, असेही तो म्हणाला. (वृत्तसंस्था)

# जो रूटला महान कसोटीपटू होण्यासाठी सचिनचा विक्रम मोडण्याची गरज नाही : बेल

◆ **जोधपूर, २५ सप्टेंबर**


सचिन तेंडुलकरचा १५,९२१ धावांचा विक्रम मोडू शकला नसला तरीही जो रूट इंग्लंडचा कसोटीतील महान फलंदाज म्हणून असेल, असे मत त्याचा माजी सहकारी इयान बेल याने व्यक्त केले आहे.

जो रूटने अलीकडेच सर्वाधिक कसोटी धावा काढणाऱ्या खेळाडूंच्या यादीत श्रीलंकेच्या दिग्गज कुमार संगकाराला मागे टाकत सहावे स्थान मिळविले आहे. १२,४०२ धावांसह ३३ वर्षीय जो रूट सचिनचा विक्रम मोडण्यापासून ३,५१९ धावा दूर आहे. जोधपूरमधील लेजेंड्स लीग क्रिकेटच्या वेळी एका खास मुलाखतीत इयान बेल बोलत होता.

गत बारा महिन्यात रूट अविश्वसनीयपणे चांगला खेळला आहे. तो पुढे आणखी काही चांगली कामगिरी करण्याचा विचार करत नाही असे मला वाटते. तो या क्षणी आम्ही जसे आहोत तसे जगत आहे, असेही तो म्हणाला.

सचिन तेंडुलकर महान क्रिकेटपटू आहे व आपण सर्वांनी त्याची प्रशंसा केली आहे. जो रूटही सचिनच्या कामगिरी इतकी





सचिन तेंडुलकर इयान बेल जो रूट

कामगिरी करू शकतो. एक नायक म्हणून तो केवळ भारतीय प्रेक्षकांसमोरच नाही, तर जगभरातील लोकांसमोरही येऊ शकतो, असे तो म्हणाला. ४२ वर्षीय इयान बेलने इंग्लंडकडून तब्बल ११८ कसोटी सामने खेळले आहे.

बॅझबॉलमुळे सध्याच्या खेळाडूंची प्रतिभा उजळून निघाली आहे. ब्रेंडन मॅक्युलम हा इंग्लंड संघात आल्यापासून व बेन स्टोक्सने पदभार स्वीकारल्यापासून, निकाल अगदी विलक्षण आहेत, असेही तो म्हणाला. संघ व्यवस्थापन हे झॅक क्रॉली, ऑली पोप, हॅरी ब्रूक यांना ॲलिस्टर कुक किंवा जोनाथन ट्रॉटसारखे होण्याचा प्रयत्न करत आहे, त्याकरिता त्यांना अनुकूल वातावरणही निर्माण करत आहे, परंतु त्यांच्यातील प्रतिभा ओळखमे महत्त्वाचे आहे, असे बेल म्हणाला.

**इंग्लंडला घरच्या मैदानावर विजय मिळविणे महत्त्वाचे**

आता इंग्लंड संघाला पुढील जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेच्या अंतिम फेरीसाठी घरच्या मैदानावर विजय मिळविणे तितकेच महत्त्वाचे आहे, असे तो म्हणाला. तथापि, पहिल्या दोन आवृत्त्यांमध्ये जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेच्या अंतिम फेरीत इंग्लंड संघाचा समावेश नव्हता. पुढील १२ महिन्यांवर आमची नजर आहे, यात भारताविरुद्ध घरच्या मैदानावर पाच कसोटी सामने खेळले जाणार आहे व हे आमच्यासाठी एक मोठे आव्हान असेल, तो म्हणाला. (वृत्तसंस्था)

### भारत हा जगातील सर्वोत्तम क्रिकेट संघ

भारत हा जगातील सर्वोत्तम संघ आहे आणि त्यानंतर ऑस्ट्रेलियाचा क्रम लागतो. आम्ही भारतात जिंकणारा शेवटचा संघ होतो व हा अव्वल क्रमांकावर जाण्याच्या प्रवासाचा एक भाग होता. इंग्लंड संघ नक्कीच प्रथम क्रमांक गाठेल यात दुमत नाही. कारण इंग्लंडकडे क्षमता आणि प्रतिभा आहे, असे तो म्हणाला.

मायदेशात सलग १७ मालिका जिंकणारा भारतीय संघ घरापासून दूर कोणत्याही संघाविरुद्ध जिंकण्यात सक्षम झाले आहेत म्हणूनच ते या क्षणी जगातील पहिला क्रमांकाचा संघ आहे, असे तो म्हणाला.



कानपूरमधील ग्रीन पार्क स्टेडियमवर बुधवारी सराव करताना बांगलादेश संघाचे खेळाडू. शुक्रवारपासून , भारत आणि बांगलादेश यांच्यादरम्यान दुसरा कसोटी क्रिकेट सामना खेळला जाणार आहे

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# लालपरीच्या राज्यातील पहिल्या महिला चालक शितल शिंदेचा अभिमान

● कविता घोडके-पाटील
● चालक दिनानिमित्त कौतुकाचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ सप्टेंबर-**

बँकींग क्षेत्रातील उच्च पदाची नौकरी सोडुन प्रवाश्यांच्या सेवेसाठी लालपरीचे सारथ्य करणाऱ्या राज्यातील पहिल्या महिला चालक विषेशतः सोलापूर आगारात कार्यरत असलेल्या शितल शिंदे यांनी महिला कोणत्याही क्षेत्रात मागे नाही हे दाखवुन दिले याचा एक महिला म्हणून अभिमान असल्याचे सरपंच परिषदेच्या सोलापूर जिल्हा महिला अध्यक्षा कविता घोडके पाटील यांनी सांगितले.

चालक दिनानिमित्त महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या सोलापूर आगारातील महिला चालक शितल शिंदे यांचा सत्कार करताना बोलत होत्या.यावेळी गुळवंचीचे सरपंच तथा मा.पृथ्वीराज माने युवा मंचचे अध्यक्ष सुनील जाधव,अकोलेकाटीच्या सरपंच अंजली क्षिरसागर, मुज्जफर जहागिरदार आदि उपस्थित होते.

पुणे येथील एका खासगी बँकेत सेल्स मॅनेजर पदावर तीन वर्षांपासून काम करणाऱ्या शितल शिंदे यांनी राजिनामा दिला त्यांची सन २०१९ मध्ये राज्य परिवहन महामंडळाच्या सरळसेवा भरतीत त्यांची चालक पदावर निवड झाली.प्रवाश्यांची सेवा करण्याची इच्छा बाळगून त्यांनी हा मार्ग स्विकारला. करोना काळात काही काळ प्रशिक्षण थांबले होते तदनंतर पुर्ण केले. प्रशिक्षण काळात त्यांनी सुमारे तीन हजार किमी प्रवास केला प्रशिक्षण दरम्यान त्यांनी महामार्ग, घाट मार्गावर तर रात्रीचे वेळी बस चालवली, सोलापूर यवतमाळ, उस्मानाबाद अश्या फेरी त्यांनी केल्या. त्यांच्या आत्मविश्वासाचे जिद्दीचे कौतुक आहे.

कोणत्याही क्षेत्रात महिला मागे नाही हे शिंदेनी दाखवून दिले. चालक दिनाचे औचित्य साधून एक महिला म्हणून सन्मान करताना अभिमान वाटला असे घोडके-पाटील यांनी सांगीतले.

### स्त्री पुरुषापेक्षा एक पाऊल पुढे : जाधव

चुल आणि मुल सांभाळणारी अशी गणना केली जाणारी स्त्री आज शिक्षण व जिद्दीचे जोरावर प्रत्येक क्षेत्रात पुरषापेक्षा एक पाऊल पुढे असल्याचे दाखवून दिले.चालक दिनाचे औचित्य साधून शिंदे यांचा सत्कार हा सर्व क्षेत्रातील चालकांचा आहे. एका उपमुख्यमंत्र्यांच्या गाडीचे सारथ्य करणारी महिला चालक, माजी आमदार राजन पाटील यांच्या पायलट असलेल्या कन्या ऋतुजा पाटील, तर लालपरी चालक म्हणून सेवेत असलेल्या शितल शिंदे या महिलासाठी आदर्शवत असल्याचे सरपंच सुनील जाधव यांनी सांगितले.

# शिवराज्याभिषेकाने महान हिंदू साम्राज्याची स्थापना

● प. पू. स्वामी गोविंद देव गिरी महाराज
● छत्रपती शिवाजी महाराज कथेचा समारोप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ सप्टेंबर -**

हिंदवी स्वराज्य निर्माण करुन छत्रपती श्री शिवाजी महाराजांनी हिंदूंना जुलमी अत्याचारातून मुक्त केले. श्री शिवराज्याभिषेकाने महान हिंदू साम्राज्याची स्थापना झाली, असे प्रतिपादन छत्रपती श्री राम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र अयोध्याचे कोषाध्यक्ष प.पू. स्वामी गोविंद देव गिरिजी यांनी केले.

३५० व्या श्री शिवराज्याभिषेक वर्षानिमित्त समस्त हिंदू समाजातर्फे जुनी मिल कंपाउंड येथील नागेश करजगी ऑर्किड स्कूलमध्ये आयोजित छत्रपती श्री शिवाजी महाराज कथेचा समारोप बुधवारी झाला. यावेळी प. पू. स्वामी गोविंद देव गिरिजी यांनी मार्गदर्शन केले. शिवविजय या विषयावर बोलताना त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचे विजयपर्व, श्री शिवराज्याभिषेक, हिंदवी स्वराज्याची स्थापना, भारतव्यापी हिंदवी साम्राज्य आदींवर विवेचन केले. प. पू. स्वामी गोविंद देव गिरिजी म्हणाले, छत्रपती श्री शिवाजी महाराज राजे असूनही संत वृत्तीचे होते. विशाल दृष्टिकोन, सहकाऱ्यांना प्रेरणा, त्यागमय जीवन असेल तर महान कार्य घडते. श्री शिव छत्रपतींच्या या गुणांची किर्ती पाहूनच छत्रसाल बुंदेला यांच्यासारख्या अनेकांना प्रेरणा मिळाली. रामायण, महाभारत यांतील संपूर्ण सार श्री शिवचरित्रात आहे. सी. ए. राजगोपाल मिणीयार यांनी प्रास्ताविक तर गुरुशांत धुत्तरगावकर यांनी सूत्रसंचालन केले.



### उत्तम सेना असेल तर राष्ट्राची विजयाकडे घोडदौड

ज्या राष्ट्राची सेना उत्तम असेल आणि सेनेचे नेतृत्वही उत्तम असेल ते राष्ट्र विजयाकडे घोडदौड करते. आपल्या भारताच्या अत्यंत शूर सेनादलांमुळे भारताची मान जगात आणखी उंचावली आहे, अशा शब्दांत प. पू. स्वामी गोविंद देव गिरिजी यांनी तीनही सैन्यदलांचे कौतुक केले.

### अमीर तडवळकर यांचा शिवराज्याभिषेकाचा प्रसंग हुबेहूब

कथेच्या समारोपप्रसंगी अमीर तडवळकर यांच्या समर्पित नाट्य शाळेच्या कलाकारांनी श्री शिवराज्याभिषेकाचा प्रसंग हुबेहूब सादर करून उपस्थितांची वाहवा मिळवली. या सादरीकरणातील श्री शिवछत्रपती शिवभक्तांमधून व्यासपीठावर येताना शिवभक्तांनी फुलांची उधळण करीत छत्रपती श्री शिवरायांचे स्वागत केले. धर्मवीर चित्रपटातील हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांची भूमिका करणारे मकरंद पाध्ये यांनी छत्रपती श्री शिवाजी महाराजांची भूमिका साकारली.



# विद्यार्थ्यांनी स्वभाव व संस्कारांमध्ये स्वच्छता गुण अंगीकारावे : चव्हाण

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २५ सप्टेंबर -**

स्वच्छता ही चांगली सवय आहे, स्वच्छ पर्यावरण आणि आदर्श जीवनशैलीसाठी प्रत्येकाने ही सवय लावली पाहिजे.निरोगी शरीरात निरोगी मानसिकता विकसित होते, हे लक्षात घेऊन देशात स्वच्छतेची मोठी गरज पाहून आपल्या पंतप्रधानांनी स्वच्छता ही सेवा सुरू केले, असे प्रतिपादन क्षेत्रीय प्रचार अधिकारी अंकुश चव्हाण यांनी केले.

केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या अंतर्गत असलेले केंद्रिय संचार ब्युरो आणि सोनामाता आदर्श विद्यालय यांच्या वतीने स्वच्छता ही सेवा २०२४ अभियानांतर्गत स्वच्छता संवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी चव्हाण बोलत होते. यावेळी प्रभारी मुख्याध्यापक जिलामी पटेल, सहायक प्रचार अधिकारी अंबादास यादव, सुरेखा लादे, मिरा सुतार आणि सुजाता सुतार आदी मान्यवर उपस्थित होते. सुजाता सुतार यांनी विद्यार्थी आणि उपस्थितांना स्वच्छतेची शपथ दिली.

विद्यार्थ्यांसाठी स्वच्छता विषयावर प्रश्नमंजुषा स्पर्धा घेण्यात आली. विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र आणि पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. एक झाड आईच्या नावे या उपक्रमांतर्गत केंद्रिय संचार ब्युरोचे परिसर आणि शाळेच्या परिसरामध्ये शेवगा, पारिजात, चाफा आणि तुळशीचे वृक्षारोपण करण्यात आले.



# इनरव्हील क्लब हार्मोनीने घेतले थॅलेसेमिया सेंटरमधील ६१ मुलांना घेतले दत्तक

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २५ सप्टेंबर -**

इनरव्हील क्लब सोलापूर, हार्मोनी यांनी श्रीमती गोपाबाई दमाणी ब्लड सेंटरला भेट देऊन तेथील थॅलेसेमिया सेंटरमधील ६१ मुलांना दत्तक घेतले.

यावेळी इनरव्हील हार्मोनी च्या प्रेसिडेंट तृषा गुप्ता, डिस्ट्रिक्ट चेअरमन डॉ. शोभना पालेकर, डिस्ट्रिक्ट वाइस चेअरमन लता शिवशंकर, डिस्ट्रिक्ट एडिटर डॉ स्मिता चाकोते, अनुराधा चांडक आदि उपस्थित होते.

इनरव्हील क्लब सोलापूर हार्मोनी च्या सर्व सदस्यांनी थॅलेसेमिया सेंटर ला भेट देऊन तेथील ६१ मुलांना दत्तक घेतले. यावेळी इंडियन रेड क्रॉस सोसायटी चे मानद सचिव जयेश पटेल व मानद सहसचिव खुशाल देढिया उपस्थित होते.

# लाचेचा आरोप; तत्कालीन सरपंचासह ग्रामसेवकाची मुक्तता

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २५ सप्टेंबर -**

हत्तूरच्या तत्कालीन सरपंचाची व ग्राम सेवकाची लाच प्रकरणातून निर्दोष मुक्तता करण्याचे आदेश सत्र न्यायाधीश राणे यांनी दिले.

सन २०१० मध्ये कुलकर्णी तांडा (हत्तुर) स्मशानभूमीच्या कामास ग्रामपंचायत हत्तुरमध्ये ठराव मंजूर झालेला होता. त्यानंतर ग्रामपंचायतीने जिल्हा नियोजन विभागाकडे सदरबाबत मंजूर झालेल्या ठरावाप्रमाणे स्मशानभूमी बांधकामास मंजुरी मिळण्याबाबत प्रस्ताव पाठवला होता. ग्रामपंचायतीने पाठवलेल्या प्रस्तावानुसार कुलकर्णी तांडा (हत्तुर) येथे सन २०११-१२ मध्ये गावाबाहेरील तलावाचे बाजूला स्मशानभूमी बांधण्याच्या कामाला जनसुविधा योजनेअंतर्गत २ लाख ५० हजार रुपयांची मंजुरी मिळालेली होती.

सदर स्मशानभूमीचे काम यातील तक्रारदार चव्हाण यांना मंजूर झालेले होते. सदरचे काम नोव्हेंबर २०१२ मध्ये पूर्ण करण्यात येऊन एकूण रकमेपैकी २ लाख १८ हजार ३६१ रुपयांचा धनादेश तक्रारदारांना ग्रामसेवक मल्लिनाथ दुधगी व सरपंच शमशादबी अत्तार यांनी फेब्रुवारी २०१३ मध्ये दिलेला होता. शासकीय नियमानुसार काम पूर्ण झाल्यानंतर कामाच्या रकमेची पाच टक्के कालदोष रक्कम ही एक वर्षानंतर ठेकेदारास परत दिली जाते. सदरची १२ हजार ५०० रुपयांची कालदोष रक्कम मिळण्यासाठी तक्रारदार चव्हाण यांनी १० डिसेंबर २०१३ रोजी ग्रामसेवक मल्लिनाथ दुधगी व तत्कालीन सरपंच श्रीमती शमशादबी गफूर अत्तार यांची भेट घेतली. त्यावेळी तत्कालीन सरपंच यांनी पूर्वी केलेल्या कामाचे व स्मशानभूमीच्या कामाचे म्हणून तक्रारदारांकडे २ हजार रुपये व ग्रामसेवकाने धनादेश काढल्यानंतर काय द्यायचे द्या, असे म्हणून लाचेची मागणी केली होती. त्यामुळे २४ डिसेंबर २०२३ रोजी तक्रारदाराने तत्कालीन सरपंच अत्तार व ग्रामसेवक दूधगी यांच्याविरुद्ध लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रारी अर्ज दिलेला होता. त्यानंतर दोन्ही आरोपींविरुद्ध विजापूर नाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आलेला होता. त्यानंतर आरोपींविरुद्ध सोलापूर येथील विशेष जिल्हा व सत्र न्यायाधीश यांच्या न्यायालयात दोषारोपपत्र पाठवण्यात आलेले होते.

या प्रकरणात सरकार पक्षातर्फे चार साक्षीदार तपासण्यात आले होते. गावातील राजकारणामुळे सरपंचांना खोटेपणाने गुंतविण्यात आल्याचे व त्यांनी कोणतेही लाच मागितली नसल्याचे आरोपींच्या वकिलांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले. तपासण्यात आलेले साक्षीदारांच्या साक्षीमध्ये महत्वपूर्ण व ठळक विसंगती व तफावती असल्याचे आरोपींच्या वकिलांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले. हे ग्राह्य धरून न्यायालयाने दोघांची मुक्तता करण्याचे आदेश दिले. याप्रकरणात सरकारच्यावतीने ॲड. दत्तात्रय पवार यांनी तर आरोपींच्या वतीने ॲड. मिलिंद थोबडे, ॲड. निलेश जोशी, ॲड. यशश्री जोशी, ॲड. दत्ता गुंड, ॲड. नागेश मेंडगुदले व ॲड. राणी गाजूल यांनी काम पाहिले.




# भाविक वारकरी मंडळ अल्पावधीतच : आ. आवताडे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ सप्टेंबर-**

भाविक वारकरी मंडळ ही संघटना अल्पावधित लोकप्रिय झाली आहे. या भवनचा वारकरी सेवेसाठी उपयोग होईल. म्हणून हा भाग्याचा क्षण मानतो, असे प्रतिपादन आमदार समाधान आवताडे यांनी केले.

चोखामेळा नगर ग्रामपंचायत अंतर्गत स्थानिक आमदार निधीतून बांधलेल्या वारकरी भवन या वास्तूच्या उदघाटन व लोकार्पण सोहळा कार्यक्रम प्रसंगी बोलत होते. ते पुढे ते म्हणाले की, मंगळवेढा येथे संत परंपरा खूप मोठी आहे. शिवाय पंढरपूर हे हाकेच्या अंतरावर आहे. त्यामुळे वारकरी भवन उभारणीचा प्रयत्न झाला. भाविक वारकरी मंडळाने व ह भ प ज्ञानेश्वर माऊली भगरे यांनी चिकाटीने प्रयत्न केले आणि ते भवन माझ्या निधीतून होत असल्याने मला मनस्वी आनंद झाला आहे.

ह भ प सुधाकर इंगळे महाराज यांच्या अध्यक्षते खाली व ह भ प गोपाळ अण्णा वासकर महाराज यांच्या शुभहस्ते, ह भ प भागवत चवरे महाराज (राष्ट्रीय उपाध्यक्ष), जोतिराम चांगभले (प्रदेश अध्यक्ष) बळीराम जांभळे (राष्ट्रीय सचिव), मोहन शेळके (प्रदेश सचिव), सरपंच शिवाजी सरगर आदींच्या उपस्थिती मध्ये कार्यक्रमाचे आयोजन केले होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष ह भ प सुधाकर इंगळे महाराज, ह भ प गोपाळ अण्णा वासकर महाराज यांनीही आपापले मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक भिमराव मोरे यांनी केले. सूत्रसंचालन संतोष मिसाळ यांनी केले. प्रारंभी श्री संत दामाजी मंदिरापासूनसंत चोखामेळा नगर येथील वारकरी भवन पर्यंत बाल वारकरी दिंडी काढन्यात आली होती. दिपप्रज्वलन व प्रतिमा पूजन करुन कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी पर्वती आवताडे (पंढरपूर विभाग महिला जिल्हाध्यक्ष ), ह भ प ज्ञानेश्वर भगरे (पंढरपूर विभाग जिल्हाध्यक्ष ), अविनाश नांद्रेकर (शहर अध्यक्ष ), ह भ प निलेश गुजरे (तालुकाध्यक्ष), ह भ प संगीता अवताडे (शहर महिला अध्यक्ष ), मल्लिकार्जुन राजमाने, संत चोखामेळा नगरचे सरपंच शिवाजी सरगर, भारत गवळी यांच्यासह अखिल भाविक वारकरी मंडळ पदाधिकारी व संत चोखामेळा नगर ग्रामपंचायतीचे सदस्य यांनी परिश्रम घेतले.ज्ञानेश्वर भगरे यांनी आभार मानले. पसायदानाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. महिला व पुरुष भाविकांची प्रमुख उपस्थिती होती.

# खानचाचा हॉटेल मालकासह ११ जण निर्दोष

● पोलीसी अत्याचाराचे जिवंत उदाहरण न्यायालयाचे निरीक्षण

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २५ सप्टेंबर -**

पोलिस शिपाई अमोल सुरेश बेगमपुरे (वय ३९, रा. विद्यानगर, शेळगी, सोलापूर) यास जीवे ठार मारण्याचा प्रयत्न तर एकास जखमी केल्याप्रकरणी हॉटेल खान चाचाचे मालक सलमान खान (वय ३०), रिहान खान (वय ३२), अल्ताफ पठाण (वय २२), मोहम्मद अन्सारी (वय २४), मोजाहिद अन्सारी (वय २४), अन्वर जोडगे (वय २६), सिद्धेश्वर हेडगे (वय २९), सैफन मुलाणी (वय २४), सादिक शेख (वय ४०), मोहसिन शेख (वय २३), शाहनवाज सय्यद (वय ३१) यांच्यावर भरलेल्या खटल्याची सुनावणी जिल्हा व सत्र न्यायाधीश योगेश राणे यांच्यासमोर होऊन त्यांनी गुन्हा शाबीत न झाल्याने सर्व आरोपींची निर्दोष मुक्तता केली.



१० ऑक्टोबर २०२० रोजी पोलिस शिपाई अमोल बेगमपुरे हे अश्विनी हॉस्पिटल येथे त्यांच्या चुलत बहिणीस पाहण्यासाठी गेले होते. तेथे त्यांचा चुलत भाऊ शशिकांत बेगमपुरे हा देखील हॉस्पिटलमध्ये बहिणीस पाहण्यासाठी आला होता. त्यावेळी दोघांनाही भूक लागल्याने ते काहीतरी खाण्यास हॉटेल खान चाचा येथे आले. त्यांनी हॉटेल मालक सलमान व रिहान यांना जेवणासाठी पार्सल देण्यास सांगितले, त्यावर हॉटेल मालक सलमान व रिहान यांनी अरेरावीची भाषा वापरून त्यांनी व इतरांनी अमोल यास लाकडी दांडके, लोखंडी रॉडने मारहाण करून जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला. म्हणून सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याचा तपास पोलिसांनी करून न्यायालयात दोषारोपपत्र पाठविले होते. या खटल्याच्या सुनावणीच्या वेळेस आरोपींचे वकील यांनी आरोपी सलमान व रिहान यांना झालेल्या जखमांचा खुलासा सरकार पक्षाने केला नाही, तसेच पोलीसांना जेवण न दिल्यामुळे त्यांनी चिडून हॉटेल मालकांना मारहाण केली आणि स्वतःवर केस होण्यापूर्वी आरोपींविरुद्ध केस दाखल केल्याचे दिसते असा युक्तिवाद मांडला. यावरून न्यायालयाने सदरचा खटला हा पोलीसी अत्याचाराचा जिवंत नमुना दिसतो असे नमूद करून सर्व आरोपींची निर्दोष मुक्तता केली. यात सरकारतर्फे ॲड. दत्तूसिंग पवार यांनी तर आरोपींतर्फे ॲड. मिलिंद थोबडे, ॲड.निशांत लोंढे यांनी काम पाहिले.



# पावसामुळे सखल भागात पाणी

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २५ सप्टेंबर -**

सततच्या पावसाने शहरातील सखल व नागरी वस्त्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर पाणी साचले होते. दोन दिवसांच्या जोरदार पावसामुळे शहरातील सखल भागांसह नागरी वस्तीत पाणी साचले होते.

नागरी वस्त्यांमध्ये देखील मोठ्या प्रमाणावर पाणी साचल्याने नागरिकांची मोठी गैरसोय झाली. शेळगी, दहिटणे, शिवाजीनगर, देगाव, सोरेगाव कॅम्प, बोळकोटे नगर यांसारख्या हद्दवाढ भागांमध्ये कच्चे रस्ते असलेल्या अनेक नगरांमधील रहिवाशांना चिखलातूनच वाट काढत पायी जावे लागले. शहरातील बाजारपेठेचा परिसर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या शिंदे चौक, सिद्धेश्वर प्रशाला, पासपोर्ट कार्यालय, छ. शिवाजी महाराज चौक, नवी वेस पोलीस चौकी, जुना कारंबा नाका, सुशील रसिक आदी ठिकाणी पाणी साचल्याने नागरिकांची मोठी गैरसोय झाली.

दरम्यान, गांधी चौकात पावसात झाड पडल्याची माहिती मिळताच महापालिकेच्या अग्निशमन विभागाने तत्काळ कटरच्या साहाय्याने झाड कापून रस्ता वाहतुकीसाठी खुला केला.

# राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामुळे नवनवीन संधी उपलब्ध : डॉ. गौतम कांबळे

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २५ सप्टेंबर -**




पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने देशभर राष्ट्रीय शैक्षणिक धोरण राबवण्याचा निर्णय घेतला हेच धोरण महाराष्ट्र शासनाने देखील राबवली जात आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या कौशल्य आधारित शिक्षणामुळेच विद्यार्थ्यांना नवनवीन क्षेत्रात आणि परदेशात करियर करण्याची संधी उपलब्ध झाली आहे. असे प्रतिपादन सामाजिक शास्त्रे संकुलाचे संचालक प्राध्यापक डॉक्टर गौतम कांबळे यांनी केले.

पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या सामाजिक शास्त्र संकुलात पंतप्रधान उच्चतर शिक्षा अभियाना अंतर्गत विद्यार्थ्यांसाठी चार दिवसीय ब्रिज कोर्स चे आयोजन करण्यात आले आहे. ब्रिज कोर्सच्या उद्घाटन प्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानावरून डॉ. कांबळे बोलत होते. यावेळी व्यासपीठावर प्राचीन भारतीय इतिहास संस्कृती आणि पुरातत्त्व विभागाचे प्रमुख डॉ. प्रभाकर कोळेकर उपस्थित होते.

यावेळी बोलताना डॉ. कांबळे म्हणाले, प्रत्येक विद्यार्थ्याने आपले स्वतःचे करिअर घडवावे हाच विद्यापीठाचा प्रमुख उद्देश आहे. यासाठी नियमित अभ्यासक्रमाच्या पुस्तकांबरोबरच स्पर्धा परीक्षेची पुस्तके ही विद्यापीठाने मोठ्या प्रमाणात उपलब्ध करून दिले आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांनी वर्गातील तासिका पूर्ण झाल्यानंतर आपला अधिकतर वेळ नॉलेज रिसोर सेंटर मध्ये अभ्यासामध्ये घालवावा. विद्यार्थ्यांनी एखाद्या विषयाची केवळ डिग्री न घेता सामाजिक शास्त्र संकुला अंतर्गत सुरू असलेल्या कौशल्य विकास अभ्यासक्रमांनाही प्रवेश घेऊन आपली कौशल्य वाढवावीत. आणि आपले करिअर घडवावे डॉ. गौतम कांबळे यांनी यावेळी केले. यावेळी बोलताना प्रा. डॉ. प्रभाकर कोळेकर म्हणाले, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठांमध्ये अध्यापनाबरोबरच विद्यार्थ्यांमध्ये संशोधन वृत्ती निर्माण व्हावी याला महत्व दिले जाते. विद्यापीठात प्रवेश घेतलेल्या प्रत्येक विद्यार्थ्यांनी आपले करिअर हे चांगल्या पद्धतीने व्हावे. यासाठी जबाबदारीने वागले पाहिजे. असेही कोळकर यांनी यावेळी स्पष्ट केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. मधुकर जक्कन यांनी केले. तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सुनिता गाजरे यांनी केले. यावेळी ब्रिज कोर्स साठी सामाजिक शास्त्र संकुलातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# मनपा प्राथमिक शिक्षण मंडळात पंडित उपाध्याय यांना अभिवादन

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २५ सप्टेंबर -**

महापालिका प्राथमिक शिक्षण मंडळामध्ये पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस प्राथमिक शिक्षण मंडळाचे मुख्य लिपिक माहेजबीन शेख यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी प्राथमिक शिक्षण मंडळाचे लेखापाल मल्लिकार्जुन हिरेमठ, पर्यवेक्षक सुरेश कासार, रजनी राऊळ, निलोपर सय्यद, महेश वालावलकर, ताहीर कारभारी, सारंग अंजीखाने, अमोल गायकवाड, भगवान गायकवाड, सचिन जाधवर, नितीन अंकुश,लक्ष्मण पुजारी, सचिन बर्मा, ताहीर बिराजदार, रतन साळवे, आशिकेष लोखंडे, पठाण, हर्षद चिंचनसुरे, अझहर पठाण, भालचंद्र साखरे, नरसिंग चिप्पा, सचिन साखरे, सायली ढोले आदी उपस्थित होते.

## निधन वार्ता

### भागवत गायकवाड



**श्रीपूर, दि. २५ सप्टेंबर-**

येथील कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखान्यातील सेवानिवृत्त कामगार भागवत शंकर गायकवाड (वय ८४) यांचे निधन झाले. श्रीपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे व्यवस्थापक अभिनंदन गायकवाड यांचे ते वडील होत. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुली, एक मुलगा, नातवंडे असा परिवार आहे.

### भंवरलाल सुकलेचा



**सोलापूर, दि. २५ सप्टेंबर-**

जुन्या काळातील कापडाचे व्यापारी भवरलालजी गुलाबचंदजी सुकलेचा यांचे (वय ८६) निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी मोहिनीबाई, गौतम, संतोष व गिरीश हे तीन मुले, दोन मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. त्यांची अंत्ययात्रा जुनी मिल कंपाऊंड येथील घरापासून गुरुवार (दि.२६) सकाळी १०.३० वाजता निघेल.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# जो पेन्शन की बात करेगा; वही देश पे राज करेगा!

## ● विराट आक्रोश मोर्चा : सामुहिक रजा काढून सुमारे दहा हजार शिक्षक सहभागी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर , दि. २५ सप्टेंबर -**

जुनी पेन्शन सुरू करणे, संच मान्यता जाचक अटी रद्द करणे, कंत्राटी शिक्षक भरती रद्द करणे अशा महत्त्वाच्या मागण्यासाठी सोलापूर शहर जिल्ह्यातील शिक्षकांनी भव्य असा विराट आक्रोश मोर्चा काढून राज्य सरकारला जोर का झटका दिल्याचे पाहायला मिळाले. '' जो पेन्शन की बात करेगा ; वही देश के राज करेगा ! '' असे फलक हाती घेऊन घोषणा देत विराट आक्रोश मोर्चा जिल्हाधिकार्यालयाकडे मार्गस्थ झाला.

सोलापूर जिल्हा प्राथमिक शिक्षक संघटना समन्वय समितीचे शिक्षक नेते संभाजीराव थोरात यांच्या नेतृत्वाखाली सर्व शिक्षक संघटना एकत्रित येऊन हा मोर्चा काढला. हुतात्मा चौक येथे चार हुतात्म्यांच्या पुतळ्यांना अभिवादन करून निघालेला हा मोर्चा दुपारी दोनच्या सुमारास जिल्हा परिषदेच्या उपोषण प्रवेशद्वारासमोर आला. येथे या मोर्चाचे रूपांतर भव्य अशा सभेमध्ये झाले. यावेळी लोकनेते अभिजित पाटील, शरद कोळी, म. ज. मोरे, अंकुश काळे, वीरभद्र यादवाड, अनिरुद्ध पवार, संजीव चाफाकरंडे, छानदारांनी आतकर, राम शिंदे व शामराव जवंजाळ यांची भाषणे झाली.





मोर्चा मधील सहभागी शिक्षकांनी जुनी पेन्शन आमच्या हक्काची असल्याचे सांगत विविध मागण्या मांडल्या. मागील काही वर्षापासून शिक्षकांना लावले जाणारे विविध शैक्षणिक कामे, नवीन आलेल्या अधिकारी व पदाधिकारी यांनी राबविण्यात सांगितलेले अनेक नवीन उपक्रम, दररोज निघणारे नवनवीन शासन निर्णय, दररोज भरावे लागणाऱ्या ऑनलाइन लिंक वरील माहिती यामुळे राज्यातील प्राथमिक शिक्षक त्रस्त झाला असून शासन शिक्षकांची एक प्रकारचे चेष्टा करीत आहे. यामुळे शिक्षकांना प्रत्यक्षात मुलांना शिकवण्याकरिता वेळच मिळत नाही. याकरिता जिल्ह्यातील सुमारे आठ ते दहा हजार शिक्षक आज रस्त्यावर उतरले.

### ● शिक्षकांनी सरकारवर साधला निशाणा

आगामी विधानसभा निवडणूक लक्षात घेऊन शिक्षक समन्वय समितीच्या पदाधिकारी आणि शिक्षक सदस्यांनी आपली पुन्हा एकदा प्रलंबित जुनी पेन्शनची मागणी सरकार दरबारी लावून धरली आहे. सरकारने जर यावर सकारात्मक निर्णय घेतला नाही तर, निवडणुकीनंतर वेगळे चित्र दिसेल असा इशारा दिला आहे. त्यामुळे आगामी विधानसभा निवडणूक डोळ्यासमोर ठेवून शिक्षकांनी राज्य सरकारवर आणि राज्यकर्त्यांवर निशाणा साधत, सरकारला जोरका झटका धीरे से देऊन, सरकारचे टेन्शन वाढवलेले आहे.

### ● विधानसभेत सरकारला जागा दाखवू

जुनी पेन्शन शिक्षकांना लागू व्हावी ही आमची प्रलंबित आणि पहिल्यापासूनची मागणी आहे. त्याच पद्धतीने संच मान्यता मधील जाचक अटी रद्द करणे, कंत्राटी शिक्षक भरती रद्द करणे, यादेखील मागण्या तात्काळ पूर्ण व्हाव्यात अन्यथा आगामी विधानसभा निवडणुकीमध्ये सरकारला त्यांची जागा दाखवून देऊ.

**- सुरेश पवार, शिक्षक समन्वय समितीचे सदस्य.**

## संक्षिप्त वृत्त

### आज हुतात्मा स्मृती मंदिरमध्ये अभिनेते शरद पोक्षेंचे व्याख्यान

**सोलापूर, दि. २५ सप्टेंबर-**

अभिनेते शरद पोंक्षे यांचे स्वातंत्र्यवीर सावरकर आणि सद्य परिस्थिती या विषयावर हुतात्मा स्मृती मंदिर मध्ये गुरूवार दि. २६ सप्टेंबर रोजी सायंकाळी ६.२५ वाजता व्याख्यान होणार आहे. महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा दक्षिण सोलापूर यांच्या वतीने या कार्यक्रमाचे करण्यात आले आहे. मराठी भाषा समृध्द करणारे राष्ट्रभक्त स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या राष्ट्रभक्ती आणि स्वातंत्र्यपूर्व काळातील विविध घडामोडी तसेच स्वातंत्र्य मिळाल्यानंतर सद्य परिस्थिती यावर अभिनेते शरद पोंक्षे हे सविस्तरपणे व्याख्यानाच्या स्वरूपात बोलणार आहेत. या कार्यक्रमाचे आयोजन महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा दक्षिण सोलापूरच्या वतीने आयोजन करण्यात आले आहे. महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा दक्षिण सोलापूरच्या माध्यमातून समाजप्रबोधन आणि जनजागृतीसाठी अनेक उपक्रम राबवण्यात येतात त्यातूनच या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा दक्षिण सोलापूरच्या अध्यक्षा रेणुका महागांवकर आणि कार्याध्यक्ष प्रशांत बडवे यांनी सांगितले. हा कार्यक्रम गुरूवार दि. २६ सप्टेंबर रोजी सायंकाळी ६.२५ वाजाता हुतात्मा स्मृती मंदिर मध्ये वेळेवर होणार असल्याचेही यावेळी सांगण्यात आले.





### मेहता शाळेमध्ये राष्ट्रीय हिंदी दिन साजरा

**सोलापूर, दि. २५ सप्टेंबर-**

कै. वि. मो. मेहता माध्यमिक शाळेमध्ये १४ सप्टेंबर हिंदी दिनाचे औचित्य साधून राष्ट्रीय हिंदी दिवस साजरा करण्यात आला. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. डॉ. रहिसा मिर्झा या उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या प्रसंगी विद्यार्थ्यांनी स्वागत नृत्य, हिंदी दिनाचे महत्त्व, नाटिका, प्रसिद्ध सुफी काव्य गायक अमीर खुसरो यांची कव्वाली-छाप तिलक सब छिनी, गुगल महाराज-हास्य व्यंग, हिंदी भाषा राष्ट्र की भाषा- समूहनृत्य, एक चतुर नार- जुगलबंदी हास्याभिनय, काव्यवाचन, दोहे आदी विविध हिंदी साहित्य प्रकार सादर केले. तसेच सहशिक्षिका धनश्री विधाते व काही विद्यार्थ्यांनी मिळून भजन गायक अनुप जलोटा यांनी संत मीराबाई यांचे भजन सादर केले. प्रमुख पाहुण्यांनी आपल्या भाषणातून सर्वप्रथम कार्यक्रमातील सहभागी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षकांचे व शाळेचे 'हिंदी भाषेच्या भव्य अशा जागरा' बद्दल अभिनंदन केले. हिंदी भाषा विविध राज्यातील लोकांना भावनिकतेने एकत्र जोडते व भारताला एक बनविते त्यामुळे विद्यार्थ्यांनी ती आत्मसात करावी आणि तिचे उपयोजन ही करावे आदी महत्वाचे विचार त्यांनी व्यक्त केले. प्रास्ताविक मुख्याध्यापिका श्रुती बागेवाडी यांनी केले. प्रमुख पाहुण्यांची ओळख सेजल चव्हाण, सूत्रसंचालन विद्यार्थिनी आसावरी पवार, नंदिनी नांदवटे यांनी केले. तर आभार तन्मय बाळापुरे याने मानले. तसेच माजी पर्यवेक्षिका सुस्मिता तडकासे उपस्थित होत्या.




### पायोनियर डिझेल कंपनीतर्फे बॉस सर्व्हिस मेळावा उत्साहात

**सोलापूर, दि. २५ सप्टेंबर-**

येथील पायोनियर डिझेल बॉश कंपनी तर्फे फ्युएल इंजेक्शन उत्पादनाचे सर्विस विक्रेते साठी हॉटेल चित्रा एक्झिक्युटिव्ह येथे खास मेळावा आयोजित करण्यात आले होते. या मेळाव्यात ग्राहकांसाठी अधि केअर ही योजना लॉन्च करण्यात आली या योजनेअंतर्गत बॉश कंपनीच्या सर्विसमध्ये अधिक वाढीव वॉरंटी देण्याचे कंपनीकडून जाहीर करण्यात आले. या कार्यक्रमास कंपनीचे एरिया मॅनेजर ध्रुवास देशमुख, अभिजीत रणशिंगे, पायोनियर डिझेलचे वितरक रविंद्र हेगडे व व्यवस्थापक संतोष गुंड उपस्थित होते.

## महाराष्ट्र व गोवा बार कौन्सिलच्यावतीने वकिलांकरिता कार्यशाळा

### ● विनामूल्य पुस्तकांचेही वितरण




**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २५ सप्टेंबर -**

बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र आणि गोवा यांच्या विद्यमाने मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती विनय जोशी व सोलापूर जिल्ह्याचे प्रमुख जिल्हा न्यायाधीश सलमान आझमी यांच्या उपस्थितीत वकिलांसाठी कायदेविषयक कार्यशाळा व नवोदित वकिलांसाठी बार कौन्सिल तर्फे दिवाणी व फौजदारी पुस्तकांचा मोफत वितरण सोहळा पार पडला.

बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र व गोवाचे माजी अध्यक्ष तथा सदस्य ॲड मिलिंद थोबडे यांनी प्रस्ताविकामध्ये कार्यशाळेचे आयोजन करण्यामागचा उद्देश सांगून बार कौन्सिलच्या कार्यांची माहिती दिली. यावेळी बार कौन्सिलचे सदस्य ॲड गजानन चव्हाण यांनी महाराष्ट्र व गोवा बार कौन्सिल ही भारतात सर्वाधिक कार्यक्रम घेणारी बार कौन्सिल आहे असे सांगितले. बार कौन्सिलचे अध्यक्ष ॲड संग्राम देसाई यांनी बार कौन्सिलच्या मुंबई येथील ॲडव्होकेट ॲकॅडमीचे २८ तारखेला भूमीपूजन कार्यक्रम आयोजित केल्याचे सांगितले.

कार्यक्रमाचे अध्यक्षीय भाषणामध्ये न्यायमूर्ती विनय जोशी यांनी बार कौन्सिल व ॲड मिलिंद थोबडे यांचे कार्याबद्दल कौतुक करून नवीन कायद्याबद्दल माहिती दिली व न्यायप्रक्रियेमध्ये नवीन कायद्यामुळे झालेल्या बदलांची माहिती देखील देऊन नवोदित वकिलांना यशस्वी वकील होण्याकरिता मार्गदर्शन केले व कोर्टरुम एक उत्कृष्ट शिक्षक आहेत असे मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमात प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश सलमान आझमी यांनी नवोदित वकिलांनी जेष्ठ वकिलांचे कामाचे निरीक्षण करुन तयार व्हावे असे मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमात बार कौन्सिलचे उपाध्यक्ष ॲड सुदीप पासबोला यांनी उलटतपास कौशल्य या विषयावर तर भारतीय न्याय संहिता, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता व भारतीय साक्ष अधिनियम या नवीन कायद्याबद्दलच्या चर्चासत्रामध्ये ॲड महेश अग्रवाल, जिल्हा सरकारी वकील प्रदीपसिंग राजपूत, ॲड रितेश थोबडे यांनी इतर मान्यवरांसह मार्गदर्शन केले. ॲड मिलिंद थोबडे यांनी नवोदित वकीलांकरीता तयार करण्यात आलेल्या दिवाणी व फौजदारी पुस्तकाबद्दल माहिती देऊन नवोदित वकीलांना प्रत्येकी ३ हजार रुपये किंमतीचे हँडबुकचे विनामूल्य वाटप करण्याची योजना जाहीर करीत जवळपास ४०० वकीलांना मोफत हँडबुकचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ॲड वैशाली बनसोडे व ॲड श्रेया देशपांडे यांनी केले तर बार कौन्सिलचे माजी अध्यक्ष ॲड विवेकानंद घाडगे यांनी आभारप्रदर्शन केले. कार्यक्रमास मोठ्या प्रमाणात वकिलांची उपस्थिती होती.



## फार्मासिस्ट डेनिमित्त जनजागृती रॅली

### विविध फार्मासिस्ट कॉलेजमधील विद्यार्थ्यांनी नोंदवला सहभाग

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ सप्टेंबर -**

जागतिक फार्मसीस्ट डे निमित्त सोलापूर शहर केमिस्ट आणि ड्रगीस्ट संघटनेच्यावतीने स्तुत्य उपक्रम हाती घेऊन भव्य अशा जनजागृती रॅलीचे आयोजन केले होते. या जनजागृती रॅलीमध्ये सोलापूर शहर जिल्ह्यातील फार्मासिस्ट कॉलेजमधील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला. शहरातील हुतात्मा चौक येथून सदरची रॅली सकाळी साडेनऊ वाजता मार्गस्थ झाली. विद्यार्थ्यांनी हातामध्ये विविध फलक घेऊन जनजागृती केली.

सद्य परिस्थितीत नागरिकांमध्ये कोणत्याही आजारावर स्वतःच्या मर्जीने औषधे घेण्याचे प्रमाण वाढले आहे. त्यावर प्रतिबंध घालण्यासाठी संघटनेने पाऊल उचलले आहे. हाच उद्देश घेऊन संघटनेने रॅलीचे आयोजन केले.

विद्यार्थ्यांनी फार्मासिस्ट तुमचा मित्र, स्वतःच्या मर्जीने औषध घेणे टाळा , असे विविध फलक घेऊन रॅली काढली. सदरची रॅली हुतात्मा चौकातून सुरू होऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथून सरस्वती चौक येथे मार्गस्थ झाली. यावेळी जनजागृती रॅलीमध्ये विविध औषध कंपनीचे केमिस्ट आणि ड्रगीस्ट तसेच फार्मासिस्ट महाविद्यालयाचे शिक्षक आणि कर्मचारी सहभागी झाले होते.



## बाहुबली मंदिरात सिद्धचक्र आराधना महोत्सव सुरू

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ सप्टेंबर -**

विजापूर रोडवरील बाहुबली मंदिरात, श्री बृहत् सिद्धचक्र आराधना महोत्सवास उत्साहात सुरुवात झाली.

पहाटे पाच वाजता मंगल वाद्य घोष, सकाळी सहा वाजता नांदी मंगल इंद्रप्रतिष्ठा आचार्य निमंत्रण कंकण बंधन, सकाळी सात वाजता घटयात्रा, मंगल कुंभायनयन इंद्रांची मिरवणूक भगवंतांचा पंचामृत अभिषेक बृहद सिद्धचक्र आराधना संगीत आरती शास्त्र सभा व सांस्कृतिक कार्यक्रम अशा विविध कार्यक्रमांचे आयोजन केलेले आहे. पूज्य मनिश्री१०८ सौम्यसागर महाराज, सारस्वत सागर महाराज यांच्या मंगल सानिध्यात विधान चालू असून सकाळी साडेआठ वाजता आणि दुपारी साडेतीन वाजता मुनी श्रींचे मंगल प्रवचनाने सर्व श्रावकांना धर्म लाभ होतो. या कार्यक्रमाचे आयोजन सुधीर पंडित व ज्योती परीवार यांनी केले आहे.

## आदिशक्तीच्या नवरात्र उत्सवाची तयारी सुरु

### ● नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शक्तीदेवी मंडळांची मंडप उभारण्याची जय्यत तयारी!



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ सप्टेंबर -**

आदिमाया आदिशक्ती श्रीतुळजाभानी मातेचा शारदीय नवरात्रौत्सव दृष्टीक्षेपात आला आहे. याच नवरात्रौत्सवाच्या पार्श्वभूमीवर शहरात आदिशक्तीच्या उत्सव तयारीस प्रारंभ झाला आहे.

शहरातील विविध सार्वजनिक नवरात्रौत्सव मंडळाच्या वतीने भव्यदिव्य असा मंडप उभारण्याचे कामकाज सुरू झाले आहे. हलते देखावे साकारण्यासाठी किमान आठ ते दहा दिवस अगोदरच मंडळाकडून मंडप उभारले जातात. त्याच अनुषंगाने शहरातील विविध सार्वजनिक नवरात्रौत्सव मंडळ तयारीत व्यस्त असलेले दिसत आहेत. सोलापूर शहरात नवरात्रौत्सवाचा जाज्वल्य इतिहास आहे. अनेक शक्तीदेवी मंडळांकडून पौराणिक आणि धार्मिक कथांवर आधारित हालते देखावे या काळात साकारले जातात. त्याच अनुषंगाने शहरातील विविध सार्वजनिक नवरात्रौत्सव मंडळ अनेक महिन्यापासून कार्यरत असतात. बाळीवेस, भवानी पेठ, बलिदान चौक, विश्रांती चौक, कुंभारवेस, कोंतम चौक आदींसह विविध परिसरात शक्तीपूजा मंडळाकडून आकर्षक आणि वैविध्यपूर्ण देखावे साकारले जातात.

**● नवरात्रौत्सवानिमित्त काढले सर्व प्रकारचे परवाने :** नवरात्रौत्सवा निमित्त नऊ दिवस शक्तिदेवी मंडळाकडून विविध धार्मिक विधी संपन्न केले जातात. त्या अनुषंगाने देखील शक्तीपूजा मंडळांची तयारी अंतिम टप्प्यात आली आहे. मंडप उभारण्यासाठी लागणारे महापालिका प्रशासनाचे वापर परवाना आणि पोलीस प्रशासनाचे ना हरकत प्रमाणपत्र असे विविध प्रकारचे परवाने काढून घेतल्यानंतर सदरची जय्यत तयारी सुरू केली आहे.

**● हालते देखावे देवीभक्तांचे ठरणार आकर्षण :** नवरात्रौत्सवा निमित्त शहरात विविध सार्वजनिक शक्तीदेवी मंडळांकडून भव्य असे मंडप थाटण्याची जय्यत तयारी सुरू केली आहे. या मंडळाच्यावतीने नवरात्रौत्सवा काळात विविध हालते देखावे साकारले जातात. सदरचे देखावे भक्तांसाठी आकर्षणाचे केंद्रबिंदू ठरतात. गतवर्षी देखावे संस्मरणीय ठरले होते. यंदाच्या वर्षी देखील देखाव्याचे आकर्षण असणार आहे.

## शिवकालीन नाण्यांचा जणू खजिनाच

## थोडीथोडकी नाहीतर तब्बल ६ हजार नाणी संग्रही

### ● छत्रपती शिवाजी महाराज अन् मगद, मौर्या काळातील एक हजार नाणी

**तभा वृतसेवा,**
**ॲड. विजयकुमार जाधव**
**सोलापूर, दि. २५ सप्टेंबर-**

सध्या अनेकांना काहीना काही तरी वेगळं करण्याचा छंद असतो. काहींना जुनी कात्रणं, जुने फोटो तर काहींना इतर विशेष असं संग्रही ठेवण्याची आवड असते. अशाप्रकारे सोलापूरमधील आयसीसीआय बँकेत बँक क्रिडेट मॅनेजर म्हणून कार्यरत असणारे ऋतुराज प्रदीप चौसळकर यांना देखील जुन्या नाण्यांचा संग्रह करण्याचा एक विशेष छंद आहे.

त्यांच्या संग्रही शे-दोनशे नाही तर तब्बल ६ हजार नाण्यांचा संग्रह आहे. यामध्ये सुमारे चारशे नाणी ही छत्रपती शिवाजी महाराज यांच्या काळातील शिवकालीन व दोन हजार वर्षापूर्वीचे मगद मौर्य काळातील नाणी आहेत.







शिवकालीन नाणे संग्रहक आणि अभ्यासक असलेल्या ऋतुराज प्रदीप चौसळकर यांच्याकडे मोठा संग्रह आहे. ब्रिटिश इंडिया ते स्वतंत्र भारतातील २०२३ मधील ७५ वा आझादी का अमृत महोत्सवापर्यंतची नाणी त्यांच्याकडे जमा आहेत. देश-विदेशातील नाणीही त्यांच्या संग्रही आहेत. यापैकी १२ राशींचे १२ नाणी ती सोमोलिया लँड या देशातील आणि थायलंडमधील २० हजारांची नोट आहे. त्यावर गणपतीचे छायाचित्र आहे. तसेच भारतातील विविध छायाचित्र असलेली नाणी जमा आहेत.

### दुर्गादेवीचं नाणेही संग्रही

**संत ज्ञानेश्वर महाराज, संत तुकाराम महाराज, सरदार वल्लभभाई पटेल, महात्मा गांधी यांच्यापासून ते आता आलेलं दुर्गादेवीचेही नाणे संग्रहित आहे. त्यात छत्रपती शिवाजी महाराज यांचं भारत सरकारने काढलेलं २ रुपये, ५० रुपये आणि १०० रुपये मूल्य असलेल्या नाण्यांचा समावेश आहे. महाराष्ट्र राज्य पुरातत्व खात्याने १९८१ ला सुवर्ण होन कसा होता हे दाखवण्यासाठी सुवर्ण होन प्रतिकृती पत्रिका काढली होती. ती त्यांच्या संग्रही आहे. ही नाणी इतकी दुर्मिळ आहेत की ते आता मिळणे कठीण आहे.**



### माझ्या संग्रहात अनेक नाणी

**माझ्या संग्रहात १६ शतकापासून ते १९ शतकापर्यंतची विविधतेने नटलेली शिवराई पाहायला मिळेल. विशेषत: यावर असलेली अक्षरे, चिन्हे पाहण्यासारखी आहेत. चिन्हही या शिवराईवरची अभ्यासण्यासारखी आहेत. चंद्र, सूर्य, शिवपिंड, भवानी तलवार, त्रिशूल असे एकापेक्षा अनेक चिन्ह या नाण्यावर पाहायला मिळतात. दोन हजार वर्षापूर्वीच्या मगद मौर्य व चाणक्य, आदिलशहा,सातवान काळातील ती मी संग्रहित आणि अभ्यासित आहे. ही नाणी आज हातात घेतल्यावर त्या काळ कसा असेल याचं साक्ष आज आपल्याला देतो.**

**- ऋतुराज प्रदीप चौसळकर**

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

CMYK

सोलापूर
# दिनांक

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## ऑर्गनवादक देशपांडे यांना स्व.पद्माकर देव पुरस्कार जाहीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ सप्टेंबर-**

श्रुति-मंदिर संस्थेचे संस्थापक संगीततज्ञ, नाट्य दिग्दर्शक, स्व. पद्माकर देव यांच्या जन्मशताब्दि वर्षाला सुरुवात होत आहे. त्यानिमित्त शनिवार दि. २८ सप्टेंबर २०२४ पासून वर्षभर विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती श्रुती-मंदिर या संस्थेचे अध्यक्ष अ‍ॅड.जे.जे.कुलकर्णी यांनी पत्रकार परिषदेत दिली.



यानिमित्त शनिवार दि. २८ सप्टेंबर रोजी सायंकाळी ६ वाजता श्री. हिराचंद नेमचंद वाचनालयाच्या लोकमान्य टिळक सभागृहात महाराष्ट्रातील प्रसिद्ध ज्येष्ठ ऑर्गन वादक संजय देशपांडे यांना माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्या हस्ते गुरुवर्य पद्माकर देव स्मृती गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. ११ हजार रुपये रोख, ग्रंथ, शाल आणि श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. याच कार्यक्रमात खासदार प्रणिती शिंदे यांचाही यावेळी संस्थेच्या वतीने सत्कार करण्यात येणार आहे. या कार्यक्रमानंतर डॉ.बाहुबली दोशी हे संजय देशपांडे यांची प्रकट मुलाखत घेतील. सत्कार समारंभानंतर सत्कारमूर्ती देशपांडे हे ऑर्गनवर मराठी नाटकातील जुनी नाट्यगीते सादर करणार आहेत. संगीत प्रेमी आणि नाट्य रसिकांनी या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन संस्थेचे अध्यक्ष अ‍ॅड. जे. जे. कुलकर्णी यांनी केले आहे.

## ▶▶ क्राईम वृत्त...

### अतिक्रमणाच्या कारणावरून मारहाण; दोघांवर गुन्हा

**सोलापूर, दि. २५ सप्टेंबर -**

पत्रा शेड मारून अतिक्रमण केल्याच्या कारणावरून शिवीगाळ करत मारहाण केल्याप्रकरणी दोन जणांविरुद्ध फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही घटना २१ सप्टेंबर रोजी सकाळी साडेदहा वाजण्याच्या सुमारास शुक्रवार पेठ येथे घडली. याप्रकरणी भारती प्रकाश कांबळे (वय ४५, रा. ढोर गल्ली, शुक्रवार पेठ) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून प्रभाकर जयकुमार कुसुमकर व अमर प्रभाकर कुसुमकर (दोघे रा. शुक्रवार पेठ) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.भारती कांबळे यांच्या मुन्सिपल प्लॉट नंबर ४५४/४५५/५५६ शुक्रवार पेठ येथे प्रभाकर कुसुमकर व अमर कुसुमकर यांनी पत्रा शेड मारून अतिक्रमण केले असल्याने कांबळे व त्यांचे पती प्रकाश, मुलगा किरण, दीपक, पुतण्या दिलीप व त्यांची पत्नी वंदना, चुलत सुन माधवी व इतर असे मिळून २१ सप्टेंबर रोजी त्या प्लॉटवर गेले होते. त्यावेळी प्रभाकर याने भारती कांबळे यांना शिवीगाळ करत तुम्हाला मस्ती आली आहे का, तुम्हाला बघून घेतो, तुमचा येथे यायचा काय संबंध असे म्हणाला. त्यावेळी कांबळे व त्यांचा मुलगा किरण याला कुसुमकर यांनी त्यांच्या हातातील लाकडी फळीने मारहाण केली. तसेच अमर याने लाकडी बॅटने चुलत सून वंदना व नातू शुभम यांना मारहाण केल्याचे फिर्यादीत म्हंटले आहे. म्हणून फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार पवार हे करीत आहेत.

### अज्ञात वाहनाच्या धडकेत तरुण जखमी; चालकावर गुन्हा

**सोलापूर, दि. २५ सप्टेंबर -**

अज्ञात वाहनाच्या धडकेत तरुण जखमी झाल्याची घटना दि. २३ सप्टेंबर रोजी दुपारी पावणेदोन वाजण्याच्या दरम्यान हकीम हॉटेल समोर घडली. याप्रकरणी साकिब रफिक बागवान (वय २३, रा.गंगाई केकडे नगर, मुळेगाव क्रॉस रोड) याने दिलेल्या फिर्यादीवरुन अज्ञात वाहन चालकाविरुद्ध एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. साकिब बागवान हा त्याच्या ताब्यातील दुचाकी क्रमांक एमएच १३ बीसी ३१०१ वरून २३ सप्टेंबर रोजी दुपारी मोबाईल दुरुस्ती करण्यासाठी जात असताना हकिम हॉटेल समोर टाटा इंट्रा वाहन क्रमांक एमएच २५ एजे ४१४० चा अज्ञात चालकाने त्याच्या ताब्यातील वाहन निष्काळजीपणाने चालून ब्रेक मारल्याने बागवान याच्या वाहनाच्या मागील बाजूस धडकून जखमी झाला. म्हणून एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार गायकवाड हे करीत आहेत.

### दुचाकी ताब्यात घेत असताना तरुणास मारहाण; चौघांवर गुन्हा

**सोलापूर, दि. २५ सप्टेंबर -**

स्पर्श फायनान्स कंपनीकडून मिळालेल्या ब्लॅकलिस्ट मधील बजाज कंपनीची दुचाकी क्रं. एमएच १३ ईडी ९२८६ ही ताब्यात घेत असताना तरुणास शिवीगाळ करत जाणीवपूर्वक बेदम मारहाण केल्याची घटना २३ सप्टेंबर रोजी दुपारी साडेबारा वाजण्याच्या दरम्यान नुराणी मस्जिद जुना विजापूर नाका येथे घडली. याप्रकरणी तुषार कैलास गायकवाड (वय २०, रा. सेटलमेंट फ्री कॉलनी नंबर ३, सलगर वस्ती पोलीस ठाणे शेजारी) याने दिलेल्या फिर्यादीवरुन अविनाश मदनावाले, राजेश मदनावाले, विशाल जाधव व एका अनोळखी इसमाविरूद्ध विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. स्पर्श फायनान्स कंपनीकडून मिळालेल्या ब्लॅकलिस्टमधील वरील क्रमांकाची दुचाकी २३ सप्टेंबर रोजी दुपारी जुना विजापूर नाका परिसरातील नुराणी मशिद येथे ताब्यात घेत असताना मदनावाले व इतरांनी मिळून गायकवाड व त्याचे मित्र लक्ष्मण जाधव, समर्थ गायकवाड, विजय जाधव व टीम लीडर आकाश धुमाळ यांना शिवीगाळ करून हाताने व लाथा बुक्क्यांनी मारहाण केली. तसेच अविनाश मदनावाले याने खोऱ्या घेऊन लक्ष्मण जाधव याला थांब तुला खल्लास करतो असे म्हणून जिवे मारण्याच्या उद्देशाने डोक्यात व छातीत खोऱ्याने मारून जखमी केले. तसेच लक्ष्मण जाधव हा मारहाणीत जखमी होऊन खाली पडला असता, त्याला देखील अविनाश आणि राजेश यांनी मिळून परत जाणीवपूर्वक जीवे मारण्याच्या उद्देशाने फरशी डोक्यात घालून मारहाण केली. म्हणून विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक गायकवाड हे करीत आहेत.

# विठूराया अन् दामाजीपंत कोणाला पावणार!

## पंढरपूर-मंगळवेढा विधानसभेसाठी इच्छुकांची भाऊगर्दी

## आवताडेंचे पारडे जड तर अभिजित पाटील, धोत्रेंची जय्यत तयारी

**तभा वृत्तसेवा । महेश भंडारकवठेकर**
**पंढरपूर, दि.२ सप्टेंबर -**

पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढविण्याच्या दृष्टीने स्थानिक नेते मंडळींकडून स्वत:साठी पोषक वातावरण निर्मिती करण्यास सध्या सुरुवात झालेली आहे. मतदार संघातील प्रमुख स्थानिक नेत्यांसह दररोज एक नवीन इच्छुक निवडणूक लढविणार असल्याचे जाहीर करीत आहे. या मतदारसंघातून विधानसभेची निवडणूक लढविण्यासाठी इच्छुकांची भाऊगर्दी दिसत आहे. आ. आवताडेंचे पारडे जड वाटत असले तरी युवा नेते अभिजित पाटील व दिलीप धोत्रेंकडून जय्यत तयारी सुरु आहे तर इच्छुक अन् पक्ष कोणता अद्याप निश्चित नसलेले प्रशांत परिचारकही मैदानात उतरण्याची तयारी करीत आहेत. पंढरीचा विठू आणि मंगळवेढ्याचे दामाजी पंत यंदा कोणाला पावणार याची उत्सुकता आहे.




पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार समाधान आवताडे हे भाजपाकडून पुन्हा निवडणूकीच्या रिंगणात उतरणार हे आता तरी निश्चित मानले जात आहे. दुसरीकडे माजी आमदार आणि भाजपाचे जिल्ह्यातील नेते प्रशांत परिचारक यांनी देखील यंदाच्या निवडणूकीसाठी दंड थोपटले आहेत. परिचारकांनी अपक्ष निवडणूक लढवावी असा सुर पांडुरंग परिवाराकडून आळविला जात आहे. विठ्ठल कारखान्याचे माजी अध्यक्ष भगीरथ भालके हे देखील यावेळी आपले नशिब पुन्हा एकदा आजमाविण्याच्या तयारीत आहेत. काँग्रेस किंवा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून निवडणूक लढविण्यास ते इच्छुक दिसत आहेत. मनसेचे प्रमुख दस्तुरखुद्द राज ठाकरे यांनीच दिलीप धोत्रे यांची उमेदवारी जाहीर केलेली आहे. राहता राहिला विषय तो विठ्ठल कारखान्याचे विद्यमान अध्यक्ष अभिजीत पाटील यांचा.. त्यांनी तर पंढरपूर- मंगळवेढा आणि शेजारील माढा या दोन्ही मतदार संघावर आपले लक्ष केंद्रीत केलेले आहे. दरम्यान पक्षातील वरिष्ठांचे आपल्याकडे लक्ष वेधण्यासाठी तसेच मतदारांशी सतत संपर्कात राहण्यासाठी प्रत्येक इच्छुक उमेदवारांकडून मतदार संघात पध्दतशीरपणे विविध कार्यक्रमांचे आयोजन,प्रायोजन सुरु असल्याचे देखील सध्या दिसत आहे. या सर्व इच्छुक मंडळीकडून मतदारसंघातील समाविष्ट असलेल्या महत्वाच्या विविध गावांमधून खेळ पैठणीचा, रक्षाबंधन, दहिहंडी, वाढदिवस,लाडकी बहिण मार्गदर्शन, महिला मेळावे, सत्कार समारंभ आदी वेगवेगळ्या कार्यक्रमांचे आयोजन करण्याची स्पर्धाच सुरु असल्याचे सध्या दिसून येत आहे.





पंढरपूर मंगळवेढा मतदार संघात इच्छुक अनेक असले तरी अजून वरिष्ठ पातळीवर महायुती तसेच महाविकास आघाडीं मधील पक्षांचेच आपसातील जागा वाटप निश्चित झालेले नाही. त्यामुळे महायुती आणि महाविकास आघाडी मधील प्रमुख पक्ष आणि मित्र पक्ष यांच्या मधील जागा वाटपाचे गणित सुटल्या नंतरच उमेदवारीचा विषय मार्गी लागेल असे सध्या प्रत्येक पक्षाच्या वरिष्ठ नेते मंडळींकडून बोलले जात आहे. पंढरपूर-मंगळवेढा मतदार संघातील इच्छुक असलेल्या मंडळींच्या जमेच्या व कमकुवत बाजू मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे.

(उर्वरित पान ११ वर)

### आमदार समाधान आवताडेंच्या जमेच्या व कमकुवत बाजू

**जमेच्या बाजू :** विद्यमान आमदार हा मोठा प्लस पाँईट. आर्थिकदृष्ट्या सक्षम. पंढरपूर मंगळवेढा तालुक्यातील ग्रामपंचायतींवर वर्चस्व. आमदारकीच्या माध्यमातून मंगळवेढ्याबरोबरच पंढरपूर तालुक्यात संपर्क. मराठा समाजातील विखुरलेले नेते एकत्र करण्यावर भर. भाजपा सारख्या पक्षाची मोठी ताकद पाठिशी राहणार. सर्वसामान्यांशी जोडलेली नाळ.

**कमकुवत बाजू :** प्रभावी वक्तृत्वाचा अभाव. आक्रमकता नाही. मराठा समाजा पुरतेच नेतृत्वाचे तुलनेने इतर समाजाचे जाळे कमी. राजकीय अनुभव तुलनेने कमी. पंढरपूर शहर आणि मतदार संघात समावेश असलेल्या गावांमधून तुलनेने पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांचे जाळे कमी. केलेली कामे जनतेपर्यंत पोहचविण्यात कमी पडतात. मागील निवडणूकीतील आश्वासनाची पुर्तता करताना सध्या नाकीनऊ. दामाजी कारखान्याच्या सत्तेची कमी जाणविणार. परिचारकांच्या मदती शिवाय निवडणूक लढविताना दमछाक होणार .

### प्रशांत परिचारकांच्या जमेच्या व कमकुवत बाजू

**जमेच्या बाजू :** परिचारक घराण्याचे वलय. मोठा राजकीय अनुभव पाठीशी. विधान परिषदेतील आमदारकीचा अनुभव पाठिशी. स्वच्छ प्रतिमा. विविध संस्थांच्या माध्यमातून केलेल्या कामां मधून वेगळी छाप. पंढरपूर आणि मंगळवेढा तालुक्यात मागील काही वर्षात निवडणूकीच्या दृष्टीने वाढविलेला जनसंपर्क महत्वाचा.विधानपरिषदेतील आमदारकीच्या कार्यकाळात पंढरपूर मंगळवेढा तालुक्यांसाठी निधी मिळवून विकासकामे केली. पंढरपूर अर्बन बँक, पांडुरंग कारखाना, युटोपियन कारखाना आदीं संस्थांचे मोठे पाठबळ. आर्थिकदृष्ट्या सक्षम.

**कमकुवत बाजू :** दोन वेळा पराभवाचा सामना. वक्तृत्वाचा अभाव परिणामी भाषणातून छाप पडत नाही. थेट जनते मधून निवडून येण्याच्या अनुभवाची कमी. मोजक्याच पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांवर विश्वास. सैनिकां संदर्भातील वक्तव्यांचा प्रचारात मुद्दा. तळागाळातील मतदारांशी थेट नाळ नाही. खोट्या स्तुतीपाठकांच्या कोंडवळ्यात रमणे. जातीच्या राजकारणाचा फटका.

## सोलापूरचा पर्यटन विकास यावर उद्या कार्यशाळा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ सप्टेंबर-**

जागतिक पर्यटन दिनाच्या औचित्याने ड्रीम फाऊंडेशन, सोलापूर पर्यटन विकास मंच व बसव संगम शेतकरी गट सोलापूरतर्फे शुक्रवार दि. २७ सप्टेंबर २०२४ रोजी सायंकाळी ५ ते ७ या वेळेत ''सोलापूरचा पर्यटन विकास'' यावर कार्यशाळा आयोजित केली आहे, अशी माहिती संयोजक काशीनाथ भतगुणकी यांनी पत्रकार परिषदेत दिली. जुळे सोलापूरातील श्री. सिध्देश्वर भोजनालय सभागृह ओम गर्जना चौक, जुळे सोलापूर येथे ही कार्यशाळा होणार आहे. जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद यांच्या मार्गदर्शनाखाली व पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात येणार आहे. सोलापूरातील विविध ऐतिहासीक पर्यटन स्थळ, कृषी पर्यटन व आगामी हुरडा पार्टी केंद्र संचालक आणि विविध मंदिर व्यवस्थापक यांना या कार्यशाळेत मार्गदर्शन मिळणार आहे. युवक, महिला, शेतकरी यांना सेंद्रीय शेती प्रक्रिया उद्योग आणि स्वंयरोजगार यावर विशेष मार्गदर्शन करण्यात येणार आहे. नाव नोंदणीसाठी ७२१९०९९९५५ व ९८३४३०६३३७ या मोबाईल नंबर वर संपर्क साधावा. जास्तीत जास्त लोकांनी या कार्यशाळेचा लाभ घ्यावा, असे आवाहन बसव संगम शेतकरी गटाचे संस्थापक कल्लप्पा भतगुणकी यांनी केले आहे.

## फताटेवाडी ग्रामपंचायतीतील गैरकारभाराची चौकशी करून अहवाल द्या

### अन्यथा सोमवारी जिल्हा परिषद कार्यालयासमोर आत्मदहन करण्याचा इशारा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ सप्टेंबर-**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील फताटेवाडी मधील गैरकारभाराची चौकशी करून अहवाल सादर करावा आणि कारवाई करावी अन्यथा सोमवार दि. ३० सप्टेंबर २०२४ रोजी सोलापूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या कार्यालयासमोर आत्मदहन करणार असल्याचा इशारा सामाजिक कार्यकर्ते विनोद चव्हाण यांनी पत्रकार परिषदेत दिला आहे.

फताटेवाडी ग्रामपंचायतच्या माध्यमातून एकूण ७ कोटी ५० लाख रुपये रक्कमेतून नियमबाह्य कामे करण्यात आली आहेत. संगनमताने ग्रामपंचायत लेखसंहिता नियम २०११ मधील तरतुदीचे पालन न करता चुकीच्या पद्धतीने कामे झाली असल्याचा आरोप चव्हाण यांनी केला आहे. याप्रकरणी चौकशी होऊन अहवाल सादर करावा या मागणीसाठी गटविकास अधिकारी, पंचायत समिती, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हाधिकारी, पुणे विभागीय आयुक्त कार्यालय यांच्याकडे मागील सात ते आठ महिन्यापासून अनेक तक्रारी अर्ज दिले होते. त्यानंतर आयुक्त कार्यालय व जिल्हा परिषद वरिष्ठ कार्यालयाकडून नियमानुसार चौकशी करून अहवाल सादर करण्याचे दक्षिण दक्षिण सोलापूर पंचायत समितीला कळविले मात्र त्यास टाळाटाळ केली जात आहे.

दरम्यानच्या काळात दक्षिण सोलापूर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांनी दि. ६ ऑगस्ट २०२४ पूर्वी सखोल चौकशी करून वस्तुनिष्ठ अहवाल सादर करण्याससाठी चार सदस्य चौकशी समिती नेमण्यात आली होती मात्र संबंधित ग्रामसेवक यांनी या समितीला दप्तर व रेकॉर्ड दाखवले नाही. त्यानंतर दुसरी चौकशी समिती नेमण्यात आली. या दुसऱ्या चौकशी समितीलाही संबंधितांनी दप्तर ,रेकॉर्ड दिले नाही. यामुळे कार्यवाही प्रलंबित आहे, असा आरोप विनोद चव्हाण यांनी केला आहे. या प्रकरणी येत्या सात दिवसात चौकशी करून अहवाल सादर करावा व संबंधित दोषीवर कायदेशीर कारवाई करावी तसे न झाल्यास अखेर येत्या सोमवारी ३० सप्टेंबर रोजी आत्मदहन करणार असल्याचा इशारा विनोद चव्हाण यांनी दिला आहे. या पत्रकार परिषदेस युवराज राठोड उपस्थित होते.

## लिंगायत समाजाच्या लिंगायत जोडो बसव यात्रेस २२ आक्टोंबरपासून प्रारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ सप्टेंबर-**

लिंगायत समाजाच्या न्याय व हक्कासाठी विविध मागण्यांकडे लक्ष वेधण्यासाठी मंगळवेढा ते मुंबई लिंगायत जोडो बसव यात्रा काढण्यात आली असल्याची माहिती राष्ट्रीय लिंगायत संघाचे राष्ट्रीय संस्थापक अध्यक्ष प्रदीप वाले यांनी पत्रकार परिषदेत दिली.

२२ ते ३० ऑक्टोबर दरम्यान ही यात्रा काढण्यात येणार आहे. मंगळवेढा, सोलापूर, अक्कलकोट, मुरूम, उमरगा, लातूर, नांदेड, परळी वैजनाथ, कपिलधार, धाराशिव, तुळजापूर, बार्शी, पंढरपूर गुड्डापूर, कवठेमहांकाळ, मिरज, जयसिंगपूर, कोल्हापूर, वारणानगर, सातारा, कोरेगाव, फलटण, सासवड, पुणे, निगडी, लोणावळा, कर्जत, ठाणे मार्गे मुंबई मंत्रालय येथे या यात्रेचा समारोप आहे.

लिंगायत धर्माला संविधानिक मान्यता व अल्पसंख्यांक दर्जा देण्यात यावा. मंगळवेढा येथे महात्मा बसवण्णा यांचे राष्ट्रीय स्मारक मंजुर करून शासकीय निधी उपलब्ध करावा. हिंदू-लिंगायत दाखल्यासहीत सर्व पोटजातींना ओबीसीचे आरक्षण देण्यात यावे. महात्मा बसवण्णा यांच्या नावाने आर्थिक विकास महामंडळाला ५ हजार कोटी निधी मिळावा. लिंगायत समाजाला राज्यात भाषिक अल्पसंख्यांक व केंद्रात अल्पसंख्यांक दर्जा द्यावा. महात्मा बसवण्णा यांचे वचन साहित्य शैक्षणिक अभ्यासक्रमात घ्यावे. लिंगायत समाजातील विद्यार्थ्यांना शिक्षणामध्ये व नोकरीमध्ये प्राधान्य द्यावे. समाजाला जनगणनामध्ये वेगळा कॉलम द्यावा. समाजातील शरण स्थळांना व मठांना तिर्थ क्षेत्राचा अ वर्ग दर्जा देण्यात यावा. गाव तिथे स्मशानभुमीसाठी जागा उपलब्ध करून देण्यात यावी यासह विविध मागण्यांसाठी ही यात्रा काढण्यात येत आहे.

# पावसांमुळे रेल्वे रुळाचे नुकसान, काही रेल्वेगाड्याच्या फेऱ्या रद्द

### रेल्वे स्टेशनवर अडकलेल्या प्रवाशाची सोय खासगी गाडीने

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर , दि. २५ सप्टेंबर -**

सोलापूर तसेच कर्नाटकात झालेल्या जोरदार पावसामुळे रेल्वे रुळाचे मोठे नुकसान झाले आहे. त्याच अंतर्गत हुबळी रेल्वे विभाग क्षेत्रातील लच्याण ते तडवळ रेल्वे स्थानकांच्या दरम्यान झालेल्या रेल्वेरूळ बिघाडानंतर रेल्वेरुळ दुरुस्तीचे कामकाज हुबळी रेल्वे विभागाच्या वतीने हाती घेण्यात आले आहे.

त्यामुळे रेल्वेरुळ दुरुस्तीसाठी सोलापूर रेल्वे विभागात धावणाऱ्या गाड्यांच्या वेळापत्रकामध्ये दि.२५,२६ आणि २७ सप्टेंबर रोजी बदल केला आहे. सोलापूर रेल्वे विभागाने या संदर्भात विशेष प्रयत्न करून प्रवाश्यांच्या सेवांची पूर्तता केली आहे. रेल्वे स्टेशनवर अडकलेल्या प्रवाशांची सोय विविध ठिकाणी खासगी गाडीने पाठविण्याची सोय केली. तरी प्रवाशांनी या गाड्यांच्या तपशिलात झालेला बदल लक्षात घेऊन प्रवास निश्तिच करावं असे आवाहन सोलापूर रेल्वेचे वरिष्ठ विभागीय वाणिज्य व्यवस्थापक योगेश पाटील यांनी केले आहे.



### वेळापत्रकामध्ये बदल झालेल्या रेल्वेगाड्यांचा तपशील

छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस-होसपेट एक्सप्रेस सोलापूर ते होसपेट, होसपेट-छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस एक्सप्रेस सोलापूर ते होसपेट, म्हैसूर-बागलकोट एक्सप्रेस सोलापूर-बागलकोट, बागलकोट-मैसूर एक्सप्रेस सोलापूर-बागलकोट, मैसूर-पंढरपूर एक्सप्रेस विजापूर-पंढरपूर, पंढरपूर-मैसूर विजयपूर-पंढरपूर **(सर्व गाड्या अंशतः रद्द)**. साईनगर शिर्डी- मैसूर या गाडीचा मार्ग परिवर्तन करून होटगी-वाडी-गुंटकल-बेल्लारी मार्गे धावणार. सोलापूर-होसपेट **(२६ सप्टेंबरला रद्द)**. होसपेट-सोलापूर **(२७ सप्टेंबरला रद्द)**.

### सुयश गुरूकुलतर्फे

## सोलापुरात २७ व २८ सप्टेंबर रोजी युवा स्फूर्ती शिबीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ सप्टेंबर-**

मागील २५ वर्षापासून शिक्षण क्षेत्रात अग्रगण्य मानल्या जाणाऱ्या ज्ञानेश्वर प्रतिष्ठान संचलित, सुयश गुरूकुलच्या रौप्य महोत्सवी वर्षाचे औचित्य साधून दि. २७ व २८ सप्टेंबर रोजी सुयश गुरूकुल येथे युवा स्फूर्ती शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती संस्थापक केशव शिंदे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

स्वामी विवेकानंद यांच्या मनुष्य घडणीचे शिक्षण या तत्वावर आधारित कार्य सुयश गुरूकुल मागील २५ वर्षापासून करत आहे. संस्थेचे संस्थापक शिंदे यांच्या ध्यान आणि प्राणायामाने निवासी विद्यार्थ्यांची पहाट व गुरूकुलाचा परिसर एका सकारात्मक ऊर्जेने चैतन्यमय होतो. सुयश गुरूकुल हे आजच्या काळातील आध्यात्म व विज्ञान यांची सांगड घालणारे एक संस्कार केंद्र आहे.

या रौप्य महोत्सवात पदार्पण करताना विविध कार्यक्रमांची रेलचेल या वर्षी असणार आहे. याचाच एका भाग म्हणून युवा स्फूर्ती शिबीर होणार असून विविध क्षेत्रातील मान्यवर मार्गदर्शन करणार आहेत. दोन दिवस चालणाऱ्या या शिबिरात सोलापूरमधील इतर शाळेतील विद्यार्थीही सहभागी होणार आहेत.

या शिबिरात मान्यवर वक्ते डॉ. वैशाली जोशी, डॉ. सतीश लकडे, सिद्धाराम पाटील, धनश्री हेबाळीकर, भक्ती देशमुख, डॉ. नवनीत तोष्णीवाल, डॉ. हिमांशू वझे, डॉ. रोहिणी पाटील आदी मान्यवर मार्गदर्शन करणार आहेत , असे शिंदे यांनी सांगितले. या पत्रकार परिषदेस मार्तंड कुलकर्णी, श्रद्धा लकडे आणि डॉ. निखिल तोष्णीवाल, वृषाली महंत आदी उपस्थित होते.


सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## ज्ञानामृत आनंदलहरी - ८९६

**तयासी चालतां पाहिजे सिदोरी ।**
**दु:ख पावे करी असत्य तो ।।**

जीवनात माणूस अनेकवेळा प्रवास करतो. त्याचे कांही प्रवास पूर्वनियोजित तर कांही अचानकपणे केलेले असतात. पूर्वनियोजित प्रवासाचे तर सोडाच; पण अचानकपणे प्रवासाला निघाला तरीही माणूस कांही प्रमाणात का होईना पण खाण्यापिण्याचा विचार करून थोडीफार शिदोरी सोबत ठेवतच असतो. पूर्वनियोजित प्रवासाच्या बाबतीत त्याचे अर्धे सामान हे खाण्यापिण्याचेच असते. एखादा प्रवासी अडचणीमुळे किंवा बाहेरचे खाण्याची सवय झाल्यामुळे जर प्रवासाला निघाला तर कोठे, केव्हा, काय व कशी शिदोरी मिळेल याचा निश्चितच विचार करतो. खरे म्हणजे जीवन हा सुध्दा एक प्रवास आहे. इतर प्रवासाचे स्थान, मार्ग, वेळ निश्चित तरी असतात, पण जीवनाच्या प्रवासाचे कांहीही निश्चित नसते. हा अनिश्चित असणारा पण निश्चितपणे करावाच लागणारा जीवनाचा प्रवास करतांना माणूस योग्य त्या शिदोरीचा विचार करीत नाही. सत्याची, सद्वर्तनाची, कर्तव्याची शिदोरी सोबत ठेवली तर हा प्रवास सुखदायी ठरतो. पण असत्य, अहंकार, कर्तव्यशून्यता, दुष्कृत्य आदीची शिदोरी सोबत ठेवली तर या प्रवासात दु:ख, क्लेशाशिवाय हाती इतर कांही लागणारच नाही. या अनुषंगाने बोलतांना तुकाराम महाराज म्हणतात, तयासी चालता पाहिजे सिदोरी । दु:ख पावे करी असत्य तो ।। जीवन हा एक प्रकारचा प्रवासच आहे हे सत्य आहे. तरीपण माणूस जीवनाकडे प्रवास म्हणून पाहत नाही. जन्मापासून सुरु झालेला हा प्रवास स्मशानात संपणार आहे, याची माणूस जाण ठेवत नाही. रिक्त हाताने जन्म घेऊन सुरु झालेल्या या जीवन प्रवासात माणूस हातात भरपूर भरून घेण्याचा प्रयत्न करतो. पण जेव्हा स्मशानाचा अंतिम टप्पा येतो तेव्हा हे हात आपोआप रिक्तच होतात. हे माणसाच्या लक्षात येत नाही. रिक्त हाताने सुरु झालेला प्रवास रिक्त हातानेच संपणार आहे, हे जर माणसाच्या लक्षात आले तर आयुष्यभर या हाताने नको ते करण्याची म्हणजेच कोणापुढे हात पसरण्याची, कोणावर हात उगारण्याची, कोणाचे हाताने काही ओढा-ताण करण्याची गरजच पडणार नाही. रिक्त हाताने संपणा-या जीवन प्रवासाचा अंतिम टप्पा लक्षात घेणारा माणूस या हातांना केवळ कर्तव्यात गुंतवतो. कर्तव्यात गुंतलेले हात तीर्थक्षेत्राप्रमाणे पावित्र्य धारण करतात. एवढेच नव्हे तर अशा हातांमुळे तीर्थक्षेत्राच्या पावित्र्याला बळकटी येते,असे ज्ञानेश्वर माऊलींनी म्हटले आहे. तीर्थक्षेत्राच्या बळकटीपेक्षा कार्यक्षेत्राची बळकटी व्हावी ही संत इच्छा हे हात म्हणजेच कर्तव्यात गुंतलेले हात पूर्ण करू शकतात. अशा हातात आपल्या हाताची नोंद झाली तर आपल्यासारखा भाग्यवान दुसरा तो कोण असणार?


तुकाराम महाराज

**जय जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : गुरुवार | दिनविशेष - |
| दि. २६ सप्टेंबर २०२४ | गुरुपुष्यामृत |
| विक्रम संवत् २०८०, | दशमी महालय |
| शके - १९४६ | चांगला दिवस |
| संवत्सर - क्रोधी नाम | ....राहू काल.... |
| मास - भाद्रपद | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| कृ. नवमी (१२.२५) | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| ऋतु - वसंत | मंगळवार : दु. ३ ते ४.३० |
| नक्षत्र- पुनर्वसू (२३.३२) | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| योग - परिघ (२३.४०) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| करण - वणिज (२४.४७) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| सुर्योदय - ०६.३० | शनिवार : स. ९ ते १०.३० |
| सूर्यास्त - १८.२९ | |

### राशीभविष्य

**मेष** : व्यावहारीक समस्यांमुळे आपण त्रस्त व्हाल. धैर्याने आणि संयमाने कामे कराल. व्यापार, नौकरीमधील स्थिती मध्यम राहील. कौटुंबिक सहकार्य आज मिळणार नाही. शक्यतो प्रवास टाळा.

**वृषभ** : नवीन व्यवसायास सुरूवात करू शकता. नम्रता ठेवल्यामुळे व्यवहारात हमखास यश मिळेल. आर्थिक प्रकरणात सावधानी बाळगा. दांम्पत्य जीवन सुखी राहील. व्यवहारात सावधानी बाळगा. वाचनाची गोडी वाढले.

**मिथुन** : जीवनात नवीन संधी निर्माण होईल. तणावमुक्त होऊन कार्य करा. व्यावसायिक स्पर्धेत यश मिळण्याचे योग आहेत. बेफीकीरीने कामे करून नका.

**कर्क** : आर्थिक बाबतीमधील प्रकरणे आज सुरळीत पार पडतील. विद्यार्थी वर्गासाठी आजचा दिवस शुभ आहे. काही घटनांमध्ये आपल्याला आज मन:स्ताप सहन करावा लागेल.

**सिंह** : संततीकडून चांगल्या बातम्या कळाल्यामुळे आनंदी रहाल. देण्या-घेण्याच्या व्यवहारात सावधानी बाळगा. वाचनाची गोडी वाढले.

**कन्या** : लोकांशी संपर्क वाढल्यामुळे आपली कामे पार पडतील. व्यापार व्यवसायात विस्तार होईल. दुसऱ्यावर रोष करू नका. कौटुंबिक स्थितीत सुधारणा होईल.

**तुळ** : राजकारणात चांगली संधी मिळण्याची आवश्यकता आहे. परमेश्वरावरील विश्वास दृढ होईल. रागावर नियंत्रण ठेवा. व्यापार फायदेशीर राहणार आहे.

**वृश्चिक** : उपयोगी चर्चा घडून येईल. टाळत असलेले कामे पुर्ण होण्याचा योग आहे. व्यवस्यातील विस्ताराच्या दृष्टीने केलेल्या योजना यशस्वी होतील. मुलांची काळजी राहील.

**धनु** : प्रतिष्ठित व्यक्तींची भेट आपल्यासाठी फायदेशीर ठरणार आहे. मानसिक संतोष निर्माण होईल. व्यवसाय चांगला चालेल. विरोधकांपासून सावध रहा. आर्थिक प्रकरणात सावधानी बाळगा. दांम्पत्य जीवन सुखी राहील.

**मकर** : व्यवसायात किंवा रोजगारात मोठे परिवर्तन घडून येण्याची शक्यता आहे. लोकप्रियता वाढणार आहे. शासनाकडून पैसा किंवा सन्मान मिळेल. जीवनसाथी बरोबर वाद विवाद होण्याची शक्यता आहे.

**कुंभ** : सामजिक कामात वेळ जाईल. अचानक लाभ होण्याचा योग आहे. नौकरीमध्ये असणाऱ्यांची बदली किंवा पदोन्नती मिळण्याचा योग आहे. निष्कारण चिंता निर्माण होईल.

**मीन** : कामकाजामध्ये व व्यापारात विचारपूर्वक निर्णय घ्या. कौटुंबिक सहकाय कमी प्रमाणात मिळेल. आर्थिक बाबतीत समाधानी रहाल. मानसिक संतोष निर्माण होईल.

# आचार्य दादासाहेब दोंदे गुणवंत शिक्षक पुरस्कार जाहीर

शनिवारी पुरस्कार वितरण सोहळा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ सप्टेंबर -**

दक्षिण सोलापूर तालुका प्राथमिक शिक्षक संघ व महिला आघाडी यांच्या वतीने देण्यात येणारे यंदाचे आचार्य दादासाहेब दोंदे गुणवंत शिक्षक पुरस्कार, आदर्श शाळा, गुणवंत अधिकारी व कर्मचारी पुरस्कार वितरण सोहळा आणि दक्षिण सोलापूर तालुक्यातील प्राथमिक शिक्षकांची सहकारी पतसंस्था मंद्रुप ची वार्षिक सर्वसाधारपण सभा

शनिवार दि. २८ सप्टेंबर २०२४ रोजी दुपारी २ वाजता होणार आहे, अशी माहिती अध्यक्ष महिबूबसाब सवार यांनी पत्रकार परिषदेत दिली. पुरस्काराचे यंदाचे १२ वे वर्ष असून वितरण समारंभ जुळे सोलापुरातील मारुती मंगल मंगल कार्यालय येथे होणार आहे. माजी आ. दिलीपराव माने यांच्या हस्ते आणि राज्य संघाचे ज्येष्ठ सल्लागार बाळासाहेब काळे यांच्या अध्यक्षतेखाली या पुरस्काराचे वितरण होणार आहे. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदिप जंगम हे उद्घाटक म्हणून उपस्थित राहणार आहेत. याप्रसंगी प्रमुख पाहणे म्हणून बाळासाहेब शेळके, सुरेश हसापुरे, अमर पाटील, उत्तमराव जमदाडे, शिक्षणाधिकारी कादर शेख, गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती दक्षिण सोलापूर मल्हारी बनसोडे, ज्येष्ठ शिक्षक नेते शिवानंद भरले, सोलापूर जिल्हा शिक्षक संघाचे अध्यक्ष वीरभद्र यादवाड, सोलापूर जिल्हा पतसंस्था संचालक शिवाजी पाटील, राजकुमार बिज्जरगी, मंद्रूप पतसंस्था अध्यक्ष सुनील बिराजदार, जिल्हाध्यक्ष महिला आघाडी सरस्वती भालके आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. यावेळी तालुक्यातील एकूण १३ केंद्रातून प्रत्येकी एक याप्रमाणे १३ शिक्षक, अक्कलकोट तालुक्यातील १, एक उर्दू व एक कन्नड अशा १५ शिक्षकांचा व ४ गुणवंत अधिकारी व कर्मचारी यांचा पुरस्काराने सन्मान करण्यात येणार आहे. सन्मान चिन्ह, सन्मानपत्र , शाल व पुष्पगुच्छ असे या पुरस्काराच्या स्वरूप आहे. या पत्रकार परिषदेस मल्लिनाथ पुजारी, भिमराव पाटील, शिवाजी पाटील, दयानंद वठारे. बालाजी गुरव, पिरप्पा हडपद, विनोद कोळी, संजय देवकते, रेवणसिद्ध हत्तुरे, अंजली जमखंडीकर, विद्या जगताप, अपेक्षा रणदिवे आदी उपस्थित होते.

**हे आहेत आदर्श शिक्षक पुरस्काराचे मानकरी**
जाकेराबी अब्दुल कादर मुलाणी (शिरवळ), रविंद्र पाटील (नांदणी), रेवप्पा बिराजदार (तेलगाव), सोनाली कोरे (धोत्री), शोभा काटकर (हत्तूर), मंगल कोनापूरे (औज आ.), सुरेश डफळे (मनगोळी), मल्लिकार्जुन तामदंडी इसरगुंडे (कुंभारी), सोनाली कदम (कारकल), संजय राजमाने (मंद्रुप), शेकप्पा गाजूल (हरणाट तांडा मुस्ती), संगिता रोडगे (उळे), कविता कोकाटे (वळसंग), हिरामणी कोमारी (म्हैसलगे ता. अक्कलकोट), महेजबीन गोलीवाले (विडी घरकुल कुंभारी), गंगाबाई मठपती (तीर्थ) आदी.



# तरुणांनी समाज माध्यमाचा अतिरेक वापर टाळावा : कबाडे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ सप्टेंबर -**

तरुणांनी समाज माध्यमाचा अतिरेक वापर टाळावा, असे आवाहन पोलीस उपयुक्त विजय कबाडे यांनी केले.

समाज माध्यमाचा अतिरेकी वापर टाळण्याकरिता शासकीय नोकरीत येणाऱ्या अडचणीबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते. त्यांनी विद्यार्थ्यांना फेसबुक इंस्टाग्राम, व्हाट्सअप याचा वापर न करता आपल्या अभ्यासाकडे लक्ष केंद्रित करावे असेही आवाहन केले. केगाव येथील भारतरत्न इंदिरा गांधी अभियांत्रिकी महाविद्यालयात प्रथम वर्ष अभियांत्रिक विद्यार्थ्यांचे स्वागत कार्यक्रम आयोजित केला होता.

अध्यक्षस्थानी अध्यक्ष रवींद्र डी गायकवाड, प्राचार्य डॉ. अनिल देशमाने उपस्थित होते. प्रास्ताविक प्रो. स्नेहल लेंगरे, प्रो. मध्या कोसर यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रो. स्नेहल शिंदे प्रो. नीलम बंडा आधी परिश्रम घेतले.

# श्रीशैल बनशेट्टी परिवार व सुरेश पाटील यांच्यात दिलजमाई

काँग्रेसच्या अशोक निंबर्गी यांची मध्यस्थी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ सप्टेंबर -**

शहरातील राजकारणातील सुखद घटना घडली. माजी सभागृह नेते सुरेश पाटील यांनी बनशेट्टीं परिवाराच्या निवासस्थानी जाऊन अनेक वर्षापासूनचा दुरावा घालविला. काँग्रेसचे अशोक निंबर्गी यांनी ही यशस्वी मध्यस्थी केली.



शहरातील राजकारणाला कलाटणी देणारी आणि दुरावलेल्या दोन परीवारांना जवळ आणणारी अतिशय सुखद राजकीय घडामोड घडली. स्वतःवर विष बाधा झाल्यानंतर सुरेश पाटील यांनी मागच्या पाच वर्षापूर्वी बनशेट्टी यांच्यासह इतरांविरोधात आरोप केले होते. यामुळे या दोन परिवारात एक दुरावा निर्माण झाला होता.एवढ्या वर्षानंतर सुरेश पाटील हे मंगळवारी सायंकाळी सव्वा पाचच्या सुमारास माजी महापौर शोभा बनशेट्टी यांच्या निवासस्थानी आले. पाटील यांनी घडलेल्या घटनेची माहिती देताना दिलगिरी व्यक्त करीत निश्चितच बनशेट्टी परिवार मला माफ करेल अशी भावना व्यक्त केली. दरम्यान, शोभा बनशेट्टी यांनी मी अण्णांना कधीच माफ केले आहे, असे सांगत भाऊ माझ्या घरी आला मला आनंद आहे. दोन मित्र पुन्हा मिळाले त्यांनी यापुढे सारथी म्हणून माझ्या सोबत राहावे, असे आवाहन केले. याप्रसंगी काँग्रेसचे अशोक निंबर्गी, भाजप एससी मोर्चाचे अशोक खटके, श्रीशैल बनशेट्टी, शशी थोरात, अक्षय अंजीखाने, सागर आतनुरे आदी उपस्थित होते.

# पंडीत भिमण्णा जाधव, मास्टर व्यंकटेशकुमार यांना सुंद्रीवादनकरिता मध्यप्रदेश सरकारकडून निमंत्रण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ सप्टेंबर-**

पंडीत कृष्णराव शंकर संगीत समारोहाचे निमंत्रण मध्यप्रदेश सरकारकडून पंडीत भिमण्णा जाधव मास्टर व्येकटेशकुमार यांना सुंद्रीवाद्य वादन करिता निमंत्रण करण्यात आल्याची माहिती जागतिक कीर्तीचे सुंद्रीवादक पंडीत भिमण्णा जाधव यांनी दिली.





पंडीत कृष्णराव शंकर संगीत समारोह मध्यप्रदेश शासनाकडून आयोजित केले जाते. तानसेन कला विधिका ग्वालियर मध्यप्रदेश येथे २४ सप्टेंबर शंकर सगीत महाविद्यालय यांचे सामूहिक समूहगान, पंडीत विद्याधर व्यास यांचे शास्त्रीय गायन, पंडीत भिमण्णा जाधव व मास्टर व्येकटेशकुमार जाधव पिता-पुत्र यांचे सुंद्री वादन तर २५ सप्टेंबर प्रविण शेवलीकर यांचे व्हायोलीन वादन, पंडीत विनायक तोरवी यांचे शास्त्रीय गायन ग्वालियर येथे होणार आहे. पंडीत भिमण्णा हे सुंद्रीसम्राट पंडित सिद्राम यांचे नातू तर वडील पंडित चिदानंद यांचे चिरंजीव होय. वयाच्या ७ व्या वर्षी त्यांनी युवावाणी ऑल इंडिया रेडिओसाठी प्रसारक म्हणून सार्वजनिक पदार्पण केले. इंडियन कौन्सिल ऑफ कल्चरल रिलेशन्स आणि भारत सरकारच्या सांस्कृतिक मंत्रालयाने सुंद्री या दुर्मिळ वाद्याचा प्रचार आणि संकलन करण्याकरिता पंडीत भिमण्णा यांचे नांव स्वतंत्रपणे समाविष्ट केले आहे. राज्य सरकारने गुरु शिष्य परंपरा योजना दक्षिण मध्य क्षेत्र सांस्कृतिक केंद्र नागपूर पश्चिम क्षेत्र सांस्कृतिक केंद्र उदयपूर आणि संगीत नाटक अकादमी ऑफ म्युझिक डान्स अँड ड्रामा यांच्या माध्यमातून अनेक शिष्यांना प्रशिक्षण दिले. ऑल इंडिया रेडिओला सर्वोच्च श्रेणीतील टॉप कलाकार म्हणून भिमण्णा जाधव यांना मान्यता मिळाली आहे.

# कौशल्य आधारित संशोधनावर भर द्यावा : कुलगुरू

● विद्यापीठात पाच दिवसीय कार्यशाळेस सुरुवात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ सप्टेंबर -**




जागतिक पातळीवर मोठ्या प्रमाणात कौशल्य असलेल्या मनुष्यबळाची मागणी वाढत आहे. विकसित देशांमध्येही लहान-लहान कौशल्य आधारित कामे करण्यासाठी कुशल मनुष्यबळाचा तुटवडा पडत आहे. त्यासाठी कौशल्य आधारित मनुष्यबळ निर्माण करण्याबरोबरच अध्यापकांनी कौशल्य आधारित संशोधनावर भर द्यावा, असे आवाहन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. प्रकाश महानवर यांनी केले.

महाराष्ट्र राज्य फॅकल्टी डेव्हलपमेंट अकॅडमी आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या कौशल्य विकास केंद्राच्यावतीने आयोजित फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राम च्या उद्घाटनप्रसंगी कुलगुरू प्रा. महानवर हे बोलत होते. यावेळी व्यासपीठावर महाराष्ट्र स्टेट फॅकल्टी डेव्हलपमेंट अकॅडमीचे समन्वयक डॉ. सुरज बाबर, संगणक शास्त्र विभागाचे डॉ. श्रीराम राऊत यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रास्ताविकात कौशल्य विकास केंद्राचे संचालक डॉ. प्रभाकर कोळेकर यांनी या कार्यशाळेसाठी महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यातून शंभरहून अधिक लोकांनी नोंदणी केली होती.

त्यापैकी केवळ ४५ प्राध्यापकांची निवड या कौशल्य आधारित प्रशिक्षणासाठी करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. हे प्रशिक्षण निवासी पाच दिवस चालणार आहे. यामध्ये एकत्रित कौशल्य आधारित अभ्यासक्रमावर प्रशिक्षण दिले जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राम साठी महाराष्ट्रातून मुंबई, ठाणे, नगर, पुणे, संभाजी नगर, लातूर, अमरावती आदी विविध जिल्ह्यातून प्राध्यापक सहभागी झाले आहेत. यावेळी ऋतुजा तांबे, डॉ. अभिजीत जगताप, प्रा. डॉ. गौतम कांबळे, सहायक कुलसचिव सोमनाथ सोनकांबळे, जनसंपर्क अधिकारी राहुल वंजारे यांच्यासह प्राध्यापक, कौशल्य विकास केंद्राचे कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. श्रुती देवळे यांनी केले. तर आभार डॉ. श्रीराम राऊत यांनी मानले.

# दिवंगत कर्मचाऱ्याच्या पत्नीला मिळाले ४० लाख रुपये

● प्रहार शिक्षक संघटनेचा पाठपुराव्यामुळे मिळाले आधार

**तभा वृतसेवा,**
**सोलापूर, दि. २५ सप्टेंबर-**

सामाजिक क्षेत्रात तसेच विविध शासकीय, निमशासकीय सेवेत कार्य करणाऱ्या संघटना नेहमीच कर्मचाऱ्यांचे हित जपण्याचा प्रयत्न करीत असतात. त्याचा उपयोग कर्मचाऱ्यांना निश्चित होतो याचे उत्तम उदाहरण प्रत्यक्षात उतरले असून, कर्मचाऱ्याच्या मृत्यूनंतर बँकेने पगार खाते असल्याने उतरविलेल्या विम्याचे तब्बल ४० लाख रुपये प्रहार शिक्षक संघटनेच्या पाठपुराव्यामुळे कुटुंबाला तातडीने मिळाले आणि कुटुंबाला आधार मिळाला आहे.

गौडगाव (ता. बार्शी) येथील लोहकरे गुरुजी यांच्या संस्थेमधील मल्टिपर्पज हायस्कूलमधील शिपाई माधव दत्तात्रय पाटील हे १५ जानेवारी २०२४ रोजी शाळेतील विद्यार्थ्यांच्या सहलीसोबत गेले असता, त्यांना दुचाकीस्वाराने धडक दिली त्यांच्यावर उपचार सुरू असताना त्यांचे निधन झाले. त्याचे पगार खाते बँक ऑफ महाराष्ट्राच्या गौडगाव शाखेत असल्याने पगार खाते दाराचा विमा बँकेने उतरविला असल्याने त्यांच्या पत्नीस चाळीस लाख रुपये मिळाले आहेत. रक्कम त्यांच्या कुटुंबाला पत्नीच्या खात्यावर जमा केली आहे.



प्रहार शिक्षक संघटना मागील दहा वर्षांपासून ६६ जिल्हा व तालुक्यात कार्यरत असून, राष्ट्रीयकृत बँकेत पगार खाते उघडण्याच्या प्रयत्नातून केलेल्या यशस्वी आंदोलनामुळे कुटुंबाला न्याय मिळाला आहे. कोणत्याही राजकीय दबावाला बळी न पडता, चार वर्षांपूर्वी संस्थांनी राष्ट्रीयीकृत बँकेत शिक्षकांसह कर्मचाऱ्यांचे पगार खाते उघडले. कोणतीही रक्कम न घेता ही सुविधा बँकेची असल्याने कर्मचाऱ्याच्या कुटुंबाला याचा फायदा झाला आहे.

**- सचिन नागटिळक,**
अध्यक्ष, प्रहार शिक्षक संघटना



# हरिभाई देवकरण महाद्यालयात शिक्षक-पालक संघाची सभा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ सप्टेंबर-**

हरिभाई देवकरण कनिष्ठ महाद्यिालयात शिक्षक-पालक संघाची सभा मोठ्या उत्साहात संपन्न झाली. या कार्यक्रमाची सुरुवात प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सरस्वती आणि सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमा पूजनाने करण्यात आली.

प्रास्ताविक ज्येष्ठ पर्यवेक्षक एस. एस. कुंभार यांनी केले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे प्राचार्या दीपा फाठक उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते पर्यवेक्षक ए.सी.राऊत यांनी शिक्षक-विद्यार्थी-पालक यांची कर्तव्ये आणि जबाबदारी याविषयी माहिती देत विशेष मार्गदर्शन केले. पर्यवेक्षक मेजर बी.डी बनसोडे यांनी सध्याच्या काळात महिला-मुलींची सुरक्षितता धोक्यात आली आहे. मुलींनी स्वतः काळजी घेतली पाहिजे. तसेच पालकांनी, शिक्षकांनी सुरक्षिततेकडे बारकाईने लक्ष दिले पाहिजे. त्याबाबत कनिष्ठ महाविद्यालय कसे काळजी घेत आहे. सीसीटीव्ही कॅमेरे, शिक्षक जातीने लक्ष देतात. याबाबत सविस्तर माहिती दिली. व्यक्तिमत्व विकास, शिस्त आणि पालकांची भूमिका याविषयी मार्गदर्शन केले. शाळा समिती अध्यक्ष राजेश पटवर्धन यांच्या कल्पनेतून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी जिल्हा स्तरीय वक्तृत्व स्पर्धा, वादविवाद स्पर्धा, समूह गायन, समूह नृत्य स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, खो- खो स्पर्धा, क्रिकेट स्पर्धा, विज्ञान प्रदर्शन आदी स्पर्धा, उपक्रम राबविण्यात येणार असल्याचे सांगितले. सूत्रसंचालन प्रा. सुरेश रेवजे यांनी केले तर आभार प्रा. नितीन पतंगे यांनी मानले. याप्रसंगी कार्याध्यक्ष डॉ. दिलीप फुटाणे सर्व शिक्षक-शिक्षिका, उपस्थित होते.

## शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा

# ‘नुमवि’ला उपक्रमशील शाळा पुरस्कार



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ सप्टेंबर-**

सोलापूर महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळाकडून नुमवि शाळेचा उपक्रमशील शाळा या पुरस्काराने सन्मान करण्यात आला.

शिक्षक दिनाचे औचित्य साधून महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळाच्या वतीने हुतात्मा स्मृती मंदिर येथे आयोजित केलेल्या पुरस्कार वितरण सोहळ्यात महापालिकेच्या आयुक्त माननीय शितल तेली उगले यांच्या हस्ते नू.म.वि. शाळेला उपक्रमशील शाळा हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. सन्मानचिन्ह, सन्मानपत्र, शाल, संगीत पेटी, खेळाचे साहित्य, वाचनीय पुस्तके, थर्मास असे पुरस्काराचे स्वरूप आहे मुख्याध्यापिका वर्षा जेधे व शिक्षक वृदांनी पुरस्काराचा स्वीकार केला. यशाबद्दल शाळा समितीचे अध्यक्ष राजेश पटवर्धन यांनी मुख्याध्यापिका, सर्व शिक्षक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी यांचे अभिनंदन केले.

पुरस्कार वितरण सोहळ्यास प्रमुख पाहुणे म्हणून समुपदेशक करियर मार्गदर्शन तज्ञ मयुरेश डंके उपस्थित होते. कार्यक्रमास महापालिका अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे उपायुक्त तैमूर मुलाणी, मच्छिंद्र घोलप उपायुक्त आशिष लोकरे सहाय्यक आयुक्त उपस्थित होते.

# सोलापूरमुळे भाषा बांधव्य टिकून

● कन्नड अभिवृद्धी प्राधिकारचे अध्यक्ष डॉ. पुरुषोत्तम बिलीमळे

## ● कन्नड अभिवृद्धी प्राधिकारतर्फे गडीनाड भागातील ६५२ विद्यार्थ्यांचा सन्मान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ सप्टेंबर-**

महाराष्ट्र सीमेवरील जनतेमध्ये कन्नड भाषाबद्दलचे प्रेम, मैत्री, आदर आणि आपुलकी आहे. हे पाहून महाराष्ट्राच्या सीमेवर कन्नड भाषेचे उज्ज्वल भविष्य आहे, असे स्पष्ट होते. सोलापूर जिल्ह्याने आतापर्यंत भाष्य बांधव्य टिकवून ठेवल्याचे प्रतिपादन कन्नड अभिवृद्धी प्राधिकारचे अध्यक्ष डॉ.पुरुषोत्तम बिलीमळे यांनी केले.

महाराष्ट्रातील ८४ हायस्कूल आणि २० कॉलेजमध्ये कन्नड माध्यमात दहावी आणि बारावी अव्वल स्थान पटकाविलेल्या तब्बल ६५२ गुणवंत विद्यार्थ्यांना कन्नड अभिवृद्धी प्राधिकरणातर्फे अध्यक्ष पुरुषोत्तमा बिलीमाले यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते सोलापुरात सन्मान करण्यात आला, यावेळी ते बोलत होते. दहावी आणि बारावीमध्ये महाराष्ट्रा



प्रत्येक कन्नड भाषिक प्रशालेत अनुक्रमे प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांक पटकाविलेल्या विद्यार्थ्यांना अनुक्रमे १२ हजार, ११ हजार, १० हजार रोख बक्षीस, प्रमाणपत्र, स्मृतिचिन्ह देण्यात आले. यावेळी माजी गृहराज्य मंत्री सिद्धाराम म्हेत्रे, डॉ. संतोष हानगल, दाक्षायाणी हुडेद, विरुप्पणा कोल्लूर, डॉ. बी. बी. पुजारी, कन्नड साहित्य परिषद महाराष्ट्र शाखेचे अध्यक्ष सोमशेखर जमशेट्टी, ज्येष्ठ साहित्यिक डॉ. गिरीश जकापुरे, आदर्श कन्नड बळगचे अध्यक्ष मलिकजान शेख, शरणप्पा फुलारी, शिवानंद गोगांव, बसवराज मसुती, प्रा. डॉ. गुरलिंगप्पा धबाले आदी उपस्थित होते.

प्राधिकरणाचे सचिव डॉ. संतोष हानगल यांनी स्वागत केले. कार्यक्रमासाठी बसवराज धनशेट्टी, राजशेखर उमराणीकर, विद्याधरा गुरव, शरणू कोळी, रामा सोलापुरे, प्रशांत बिराजदार व आदर्श कन्नड बळगच्या पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले. महेश मेत्री आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी बहारदार गीतांचा कार्यक्रम सादर केला. चिदानंद मठपती यांनी सूत्रसंचालन केले, तर विद्याधर गुरव यांनी आभार मानले.

कर्नाटक सरकारच्या कन्नड अभिवृद्धी विकास प्राधिकरणाने दिलेला कन्नड माध्यम पुरस्कार महाराष्ट्रातील कन्नड माध्यमांच्या विद्यार्थ्यांना कन्नड शिकण्यासाठी प्रोत्साहन देणारे आहे. यामुळे त्यांच्या आत्मविश्वास जागृत होणार आहे. याशिवाय कर्नाटकामध्ये त्यांना शिक्षण आणि नोकरीच्या संधी प्राप्त होण्यास मदत होणार आहे.

**- सोमशेखर जमशेट्टी,**
अध्यक्ष, कन्नड साहित्य परिषद महाराष्ट्र

गडीनाथड भागातील विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी कर्नाटक सरकारने गुणगौरव कार्यक्रम घेतला. हा कार्यक्रम खरोखर प्रेरणा देणारा ठरणारा आहे. यामुळे विद्यार्थ्यांना आपले ध्येय साध्य करण्यासाठी निश्चितच मार्गदर्शन मिळणार आहे.

**- डॉ. संतोष हानगल,**
सचिव, कन्नड अभिवृद्धी प्राधिकार, बेंगळुरू

## संक्षिप्त वृत्त



### सोलंकरवाडी येथे कृषक सुवर्ण समृद्धी रथाचे उत्साहात स्वागत

**मोडनिंब, दि. २५ सप्टेंबर-**

सोलंकरवाडी येथे कृषी विज्ञान केंद्राच्या कृषक सुवर्ण रथाचे स्वागत करण्यात आले. कृषी विज्ञान केंद्राच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या अंतर्गत या सप्ताहात कृषक सुवर्ण समृद्धी रथ गावोगावी फिरवून शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात येत आहे. या रथासोबत मोहोळ येथील कृषी विज्ञान केंद्राचे डॉ.विशाल वैरागर, डॉ पंकज माडावी, डॉ. स्वाती कदम, प्रा. काजल मात्रे या शास्त्रज्ञांनी शेतकऱ्यांना या सप्ताह विषयी माहिती देत महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी व कृषी विज्ञान केंद्राच्या विविध उपक्रमांविषयी जागरूकता निर्माण केली.या सुवर्ण समृद्धी रथाच्या स्वागता वेळी सरपंच बाबासाहेब पांढरे, राजाभाऊ भांगिरे, अनंता गलांडे, ग्रामसेवक दत्तात्रेय टोणपे, भिमराव मोरे, वामन यादव, वैजिनाथ राजगे, विशाल राजगे, संदीप गलांडे यांसह ग्रामस्थ व शेतकरी मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.



### विजय चव्हाण-सांगलीकर यांच्याकडून सांगोल्याच्या आपुलकी प्रतिष्ठानला देणगी

**सांगोला, दि. २५ सप्टेंबर-**

सांगोला कडलास रोडवर सांगलीकर बंगला येथे वास्तव्यास असलेले, सामाजिक कार्याची आवड असणारे तसेच एअर इंडिया मध्ये ३६ वर्षे नोकरी करून सेवानिवृत्त झालेले विजय चव्हाण सांगलीकर यांनी आपल्या ६१ व्या वाढदिवसानिमित्त सांगोला तालुक्यात सामाजिक कार्यात अग्रगणी असलेल्या आपुलकी प्रतिष्ठान या संस्थेला ५ हजार रुपयांची देणगी देऊन सामाजिक बांधिलकी जपली आहे.वाढदिवसानिमित्त आपुलकी सदस्यांनी चव्हाण यांना गुलाब रोप भेट देऊन शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी आपुलकीचे अध्यक्ष राजेंद्र यादव,सचिव संतोष महिमकर, प्रा. डॉ.विधिन कांबळे, महादेव दिवटे, अच्युत फुले, अरविंद डोंबे गुरुजी, डॉ. रमेश बुगड, दादा खडतरे, श्रीकांत देशपांडे, चंद्रशेखर कवडे, प्रमोद दौंडे, वनिता चव्हाण उपस्थित होते.

### सिंहगड स्कूलची आदिती भंडारे हिची धनुर्विद्यामध्ये विभागीय स्पर्धेसाठी निवड

**पंढरपूर, दि. २५ सप्टेंबर-**



जिल्हा क्रीडा कार्यालय अंतर्गत अरण येथे झालेल्या जिल्हास्तरीय धनुर्विद्या कंपाउंड राउंड या प्रकारात सिंहगड पब्लिक स्कूल ची १४ वर्ष वयोगटामधील अदिती भंडारे हिने प्रथम क्रमांक मिळवून यश संपादन करून विभागीय स्पर्धेसाठी पात्र ठरली. आदितीच्या या यशाबद्दल संस्थेचे संस्थापक एम एन नवले , कॅम्पस डायरेक्टर कैलास करांडे शाळेच्या प्राचार्या स्मिता नवले, मुख्याध्यापिका स्मिता नायर तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले व विभागीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.या स्पर्धेसाठी अदितीला क्रीडा शिक्षकांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

### मराठवाडा विद्यापीठात वैष्णवी गाडे द्वितीय क्रमांकाने उत्तीर्ण

**करकंब, दि. २५ सप्टेंबर-**



कौठळी (ता. पंढरपूर) येथील रहिवासी व दयानंद कला महाविद्यालय लातूर येथे कला शाखेत शिक्षण घेत असलेल्या वैष्णवी मधुकर गाडे ही रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड येथून कला शाखेत ८७.८० टक्के गुण मिळवून द्वितीय क्रमांकाने उत्तीर्ण झाली. वैष्णवी गाडेला प्राचार्य शिवाजी गायकवाड, राजेश कासार, गणेश कासार, मधुकर गाडे, शितल गाडे यांच्यासह सर्व शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले. तिच्या या यशाबद्दल तिचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# अल्पवयीन निर्भयावर अत्याचार; आरोपीस २० वर्षे कारावास

● बार्शी जिल्हा सत्र न्यायालयाचा निकाल

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २५ सप्टेंबर-**

उपळाई बु. (ता. माढा) येथील आरोपी विष्णू साधू शिंदे (वय ३९ वर्षे) याने २० फेब्रुवारी २०२० रोजी निर्भया मुलगी राहत असलेल्या घरी अल्पवयीन निर्भया हिच्यावर अत्याचार केल्याप्रकरणी आरोपीविरुध्द माढा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला होता. या प्रकरणी बार्शी जिल्हा सत्र न्यायालयाने आरोपीला २० वर्षे सश्रम कारवासाची शिक्षा सुनावली आहे.

सरकार पक्षाच्यावतीने गुन्हा शाबितीसाठी महत्त्वाचे ९ साक्षीदार तपासण्यात आले. यातील फिर्यादी ही आरोपीची पत्नी होती. सदर फिर्यादी फितूर झाली. परंतु यातील निर्भया हिने तिचा जवाब न बदलता आरोपीविरुध्द दिलेली साक्ष महत्त्वपूर्ण ठरली. निर्भया हिचे साक्षीस अनुसरुन वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रमोद बोबडे यांनी निर्भया हिची वैद्यकीय तपासणी केली. सदर वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रमोद बोबडे यांनी दिलेली साक्ष महत्त्वपूर्ण ठरली. यातील फिर्यादी फितूर झाल्याने गुन्हा दाखल करणारे ठाणे अंमलदारांच्या साक्षीमुळे फिर्यादीची फिर्याद कोर्टात शाबीत झाली. या प्रकरणात तपासिक अंमलदार सहाय्यक पोलीस निरीक्षक के.आर. घोंगडे यांनी सदर गुन्ह्याचा तपास करताना अतिशय महत्त्वपूर्ण तपास करुन आरोपीविरुध्द सबळ पुरावा गोळा केला होता. निर्भया हिचे बरोबर झालेल्या अत्याचाराच्या अनुषंगाने कोर्टासमोर आलेला पुरावा या सर्व बाबी कोर्टासमोर सहाय्यक सरकारी वकील प्रदीप बोचरे, दिनेश देशमुख यांनी सर्वोच्च न्यायालयाचे न्याय निर्णय कोर्टासमोर मांडल्या व संपूर्ण बाब रेकॉर्डवर आणली. सरकार पक्षाचे वतीने करण्यात आलेला युक्तीवाद ग्राहय धरुन, आरोपीने अल्पवयीन निर्भया हिच्यावर बलात्कार केला आहे. ही बाब निदर्शनास आणून देण्यात आले. सरकारी पक्षाचा युक्तीवाद व आरोपीविरुध्द आलेला पुरावा याचा विचार करता विशेष जिल्हा न्यायाधीश विक्रमादित्य मांडे यांनी आरोपी विष्णू साधू शिंदे (वय ३९, रा. उपळाई बु., ता. माढा) यास भादंविक ३७६ (ए) अन्वये दोषी धरुन २० वर्षे सश्रम कारावास व पाच हजार रुपये दंड व दंड न भरल्यास १ महिने कारावास, बाललैंगिक अत्याचार कायदा २०१२ कलम ४ अन्वये १० वर्षे सश्रम कारावास व दोन हजार रुपये दंड व दंड न भरल्यास १ महिना कारावास, बाललैंगिक अत्याचार कायदा २०१२ कलम ६ अन्वये १० वर्षे सश्रम कारावास, ५ हजार रुपये दंड व दंड न भरल्यास १ महिना कारावास शिक्षा सुनावण्यात आली. बाललैंगिक अत्याचार कायदा २०१२ कलम ८ अन्वये ३ वर्षे सश्रम कारावास व दोन हजार रुपये दंड व दंड न भरल्यास १ महिना कारावास, बाललैंगिक अत्याचार कायदा २०१२ कलम १२ अन्वये ३ वर्षे सश्रम कारावास व पाच रुपये दंड व दंड न भरल्यास १ महिना कारावास ठोठावण्यात आला. सरकार पक्षातर्फे ॲड. प्रदीप बोचरे, दिनेश देशमुख यांनी काम पाहिले. या गुन्ह्याचा तपास सपोनि के. आर. घोंगडे यांनी काम केलेला होता. तसेच कोर्ट पैरवी अधिकारी म्हणून पोहेकॉ विनायक घुगे यांनी काम पाहिले.



# माणुसकी हा सर्वश्रेष्ठ धर्म

**अमोल कुलकर्णी : बार्शीत ब्राह्मण महासंघातर्फे सन्मान**

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २४ सप्टेंबर-**

माणुसकी हा सर्वश्रेष्ठ धर्म असून सर्वच संतांनी आपल्या आचरणातून हेच संस्कार समाजावर केल्याचे प्रतिपादन अमोल कुलकर्णी यांनी केले.

ब्राह्मण महासंघ बार्शीच्यावतीने ब्रह्मवृंदाचे वाढदिवस व ज्येष्ठांच्या सत्काराप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी भारतीय सांख्यिकी सेवा केंद्राचे सहाय्यक निर्देशक सुभाष जोशी होते. सुनिल देशपांडे यांनी स्वागत गीत म्हटले. शोभा रणशूर यांच्या कृष्णाष्टकाने वातावरणात पावित्र्य आणले. यावेळी प्रदेश कार्याध्यक्ष प्रवीण शिरसीकर, शोभा कुलकर्णी, लता अग्निहोत्री, लक्ष्मीबाई कुलकर्णी, सुहास उत्पात, व्यंकटेश झिंजुर्डे यांचा सन्मान करण्यात आला. सूत्रसंचालन व्यंकटेश कुलकर्णी यांनी केले तर आभार तालुकाध्यक्ष दिनकर सापनाईकर यांनी केले. मुकुंदशेठ कुलकर्णी-निरमावाले, पांडुरंग कुलकर्णी, जगदीश कुलकर्णी, अनिल देशपांडे, भर्तरी कुलकर्णी, ॲड. विजय कुलकर्णी, सुधीर टांकसाळे, डॉ. हेमंत साने, लक्ष्मीकांत कुलकर्णी, एम.डी. कुलकर्णी, गौरी पाटील, स्वप्ना केसकर, सुवर्णा कुलकर्णी, प्रवीणा देशपांडे, डॉ. संध्या साने, सुरेखा कुलकर्णी, अंजली बडवे, पूजा शिरसीकर, सारिका कुलकर्णी यांनी परिश्रम घेतले.

# उपमुख्यमंत्री अजित पवारांना करमाळ्यात विविध मागण्यांचे निवेदन

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि.२५ सप्टेंबर-**

अंतरवली सराटी येथे मराठा संघर्षयोध्दा मनोजदादा जरांगे-पाटील हे ८ दिवसांपासून आमरण उपोषणास बसलेले आहेत. शासनस्तरावर अजूनसुद्धा त्या आमरण उपोषणाची दखल घेतली नाही. याचा आम्ही सकल मराठा समाज करमाळ्याच्या वतीने जाहीर निषेध करतो, असे म्हणत उपमुख्यमंत्री अजित पवार यांना मराठा समाजाने निवेदन दिले.



मराठा संघर्ष योद्धा मनोजदादा जरांगे-पाटील यांनी ज्या मागण्या शासनासमोर मांडल्या आहेत, त्या मागण्या तात्काळ पूर्ण करून घ्याव्यात, आपण मराठा समाजाचे केंद्र बिंदू आहात. महाराष्ट्रातील मराठा बांधवांच्या खूप मोठ्या अपेक्षा आहेत. तुम्ही मराठा असल्याची जाणीव ठेवून तुम्ही मराठा समाजाला ओबीसीतून ५० टक्केच्या आतून आरक्षण मिळवून द्यावे, महाराष्ट्रामध्ये सध्या ओबीसीचे दाखले मोठ्या प्रमाणात मिळाले आहेत. परंतु त्या दाखल्याचा जात पडताळणी ऑफिसमध्ये पडताळणी करून मिळत नाही व लाखांवर पैसे मागण्याचे प्रकार चालू आहेत. संबंधित एजंट व अधिकाऱ्यांवर तात्काळ गुन्हे दाखल करावेत. म्हणजे पैसे मागण्यांचे थांबतील. आपली प्रशासनावर मजबूत पकड आहे. संबंधित अधिकाऱ्यांचा बंदोबस्त आपण नक्कीच कराल ही अपेक्षा. ज्या बांधवाच्या ओबीसी नोंदी सापडल्या नाहीत त्या बांधवांसाठी सगे सोयरेचा अध्यादेश तात्काळ दादा तुम्ही काढून घ्यावा. मनोजदादा जरांगे-पाटील यांच्या जिवाची काळजी कराल ही अपेक्षा आणि मनोजदादा जरांगे-पाटील यांनी केलेल्या मागण्या तात्काळ पूर्ण करून घ्याव्यात. जर असे झाले नाहीतर मात्र तुम्हाला मराठा समाज कधीही माफ करणार नाही, मराठा समाजाच्या रोषाला तुम्हाला सामोरे जावे लागेल. मनोजदादा जरांगे-पाटील यांचे मागण्या पूर्ण करून उपोष थांबवावे ही अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

# अश्वारूढ शिवशिल्पाचे शुक्रवारी आगमन

● सांगोल्यातील शिवप्रेमी मंडळांमधून समाधान

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.२५ सप्टेंबर-**

सांगोला शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात लोक सहभागातून नव्याने बांधण्यात आलेले भव्य दिव्य शिवतीर्थ येथे बसवण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारूढ शिवशिल्पाचा शुक्रवारी २७ सप्टेंबर रोजी आगमन सोहळा आयोजित करण्यात आल्याची माहिती शिवप्रेमी मंडळ सांगोला यांनी पत्रकार परिषदेमध्ये दिली.

सांगोला शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक या ठिकाणी अश्वारूढ शिवशिल्प व्हावे,अशी अनेक वर्षापासून शिवप्रेमींची मागणी होती.त्यानुसार सांगोला नगरपरिषदेच्या सहकार्याने व आर्किटेक्ट संकेत शास्त्री यांच्या मार्गदर्शनाखाली एक ऐतिहासिक वारसा जपणारे शिवतीर्थ उभारण्यात आले आहे.महाराष्ट्र शासनाच्या कला संचनालय विभागाचे मार्गदर्शनानुसार कोल्हापूर येथील शिल्पकार संताजी चौगले यांनी ११ फुट उंचीचा २.५ टन वजनाचा ब्राँझ धातूचा पुर्णाकृती भव्य दिव्य असे शिवशिल्प साकारलेले आहे.



सर्व शासकीय परवानगी मिळाले असून गुरुवार दि.२६ सप्टेंबर रोजी छत्रपती शिवाजी महाराज यांचे अश्वारूढ शिवशिल्प कोल्हापुर ते सांगोला असा जल्लोषपूर्ण वातावरणात येणार असून तालुक्यातील हजारो शिवभक्त आपल्या वाहनाच्या ताफ्यासह सामील होणार आहेत. दरम्यान सांगोला तालुक्याचे हद्दीमध्ये आगमन झाल्यानंतर जुनोनी, हातीद,पाचेगाव खुर्द, कारंडेवाडी, नाझरा मठ आदी ठिकाणी भव्य दिव्य असे स्वागत होणार आहे. शुक्रवारी २७ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजता सांगोला शहरातील अंबिका मंदिर येथून ढोल पथक, लेझीम पथक, टाळ पथक, उंट, घोडे, मावळे यांचा समावेश असणारी भव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे.यासाठी सांगोला शहरातील सर्व प्रमुख रस्त्यांवर भगवे झेंडे,स्वागत कमानी उभारण्यात येणार आहेत. तसेच प्रमुख मार्गावरुन रांगोळ्यांची आरास काढण्यात येणार असून फटाक्यांची आतिषबाजी करण्यात येणार आहे. सांगोला शहरातील भीमनगर, वाढेगाव नाका, कडलास नाका, वासुद चौक, महात्मा फुले चौक,नेहरू चौक व छत्रपती शिवाजी महाराज चौक या ठिकाणी सर्व समाजबांधवांकडून भव्य स्वागत करण्यात येणार आहे. मिरवणुकीमध्ये शिवप्रेमी नागरिक सेवा देणार आहेत, अशी माहिती शिवप्रेमी मंडळाने दिली.

पान नऊवरुन

# विठुराया अन् दामाजीपंत कोणाला पावणार?

### माजी आ. भारत भालके यांचा वारसा



**● जमेच्या बाजू :** लोकप्रिय माजी आमदार (स्व.) भारत भालके यांचा वारसा. विठ्ठल कारखान्याच्या अध्यक्षपदाचा अनुभव पाठीशी.वडिलांच्या निवडणुकीच्या वेळी प्रचाराची धुरा सांभाळण्याचा अनुभव. पोटनिवडणुकीतील चुकांची पुनरावृत्ती होणार नाही याची काळजी घेण्याची संधी. वडीलां प्रमाणे प्रभावी वक्तृत्व साधण्याचा प्रयत्न करतात. (स्व). भारत भालकेंच्या लोकप्रियतेचा मोठा फायदा. जनतेमधील तळागाळातील लोकांची अजूनही सहानुभूती मिळते. मंगळवेढा तालुक्यात विशेषत:: ३५ गावांसारख्या ग्रामीण भागातील जनतेचा भालके परिवाराला अजूनही मोठा पाठिंबा. मराठा समाजाचे भरभक्कम पाठबळ. विठ्ठल परिवाराची ताकद पाठीशी. वडिलांप्रमाणे आवाज त्यामुळे समोरच्या नागरिकांना (स्व.) भारत भालकेंच्या आवाजाचा होतो साक्षात्कार. राजकारण करताना पत्नीचे मोठे सहकार्य.

**● कमकुवत बाजू :** प्रत्येक बाबतीत जनतेकडून वडिलांशी थेट केली जाते तुलना. थेट जनतेशी संपर्क नाही. निवडणुका डोळ्या समोर ठेवून सर्व सामान्य नागरिक,पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांच्या संपर्कात राहण्याचा प्रयत्न. विठ्ठल परिवार अभेद्य ठेवण्यात अपयश. थोडेफार मितभाषी. वडिलांप्रमाणे प्रभावी भाषणबाजी नाही. पोटनिवडणूक आणि विठ्ठल कारखान्याच्या निवडणुकीतील पराभवामुळे गेले खचून. मोठ्या संस्थांचे पाठबळ नसल्यामुळे आर्थिक बाजू थोडीफार कमकुवत.मध्यंतरी बीआरएस पक्ष प्रवेशामुळे काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील निष्ठेला तडा. काँग्रेस आणि राष्ट्रवादीच्या वरिष्ठांचा विश्वासाला काही अंशी तडा गेल्यामुळे उमेदवारी मिळविण्यात अडचण. वडिलांच्या निधना नंतरच्या पोटनिवडणुकीतील पराभवा नंतर जनता आणि भालके परिवारात निर्माण झालेला गॅप भरुन काढण्याची करावी लागणार कसरत. मोजक्या मंडळींतच उठबस. राजकीय परिपक्वतेचा अभाव. भारत भालकें प्रमाणे दानशूरपणाचा अभाव. विठ्ठल कारखान्याची सत्ता नसल्यामुळे निवडणूक लढविताना दमछाक होणार.

### राजकीय पार्श्वभूमी नसतानाही राजकारणात मोठा दबदबा



**● जमेच्या बाजू :** राजकीय वारसा नसताना थेट राजकारणात प्रवेश, धाडसी निर्णय घेण्याची ताकद. विठ्ठल कारखान्याच्या सत्तेमुळे मोठ्या संस्थेचे पाठबळ पाठीशी. आर्थिक बाजू भरभक्कम. जनसामान्यांशी थेट नाळ जोडण्याचा कसोशीने प्रयत्न. राजकारणातील आजी,माजी नेत्यांचे चांगले गुण हेरून त्यावर मार्गक्रमण करण्याचा कसोशीने प्रयत्न. वयाने लहान असल्यामुळे सर्वांशी आदबीने वागणूक. सर्वसामान्य नागरिकांना भेटण्यासाठी मध्यस्थांची गरज लागत नाही. तरुणवर्गात विशेष क्रेझ. कोणताही डामडौल नाही.सर्वसामान्यांबरोबर शेतकऱ्यांच्या प्रश्नांची माहिती. विठ्ठल कारखान्याच्या सभासदांचा मोठा विश्वास. समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत पोहचण्याचा विविध कार्यक्रमांच्या आयोजनातून प्रयत्न करतात. गोरगरिबांना आपल्यापरीने मदतीसाठी सदैव हातपुढे. विठ्ठल परिवारातील मतदारांचा भरभक्कम पाठिंबा.

**● कमकुवत बाजू :** राजकीय अनुभव कमी, तडकाफडकी निर्णयामुळे दूरगामी परिणामांचा धोका. विठ्ठल परिवार मजबूत किंवा एकसंघ ठेवण्यात अपयश. राजकीय वारसा नसताना विठ्ठल कारखान्यावरील सत्तेमुळे विठ्ठल परिवारातील जुने नेते दुरावले. मतदारसंघाची निश्चिती नाही त्यामुळे धरसोड वृत्ती. एका राजकीय पक्षांची विचारधारा निश्चित नाही त्यामुळे पदाधिकारी, कार्यकर्ते संभ्रमात. निष्ठेपेक्षा काहीतरी हाती लागेल या भावनेने जवळ आलेल्या पदाधिकारी, कार्यकर्त्यांचा आजूबाजूला महापूर. सर्व पक्षांतील वरिष्ठांची संबंध त्यामुळे उमेदवारीबाबत पेच. विठ्ठल कारखान्याच्या कारभाराचे विशेष: कारखान्यावरील कर्जाचे, मुद्दे विरोधकाकडून प्रचारात येणार. वाळू ठेकेदारीच्या व्यवसायामुळे स्वच्छ असलेल्या प्रतिमेला थोडेफार गालबोट.

### पक्षप्रमुखांचे विश्वासू अन् थेट संपर्क



**● जमेच्या बाजू :** पक्षप्रमुखांशी थेट संपर्क. पक्षाची एकनिष्ठ त्यामुळेच दस्तुरखुद्द पक्षप्रमुखांकडूनच उमेदवारी बहाल. सर्वसामान्यांना मदतीसाठी सैदव तत्पर. संस्थांचे पाठबळ नसताना कार्यक्रमांचे आयोजन करण्याची धमक. स्वत:च्या पक्षात वजन निर्माण केल्यामुळे त्याचा इतर पक्षांतील नेते मंडळी,पदाधिकाऱ्यांशी थेट संपर्क. मतदारसंघात पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांचे जाळे. काय कमी आहे ते दाखवून दिल्यावर त्यामध्ये सुधारणा करण्याची वृत्ती. जनतेचा अभिप्राय घेऊन त्या प्रमाणे कार्यात सातत्य ठेवण्याचा कसोशीने प्रयत्न. नवीन संकल्पना आत्मसात करुन त्या राबविण्यावर भर. मागील विधानसभा निवडणुकीतील पराभव ज्या चुकांमुळे झाला त्याची पुर्नरावृत्ती होऊ नये याची दक्षता घेण्याची यावेळी संधी.

**● कमकुवत बाजू :** पंढरपुरात संपर्क मात्र मंगळवेढा शहर आणि ग्रामीण भागात तुलनेने संपर्क नाही. स्वत:च्या पक्षाला आजपर्यंत सत्तेची संधी नसल्यामुळे जनतेसाठी कार्य करताना मोठ्या अडचणी. विधानसभा निवडणुकीला सामोरे जाण्या एवढे संपूर्ण मतदार संघात पदाधिकाऱ्यांचे आणि कार्यकर्त्यांचे जाळे नाही. तळागाळातील नागरिकांना मदत शिवाय मतदार संघात कोणतेही विकासकाम नाही. मतदारसंघात पक्षाचेच ठोस काम नसल्यामुळे स्वत:च्या कार्याबद्दल देखील जनतेच्या मनात प्रश्नचिन्ह. संस्थांचे पाठबळ नसल्यामुळे आर्थिक अडचणींचा करावा लागतो सामना.



विधानसभा निवडणुकीला अजूनही एक ते दीड महिन्यांचा कालावधी बाकी आहे. त्यामुळे वरील उमेदवारांनी आपल्यातील जमेच्या बाजूचा आधार घेत ज्या कमकुवत बाजू आहेत त्यावर कशा पद्धतीने मात करुन येत्या निवडणुकीला आपणाला सामोरे जाता येईल यासाठी प्रत्येकाला कसोशीने प्रयत्न करणे गरजेचे आहे. ते करतीलच, अशी आशा आहे.

CMYK

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## सांगोला विद्यामंदिरमध्ये पालक-शिक्षक सभा उत्साहात

**तभा वृत्तसेवा**
**सांगोला, दि. २५ सप्टेंबर-**

सांगोला विद्यामंदिर ज्यु. कॉलेज येथे अकरावीच्या सर्व शाखेच्या विद्यार्थ्यांची पहिल्या सत्रातील पालक-शिक्षक सहविचार सभा उत्साहात पार पडली. अध्यक्षस्थानी प्राचार्य अमोल गायकवाड होते. यावेळी उपमुख्याध्यापिका शहिदा सय्यद, उपप्राचार्य प्रकाश म्हमाणे, पालक शिक्षक संघाचे सदस्य शरद शिंदे उपस्थित होते.

प्रास्ताविकातून प्रा.शिवशंकर तटाळे यांनी सभेचा हेतू विषद करत ज्यु. कॉलेजमधील अध्यापक ओळख करून दिली. प्रा. राजेंद्र कुंभार यांनी कॉलेजमध्ये राबवल्या जाणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली. प्रा. मिलिंद देशमुख यांनी बाह्य परीक्षाविषयी मार्गदर्शन केले. पालकांच्या मनोगतामध्ये संजय खटकाळे, आण्णासो गुजरे, बंडू इंगोले, संजयकुमार जगताप, रामचंद्र पवार, वर्षा बांगर, संगीता कदम, लिंगराज बुधगिरे, संदीप पंडित, बबन पवार यांनी शाळेविषयी गौरवोद्गार काढून काही सूचनाही दिल्या.

प्रकाश म्हमाणे यांनी विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी पालकांनी शाळेशी आणि विषय शिक्षकांशी संपर्क साधावा असे सांगत शिस्तीचे महत्व सांगितले.प्राचार्य अमोल गायकवाड यांनी विद्यार्थ्यांच्या विकासासाठी संस्कार शिबिरे घेतली जातात. परंतु आम्ही शाळेमध्येच वेगवेगळ्या उपक्रमातून विद्यार्थ्यांना संस्कार देण्याचा प्रयत्न करतो आहे, असे मनोगतात सांगितले. सूत्रसंचालन प्रा. अर्चना कटरे यांनी तर प्रा. सागर बुधावणे यांनी आभार मानले.



## संक्षिप्त वृत्त...



### तांदुळवाडी जिल्हा परिषद शाळेला जिल्हास्तरीय आदर्श शाळा पुरस्कार

**अकलूज, दि. २५ सप्टेंबर-**

जिल्हा प्राथमिक शिक्षक पतसंस्थेच्या वतीने माळशिरस तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तांदुळवाडीचा जिल्हास्तरीय आदर्श शाळा म्हणून पंढरपूर येथे सन्मान करण्यात आला. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तांदुळवाडी ही एक उपक्रमशील व गुणवत्तापूर्ण शिक्षण देणारी शाळा आहे. शाळेतील पवार, अंकुशराव, ढवण व मुख्याध्यापक नामदेव आवताडे हे चारही शिक्षक नेहमीच मुलांच्या गुणवत्तेवर भर देत आहेत. शाळेत सर्व शिक्षक स्पर्धा परीक्षा तसेच विविध उपक्रम घेऊन मुलांना आनंददायी व व्यावहारिक शिक्षण देण्याचा प्रयत्न करतात. शाळेस नेहमीच शाळा व्यवस्थापन समिती, पालक व तांदुळवाडी गावातील ग्रामस्थ यांचे पाठबळ व सहकार्य असते. शाळेच्या आजवर केलेल्या प्रयत्नांचा सन्मान म्हणून पंढरपूर येथे जिल्हास्तरीय आदर्श शाळा म्हणून शिक्षक संघाचे सल्लागार व माजी राज्य अध्यक्ष बाळासाहेब काळे, शिक्षक नेते अंकुशराव काळे व मच्छिंद्र मोरे चेअरमन रामभाऊ यादव, व्हाईस चेअरमन व्हनमाने, चेअरमन विठ्ठलराव काळे, व्हाईस चेअरमन संभाजीराव फुले प्रदीप आवताडे यांनी प्रमाणपत्र, सन्मानचिन्ह तसेच बक्षीस रक्कम देऊन सर्व शिक्षक, शाळा व्यवस्थापन समिती व पालक यांचा एकत्रित सन्मान केला. यावेळी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सुहास उघडे उपस्थित होते.



### पांगरी ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी ॲड. रियाज बागवान बिनविरोध

**बार्शी, दि. २५ सप्टेंबर-**

पांगरीचे उपसरपंच गणेश गोडसे यांनी राजीनामा दिल्यामुळे पांगरी ग्रामपंचायत उपसरपंचपद रिक्त झाले होते. या रिक्तपदासाठी पांगरीतील सामाजिक कार्यकर्ते व ग्रामपंचायत सदस्य ॲड. रियाज दस्तगीर बागवान यांचा एकमेव अर्ज आल्यामुळे त्यांची बिनविरोध निवड झाली आहे. या निवडीमुळे पांगरीच्या सर्व जनतेतून ॲड. रियाज बागवान यांचे स्वागत व अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. यावेळी सरपंच हिराबाई काकडे, ग्रामविकास अधिकारी सिध्देश्वर चौधरी, ॲड. अनिल पाटील, विलास जगदाळे, विजय गरड, उमेश गाढवे, सुहास देशमुख, रेणूका मोरे, प्रमिला नारायणकर, मनिषा धस, गणेश गोडसे, सिकंदर शेख, जमीर शेख, फारुक शेख, धनंजय खबाले, डॉ. अरिफ शेख, सिंकदर शेख, रामभाऊ देशमुख, विष्णू पवार, सुहास देशमुख, दिलीप जानराव, गफार शेख, जमील शेख, विजयकुमार माळी, युवराज खबाले इत्यादी मान्यवर उपस्थित होते. या निवडीबद्दल विद्यमान आमदार राजेंद्र राऊत यांनी अभिनंदन व शुभेच्छा दिल्या आहेत.





### सनराईज इंग्लिश मीडियम गुरुकुलचे धनुर्विद्या स्पर्धेमध्ये घवघवीत यश

**टेंभूर्णी, दि. २५ सप्टेंबर-**

श्री माऊली शिक्षण प्रसारक व समाजसेवा मंडळ संचलित सनराइज् इंग्लिश मीडियम गुरुकुल स्कूल टेंभुर्णीमधील विद्यार्थ्यांनी अरण या ठिकाणी झालेल्या जिल्हास्तरीय धनुर्विद्या स्पर्धेमध्ये घवघवीत यश संपादन केले. वय वर्ष १४, वय वर्ष १७ या गटांमध्ये प्रशालेच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन उत्कृष्ट यश संपादन करून विभागस्तरीय होणाऱ्या धनुर्विद्या स्पर्धेसाठी पात्र ठरले आहेत. यामध्ये १४ वर्षे वयोगटात वर्धन कोरडे व कुमारी प्रांजल खाडे तसेच १७ वर्षे वयोगटांमध्ये निशांत क्षीरसागर या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करून यश संपादन केले. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष योगेश बोबडे, सचिवा सुरजाताई योगेश बोबडे, संस्थेचे अकॅडमिक डायरेक्टर मंगेश काशीद, प्रिन्सिपल शाहिदा पठाण यांनी अभिनंदन केले.

### कुंभारीतील जागृत जय भवानी नवरात्रोत्सव मंडळाच्या अध्यक्षपदी भोरगुंडे

**सोलापूर, दि. २५ सप्टेंबर-**



दक्षिण सोलापूर तालुक्यातील कुंभारी येथील जय भवानी नवरात्रोत्सव तरुण मंडळाच्या अध्यक्षपदी गेनसिद्ध भारगुंडे यांची निवड करण्यात आली आहे. उपाध्यक्ष सोमनिंग कळळे, सचिव पोलीस पाटील शिवानंद बिराजदार, मिरवणूक प्रमुख भुताळी कळकिळे, गेनसिद्ध गुंडे, सिद्धाराम मनगुळे, खजिनदार रमेश पुजारी यांची निवड झाली. यावेळी आप्पासाहेब बिराजदार, आप्पासाहेब इमडे, श्रीशैल जडगे, मदप्पा डक्के, माळसिद्ध मनगुळे, अवधूसिद्ध आमचे उपस्थित होते.

# १ हजार ६७३ हेक्टर सूर्यफुलावर पावसाचे 'पाणी'

## ● अक्कलकोट तालुक्यातील शेतकरी अडचणीत; पीकविमा अधिसूचित सूर्यफूलचा समावेश नाही

**तभा वृत्तसेवा । नंदकुमार जगदाळे**
**अक्कलकोट, दि. २५ सप्टेंबर-**



| पिके आणि पेरणी क्षेत्र | |
|---|---|
| सोयाबीन | मका |
| १३ हजार ६३२ | १ हजार ८५६ |
| बाजरी | सूर्यफूल |
| ५०८ | १ हजार ६७३ |
| | कापूस |
| | ७५८ |



अक्कलकोट तालुक्यात शनिवार, रविवार, सोमवार, मंगळवार सलग पाऊस झाला आहे. सलग पडत असलेला पाऊस, उभ्या पिकात थांबलेले पाणी, यामुळे काढणीस आलेले सोयाबीन, सूर्यफूल, बाजरी पिकाच्या दर्जावर तसेच एकरी उताऱ्यावर व काही शेतकऱ्याचे संपूर्ण पिकाचे नुकसान होणार अशी स्थिती आहे.

तालुका कृषी अधिकारी हर्षद निगडे यांनी नुकसानीसंदर्भात पीक विमा भरलेल्या शेतकऱ्यांनी अधीसूचित पिकाच्या नुकसानीसंदर्भात ७२ तासांच्या आत पीकविमा कंपनीच्या टोल फ्री क्रमांकावर शेतक ऱ्यांनी सूचित करण्याचे आवाहन केले आहे. तालुक्यात फारच कमी फक्त १ हजार ६७३ हेक्टरवर सूर्यफूल पिकाची पेरणी झाली आहे. यामुळे पीकविमा अधिसूचित यादीमध्ये सूर्यफूलचा समावेश नाही. सूर्यफूल पिकास कालावधी जास्त लागतो. यामुळे शेतकऱ्याचा सूर्यफूल पेरणीचा कल कमी झाला आहे. उडीद, मूग, सोयाबीन पेरणी क्षेत्रामध्ये वाढ झाली असल्याची माहिती तालुका कृषी अधिकारी दर्षद निगडे यांनी दिली. तालुक्यात शनिवारी सरासरी २९ मिमी, रविवारी २३.१२ मिमी, सोमवारी १२.६ मिमी व मंगळवारीही सलग पाऊस झाल्याने काढणीस आलेले सूर्यफूल, सोयाबीन, बाजरी, मका आदी पिके धोक्यात आहेत. अतिवृष्टीचा निकष हा २४ तासात ६५ मिमी पाऊस झाल्यास महसूल विभाग आदेश काढून पीक पंचनामे केली जातात. यामुळे निकषाप्रमाणे तालुक्यात अतिवृष्टी झाली नाही. ज्या शेतकऱ्यांच्या उभ्या सूर्यफूल, सोयाबीन, बाजरी इत्यादी पिकात सलग पाऊस झाल्याने पावसाचे पाणी साचून नुकसान झाले आहे. याच्या पीक नुकसानीसंदर्भात निकषाप्रमाणे पंचनामे होऊ शकणार नाहीत. शेतकऱ्याच्या सूर्यफूल, सोयाबीन, बाजरी, मका उभ्या पिकात पावसाचे पाणी थांबल्याने शेतकऱ्याच्या नुकसानीसंदर्भात शासनाने काही अपवादात्मक परिस्थितीबाबत सलग झालेला पाऊस हा ६५ मिमीपेक्षा अधिक झाल्याने काही शेतकऱ्यांशच्या पिकाचे अंशतः काहीचे पूर्णतः नुकसान झाले आहे. अशा शेतकऱ्यांना शासनाने नुकसानीसंदर्भात सहानुभूतीपूर्वक विचार करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत करावी, अशी मागणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे तालुका प्रमुख आनंद बुक्कानुरे, लहुजी शक्ती सेना सोलापूर जिल्हाध्यक्ष वसंत देडे, राष्ट्रीय समाज पक्षाचे पश्चिम महाराष्ट्र उपाध्यक्ष सुनिल बंडगर यांनी व्यक्त केली आहे.

> अक्कलकोट तालुक्यात उडीद, मुगाची ९० टक्के मळणी झाली आहेत. सोयाबीन पेरा मोठा आहे. यामुळे लागोपाठ पावसामुळे सोयाबीन फुगून उत्पादन, दर्जावर परिणाम झाला आहे. सूर्यफूल पेरणी तालुक्यात कमी झाली आहे. दरही कमी असल्याने शेतकऱ्याचा सूर्यफूल पेरणीचा कल कमी झाला आहे. आमच्याकडे फक्त १५० बॅग यंदा बियाण्यांची विक्री झाली. सूर्यफूल उत्पादनावर सलग पावसाने मोठा परिणाम होणार आहे.
>
> **- अप्पासाहेब पाटील,** माजी उपसभापती, बाजार समिती, अक्कलकोट

## अभिजीत पाटलांची घोड्यावरून मिरवणूक

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २५ सप्टेंबर-**



माढा तालुक्यातील वडोली या गावांमध्ये श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अभिजीत पाटील हे गाव भेटीसाठी गेले असता चक्क ग्राम स्थांनी अभिजीत पाटील यांची घोड्यावरून मिरवणूक काढून मोठ्या उत्साहात स्वागत केले.

घोड्यावरून मिरवणूक काढल्यानंतर अभिजीत पाटील यांनी लोकांचं प्रेम काय असतं याचा प्रत्यय मी माढा मतदारसंघातील जनतेकडून घेतो आहे. व्यक्तिगत माणसांच्या आयुष्यात घोड्यावर बसण्याचा क्षण हा एकदाच असतो परंतु घोड्यावर बसून हालगीच्या तालात आमदार होण्यापूर्वीच 'आमदार' म्हणून अविस्मरणीय मिरवणूक वडोली येथील ग्रामस्थांनी अविस्मरणीय मिरवणूक काढली असे उद्गार भारावून गेलेल्या अभिजीत पाटील यांनी काढले. यावेळी बोलताना अभिजीत पाटील म्हणाले की;माढा मतदारसंघात अनेक प्रश्न प्रलंबित आहेत. यावर एकच तोडगा म्हणजे बदल करणं! आणि त्याच बदलांवर आपल्याला काम करण्याची प्रचंड मोठी संधी आहे. शेतकऱ्यांचं हित डोळ्यासमोर ठेवून अविरत काम करण्याची भूमिका जनमानसात मिसळलं की आपोआप जोड लागते. यावेळी वडोलीचे सरपंच सतीश काळे, डीव्हीपी बँकेचे नूतन चेअरमन औदुंबर महाडिक, उपसरपंच साधून पडळकर, विविध कार्यकारी सोसायटीचे चेअरमन शंकर सुरवसे, धनाजी काळे, प्रगतीशील बागायतदार भगवान बंडगर, गोरख पडळकर यांसह आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

## सुनील तटकरे यांच्या बंदोबस्तासाठी निघालेल्या जीपचा अपघात

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि. २५ सप्टेंबर-**



बावी (ता.माढा) गावच्या शिवारात चालकाचे गाडीवरील नियंत्रण सुटल्याने राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते सुनील तटकरे यांच्या बंदोबस्तासाठी निघालेल्या जीपचा अपघात होऊन जीप पलटी झाली.

या अपघातात चालकासह तिघेजण जखमी झाले. हा अपघात मंगळवारी पहाटे ५:३० च्या सुमारास हा अपघात झाला. सदर अपघाताबाबत पोलिस सूत्रांच्या माहितीनुसार वाहन (क्र. एम. एच. १३/ ई. के. १७५६) चा चालक शेटफळकडून कुडूवाडीकडे सुनील तटकरे यांच्या बंदोबस्तासाठी निघाला होता. सोबत ग्रामीण पोलिस दलातील तिघे जण होते. बावी गावाजवळ मंगळवारी पहाटेच्या सुमारास चालकाचे गाडीवरील नियंत्रण सुटल्याने जीप रोडच्या बाजूला जाऊन पलटी झाली. यात चालकासह वरील चौघे जखमी झाले.जखमींमध्ये चालक अंकुश निंबाळकर (वय २३), सोबत असलेले तीन कर्मचारी येजगर, बोराडे, खराडे (सर्व रा. सोलापूर ग्रामीण पोलिस मुख्यालय, सोलापूर) यांचा समावेश आहे. सर्व जण किरकोळ जखमी झाले असून, वाहनाचे नुकसान झाले आहे. अपघातातील वाहन रस्त्याच्या बाजूला असून, वाहतूक सुरळीत सुरू आहे. सर्व जखमींवर दवाखान्यात उपचार करण्यात आल्याची माहिती महामार्ग पथकाचे प्रकाश वाघमारे यांनी दिली.

## मूकबधिर विद्यार्थ्यांनी लुटला वळसंग वाड्यातील वॉटर पार्कचा आनंद

**तभा वृत्तसेवा,**
**वळसंग, दि. २५ सप्टेंबर-**



वळसंग (ता. दक्षिण सोलापूर) येथे सुप्रसिद्ध असलेल्या सुनील बाबानगरे यांच्या वळसंग वाडा व फंटूस वॉटर पार्क यांच्याकडून मूकबधिर विद्यार्थ्यांना मोफत वाटर पार्क तसेच मोफत जेवणाची सोय करून देण्यात आली. विद्यार्थ्यांनी दिवसभर मनसोक्त याचा आनंद लुटला.

विकासनगर, सोलापूर येथील ममता मूकबधिर शाळेकडून कर्णबधीर दिनानिमित्त मूकबधिर विद्यार्थ्यांना काहीतरी नवीन शैक्षणिक सोयीसुविधा व प्रवासाची सोय करण्याची योजना सुनील बाबानगरे यांच्यासमोर मांडण्यात आली. सुनील बाबानगरे यांनी व्यवसायिक दृष्टिकोनाचा विचार न करता दातृत्व दाखवत ६५ विद्यार्थी-विद्यार्थिनी व शिक्षकांना मोफत सफर घडवून आणण्याचे मान्य केले. यामुळे विद्यार्थ्यांना ही संधी प्राप्त झाली. सुनील बाबानगरे यांच्याप्रमाणे इतरांनीही सहकार्य केल्यास मुलांचा आनंद द्विगुणित होईल, असे मुख्याध्यापिका संगीता गायकवाड यांनी सांगितले. यावेळी वळसंग वाडा व फंटूस वॉटर पार्कचे मालक सुनील बाबानगरे, मुख्याध्यापिका संगीता गायकवाड, तेजश्री श्रीरेखम, नीता देशपांडे, उज्ज्वला पराळे, श्रीकृष्ण कदम, रघुनाथ फुगे, संजय शिंगाडे, कर्मचारी बिळंबे उपस्थित होते.

## उद्याचा मंगळवेढा बंद मागे

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि.२५ सप्टेंबर-**

संघर्ष योद्धे मनोज जरांगे-पाटील यांचे उपोषण स्थगित झाल्यामुळे गुरुवारी पुकारण्यात आलेला मंगळवेढा बंद मागे घेण्यात आला.

बंदच्या निमित्ताने शेतकरी, कष्टकरी, सर्व समाजघटक, तसेच व्यावसायिक, शाळे-तील व कॉलेजमधील विद्यार्थी व इतर सर्व व्यापारी संघटना यांची जी गैरसोय होणार होती. त्याबद्दल दिलगिरी व्यक्त करत आहोत. तसेच बंदमध्ये सहभाग नोंदवणाऱ्या शहर व तालुक्यातील रिक्षा संघटना, विद्यार्थी वाह-तूक संघटना, व्यापारी संघटना, शाळा महाविद्यालये, खासगी व शासकीय आस्थापनेचे आभार मानण्यात आले.

## वेळापूरला जागतिक अध्यात्मिक पर्यटनस्थळ म्हणून घोषित करावे

### सरबजितसिंह बावा यांची केंद्र सरकारकडे मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. २५ सप्टेंबर-**



श्री अर्धनारी नटेश्वराची अलौकिक मूर्ती प्रथमच पाहिली. जागतिक कीर्तीची मूर्ती कुठेही पाहायला मिळाली नाही. वेळापूर हे एक जागतिक किर्तीचे अध्यात्मिक ठिकाण आहे. भारत सरकारने हे एक जागतिक किर्तीचे अध्यात्मिक पर्यटनस्थळ म्हणून घोषित करावे, असे मत पंजाबच्या श्री क्षेत्र घुमान येथील श्री नामदेव दरबार कमिटीचे सचिव सरबजितसिंह बावा यांनी व्यक्त केले.

यावेळी सुखजिंदरसिंह बावा, मनजिंदरसिंह बावा यांनी श्री क्षेत्र पंढरपूर येथे श्री विठ्ठलाचे तर श्री क्षेत्र वेळापूर येथे श्री अर्धनारी नटेश्वराचे दर्शन घेतले. त्यांनी वेळापूर येथील नामदेव समाज मंदिरासही भेट दिली. त्यांना मंदिराचे पुजारी जगदीश गुरव यांनी मूर्ती व मंदिराची माहिती दिली. नामदेव शिंपी समाजातर्फे त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी सूर्यकांत भिसे, मनोज मांढरे, अनंत जवंजाळ, संजय उरणे, प्रकाश माळवदकर, अरुण उरणे, विठ्ठल जवंजाळ, उद्धव उरणे, मनोज उरणे, अनिल पोरे आदी उपस्थित होते.

# पंढरपूर-मंगळवेढ्यातून प्रशांत, माढ्यातून उमेश परिचारकांनी निवडणूक लढवावी

### पांडुरंग परिवारातील पदाधिकारी, कार्यकर्त्यांची मागणी; परिचारक बंधूंची भूमिका अद्याप गुलदस्त्यातच

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.२५ सप्टेंबर-**



माढा मतदारसंघातून उमेश परिचारक तर पंढरपूर-मंगळवेढ्यातून प्रशांत परिचारकांनी निवडणूक लढवावी अशी मागणी पांडुरंग परिवारातील पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी केली आहे.

दरम्यान परिचारक बंधूंनी आपली भूमिका गुलदस्त्यातच ठेवलेली आहे. त्यामुळे त्यांच्या भूमिकेकडे लक्ष लागले आहे. मंगळवारी पंढरपूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती दिलीपअप्पा घाडगे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये पांडुरंग परिवारातील पदाधिकाऱ्यांची बैठक झाली. दिलीप घाडगे म्हणाले की, पंढरपूर तालुक्यातील ४२ गावे माढा विधानसभा मतदारसंघात असून यामध्ये एक लाख पाच हजार मतदार आहेत.पांडुरंग परिवाराने या ४२ गावांमध्ये चांगले काम केले आहे. तीन जिल्हा परिषद सदस्य व सहा पंचायत समिती सदस्य आहेत. पांडुरंग साखर कारखान्याने या भागातील पाच लाख मे. टन उसाचे गाळप करून चांगला ऊस दर दिला आहे. ऐंशी टक्के ग्रामपंचायतीवर पांडुरंग परिवाराची सत्ता आहे. माळशिरस तालुक्यातील १५ गावांमध्येही पांडुरंग परिवार सक्रिय आहे. या भागातील सुमारे दीड लाख टन ऊस गाळप केले आहे. या भागात पांडुरंग परिवाराची राजकीय ताकद मोठी आहे. त्यामुळे युटोपियन शुगर्सचे अध्यक्ष उमेश परिचारक यांनी माढ्यातून आणि माजी आमदार तथा पांडुरंग परिवाराचे नेते प्रशांत परिचारक यांनी पंढरपूर-मंगळवेढ्यातून निवडणूक लढवावी अशी जोरदार मागणी केली. त्यानंतर पांडुरंग परिवारातील इतर पदाधिकाऱ्यांनीदेखील ही मागणी उचलून धरली असून दोन्ही परिचारक बंधूंनी निवडणुकीच्या रिंगणात उतरावे अशी आग्रही भूमिका घेतली आहे. दरम्यान या बैठकीनंतर सर्व पदाधिकाऱ्यांनी उमेश परिचारक यांची भेट घेऊन प्रस्ताव ठेवला आहे. यावर निर्णय घेणार असल्याचे परिचारक यांनी सांगितले. यावेळी पांडुरंग कारखान्याचे उपाध्यक्ष कैलास खुळे, बाजार समितीचे सभापती हरिष गायकवाड, पंचायत समितीचे माजी उपसभापती प्रशांत देशमुख, लक्ष्मण धनवडे, व्हाण, बाळासाहेब देशमुख यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

> **परिचारकांसाठी माढ्याची लढाई सोपी**
>
> माढा विधानसभा मतदारसंघात पंढरपूर तालुक्यातील ४२ गावांचा समावेश आहे. या ४२ गावांमध्ये परिचारक गटाची मोठी राजकीय ताकद आहे. शिवाय याच मतदारसंघात माळशिरस तालुक्यातील १४ गावांचा समावेश आहे. यामध्ये त्यांच्या पांडुरंग सहकारी साखर कारखान्याचा ही समावेश आहे. त्यामुळे माढा मतदारसंघातून परिचारकांना निवडणूक लढवणे हे सोपे असल्याचे त्यांच्या कार्यकर्त्यांचे मत आहे.

धाराशिव
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## तेर येथील जि.प.प्रा. शाळेतील शिक्षकांचा कडकडीत बंद



**तभा वृत्तसेवा**
**तेर, दि.२५ सप्टेंबर -**

धाराशिव तालुक्यातील तेर येथील पाचही प्राथमिक जिल्हा परिषद प्रशालेतील सर्वच शिक्षक, शिक्षिका विविध मागण्यासाठी सामुहिक रजेवर २५ सप्टेंबरला गेल्याने कडकडीत बंद पाळण्यात आला.

धाराशिव तालुक्यातील तेर येथील जि.प. कन्या शाळा, जि.प. केंद्रीय शाळा, जि.प. पेठ शाळा, जि.प. स्पेशल शाळा, जि.प. उर्दू शाळेतील प्राथमिक विभागाचे सर्वच शिक्षक, शिक्षिका विविध मागण्यासाठी २५ सप्टेंबरला सामुहिक रजेवर गेल्याने तेर येथील सर्वच प्राथमिक जिल्हा परिषद प्रशालेत एक दिवसीय कडकडीत बंद पाळण्यात आला. त्यामुळे तेर येथील सर्वच प्राथमिक जिल्हा परिषद शाळा बंद होत्या.



## संक्षिप्त वृत्त...



### सकल मराठा समाजाचे तुळजापूरात बोंब मारो आंदोलन

**तुळजापूर, दि.२५ सप्टेंबर -**

मराठा संघर्षयोद्धा मनोज जरांगे-पाटील यांची प्रकृती खालावत असताना देखील शासन मराठा आरक्षण मागणी दखल घेत नसल्याच्या निषेधार्थ सकल मराठा समाजाने मंगळवार दि.२४ रोजी शासन व शासनातील मंत्र्याच्या निषेधार्थ बोब मारीत मोर्चा काढत शासनाचा निषेध केला. छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यापासुन या बोंब मारो आंदोलनास आरंभ झाला. या आंदोलनात शासन तसेच मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांच्या निषेधाचा घोषण देत बोंब मारीत तहसिल कार्यालयाजवळ शासनाचा जाहीर निषेध केला. या आंदोलनात सकल मराठा समाज शहर व तालुक्यातील सहभागी झाले होते.



### मनोज जरांगे यांना पाठिंबा देण्यासाठी लोहाऱ्यात साखळी उपोषणास सुरुवात

**लोहारा, दि.२५ सप्टेंबर -**

उपोषणकर्ते संघर्ष योद्धा मनोज जरांगे-पाटील यांच्या उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी लोहारा येथे सकल मराठा समाच्यावतीने लोहारा तहसील कार्यालयासमोर दि.२५ सप्टेंबर पासुन साखळी उपोषणास सुरुवात करण्यात आली आहे. जोपर्यंत संघर्ष योद्धा मनोज पाटील यांच्या मागणीला यश मिळत नाही त्यांचे उपोषण थांबत नाही, संघर्ष योद्धा मनोज जरांगे-पाटील यांचे आदेश मिळेपर्यंत साखळी उपोषण सुरु राहील, असे सकल मराठा समाजाच्यावतीने सांगण्यात आले. या उपोषणात शरद पवार, बालाजी यादव, लक्ष्मण पवार, अनंत पवार, महादेव गिरी, अजित मोटे, हणमंत रवळे, महादेव मगर, महेश गोरे, सहभागी आहेत.



### इटकळ बुद्ध विहारात गुणवंताचा नागरी सत्कार

**इटकळ, दि.२५ सप्टेंबर -**

इटकळ बुद्ध विहारांमध्ये सायंकाळी साडेसात वाजता भारतीय बौद्ध महासभेच्या जिल्हाध्यक्ष राजश्री कदम यांच्या अध्यक्षतेखाली गुणवंताचा सत्कार आणि समाज रत्न पुरस्कार प्राप्त आर.एस. गायकवाड यांचा यांच्या नागरी सत्काराच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी या कार्यक्रमास सरपंच साहेबा क्षीरसागर, उपसरपंच फिरोज मुजावर, ग्रामपंचायत सदस्य अमोल पाटील, राहुल बागडे, रफिक मुजावर, अब्दुल शेख हे मान्यवर उपस्थित होते. प्रास्ताविकामध्ये बाळू बागडे गुरुजी यांनी आदिनाथ बागडे पुणे व मीनाक्षी बागडे यांच्या सामाजिक कार्यात गौरव केला. यावेळी भारतीय बौद्ध महासभेच्या नूतन जिल्हाध्यक्ष राजश्री कदम यांचा इटकळ बौद्ध बांधवांच्या वतीने सत्कार करण्यात आला. या नागरी सत्काराच्या कार्यक्रमाचे आयोजन अनिल बागडे, विलास दुपारगुडे, भारत बागडे, आदिनाथ बागडे, मीनाक्षी बागडे आणि त्यांच्या सहकार्याने केले होते.



### समाजवादी पार्टी जिल्हाअध्यक्ष पदी अमीर शेख यांची निवड

**तुळजापूर, दि.२५ सप्टेंबर -**

समाजवादी पार्टी जिल्हाध्यक्ष पदी आमीर ईब्राहीम शेख यांची निवड करण्यात आली. रविवार दि.२३ रोजी समाजवादी पार्टी मुंबई येथील कार्यालयात अमीर शेख आपसिंगा यांना समाजवादी पार्टीच्या उस्मानाबाद जिल्हाध्यक्षपदी निवड करण्यात आली आले व नियुक्ती पत्र देण्यात आले. समाजवादी पार्टीचे मुंबई महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष तथा आमदार अबु आसिम आझमी यांच्या आदेशानुसार समाजवादी पक्षाचे प्रदेश कार्याध्यक्ष प्रतापराव होगाडे, जनरल सेक्रेटरी परवेझ सिद्धीकी, डॉ. अब्दुल रौफ शेख, प्रदेश कार्यकारणी अँड.रेवन भोसले उपस्थिती होते. समाजवादी पार्टी जिल्हाध्यक्ष पदी अमीर शेख यांच्या निवडीचे वृत्त कळताच फटाके फोडुन आनंदोत्सव साजरा केला.

## परंडा मतदार संघात तानाजी सावंत यांच्या विरोधात महाविकास आघाडीचा उमेदवार कोण?

**तभा वृत्तसेवा / आप्पासाहेब शिंदे**
**परंडा, दि.२५ सप्टेंबर -**







परंडा विधानसभा मतदारसंघात विधानसभा निवडणूक लढविण्यासाठी कोण कोण इच्छुक आहेत हे लवकरच कळेल येत्या दहा ते पंधरा दिवसात अचारसंहीता लागू शकते. त्यामुळे परंडा मतदारसंघात तिरंगी किंवा चौरंगी लढत होण्याची शक्यता नाकारता येत नाही. राज्याचे आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री तथा धाराशिव जिल्ह्याचे पालकमंत्री प्रा.डॉ. तानाजीराव सावंत हे पुन्हा विधानसभा निवडणुकीच्या रिंगणात पूर्ण ताकतीने उतरत असून त्यांच्या विरोधात महाविकास आघाडीचा उमेदवार कोण? राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे माजी आ. राहुल मोटे की शिवसेना ठाकरे गटाचे माजी आमदार ज्ञानेश्वर पाटील याची चर्चा ही मतदार संघात जोरात सुरू असून वंचित बहुजन आघाडी कडून मराठवाडा उपाध्यक्ष प्रवीण रणबागुल हे विधानसभा निवडणूक लढविण्यास सज्ज झाले आहेत. तर मनसे ही आपला उमेदवार उभा करू शकतो.

गेल्या पाच वर्षात आमदार व पालकमंत्री म्हणून सावंत यांनी परंडा मतदारसंघात मोठ्या प्रमाणात विकास कामे केली असल्याचे तानाजीराव सावंत यांनी मतदारसंघात गाव भेटी दौऱ्याच्या वेळी सांगत मोठ्या प्रमाणात विकास कामे केली आहेत, असे सांगितले जात आहे. तर मतदार संघासाठी कोट्यावधी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिल्याचे सांगत आहेत काही महत्त्वपूर्ण विकास कामे सुरू आहेत त्याचे लोकाअर्पण ही केल्याचे सांगितले जात आहे. त्याच बरोबर निवडणुकीच्या अनुषंगाने निवडणुकीच्या अनुषंगाने तानाजीराव सावंत यांनी मतदारांच्या गाठीभेटी घेण्यासाठी गाव भेट दौरा करून प्रचारास जोरदार सुरुवात केली आहे.

महाविकास आघाडीचा उमेदवार कोण याची चर्चा सध्या परंडा मतदारसंघात जोरात रंगत असून माजी आमदार राहुल मोटे यांनीही भूम, वाशी तालुक्यात गाव गेट दौरे करून मतदाराच्या गाठीभेटी घेण्यास सुरुवात केली आहे. सध्या राहुल मोटे परंडा तालुक्यात मतदारांच्या गाठीभेटी घेत आहे. आपण आमदार असताना मतदार संघात मोठ्या प्रमाणात विकास केल्याचे मतदाराना पटवून देत आहेत. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाकडून महाविकास आघाडीचे उमेदवार म्हणून माजी आमदार ज्ञानेश्वर पाटील यांच्या नावाची ही जोरदार चर्चा असुन पाटील यांना तिन्ही तालुक्यात मानणारा मतदार मोठ्या प्रमाणात आहे.

त्यांच्या ही काळात मतदार संघात मोठया प्रमाणात विकास कामे झाली होती असे म्हटले जात आहे.

### वंचितकडून बिगुल वाजले...

पैशावर निवडणुका जिंकता येत नाहीत जनतेच्या संपर्कात राहीले पाहिजे. वंचित बहुजन आघाडी कडून परंडा मतदारसंघात प्रवीण रणबागुल हे विधानसभा निवडणूक लढविण्यास इच्छुक असल्याने मतदारसंघात मोठी रंगत येणार आहे. रणबागुल यांनी भूम, वाशी तालुक्यातील प्रत्येक गावातील जनतेच्या गाव भेटी घेतल्या असून बऱ्याच शेतकऱ्यांच्या पिकाचे मोठ्या प्रमाणात पावसामुळे नुकसान झाले होते. त्या शेतकऱ्याच्या बांधावर जाऊन प्रत्यक्षात बागुल यांनी शेतकऱ्याची भेट घेऊन फुल ना फुलाची पाकळी म्हणून शेतकऱ्यांना सढळ हाताने थोडीशी आर्थिक मदत देण्याचा प्रयत्न केला असून प्रवीण बागुल सध्या परंडा तालुक्यात जनता जनार्दन मतदाराशी संपर्क साधत असून त्यांना यावेळी जनतेतून चांगला प्रतिसाद मिळत असल्याचेही दिसून येत आहे.

## परंडा तालुक्यातील वीज पुरवठा वारंवार खंडीत; ग्रामस्थांत नाराजी

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.२५ सप्टेंबर -**

परंडा शहर व तालुक्यातील बहुतेक गावामध्ये वीज पुरवठा वारंवार खंडित होण्याचे प्रकार गेल्या अनेक दिवसांपासुन वाढल्यामुळे सुरू असल्याने तालुक्यातील जनतेमधील ग्रामस्थ नाराजी व्यक्त करण्यात येत आहे.

पावसाला सुरुवात होताच वीज पुरवठा खंडित होत असल्याने जेकटेवाडी व देवगांव (बु) गावामधील ग्राम स्थांमध्ये विद्युत महावितरण कंपनीबद्दल प्रचंड रोष निर्माण होत आहे.

तसेच कोणत्या ना कोणत्या भागामध्ये विजेचा फॉल्ट असल्याचे कारण पुढे करत वीज गायब होते. याचाच अर्थ संबधितीत अधिकाऱ्याचे वीजेच्या व्यवस्थेकडे साफ दुर्लक्ष होत असल्याचे दिसुन येते याचा सर्वाधिक फटका सर्व सामान्य नागरिकांना बसत आहे. वीज पुरवठा खंडित होत असल्यामुळे याचा त्रास हा विद्यार्थी, शेतकरी व व्यावसायिकांना सहन करावा लागत आहे.



त्यातच पावसाळा सुरु असल्याने डासांच्या प्रादुर्भावामुळे आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. यामुळे जेकटेवाडी व देवगांव (बु) येथील नागरिकांनी विद्युत महवितरण कंपनीच्या भोंगळ कारभारावर नाराजी व्यक्त केली आहे. तसेच अधिकारी व कर्मचारी आपल्या नियुक्तीच्या ठिकाणी वास्तव्य करीत नसलेल्या वीज पुरवठा लवकर सुरू होत नाही.

तसेच दरमहा मीटरची रिडींग दि.१ ते ५ तारखेच्या घेऊन जाणे बंधनकारक असताना उशिरा रिडींग नेण्यात येते याचा फटका वीज धारकांना बसतो कारण १०० युनिटच्या पुढे वीजेचा वापर झाला तर दुप्पट वीज बिल आकारणी होते. शिवाय नियमित वीज बिलाचे वाटत करण्यात येत नाही.

तेव्हा वरिष्ठ अधिकारी यांनी याकडे लक्ष द्यावे, अशी मागणी सर्वसामान्य वीज धारकांतुन होत आहे.

## देवी विजय ग्रंथ समाप्ती सोहळा सांगता



**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२५ सप्टेंबर -**

कमान वेस विभागातील जय अंबिका मंडळ यांच्या वतीने रूढी परंपरे नुसार श्री तुळजाभवानी मातेचे महात्य असलेल्या श्री देवी विजयग्रंथ वाचन सांगता सोहळा संपन्न झाला.

त्यानिमित्त आई तुळजाभवानी मातेस सिंहासन पूजा करून अन्नदान करून श्री देवी ग्रंथ वाचन सोहळा समाप्ती करण्यात आली. शहरातील शुक्रवार पेठ, खडकाळ गल्ली, जवाहर गल्ली, कमान वेस भागात सर्व पुजारी बांधव मोठ्या प्रमाणात राहतात. या समाप्तीनिमित्त सिंहासन पूजा, अन्नदान करण्यात आले.

यासाठी मंडळाचे अध्यक्ष किरण लोंढे, नाना पेंदे, बाळासाहेब कदम, रमाकांत लोंढे, विक्रम कदम, श्रेणिक मुकेरकर, बर्वे, अजित काठेवाड, चिवचिवे, गणेश कदम, अमोल लोंढे हे सिंहासन पूजेसा उपस्थित होते.

## शेतकऱ्यांना एसडीआरएफ, एनडीआरएफ अंतर्गत तातडीने मदत द्यावी : अनिल जगताप

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२५ सप्टेंबर -**

अतिवृष्टी व सततच्या पावसाने झालेल्या नुकसानीपोटी धाराशिव जिल्ह्यातील शेतकऱ्यांना एसडीआरएफ व एनडीआरएफ अंतर्गत तातडीने मदत करावी, अशी मागणी निवेदनाद्वारे जिल्हाधिकारी यांच्याकडे सामाजिक कार्यकर्ते तथा विमा अभ्यासक अनिल जगताप यांची मागणी केली आहे.

जिल्हाधिकारी डॉ. सचिन ओंबासे यांना दिलेल्या निवेदनात त्यांनी म्हटले आहे की, गेल्या तीन चार दिवसापासून धाराशिव जिल्ह्यात अतिवृष्टी व सततचा पाऊस होऊन धाराशिव जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे प्रचंड प्रमाणात पिकाचे व पशुधनाचे नुकसान झाले आहे. त्यामुळे खूप मोठी आर्थिक झळ यावर्षी शेतकऱ्यांना सहन करावी लागणार आहे. धाराशिव जिल्ह्यातील व सततचा पाऊस झाल्याने शेत जमिनी खरवडून गेल्या असून, उभ्या पिकाचे खूप मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. अनेक ठिकाणी रस्ते व पूल खचले आहेत. पुराच्या पाण्यात जनावरे वाहून गेली असून शेतात सोयाबीनची गंज लावताना वीज पडल्याने कळंब तालुक्यातील तालुक्यातील भाट शिरपुरा येथील एका तरुण शेतकऱ्यांचे प्राण गेले आहे. धाराशिव जिल्ह्यात आर्थिक व जीवित हानी खूप मोठ्या प्रमाणात झालेली आहे. शेती पिकाचे तर कधीही न भरून येणारे नुकसान झाल्याने शेतकरी हतबल झाला असून त्याला आर्थिक मदतीची गरज आहे.



जिल्हाधिकाऱ्यांनी तालुका महसूल प्रशासनाला आदेश देऊन अतिवृष्टी व सततच्या पावसाच्या झालेल्या शेती पिकाच्या नुकसानीचे पंचनामे तातडीने करावेत. तसेच यापूर्वी संबंधितांना आदेश दिले असल्यास त्याची गती वाढवावी व तातडीने शासनाला प्रस्ताव सादर करून शेतकऱ्यांना एसडीआरएफ एनडीआरएफ अंतर्गत तातडीने मदत द्यावी.

येत्या १५ ते २० दिवसात महाराष्ट्रात विधानसभेची आचारसंहिता लागणार असल्याने पंचनामे तातडीने पूर्ण करून शासनाला प्रस्ताव पाठवावा व तातडीने बळीराजांना मदत करावी, अशी विनंती अनिल जगताप यांनी केली आहे.

## मांजरा धरण ओव्हर फ्लो, दोन दरवाजे उघडले



**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.२५ सप्टेंबर -**

बीड, लातूर, धाराशिव जिल्ह्याला वरदान ठरलेले, धनेगाव येथील मांजरा धरण दि.२५ सप्टेंबर बुधवार रोजी दुपारी ओव्हर फ्लो झाले असून धरणाच्या दोन दरवाजातून १ हजार ७३० क्यूसेक वेगाने पाण्याचा विसर्ग सुरु केला आहे.

धरण झाल्यापासून गेल्या ४४ वर्षाच्या काळात १७ व्यादा धरण भरले आहे. बीड जिल्ह्यातील केज, अंबेजोगाई, धारूर सह लातूर शहर, मुरुड, लातूर औद्योगिक वसाहती सह, कळंब आदी गावांना पाणी पुरवठा या धरणातून केला जातो.

तसेच बीड, लातूर, धाराशिव जिल्ह्यातील शेकडो एकर शेती या धरणामुळे बागायती झाली आहे.

गेल्या दोन वर्षानंतर पुन्हा एकदा धरण भरल्यानंतर शेतकरी वर्गात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

## माकणी निम्न तेरणा प्रकल्पाचे सर्वच दरवाजे उघडले

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.२५ सप्टेंबर -**



लोहारा तालुक्यातील माकणी धरणाच्या पाणलोट क्षेत्रात पाऊस पडला असल्यामुळे येणारा येवा लक्षात घेऊन पाणी पातळी नियंत्रित करण्याच्या दृष्टीने दि.२५ सप्टेंबर रोजी पहाटे ५.१५ वाजता निम्न तेरणा प्रकल्पाचे द्वार क्रं. ५,१०,४,११,३,१२,२ व १३ हे १० सेंटिमीटरनी वाढवुन तेरणा नदी पात्रात विसर्ग वाढविण्यात आला आहे. सध्य:स्थितीत द्वार क्रं.१ ते १४ (एकुण १४) हि वक्रद्वारे २० सेंटिमीटरनसेंटिमीटरने चालु असुन एकुण १०७०४ क्युसेक्स (३०३.१० क्युमेक्स) इतका विसर्ग नदीपात्रात सोडण्यात आला आहे. धरणामध्ये येणारी पाण्याची आवक पाहुन विसर्ग वाढविणे, कमी करणे निर्णय घेण्यात येईल. तरी नदीकाठच्या सर्व गावातील नागरिक व शेतकरी बांधवांनी दक्ष रहावे. नदीकडे जाऊ नये व आपली जनावरे व मालमत्ता आदी नदीकाठाहून दुर न्यावे. सदर बाबीकडे आ. चौगुले लक्ष ठेवून आहोत.

तरी कोणत्याही स्वरूपाची समस्या उद्भवल्यास नागरिकांनी त्वरीत आमच्याशी संपर्क साधावा, असे आवाहान उमरगा लोहारा तालुक्याचे आ. ज्ञानराज चौगुले यांनी केले आहे.

निम्न तेरणा धरणात पाण्याचा विसर्ग चालू असल्याने तहसीदार काशिनाथ पाटील यांनी धरणावर येऊन पाहणी करुन परिस्थितिवर लक्ष ठेऊन आहेत. निम्न तेरणा धरणाचे शाखा अभियंता के.आर. एनगे, हे सर्व कर्मचारी निम्न तेरणा धरणावर तळ ठोकून आहेत.

## बोरी धरण पाण्याने तुडूंब भरले; अनेक गावांचा प्रश्न मिटला

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२५ सप्टेंबर -**

सध्या पडत असलेल्या पावसामुळे नळदुर्ग येथील बोरी धरण पाण्याने तुडुंब भरले आहे. दि.२५ सप्टेंबर रोजी हे धरण पुर्ण भरल्याने धरणाचा सांडवा सुरु झाला आहे. धरण भरल्यामुळे धरणातील नवीन पाण्याचे जलपुजन नळदुर्ग शहर पत्रकार संघ व शहर शिवसेनेच्या वतीने करण्यात आले. धरण भरल्यामुळे नळदुर्ग शहरासह तीर्थक्षेत्र तुळजापुर व अणदुरसह इतर गावांच्या पाण्याचा प्रश्न मिटला आहे.

सध्या बोरी धरण पाणलोट क्षेत्रात चांगला पाऊस झाल्याने दि.२५ सप्टेंबर रोजी बोरी धरण पाण्याने तुडुंब भरले असुन धरणाचा सांडवा सुरु झाला आहे. सांडवा पुर्ण क्षमतेने सुरु झाला नसला तरी येत्या दोन दिवसात हा सांडवा पुर्ण क्षमतेने सुरु होऊन ऐतिहासिक नळदुर्ग किल्लयातील नेत्रदीपक म्हणुन ओळखले जाणारे शिलक आणि नर-मादी धबधबा सुरु होण्याची शक्यता आहे. गेल्या वर्षी अतिशय कमी पाऊस झाल्यामुळे बोरी धरण भरले नव्हते त्यामुळे किल्लयातील शिलक व नर-मादी धबधबा सुरु झाले नव्हते. त्यामुळे किल्ला पाहण्यासाठी येणाऱ्या पर्यटकांची घोर निराशा झाली होती मात्र यावर्षी बोरी धरण भरल्यामुळे हे धबधबे पुर्ण क्षमतेने प्रवाहीत होण्याच्या आशा उंचावल्या आहेत.

बोरी धरण भरल्यामुळे नळदुर्ग शहरासह तुळजापुर, अणदुर व इतर गावांच्या पाण्याचा प्रश्न मिटला आहे. त्याचबरोबर धरण क्षेत्रातील शेतीच्या सिंचनाचा प्रश्नही आता मिटला आहे. धरण क्षेत्रातील शेतकऱ्यांना आता कालव्याद्वारे रब्बी तसेच उन्हाळी पिकासाठी पाणी उपलब्ध होणार आहे.

बोरी धरण भरल्यामुळे सर्वत्र आनंदाचे वातावरण पसरले आहे. दि.२५ सप्टेंबर रोजी नळदुर्ग शहर पत्रकार संघ व शहर शिवसेनेच्या वतीने धरणातील पाण्याचे जलपुजन करण्यात आले. सामाजिक कार्यकर्ते संजय विठ्ठल जाधव तसेच विलास येडगे यांच्या हस्ते जलपुजन करण्यात आले.



यावेळी शहर पत्रकार संघाचे सुहास येडगे, तानाजी जाधव, लतिफ शेख, शिवाजी नाईक, भगवंत सुरवसे, दादासाहेब बनसोडे, अजित चव्हाण, सुधीर हजारे, अमर भाळे आदिजन उपस्थित होते. शहर शिवसेनेच्या वतीने कमलाकर चव्हाण यांच्या हस्ते जलपुजन करण्यात आले. यावेळी सरदारसिंग ठाकुर, शहर प्रमुख संतोष पुदाले, उपशहरप्रमुख शाम कणकधर आदिजन उपस्थित होते.

# कंत्राटी शिक्षक भरतीस राज्यातील प्राथमिक शिक्षक संघटनांचा विरोध

## जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा, मराठवाडा शिक्षक संघाचा आंदोलनास पाठींबा! प्रचंड संख्येने मोर्चात सहभागी होण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२५ सप्टेंबर -**

वीस पेक्षा कमी पटसंख्येच्या शाळेत कंत्राटी शिक्षक भरतीचा शासनादेश शिक्षक दिनी महाराष्ट्र सरकारने जारी केला आहे. कंत्राटी कर्मचारी भरती बंदी करावी, १५ मार्च २०२४ चा जाचक शासन निर्णय रद्द करावा, शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना १० २० ३० आश्वासित प्रगती योजना लागू करावी, यासह अनेक मागण्यासाठी शिक्षकांनी जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढला होता.



जशीच्या तशी जुनी पेन्शन योजना लागू करावी, २००५ पूर्वी नियुक्त शिक्षक व नंतर शंभर टक्के अनुदानावर आलेल्या सर्व शिक्षकांना जुनी पेन्शन योजना लागू करावी, अंशतः अनुदानित शाळेतील वर्ग तुकड्यांना टप्पा वाढ त्वरित देण्यात यावा या व इतर मागण्यासाठी राज्यातील सर्व प्राथमिक/ माध्यमिक शिक्षक संघटनांनी या विरोधात आंदोलन छेडले आहे. मराठवाडा शिक्षक संघाने या आंदोलनास पाठींबा दिला आहे.

जिल्ह्यातील सर्व शिक्षक संघटनांच्या वतीने शासनाच्या शिक्षणाच्या चुकीच्या धोरणांविरोधात विराट मोर्चा काढण्यात आला.

याप्रसंगी दि.१५मार्च चा शासन निर्णय हा राज्यातील सर्व जि. प. शाळा कायमच्या बंद करण्याच्या दृष्टीने घेण्यात आलेला आहे त्याचा तीव्र निषेध राज्यातील सर्व शिक्षक संघटनांनी केला आहे. तो निर्णय रद्द करण्यासाठी राज्यातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चे काढण्यात आले होते.

त्याप्रसंगी समन्वय समितीच्या वतीने लालासाहेब मगर, यांच्या नेतृत्वाखाली राज्य कार्यकारिणी सदस्य बशीर तांबोळी, जिल्हाध्यक्ष बाळासाहेब वाघमारे, सुरेश भालेराव, अविनाश मोकाशे, कैलास मोहिते, शिवाजी साखरे राजाभाऊ अकोसकर, सविता पांढरे, मालोजी वाघमारे, बब्रुवान भोसले, युवराज पिंगळे, दत्तात्रय लोहार, मिलिंद जानराव, बाचेवाड, विक्रम मगतराव यांच्या उपस्थितीत अप्पर उपजिल्हाधिकारी धाराशिव यांना निवेदन देण्यात आले. मराठवाडा शिक्षक संघाचे जिल्हाध्यक्ष जयपाल शेरखाने, मराठवाड्याचे अध्यक्ष सूर्यकांत विश्वासराव, सरचिटणीस राजकुमार कदम, उपाध्यक्ष ज्ञानोबा वरवट्टे, कोषाध्यक्ष ए. बी. औताडे, केंद्र कार्यकारणी सदस्य तीर्थकर सर व जमादार एफ जी जिल्हा सचिव विक्रम मयाचारी, जिल्हा कार्याध्यक्ष भोसले डि के, जिल्हा उपाध्यक्ष रमण जाधव, संतोष सोलंकर, जिल्हा कोषाध्यक्ष बनसोडे डी एम, जिल्हा सहसचिव बलसुरे सर व गीते जे पी, धाराशिव शहराध्यक्ष पाटील व्ही एस, दाराचे तालुकाध्यक्ष दराडे एस के, वाशी तालुका अध्यक्ष अरुण बोंदर यांचीही यावेळी उपस्थिती होती

### डॉ.बापूजी साळुंखे यांचे शिक्षण जीवनाला आकार देते : डॉ. स्वामी

**तुळजापूर, दि.२५ सप्टेंबर -**

येथील श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर संचलित तुळजाभवानी महाविद्यालय तुळजापूर येथे १९७१ ते १९७८ या कालावधीत तुळजाभवानी महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या माजी विद्यार्थ्यांचे स्नेह सम्मेलन नुकतेच संपन्न झाले. या प्रसंगी अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ सोलापूरचे माजी कुलगुरू व हिंदी विषयाचे गाढे अभ्यासक डॉ. इरेश स्वामी यांनी वरील उद्गार काढले. याप्रसंगी अंकुश माने, डॉ.चिकमठ, प्राचार्य हिरेमठ, डॉ.फारुक सिद्दिकी, ए.व्ही.जगदाळे, व्ही. व्ही.जगदाळे, डॉ.यशवंतराव डोके, प्रा.सुधीर शिंदे, प्राचार्य धुमरे, प्रा.ए.डी.जाधव हे उपस्थित होती.

# परंडा उपजिल्हा रूग्णालयात रूग्णांची हेळसांड; नागरिकांत नाराजी

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.२५ सप्टेंबर -**

परंडा शहरातील जिल्हा उप रुग्णालयात येणाऱ्या रुग्णांना व्यवस्थितपणे औषधोपचार मिळत नसल्याने सर्व सामान्य नागरिकांतुन नाराजी व्यक्त करण्यात येत आहे.

शासनाने लाखो रुपये खर्च या उप रुग्णालयात मोठ्या-मोठ्या उपचारासाठी व तपासणी करण्यासाठी मशनरी उपलब्ध करुन दिल्या आहेत. त्या मशनरी चालविण्यासाठी तज्ञ चालकाची नेमणूक न केल्यामुळे त्या मशीन धुळखात पडुन राहिल्याचे समजते. तसेच या रुग्णालयात तज्ञ डॉक्टर याची नेमणूक न करता शहरातील डॉक्टर यांच्या नेमणूक करण्यात आल्या आहेत. त्याची स्वताची रुग्णालये परंडा शहरात आहेत.

त्यामुळे ही मंडळी वेळेवर उपस्थित राहात नसुन आलेल्या रुग्णांची व्यवस्थितपणे तपासणी करीत नाहीत. फक्त तोडी काय झाले असे विचारुन गोळ्या लिहुन देतात.

आज सरकारचे लाखो रुपये खर्च होऊन सुध्दा ही मंडळी रुग्णाना व्यवस्थित सेवा देत नाहीत याची वरिष्ठ पातळीवर वरुन चौकशी करण्यात यावी तसेच या रुग्णालयात शहरातील डॉक्टरची नेमणूक कमी तज्ञ डॉक्टर याची नेमणूक करण्यात यावी, अशी मागणी ही करण्यात येत आहे. तसेच यांच्याकडील रुग्णवाहिका ही नेहमी नादुरूस्त तर रस्त्यावर टायर फुटणाऱ्या आहेत. त्यामुळे पेशंटला अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे.

तेव्हा वरिष्ठ अधिकारी यांनीकडे लक्ष देवुन या रुग्णालयाचा कारभार सुरळीत करण्यासाठी प्रयत्न करावेत, अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

# प्रथम एज्युकेशन फाउंडेशनकडून नाथवाडी आणि गौर येथील जि.प. शाळेला भेट



## गौर येथील जीएसके उपक्रमाबाबत समाधान व्यक्त

**तभा वृत्तसेवा**
**येरमाळा, दि.२५ सप्टेंबर -**

शैक्षणिक गुणवत्ता विकास कार्यक्रम धाराशिवअंतर्गत जिल्हा परिषद धाराशिव आणि प्रथम एज्युकेशन फाऊंडेशन यांच्या संयुक्तीने सोमवारी (ता.२३) कळंब तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नाथवाडी येथे आसाम, अरुणाचल प्रदेश येथील बुधिदिप्ता चेतीया, प्रकाश गिरी अरूनाचल प्रदेश, जि.पी. प्रोग्राम ब्लॉक समन्वयक सातारा जिल्हा संयोजक संदिप रांजणे येरमाळा केंद्र प्रमुख बी.एस. जाधवर यांनी भेट दिली.

# कै. कमलाकरराव कुलकर्णी यांच्या स्मृतीनिमित्त मतिमंद विद्यार्थ्यांना खाऊ वाटप

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.२५ सप्टेंबर -**



अखिल भारतीय साने गुरुजी कथा मालेचे जिल्हाध्यक्ष सेवा निवृत्त मुख्याध्यापक डी.के. कुलकर्णी यांनी वडील कमलकरराव कुलकर्णी स्मृती निमित्त सोजर मतिमंद विद्यालय कळंब येथील मतिमंद विद्यार्थ्यांना केळी, बिस्किट वाटप करण्यात आले.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी ज्येष्ठ नागरिक महासंघाचे जिल्हाध्यक्ष हभप. महादेव महाराज अडसूळ हे होते. तर प्रमुख उपस्थिती कुलकर्णी परिवारातील डि.के. कुलकर्णी, जयंत कुलकर्णी, डॉ. गिरीष कुलकर्णी, जिल्हाध्यक्ष सुरेश टेकाळे, प्रकाश भडंगे, जिल्हा कबड्डी असोसिएशनचे अध्यक्ष लक्ष्मण मोहिते, माधवसिंग राजपूत, मकरंद पाटील, बंडू ताटे, सोपान पवार, प्रदीप यादव, बाळासाहेब यादव यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमात डि.के. कुलकर्णी यांनी सोजर मतिमंद शाळेचे मुख्याध्यापक चंद्रकांत बेडके यांचा शाल, पुष्पहार देऊन सत्कार केला. त्यांनी शाळेच्या माध्यमातून मतिमंद विद्यार्थ्यांनी स्वालंबी बनावे व समाजात सन्मानाचे जिने जगता यावे यासाठी करीत असलेल्या कार्याचे कौतुक केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजेंद्र जाधव यांनी तर आभार डॉ.गिरीष कुलकर्णी यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सोजर मतिमंद विद्यालयातील बळीराम मिटकरी, अभिजीत होनराव व कर्मचारी वृंद यांनी परिश्रम घेतले.

# ब्रह्मवार्ता विवाह संस्थेचा उमरगा येथे ६ ऑक्टोबरला राज्यस्तरीय वधु-वर परिचय मेळावा

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.२५ सप्टेंबर -**

उमरगा (जि. धाराशिव) येथील ब्राह्मण समाज व ब्रह्मवार्ता वधु-वर विवाह संस्था व तुळजाई वधुवर संस्था नळदुर्ग यांच्या संयुक्त विद्यमाने येत्या ६ ऑक्टोबर रोजी राज्यस्तरीय वधु-वर परिचय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती येथील ब्राह्मण समाजाचे जेष्ठ नेते रामकृष्ण पंत खरोसेकर यांनी दिली आहे.

तसेच या मेळाव्यात ब्राह्मण समाजातील प्रथम वर वधु-वर घटस्फोटित, विधवा, विधुर, व्यंग, अपंग व सर्व विवाहच्छुक यांना या मेळाव्यात सहभागी होता येणार आहे. सदरील मेळावा श्रीराम मंदिरात आयोजित करण्यात आला आहे.

तसेच मेळाव्यात ब्रह्मवार्ता वधु-वर संस्थेचे संस्थापक अध्यक्ष श्रीराम विद्वत याचे आपल्याला मार्गदर्शन लाभणार आहे.

तसेच राज्यस्तरीय वधु-वर विशेषांक मेळाव्यात उपलब्ध असतील तेव्हा राज्यातील सर्व ब्राह्मण समाजातील वधु-वर यांनी मेळाव्यासाठी नांव नोदणी करावी, असे आवाहन डॉ. चंद्रकांत महाजन, उज्वल देवणी, संतोष कुलकर्णी, रविंद्र दुसे, प्रवीण कुलकर्णी यांनी केले आहे.

# धारासुर मर्दिनी नागरी सहकारी पतसंस्थेची वार्षिक सभा संपन्न

### नवीन शाखा काढणार ९ टक्के लाभांश आहेत

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२५ सप्टेंबर -**

धारासुर मर्दिनी नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित धाराशिव या संस्थेची ३६वी वार्षिक सर्वसाधारण सभा संस्थेच्या सभागृहात सोमवार दि.२३ सप्टेंबर रोजी संस्थेचे अध्यक्ष योगेश संभाजीराव जाधव यांच्या अध्यक्षतेखाली खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली. या सभेस प्रमुख पाहुणे म्हणून विभागीय सहनिबंधक सच्चिदानंद नाईकवाडी व धनंजय काळे सहाय्यक निबंधक सहकारी संस्था धाराशिव व सहकार प्रशिक्षण अधिकारी मधुकर जाधव लाभले.



संस्थेचे अध्यक्ष योगेश जाधव व सर्व पाहुण्यांच्या व संचालकांच्या हस्ते गणेश पूजन लक्ष्मीपूजनाने सभेस सुरुवात झाली. कार्यक्रमात प्रमुख पाहुणे विभागीय सहनिबंधक सच्चिदानंद नाईकवाडी यांचा शाल, श्रीफळ देऊन सत्कार अध्यक्ष योगेश जाधव यांनी केला. सहाय्यक निबंधक सहकारी संस्था धाराशिव धनंजय काळे यांचा सत्कार संस्थेचे उपाध्यक्ष श्रीपाद पाटील यांनी केला व सहकार प्रशिक्षण अधिकारी यांचा सत्कार शंभू बांगड यांनी केला संस्थेचे संचालक विधीज्ञ ॲड. प्रसाद जोशी यांची जिल्हाविधीज्ञ मंडळाचे अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार विभागीय सहनिबंधक सचितानंद नाईकवाडी यांच्या हस्ते करण्यात आला.

अहवाल वाचन करताना योगेश संभाजीराव जाधव यांनी सांगितले की संस्थेकडे मार्च २०२४ अखेर भाग भांडवल ७६५३०६९/- झाल्याचे व संस्थेने अहवाल वर्षात ३१३०३४५८/- इतके कर्ज वाटप केले असून संस्थेचा निधी रु. २७७३६१३१.७० इतका असून रु१६००४७७/- झाला असून सभासदांना ९ टक्के लाभांश जाहीर करून नवीन शाखा काढणार असल्याचे सांगितले. सभेत विभागीय सहनिबंधक सचितानंद नाईकवाडी यांनी संस्थेने ठेवीच्या तुलनेत कर्ज वाटप वाढवावे व जुन्या कर्जदारांची वसुली करावी जेणेकरून आपला ताळेबंद स्वच्छ होईल आणि कर्जदारांनी वेळेवर कर्ज भरण्याचे आवाहन केले. सहकार प्रशिक्षण अधिकारी मधुकर जाधव यांनी संचालक कर्मचारी व सभासद यांना विशेष मार्गदर्शन केले.

कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सर्व कर्मचारी संक्षेप ठेव प्रतिनिधी यांनी परिश्रम घेतले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार व्यवस्थापक आर.बी. केरकर यांनी केले.


## जाहीर समन्स

**मा.उपनिबंधक सहकारी संस्था, शहर सोलापूर, सोलापूर यांचे समोर**
सोलापूर जिल्हा महसूल कर्मचारी सहकारी पतसंस्था, नियमित सोलापूर
सिटी सर्व्हे नं. ८४१३, दुसरा मजला, जुने जिल्हाधिकारी आवार, सोलापूर-४१३००३

**लोकमंगल नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, सोलापूर - अर्जदार**
**विरुद्ध**
(खालील तपशिलातील नमुद केलेले थकबाकीदार सभासद) **- जाब देणार**

| अ. क्र. | दावा क्र. | दावा रक्कम | प्रतिवादी नंबर | प्रतिवादीचे नाव व पत्ता |
|---|---|---|---|---|
| १८ | १२६/२०२४ | १,८५,५०५/- | २ | **श्री. चिलगुंडे संदिप शिवाजी** रा. मु.पो. सराटी, ता. तुळजापूर, जि. उस्मानाबाद |
| २० | १२८/२०२४ | २,६६,११९/- | १ | **श्री. कांबळे प्रदिप अंकुश** रा. मु.पो. अणदूर, ता. तुळजापूर, जि. उस्मानाबाद |
| | | | २ | **श्री. बाबर ज्ञानेश्वर सुधाकर** रा. मु.पो. हनुमान मंदिरजवळ, गुळहळ्ळी, ता. तुळजापूर, जि. उस्मानाबाद |
| | | | ३ | **श्री. जाधव शिवाजी रत्तु** रा. रा. मु.पो. वत्सला नगर, अणदूर, ता. तुळजापूर, जि. सोलापूर |

यात वादी पतसंस्था यांनी दाखल केलेल्या अर्जातील वर नमूद केलेल्या प्रतिवादी यांचे पत्ते उपलब्ध होत नसल्यामुळे / पत्त्यावर आढळून येत नसल्याने / अपुरा पत्ता असल्याने सदरचे जाहीर समन्स देणेत येत आहे.

**प्रतिवादी यांना जाहीर समन्सद्वारे कळविणेत येते की, उपनिर्दिष्ठ अर्जासंबंधी आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वतः जातीने अथवा वकिलामार्फत दिनांक : १०/१०/२०२४ रोजी दुपारी १२.०० वाजता कागदपत्रासह या कार्यालयात हजर रहावे.**

प्रतिवादी यांनी तारखेस वेळेवर हजर न राहिल्यास त्यांच्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल व पुढील योग्य तो निर्णय केला जाईल.

आज दि. २४/०९/२०२४ रोजी माझी सही व कार्यालयाचे मुद्रेसह हे जाहीर समन्स दिले आहे.

**स्थळ - सोलापूर**
**दिनांक : २४/०९/२०२४**

शिक्का

**सही/-**
**(डॉ. पी.ए. बागल)**
**उपनिबंधक**
**सहकारी संस्था, सोलापूर शहर, सोलापूर**


## गुन्हा नोंदविण्यासाठी आसूड मोर्चा

**धाराशिव, दि.२५ सप्टेंबर -**

शहरातील मागासवर्गीय भागात लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजनेअंतर्गत रस्ता व नालीचे काम न करता निधी हडपणाऱ्या पालिका प्रशासन व ठेकेदाराविरूध्द ॲट्रॉसिटी कायद्यानुसार गुन्हा दाखल करावा, या मागणीसाठी बुधवारी रिपाइं (डे.) च्यावतीने जिल्हाधिकारी कार्यालयावर आसूड मोर्चा काढण्यात आला.


**तहसिल कार्यालय परंडा**
**बार्शी रोड,परंडा पिनकोड-४१३५०२**
**(दंडणीय विभाग)**

**जा.क्र.२०२४/महसुल/जन्म-मृत्यू नोंद/क्रमांक दिनांक २/०९/२०२४**
**जाहीरनामा**

व्यामधी अर्जदार मुजावर नियाजुद्दीन बशिरोद्दीन रा. परंडा ता. परंडा जि धाराशिव यांची जन्म दिनांक ०५/०८/१९५२ रोजी सौ. परंडा तालुका, परंडा जि, धाराशिव येथे झालेला असून, याबाबतची नोद नगरपरिषद कार्यालय परंडा ता. परंडा जि, धाराशिव येथे नसल्याने अर्जदार यांनी या कार्यालयात अर्ज करून स्वतः व्या जन्माची नोद अभिलेखामध्ये घेणे करीत आदेशीत करण्याबाबत विनंती अर्ज केलेला आहे.

सररहू अर्जदार मुजावर नियाजुद्दीन बशिरोद्दीन रा. परंडा ता. परंडा जि धाराशिव गाध्या जन्मनोंदी बाबत/जन्मस्थळाच्या नोदीबाबत कोणाचा आक्षेप असल्यास या जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत या कार्यालयात हजर होऊन आपली हरकत लेखी स्वरूपात कळविण्यात यावी असे या जाहीरनाम्याद्वारे कळवीण्यात येते, विहित मुदतीत हरकत प्राप्त न झाल्यास अर्जदाराचे अर्जात मागणी केलेनुसार विनंती प्रमाणे पुरावा घेऊन आदेश पारित करण्यात येईल.

दिनांक ८/८/२०२४ रोजी सहीनिशी व या कार्यालयाचे शिक्यानिशी दिले.

**स्वाक्षरित /-**
**कार्यकारी दंडाधिकारी**
**तथा तहसिलदार उमरगा**


# कळंब तालुक्यातील मोहा मंडळात अतिवृष्टी ..! सोयाबीन पाण्यात ऊसाचे फड आडवे

**तभा वृत्तसेवा**
**खामसवाडी, दि.२५ सप्टेंबर -**

कळंब तालुक्यातील मोहा मंडळात वादळी वाऱ्यासह झालेल्या मुसळधार पावसाने शेतातील सोयाबीन पिकाचे पूर्ण नुकसान झाले आहे.

दुपारी पाच वाजण्याच्या सुमारास चालू झालेल्या जोराच्या पावसाने खामसवाडी, मोहा, नागझरवाडी, खेरडा आदी गावाला वादळी पावसाने झोडपले.संध्याकाळी पाच ते आठ वाजेपर्यंत तुफान झालेल्या पावसाने ओढे, नदीला पूर आला. शेतात काम करायला गेलेले शेतकरी, मजूर महिला यांना पुराच्या पाण्यामुळे रात्री ११ वाजण्याच्या सुमारास घरी यावे लागले. गत कांही दिवसांपूर्वी झालेल्या पावसाने ५० टक्के नुकसान झाले होते त्याचे पंचनामे सुद्धा झाले नाहीत तोपर्यंत तर ह्या पाऊसने होत्याच नव्हतं झालं आहे. सदरील पाऊसाने शेतकऱ्यांनी काढलेले सोयाबीनह पाण्यात आहे तर कांही ठिकाणी पाण्यात वाहूनपण गेले आहे. उन्हाळ्यात पाणी कमी असल्याने शेतकऱ्यांनी ठिंबकवर ऊस पिक जपले होते. मात्र जोराच्या वाऱ्याने पाऊसाने पूर्ण आढवे झाले असून नुकसान झाले आहे.

गतवर्षीच्या नुकसानचे अनुदान अद्याप वाटप झाले नाही त्यातच काल झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकरी पूर्ण कोलमडला आहे. प्रशासन कासव गतीने पंचनामे करीत असल्याने शेतकऱ्यांत तिव्र नाराजी आहे.

विमा कंपनीचेही अधिकारी यांचीही चालढकल होत असल्याने शेतकऱ्यांत रोष निर्माण झाला आहे. सदरील परिस्थितीत शेतकरी पूर्ण कोलमडला असून तात्काळ आर्थिक मदत शासनाने करण्याची मागणी आहे.पावसाची नुकसानीची माहिती आमदार कैलास पाटील यांना कळल्याने त्यांनी तात्काळ कळंब तहसीलदार हेमंत टोकले यांनी नुकसान झालेल्या शेतात पाहणी केली.

> या झालेल्या वादळी पाऊसाने आमच्या गावात खुप नुकसान झाले असून उडीद, मूग, सोयाबीन पूर्ण पाण्यात गेले तर नदीकाठचे शेतकऱ्यांचे जमिनी वाहून गेल्याने अतोनात नुकसान झाले आहे. याबाबत पालकमंत्री तानाजी सावंत, जिल्हाधिकारी यांना कळविले आहे.
> **- अमोल पाटील, सरपंच, खामसवाडी.**


**तहसिल कार्यालय परंडा**
**बार्शी रोड,परंडा पिनकोड-४१३५०२**
**(दंडणीय विभाग)**

**जा.क्र.२०२४/महसुल/जन्म-मृत्यू नोंद/क्रमांक दि. २४/०९/२०२४**
**जाहीरनामा**

ज्याअर्थी अर्जदार मुजावर अजिजोद्दीन बशिरोद्दीन साहेब रा. परंडा ता. परंडा जि. धाराशिव यांची जन्म दिनांक. १५/०३/१९५३ रोजी मौ. परंडा तालुका. परंडा जि. धाराशिव येथे झालेला असून, त्याबाबतची नोंद नगरपरिषद कार्यालय परंडा ता. परंडा जि. धाराशिव येथे नसल्याने अर्जदार यांनी या कार्यालयात अर्ज करून स्वतः च्या जन्माची नोंद अभिलेखामध्ये घेणे करीत आदेशीत करण्याबाबत विनंती अर्ज केलेला आहे.

सररहू अर्जदार मुजावर अजिजोद्दीन बशिरोद्दीन साहेब रा. परंडा ता. परंडा जि. धाराशिव यांच्या जन्मनोंदी बाबत/जन्मस्थळाच्या नोंदीबाबत कोणाचा आक्षेप असल्यास या जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत या कार्यालयात हजर होऊन आपली हरकत लेखी स्वरूपात कळविण्यात यावी असे या जाहीरनाम्याद्वारे कळवीण्यात येते, विहित मुदतीत हरकत प्राप्त न झाल्यास अर्जदाराचे अर्जात मागणी केलेनुसार विनंती प्रमाणे पुरावा घेऊन आदेश पारित करण्यात येईल.

दिनांक २५/९/२०२४ रोजी सहीनिशी व या कार्यालयाचे शिक्यानिशी दिले.

**स्वाक्षरित /-**
**कार्यकारी दंडाधिकारी**
**तथा तहसिलदार उमरगा**



**तहसिल कार्यालय परंडा**
**बार्शी रोड,परंडा पिनकोड-४१३५०२**
**(दंडणीय विभाग)**

**जा.क्र.२०२४/महसुल/जन्म-मृत्यू नोंद/क्रमांक-२ दि. २४/०९/२०२४**
**जाहीरनामा**

ज्याअर्थी अर्जदार सायरा बानु सरफराज मुजावर रा. परंडा ता. परंडा जि. धाराशिव यांची जन्म दिनांक. २२/०५/१९६९ रोजी मौ. परंडा तालुका. परंडा जि. धाराशिव येथे झालेला असून, त्याबाबतची नोंद नगरपरिषद कार्यालय परंडा ता. परंडा जि, धाराशिव येथे नसल्याने अर्जदार यांनी या कार्यालयात अर्ज करून स्वतः व्या जन्माची नोद अभिलेखामध्ये घेणे करीत आदेशीत करण्याबाबत विनंती अर्ज केलेला आहे.

सररहू अर्जदार सायरा बानु सरफराज मुजावर रा. परंडा ता. परंडा जि. धाराशिव यांच्या जन्मगोंदी बाबत/जन्मस्थळाच्या नोदीबाबत कोणाचा आक्षेप असल्यास या जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत या कार्यालयात हजर होऊन आपली हरकत लेखी स्वरूपात कळविण्यात याची असे या जाहीरनाम्याद्वारे कळवीण्यात येते, विहित मुदतीत हरकत प्राप्त न झाल्यास अर्जदाराचे अर्जात मागणी केलेनुसार विनंती प्रमाणे पुरावा घेऊन आदेश पारित करण्यात येईल.

दिनांक २५/९/२०२४ रोजी सहीनिशी व या कार्यालयाचे शिक्यानिशी दिले.

**स्वाक्षरित /-**
**कार्यकारी दंडाधिकारी**
**तथा तहसिलदार उमरगा**



**तहसिल कार्यालय परंडा**
**बार्शी रोड, परंडा पिनकोड-४१३५०२**
**(दंडणीय विभाग)**

**जा.क्र.२०२४/महसुल/जन्म-मृत्यू नोंद/क्रमांक दि. २४/०९/२०२४**
**जाहीरनामा**

ज्याअर्थी अर्जदार तसनीम बानु बशीरुद्दीन इनामदार रा. परंडा ता. परंडा जि. धाराशिव यांची जन्म दिनांक. ०७/०७/१९६८ रोजी मौ. परंडा तालुका. परंडा जि. धाराशिव येथे झालेला असून, त्याबाबतची नोंद नगरपरिषद कार्यालय परंडा ता. परंडा जि. धाराशिव येथे नसल्याने अर्जदार यांनी या कार्यालयात अर्ज करून स्वतः च्या जन्माची नोंद अभिलेखामध्ये घेणे करीत आदेशीत करण्याबाबत विनंती अर्ज केलेला आहे.

सररहू अर्जदार तसनीम बानु बशीरुद्दीन इनामदार रा. परंडा ता. परंडा जि. धाराशिव यांच्या जन्मनोंदी बाबत/जन्मस्थळाच्या नोंदीबाबत कोणाचा आक्षेप असल्यास या जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत या कार्यालयात हजर होऊन आपली हरकत लेखी स्वरूपात कळविण्यात यावी असे या जाहीरनाम्याद्वारे कळवीण्यात येते, विहित मुदतीत हरकत प्राप्त न झाल्यास अर्जदाराचे अर्जात मागणी केलेनुसार विनंती प्रमाणे पुरावा घेऊन आदेश पारित करण्यात येईल.

दिनांक २५/९/२०२४ रोजी सहीनिशी व या कार्यालयाचे शिक्यानिशी दिले.

**स्वाक्षरित /-**
**कार्यकारी दंडाधिकारी**
**तथा तहसिलदार उमरगा**



**तहसिल कार्यालय परंडा**
**बार्शी रोड,परंडा पिनकोड-४१३५०२**
**(दंडणीय विभाग)**

**जा.क्र.२०२४/महसुल/जन्म-मृत्यू नोंद/क्रमांक दिनांक २/०९/२०२४**
**जाहीरनामा**

ज्याअर्थी भाग्यश्री बाळासाहेब महाडिक यांचा जन्म दिनांक १३/७/१९७० रोजी मौ. परंडा तालूका परंडा जि. धाराशिव येथे झालेला असून त्याबाबतची नोंद नगर परिषद परंडा ता. परंडा जि. धाराशीव येथे नसल्याने भाग्यश्री बाळासाहेब महाडिक रा परंडा यांनी या कार्यालयात अर्ज करुन स्वतः चे जन्म ाची नोंद जन्म /मृत्यू नोंद अभिलेखामध्ये घेणे करीता आदेशीत करण्याबाबत विनंती अर्ज केलेला आहे.

सररहू भाग्यश्री बाळासाहेब महाडिक यांच्या जन्माच्या नोंदी बाबत कोणाचा आक्षेप असल्यास या जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महीन्याच्या आत या कार्यालयात हजर होवून आपली हरकत लेखी स्वरुपात कळविण्यात यावी असे या जाहीरनाम्यावद्दारे कळविण्यात येते, विहीत मुदतीत हरकत प्राप्त न झाल्यास अर्जदाराचे अर्जात मागणी केलेनुसार विनंती प्रमाणे पुरावा घेवून आदेश पारीत करण्यात येईल.

दिनांक ८/८/२०२४ रोजी सहीनिशी व या कार्यालयाचे शिक्यानिशी दिले.

**स्वाक्षरित /-**
**कार्यकारी दंडाधिकारी**
**तथा तहसिलदार उमरगा**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## मराठा सेवा संघाचा वर्धापन दिन उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**निलंगा, दि. २५ सप्टेंबर-**

मराठा सेवा संघ निलंगा तालुका शाखेचा ३४ वा वर्धापन दिन विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला. सुरवातीला जिजाऊ, शिवराय यांच्या प्रतिमांचे पूजन महिलांच्या हस्ते करण्यात आले व ज्येष्ठ मान्यवरांच्या हस्ते दिपप्रज्वलन केले. आमर पाटील यांनी जिजाऊ वंदना गाऊन कार्यक्रमाची सुरुवात केली. यावेळी विद्यार्थी आणि मराठा सेवा संघाचे ज्येष्ठ सहकारी त्याचबरोबर विविध क्षेत्रात व लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा ग्रंथ भेट देऊन सन्मान करण्यात आला. वर्धापन दिनानिमित्त यावेळी शंभूराजे यांचे जीवन चरित्र व तुकोबा वाणीचे अंक असे अडीचशे ग्रंथ भेट देण्यात आले. अध्यक्षस्थानी म्हणून बालाजीराव जाधव महासचिव जतूसाप महाराष्ट्र हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून एम.एम.जाधव जिल्हा सचिव मराठा सेवा संघ सतीश हानेगावे राज्य प्रवक्ता जतूसाप, अनंतराव गायकवाड, विभागीय अध्यक्ष उद्योजक कक्ष गोविंद इंगळे, माजी अध्यक्ष पत्रकार संघ, अरुण सोळंके जिल्हाध्यक्ष शिक्षक समिती उपस्थित होते. वर्धापन दिनाच्या निमित्ताने विविध विषयावरती चर्चासत्र व व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. यावेळी अरुण सोळंके, गोविंद इंगळे मार्गदर्शन केले. सतीश हाणेगावे यांनी धर्म व कर्मकांड याची अतिशय सखोलपणे चीरफाड केली. कोणताच धर्म वाईट नसतो धर्माच्या नावावर लोकांना लुबाडणारे समाजात भांडण लावणारी ढोंगी पाखंडी यावर त्यांनी विवेचन केले. प्रास्ताविक नेलवाडे आर के यांनी केले तर सूत्रसंचालन अमरदिप पाटील यांनी केले आभार अजय मोरे यांनी मानले .कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी इंजिनिअर मोहन घोरपडे , बरमदे डी बी, आनंद जाधव,प्रताप हंगरगे ,संदीप खमितकर ,अनिल जाधव, ज्ञानेश्वर जाधव,बाळासाहेब बिरादार, पवार अमित, रंजना जाधव, शिंदे आर जी, प्रियंका पाटील यांनी परिश्रम घेतले.

## जाहीर समन्स

**मा.उपनिबंधक सहकारी संस्था, शहर सोलापूर, सोलापूर यांचे समोर**
सोलापूर जिल्हा महसूल कर्मचारी सहकारी पतसंस्था, नियमित सोलापूर
सिटी सर्व्हे नं. ८४१३, दुसरा मजला, जुने जिल्हाधिकारी आवार, सोलापूर-४१३००३

**लोकमंगल नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, सोलापूर - अर्जदार**

**विरुद्ध**

(खालील तपशिलातील नमुद केलेले थकबाकीदार सभासद) **- जाब देणार**

| अ. क्र. | दावा क्र. | दावा रक्कम | प्रतिवादी नंबर | प्रतिवादीचे नाव व पत्ता |
|---|---|---|---|---|
| १९ | १२७/२०२४ | ९९,५५७/- | ३ | **श्री. मोरे योगेश श्रीनिवास** रा. मु. खानापूर पो. पोहरेगाव, ता. रेनापूर, जि. लातूर |

यात वादी पतसंस्था यांनी दाखल केलेल्या अर्जातील वर नमूद केलेल्या प्रतिवादी यांचे पत्ते उपलब्ध होत नसल्यामुळे / पत्त्यावर आढळून येत नसल्याने / अपुरा पत्ता असल्याने सदरचे जाहीर समन्स देणेत येत आहे.

**प्रतिवादी यांना जाहीर समन्सद्वारे कळविणेत येते की, उपनिर्दिष्ठ अर्जासंबंधी आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वतः जातीने अथवा वकिलामार्फत दिनांक : १०/१०/२०२४ रोजी दुपारी १२.०० वाजता कागदपत्रासह या कार्यालयात हजर रहावे.**

प्रतिवादी यांनी तारखेस वेळेवर हजर न राहिल्यास त्यांच्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल व पुढील योग्य तो निर्णय केला जाईल.

आज दि. २४/०९/२०२४ रोजी माझी सही व कार्यालयाचे मुद्रेसह हे जाहीर समन्स दिले आहे.

**स्थळ - सोलापूर**
**दिनांक : २४/०९/२०२४**

**शिक्का**

**सही/-**
**(डॉ. पी.ए. बागल)**
**उपनिबंधक**
**सहकारी संस्था, सोलापूर शहर, सोलापूर**

# खा. अजित गोपछडेंच्या मागण्यांची उपमुख्यमंत्र्यांनी घेतली दखल

## हिंदू वीरशैव लिंगायत सन्मान यात्रेचे फलित

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, दि. २५ सप्टेंबर-**

खासदार डॉ. अजित गोपछडे यांच्या नेतृत्वात काढण्यात आलेली वीरशैव लिंगायत सन्मान यात्रा फलद्रूप झाली असून या माध्यमातून डॉ. गोपछडे यांनी केलेल्या मागण्या पूर्ण करण्याचे आश्वासन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहे. समाजातील विद्यार्थ्यांसाठी नवी मुंबई आणि पुण्यात वसतिगृहासाठी जागा देण्यासही फडणवीस यांनी अनुकूलता व्यक्त केली आहे.

वीरशैव लिंगायत समाजाच्या शिष्टमंडळाने राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन त्यांना निवेदन सादर केले. विविध मागण्या संदर्भात चर्चाही केली.त्यावेळी फडणवीस यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला.

वीरशैव लिंगायत हा समाज हिंदू धर्माचा अविभक्त घटक आहे हे विविध मुद्द्यांच्या आधारे मांडणारी वीरशैव लिंगायत सन्मान यात्रा खा.डॉ.अजित गोपछडे यांच्या नेतृत्वात दि.५ सप्टेंबर रोजी भक्तीस्थळ, श्रीक्षेत्र राजुर (अहमदपूर) येथून सुरु झाली.या यात्रेच्या माध्यमातून वीरशैव लिंगायत पंथाला अनुसरणारे आणि अन्य हिंदूधर्मीय यांच्यात सुसंवादाचा दुवा साधला गेला. आपण सर्व व्यापक,

सर्वसमावेशक अशा हिंदू धर्माचे वैशिष्ट्यपूर्ण घटक आहोत ही जाणीव जनमानसात रुजवत या यात्रेची सांगता 'शक्तीस्थळ' मंगळवेढा येथे झाली. समाजाच्या शिष्टमंडळाने उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिलेल्या निवेदनात हिंदू वीरशैव, हिंदू लिंगायत असा दाखला असणाऱ्या सर्व जातींना इतर मागासवर्गीय दर्जा देण्यात यावा.ज्या पोटजातींना मागास प्रवर्गात आरक्षण आहे ते कायम ठेवावे.जगद्ज्योती महात्मा बसवेश्वर आर्थिक विकास महामंडळावर अधिकारी व सदस्यांची नियुक्ती करून महामंडळ प्रभावीपणे कार्यान्वित करावे. केवळ मागासवर्गीय व इतर



मागासवर्गीयांसाठीच हे महामंडळ न राहता सर्वच वीरशैव लिंगायत प्राधान्याने आर्थिक दुर्बल समाज बांधवांना याचा सहज व त्वरित लाभ मिळेल अशी नियमावली करून यातील जाचक अटी व पोर्टल वारंवार स्थागित होणे आदी तांत्रिक अडचणी दूर करून त्याचा होतकरू युवक, महिला, विविध बचत गट यांना लाभ होईल अशी रचना करावी. सध्या दिलेल्या ५० कोटी रुपयांचा महामंडळाचा निधी समाजाच्या संख्येच्या प्रमाणात अत्यंत तोकडा आहे. तो एक हजार कोटी रुपये करावा. हिंदू वीरशैव-लिंगायत समाजाच्या स्मशानभूमीवर विघातक शक्तींनी ठिकठिकाणी अतिक्रमण केली आहेत. ती मोकळी करून द्यावीत. हिंदु वीरशैव- लिंगायत समाजाच्या अनेक स्मशानभूमीच्या जागा -भूखंडांना शासकीय निधीतून संरक्षक भिंती उभारून रक्षण करावे.हिंदु वीरशैव- लिंगायत समाजाच्या जनसंख्येच्या प्रमाणात स्मशानभूमीसाठी जागा उपलब्ध करून द्यावी. महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठात जगद्ज्योती महात्मा बसवेश्वर अध्यासन केंद्रांची स्थापना करावी व त्यासाठी आवश्यक निधी व सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. मुंबई, पुणे, सोलापूर, कोल्हापूर, नागपूर, अकोला, यवतमाळ, संभाजीनगर, लातूर, नांदेड या शहरात विद्यार्थी वसतीगृहांसाठी जागा, इमारत व आवश्यक सुविधासाठी निधी उपलब्ध करुन द्यावा. अठरापगड जातीचा हा समाज असल्याने वंचित, आर्थिक मागास घटकांसाठी या शैक्षणिक, शिक्षण पूरक सुविधेची अत्यंत गरज आहे. हिंदू वीरशैव-लिंगायत समाजासाठी जनसंख्यानिहाय प्रत्येक जिल्हयात किमान एक 'वीरशैव सदन' (सभागृह व पूरक सुविधा) यासाठी जागा व इमारत निधी उपलब्ध करून द्यावा. स्वतंत्र लिंगायत धर्माची मागणी अमान्य करून, संविधांनानुसार हिंदु वीरशैव-लिंगायत समाजाला न्याय,सन्मान व प्रत्येक क्षेत्रात संधी उपलब्ध होईल अशी योजना करावी आदी मागण्यांचा समावेश आहे. उपमुख्यमंत्री फडणवीस यांना भेटलेल्या शिष्टमंडळात वीरशैव लिंगायत शिवाचार्य सभेचे अध्यक्ष तथा कपिलधार येथील मन्मथ मठाचे प.पू. शिवाचार्य पंचाक्षर शिवाचार्य महास्वामी, पंढरपूरच्या विठ्ठल - रुक्मिणी मंदिर देवस्थानचे सहअध्यक्ष हभप गहिनीनाथ महाराज औसेकर, वीरशैव लिंगायत शिवाचार्य सभेचे सचिव महादेव शिवाचार्य गुरुसिद्धलिंग शिवाचार्य महाराज,सोलापूरचे भाजप जिल्हाध्यक्ष आ. सचिन कल्याणशेट्टी, राज्यसभा खासदार डॉ.अजित गोपछडे,माजी मंत्री बसवराज पाटील मुरूमकर,भाजपा नेत्या डॉ.अर्चना पाटील-चाकूरकर, सांगलीचे भाजप नेते डॉ.रविंद्र आरळी,जंगम संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष श्रावण राजेंद्र,पिंपरी-चिंचवड येथील हिंदू वीरशैव लिंगायत मंचाचे अण्णाराव बिरादार, पुण्याच्या हिंदू वीरशैव लिंगायत मंचचे हेमंत हरहरे, गुरुराज चरंतीमठ, हिंदू वीरशैव लिंगायत मंच देवगिरी प्रांताचे नितीन शेटे, पुण्याचे डॉ. राजेंद्र हिरेमठ, हिंदू वीरशैव लिंगायत मंचचे प्रचार-प्रसार प्रमुख तेजस महाजन, गोविंदराव माकणे, गुरुनाथ मगे, प्रेरणा होनराव, ॲड. संभाजीराव पाटील, बसवराज पाटील कौळखेडकर,श्रीरंग महाराज औसेकर, कपिल माकणे,बालाजी पाटील चाकूरकर, अमोल निडवदे, मेघराज भरबडे यांचा समावेश होता.




## अहमदपूर येथे औषध व्यावसायिकांची रॅली

**तभा वृत्तसेवा,**
**अहमदपूर, दि. २५ सप्टेंबर-**

विविध डॉक्टर आणि रुग्ण यांना विश्वासाने औषध उपलब्ध करून देण्याची भूमिका बजावणारे मेडिकल व्यवसायिक हेऔषनिर्माणशास्त्र पदवी धारक असल्याने त्यांच्यावर पूर्ण विश्वास रुग्ण ठेवत असतो.

अहमदपूर तालुक्यात ३०० चे वर फार्मसिस्ट आहेत. अंतरराष्ट्रीय फार्मसिस्ट दिना निमित्त अहमदपूर शहरात या निमत्त रॅली काढण्यात आली.या रॅलीत त्यांनी जे फलक हाती घेतले होते ते लक्षवेधनारे होते त्या मध्ये फार्मासिस्ट - आरोग्य सेवेतील मुख्य घटक, फार्मासिस्ट डॉक्टर आणि रुग्ण यांच्यातील महत्वाचा दुवा , फार्मासिस्ट आपल्या योग्य औषधीपचारासाठी आपला योग्य सहकारी व मैत्रीपूर्वक संवादासाठी आपला आरोग्य सोबती आहे पण स्वतःच्या मनाने कोणतेही औषध घेणे टाळा. मुदत बाह्य औषधे घेऊ नका. औषधीपचार चालू असताना शक्यतो कोणतेही व्यसन करु नका. अशा सूचनाही नागरिकांना करण्यात आल्या होत्या. अहमदपूर तालुका केमिस्ट ॲन्ड ड्रगीस्ट असोचे अध्यक्ष संगमेश्वर पंचाक्षरी निला उपाध्यक्ष -सुनिल बसवंतअप्पा मजगे,कार्याध्यक्ष -बालाजी नामदेवराव कोटगिरे ,सचिव -धनंजय रामचंद्र कोत्तावार यांचे मार्गदर्शनात शहरातील मुख्य मार्गावर हि रॅली काढण्यात आली.

## निलंग्याची जनताच दादासाहेबांच्या विचारांची वारस : संगीता पाटील-निलंगेकर

**तभा वृत्तसेवा,**
**निलंगा, दि. २५ सप्टेंबर-**

मी दादासाहेब म्हणजे माजी मुख्यमंत्री स्व डॉ शिवाजीराव पाटील निलंगेकर यांचे कार्य जवळून पाहिले आहे. मतदारसंघाच्या विकासात्मक कामासाठी दादासाहेबांनी स्वताला वाहुन घेतल होते. जनता हीच दादासाहेबांचा परिवार होती. त्यामुळे दादासाहेबांच्या विचाराची वारस ही जनताच आहे. व दादासाहेबांच्या विचाराच प्रतिनिधीत्व हे अशोकराव पाटील-निलंगेकर हेच करत असल्याचे ॲड. संगीता पाटील-निलंगेकर यांनी सांगितले

तालुक्यातील डांगेवाडी येथे भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या महिला आघाडीच्या नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचा सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी डांगेवाडी येथील व




निलंगा पंचायत समितीच्या माजी सभापती चमनबाई हुलसुरे यांची जिल्हा उपाध्यक्षपदी, औराद शहाजानीच्या सरपंच आरती भंडारे यांची महीला आघाडीच्या निलंगा तालुकाध्यक्षपदी, सरचिटणीस पदी रमा टोपे, शिरूर अनंतपाळ च्या महानंदा वाघमारे यांची जिल्हा उपाध्यक्षपदी, उदगीर शहराध्यक्षपदी ललीताताई निले, शिरूर अनंतपाळ शहराध्यक्षपदी करुणा पारशेट्टे व वांजरवांडा गावच्या सरपंच वैशाली जाधव यांच्या निवडी झाल्याबद्दल महिला आघाडीच्या लातूर जिल्हाध्यक्षा शिला पाटील व संगीताताई पाटील-निलंगेकर यांच्या हस्ते नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी ॲड. संगीताताई पाटील-निलंगेकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या मेळाव्यात महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्ष शिलाताई पाटील, राखीताई शेळके, आरतीताई भंडारे चमनबाई हुलसुरे, रमाताई टोपे यांनी मनोगत व्यक्त करत निलंगा मतदारसंघातील भगीनीचे लाडके अशोकराव पाटील निलंगेकर व कॉंग्रेस च्या पाठीशी खंबीरपणे उभे टाकण्याचे आवाहन केले. यावेळी मोठ्या संख्येने महिलांची उपस्थिती होती.

# निरोगी समाजाच्या उभारणीत फार्मासिस्टची विकसित भूमिका

आंतरराष्ट्रीय स्तरावर दरवर्षी २५ सप्टेंबर हा दिन जागतिक फार्मासिस्ट दिन म्हणून साजरा केला जातो. जनतेच्या आरोग्याची काळजी घेण्याची जी रचना भारतामध्ये आहे त्यात फार्मसी व त्यामध्ये कार्यरत फार्मासिस्ट चे योगदान अतिशय महत्त्वाचे आहे. सध्याच्या बदललेल्या आधुनिक काळात देखील फार्मासिस्ट व रुग्ण /ग्राहक यांच्यातील नाते अधिक दृढ आहे.

सद्य परिस्थितीमध्ये भारतात २० लाखापेक्षा जास्त केमिस्टची दुकाने व हजारोच्या संख्येने हॉस्पिटल फार्मासिस्ट आपली सेवा, जबाबदारी व कर्तव्य प्रामाणिकपणे पार पाडत आहेत

भारतीय नागरिकांचे आरोग्य सुस्थितीत ठेवण्याकरता अहोरात्र प्रयत्न करणाऱ्या फार्मासिस्टच्या कार्याचा यथोचित गौरव आजच्या दिनी जागतिक पातळीवर केला जातो.. फार्मासिस्ट च्या आरोग्य विषयक कार्यावरती प्रकाशझोत टाकणारा हा लेख

स्थळ: गोव्यातील मिरामारचा समुद्र किनारा

वेळ :सूर्यास्ताची. वातावरण शांत, कुठेतरी घरटयाकडे परतणाऱ्या पक्षांचा किलकीलाट ऐकू येत होता. शाळेतून घराकडे परतत असताना एक छोटा मुलगा समुद्र किनारी वाळूतून एकटाच जात होता. समुद्राला भरती येत आहे याची जाणीव लाटांचा खळखळणारा आवाज देत होता. मधुनच एखादी जोराची लाट किनाऱ्यावर दूरवर पोहोचत होती. मुलगा शांतपणे आपल्याच विचारात चालला होता.

अचानक एक जोरदार लाट आली आणि आपल्या बरोबर असंख्य, रंगीबेरंगी छोटे छोटे मासे घेऊन आली. किनाऱ्यावर दूरवर पोहोचली आणि लगेचच परत गेली. पण परत जाताना एकटीच गेली / बिचारे लहान लहान मासे तसेच किनाऱ्यावर राहून गेले. तडफडू लागले. त्या लहान मुलाने ते दृष्य पाहिले आणि त्याचा लहान जीव ते पाहून गलबलून गेला. आणि क्षणाचाही विलंब न लावता तो ते मासे उचलून समुद्रात फेकू लागला. एकटा तो कोवळा जीव त्या छोटया छोटया माशासाठी धडपडू लागला. माश्यांची संख्या अगणित पण कशाचाही तमा न बाळगता हिमतीने तो कामाला लागला होता.

दूरवरून त्याची ती घडपड एक सद्गृहस्थ पाहत होते. त्यांना त्याची गंमत वाटली. ते हळूहळू चालत त्या मुलाजवळ आले आणि त्यानी त्याला प्रश्न केला, बाळ, कशासाठी एवढी धडपड चालली आहे ? मुलाने शांतपणे त्यांच्या कडे पाहीले. क्षणभर त्याच्या चेहऱ्यावर त्या गृहस्था विषयी प्रश्नचिन्ह उमटले. त्याच्या मनात शंका आली तडफडणारे मासे या माणसाला दिसत नाहीत ? आणि त्याने उत्तर दिले काका या छान छान माशांची तडफड दूर करण्याचा प्रयत्न करतोय गृहस्थ पुन्हा विचारते झाले, अरे वेडया! काय फरक पडतोय? ही धडपड नाही केलीस तर! मुलगा परत शांत आणि एक अर्थपूर्ण नजर टाकून उत्तरतो, काका, माझ्यात काहीही फरक पडत नाही, पण फरक पडतो आहे तो त्या माशांच्यात ! त्या छान कोवळ्या जीवांना त्यांचे जीवन परत मिळतयं ! या उत्तरावर ते गृहस्थ आवाक होऊन त्या मुलाकडे पाहत राहतात. मुलगा आपली धडपड चालूच ठेवतो आणि त्या मुलाच्या उत्तरावर विचार करत ते गृहस्थ निघून जातात.

ही छोटीशी गोष्ट आपल्याला बरेच काही सांगते आहे. तंत्रज्ञान क्षेत्रात झपाटयाने होणाऱ्या प्रगतीमुळे मानवी जीवन ही बरेचसे तांत्रीक होत चालले आहे. आणि बदलत्या काळात धावपळीचे जीवन ही माणसाने आत्मसात करणे अपरीहार्य झाले आहे. तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात कितीही प्रगती झाली आणि आपल्या जीवन पध्दतीत त्याचा कितीही परिणाम झाला तरी माणूस अन त्याच्यातील माणुसकी म्हणून आपले कर्तव्य आपण विसरू नये हीचभावना त्या मुलाच्या रूपाने आपल्या समोर येत आहे. काळानुरूप बदलत्या आधुनिक व्यवसायपध्दतीत देखील सामाजीक बांधिलकी जोपासत समाजाचे आरोग्यहित नजरेसमोर ठेवून गरजू रुग्णांना वा त्यांच्या नातेवाईकांना चोवीस तास औषधीय सेवा उपलब्ध करून देण्यासाठी फार्मासिस्ट कायदा व नैतिक जबाबदारीच्या पार्श्वभूमीवर नेहमीच कटिबद्ध राहिला आहे .यालाच औषधीय व्यवसाय क्षेत्रात कम्युनिटी फार्मसी म्हणतात. सामाजिक बांधिलकीच्या स्वरूपात व्यावसायिक जबाबदाऱ्या समर्थपणे पार पाडणे हे लोकांच्या आरोग्याच्या दृष्टीने फार्मासिस्ट ने केलेले व्यावसायिक योगदानच होय! फार्मासिस्ट हा स्वास्थ्य प्रक्रियेचा एक अविभाज्य आणि अत्यंत महत्वाचा घटक आहे. मनुष्य किंवा इतर प्राणीमात्र यांच्या प्रकृती स्वास्थ्यासाठी कार्यरतअसणाऱ्या प्रक्रियेत फार्मासिस्ट' म्हणून तो वेगवेगळ्या भूमिकेत कार्यरत असतो. जसे कि

१) इंडस्ट्रियल फार्मासिस्ट : दर्जेदार औषधाची ग्वाही देत औषधकंपनी मध्ये औषधाची निर्मीती करणारा फार्मासिस्ट

२) हॉस्पीटल फार्मासिस्ट : शासकीय , निमशासकीय, खाजगी , धर्मादाय रुग्णालयामध्ये औषधाचे वितरण करणारा फार्मासिस्ट

३) क्लिनीकल फार्मासिस्ट : प्रत्यक्ष रुग्णांचे निरीक्षण आणि उपचारांशी संबंधित असणारा फार्मासिस्ट.

४) अकॅडेमिक फार्मासिस्ट : शैक्षणिक संस्थेमध्ये विविध पदावरती कार्यरत असणारा फार्मासिस्ट.

५) कम्युनिटी फार्मासिस्ट : जनतेच्या , रुग्णाच्या सतत संपर्कात असणारा जो कि डॉक्टरच्या चिट्टीनुसार औषध देत असताना रुग्णाचे समुपदेशन करतो .

वरील भुमिकेमधील जनतेच्या सरळ संपर्कात येणारी फार्मासिस्टची भूमिका म्हणजे कम्युनिटी फार्मासिस्ट व हॉस्पीटल फार्मासिस्ट विविध क्षेत्रामध्ये प्रामाणिक पणे काम करत समाज बांधणीच्या म्हणजेच एका अर्थाने राष्ट्र बांधणीच्या कार्यामध्ये योगदान देणाऱ्या व्यक्तींचा सन्मान विशिष्ट दिवशी केला जातो जसे की १ जुलै रोजी डॉक्टर दिन, ५ सप्टेंबर रोजी शिक्षक दिन, १५ सप्टेंबर रोजी अभियंता दिन , १२ मे रोजी नर्सिंग दिन अन समाजाच्या आरोग्य विषयक क्षेत्रामध्ये मोलाचे योगदान देणाऱ्या फार्मासिस्ट च्या सन्मानार्थ जागतिक फार्मासिस्ट दिनाच्या माध्यमातून २५ सप्टेंबर रोजी केला जाणारा गौरव ..

हे नक्की आहे की निरोगी नागरिक ... सशक्त भारत भारताची सर्वंकष शक्ती ही भारतीय नागरिकांच्या आरोग्यावर अवलंबून आहे .प्रत्येक राष्ट्रामध्ये नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेणारे तीन महत्त्वाचे क्षेत्र आहेत जसे की वैद्यकीय क्षेत्र ,औषध निर्माण क्षेत्र व वैद्यकीय क्षेत्राशी निगडित असणारे पॅरा मेडिकल क्षेत्र. वैद्यकीय क्षेत्रामध्ये रजिस्टर्ड मेडिकल प्रॅक्टिशनर म्हणजेच डॉक्टर हा महत्त्वाचा घटक आहे तर फार्मसी क्षेत्रामध्ये रजिस्टर फार्मासिस्ट म्हणजेच नोंदणीकृत औषधनिर्माता हा महत्वाचा व्यक्ती काम करत असतो त्यासोबत वैधकीय पेशाशी सलंग्न प्यारा मेडिकल क्षेत्रामध्ये नर्सेस , प्रयोगशाळा तंत्रज्ञ , वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता व आहार तज्ञ हे कार्यरत असतात इतर क्षेत्रांमध्ये कार्यरत असणाऱ्या व्यक्तींचा गौरव करण्याकरता राष्ट्रीय स्तरावर ती हो का एका विशिष्ट दिवशी केला जातो परंतु डॉक्टर्स डे फार्मासिस्ट डे व नर्सेस दे आंतरराष्ट्रीय स्तरावर ती पूर्ण जगभर साजरे केले जातात यातच फार्मसीच्या कार्याची महती सामावलेली आहे जागतिक औषध निर्माता दिन ही मूळ कल्पना इंटरनॅशनल फार्मासिटिकल फेडरेशनची आहे ही कल्पना २५ सप्टेंबरला मूर्त स्वरूपात अवतरली ज्याप्रमाणे रोज उगवणारा सूर्य आपणास उर्जा देतो सृष्टीला नवीन तेज देतो त्याप्रमाणे दरवर्षी येणारा २५ सप्टेंबर हा दिवस फार्मासिस्ट ना नवीन दिशा नवीन प्रेरणा देत असतो यावर्षी आपण झहरीरलळीीं :ाशशींळपस सश्रेलरश्र हशरश्रींह पशशवी. जागतिक आरोग्य गरजा पूर्ण करणारा: फार्मासिस्ट हे ब्रीद वाक्य घेऊन साजरा करीत आहोत.


जनतेच्या आरोग्याची काळजी घेणाऱ्या ज्या संस्था ज्या रचना भारतामध्ये व संपूर्ण जगामध्ये आहेत त्यातला अतिशय महत्त्वाचा घटक रजिस्टर फार्मासिस्ट आहे वेळप्रसंगी स्वतः स्वतः ला होणाऱ्या त्रासाचा विचार न करता रुग्णांच्या आरोग्यविषयक भल्याकरिता अहोरात्र सेवा देणाऱ्या नोंदणीकृत फार्मासिस्ट कार्याचा गौरव त्यांच्या कार्यात कार्याला सलाम मानाचा करण्याचा आजचा दिवस



खेदाची बाब म्हणजे इतर क्षेत्रावर क्षेत्राचा प्रसार प्रचार जनजागृती ही फार झपाट्याने झाली त्यामानाने फार्मसी आणि त्यामध्ये कार्यरत फार्मासिस्ट याबद्दल जनतेमध्ये माहिती ही उशिराने झाली.

पूर्वी डी .फार्मसी अथवा बी .फार्मसी हा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर मेडिकल स्टोअर सुरू करण्यासाठी परवाना परवाना प्राप्त करण्यासाठी घ्यावयाचे शिक्षण एवढिच मर्यादित माहिती होती , परंतु कालांतराने का होईना नोंदणीकृत फार्मासिस्ट बद्दल सकारात्मक माहिती जनतेला माहित झाली , फार्मसी क्षेत्र हे जनतेच्या आरोग्याची काळजी घेणारे अतिशय महत्वाचे आहे याबद्दल जनजागृती झाली . फार्मसीच्या ज्ञानाला कौशल्याला खऱ्या अर्थाने राजमान्यता मिळाली ते १९६३ साली आयोजित आंतरराष्ट्रीय स्तरावरील ब्रिटिश फार्मासिटिकल कॉन्फरन्स मध्ये , या परिषदेमध्ये दोन महत्त्वाचे ठराव पारित झाले रोगाचं रोगाचे निदान व औषध उपचार लिहून देण्याच्या बाबतीमध्ये तज्ञ व्यक्ती म्हणून नोंदणीकृत मेडिकल प्रॅक्टिशनर यांना संबोधण्यात आले तर औषधाच्या बातमीबद्दल व्यक्ती म्हणून नोंदणीकृत फार्मासिस्ट यांच्यावरती शिक्कामोर्तब करण्यात आले.फार्मासिस्ट औषधाच्या बाबतीमध्ये सर्व दृष्टिकोनातून परिपूर्ण आहे कारण प्रत्येक प्रत्येक औषधाबद्दल ची सविस्तर माहिती जसे की ब्रँड नेम , ट्रेड नेम ,कंपोझिशन, स्टोरेज कंडिशन ,डायरेक्शन आधी बाबीची इत्यंभूत माहिती फार्मासिस्ट ला असते .बऱ्याच संदर्भामध्ये असा उल्लेख केलेला आहे की मेदिकल प्रॅक्टिशनर व फार्मासिस्ट हे दोघे एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत , निश्चितपणे फार्मासिस्ट हा मेडिकल प्रॅक्टिशनर व रुग्ण यांच्यामधील दुवा आहे . सर्वसामान्य रुग्णाची काय परिस्थिती असते जेव्हा एखाद्या रोगाचा विकाराचा त्रास होतो तेव्हा तो रुग्ण उपचारासाठी डॉक्टर कडे जात असताना मनामध्ये ठरवतो की डॉक्टरकडे गेल्यानंतर मी माझ्या मनातील ६-७ गोष्टीबद्दल विचारणा करेन परंतु परंतु डॉक्टर कडे गेलं तर काही गोष्टी शंका निरसन करून घेण्याचं तो विसरतो पण जेव्हा तो पेशंट तो रुग्ण प्रिस्क्रिपशन घेऊन फार्मासिस्ट कडे जातो तेव्हा त्याच्या मनामध्ये असणारे इतर शंका तो मनमोकळेपणाने फार्मासिस्ट ला विचारतो . मागील दोन वर्षांपूर्वी करोना महामारी ने पूर्ण जग ग्रासलेले होते आणि त्या बिकट परिस्थितीमध्ये जनतेच्या आरोग्याची काळजी घेत त्यांना जीवदान देण्याच्या बाबतीमध्ये डॉक्टर च्या व इतर आरोग्याशी निगडित घटकाच्या खांद्याला खांदा लावून फार्मासिस्ट ने भरीव असे योगदान दिले आहे

केअरींग फॉर आदर्स म्हणजे इतरांसाठी काळजी घेणे या शब्दाचा अर्थ फार मोठा आहे द गुड फार्मासिस्ट या पुस्तकामध्ये असे दर्शविण्यात आले आहे की दुसऱ्यांना वेळ देणे, त्याची समस्या शांतपणे समजून घेणे, समस्येमध्ये रस दाखवणे, उपाय योजनेमध्ये सहभागी होणे , त्याचा भल्यासाठी समर्पित भावनेने काम करणे म्हणजेच केअरींग फॉर आदर्स. फार्मासिस्ट औषध विक्रीचा व्यवसाय करत असताना जेव्हा अशा पद्धतीने अशा पद्धतीने काम करतो तेव्हा रुग्णांच्या मानसिकतेमध्ये निश्चितपणे सकारात्मक फरक पडतो. म्हणूनच मानसिक आरोग्य सुधारणांमध्ये फार्मासिस्टचा सिंहाचा वाटा असतो.एक बाब नक्की की औषधांचा योग्य परिणाम मिळण्यासाठी रुग्णाचे मनोधैर्य हे चांगले असले पाहिजे बळकट असले पाहिजे. फार्मासिस्ट समुपदेशनाच्या माध्यमातून हे कार्य सतत पणे करत असतो. फार्मासिस्ट ला फार्मासिस्ट विषयी असणारा जिव्हाळा प्रेम व आत्मीयता अतिशय महत्वाचा आहे ,फार्मासिस्ट स्वतःचे कर्तव्य बजावत असताना कायद्याची काटेकोरपणे अंमलबजावणी तर करतोच परंतु पेशंटला अडीअडचणीच्या काळामध्ये आपुलकीची वागणूक देत असतो , त्याच्या भावना समजून घेतो म्हणूनच फार्मासिस्टची सामाजिक बांधिलकी फार महत्वाची आहे , आणि याच कारणास्तव फार्मासिस्ट व रुग्ण त्यांच्यादरम्यान कायमस्वरूपी दृढ संबंध प्रस्थापित झाले आहेत . सध्याच्या आधुनिक स्पर्धात्मक युगात जनतेची जीवनशैली बदललेली असल्याकारणाने विविध रोगांचा प्रादुर्भाव व आरोग्याशी निगडीत जटील प्रश्न निर्माण झाले आहेत या बाबतीमध्ये कम्युनिटी फार्मासिस्ट समाजाची सर्वात मोठी गरज पूर्ण करत असतो विशेषत औषध विक्रीची सेवा उपलब्ध करून देत असताना कम्युनिटी फार्मासिस्ट हा विविध पातळीवर काम करत असतो..



**- प्रा. प्रताप भोसले**
**चन्नबसवेश्वर फार्मसी कॉलेज, लातूर.**

# लातूर दिनांक

लातूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले


## जिल्हास्तरीय शालेय थ्रो बॉल स्पर्धेत 'किलबिल'चा संघ प्रथम

**तभा वृत्तसेवा,**
**अहमदपूर, दि. २५ सप्टेंबर-**

महात्मा गांधी महाविद्यालय अहमदपूर येथे पार पडलेल्या शालेय जिल्हास्तरीय स्पर्धेत किलबिल नॅशनल स्कूल शाळेतील संघ सर्वप्रथम आला असून संघाची नांदेड येथे होणाऱ्या विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली.

या संघात गव्हाळे संकेत, तिरुपती होळकर, साई अवधूत, सिद्धेश्वर मुळे, ढगे सुमित, चैतन्य मुंडे, खजेपवार पार्थ, येरमे वेदांत, कबीर आदर्श, कृष्णकांत तराटे, कुंभारे महेश, नागेश कदम या खेळाडूंचा समावेश आहे. या यशाबद्दल संस्थेचे सचिव ज्ञानोबा भोसले, प्राचार्य संतोष पाटील, उप प्राचार्य धरमसिंग, ऑफिस इन्चार्ज - सचिन जगताप यांनी विजय खेळाडूंचे सत्कार करून अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.




विजयी संघास क्रीडा शिक्षक कासिम शेख, विशाल सरवदे, अर्शद शेख, इरफान आकोले, निलेश बन यांचे मार्गदर्शन लाभले.



## संक्षिप्त वृत्त



### जिल्हा क्रीडा संकुलात शनिवारपासून राज्यस्तरीय तायक्वांदो स्पर्धा

**लातूर, दि. २५ सप्टेंबर-**

शहरातील जिल्हा क्रीडा संकुल औसा रोड लातूर येथे दि २८ ते ३० सप्टेंबर रोजी तायक्वांदो असोसिएशन ऑफ लातूर यांच्या वतिने ३४ वी राज्यस्तरीय वरिष्ठ गट महिला व पुरुष तायक्वांदो स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेसाठी राज्यातून १६ वजनीगटात ४८० खेळाडूंचा सहभाग होणार असुन विजेते खेळाडू दि. ११ ते १४ ऑक्टोबर दरम्यान पांडेचेरी येथे होत असलेल्या राष्ट्रीय स्पर्धेत सहभागी होणार असल्याचे तायक्वांदो असोसिएशन ऑफ महाराष्ट्राचे अध्यक्ष डॉक्टर अविनाश बारगजे यांनी आज दि २५ सप्टेंबर रोजी लातूर येथे आयोजित पत्रकार परिषदेत माहिती दिली. क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे, भारतीय खेल महासंघ, राष्ट्रीय खेल मंत्रालय यांच्या मान्यतेने तायक्वांदो फेडरेशन ऑफ इंडिया व तायक्वांदो असोसिएशन ऑफ महाराष्ट्र मुंबई या संस्था देशात अधिकृत काम करत आहे. नुकत्याच तामिळनाडूत झालेल्या खेलो इंडिया अस्मिता वूमेन्स लिग स्पर्धेत महाराष्ट्राला सर्वाधिक १० सुवर्णपदक पटकाविले आहे. जी १, जी २ स्तरावरच्या स्पर्धेत व नॅशनल गेम्समधे सर्वाधिक पदक महाराष्ट्र राज्याचे आहेत. लातूर येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेत दि २८ सप्टेंबर रोजी खेळाडुंची उपस्थिती वजन तपासणी व पुमसे प्रकाराच्या स्पर्धा संपन्न होतील तर दि २९ सप्टेंबर रोजी मान्यवरांच्या हस्ते सकाळी ११ वाजता उद्घाटन व स्पर्धेला सुरुवात होऊन दि ३० सप्टेंबर रोजी पदक वितरण व समारोप होणार असून निवास, भोजन व स्पर्धेचे तांत्रीक तयारी झाली असल्याचे आयोजक तायक्वांदो जिल्हा संघटनेचे सचिव नेताजी जाधव यांनी सांगितले आहे.




### हासेगाव फार्मसीत आपत्ती व्यवस्थापन कार्यक्रमाचे आयोजन

**औसा दि. २५ सप्टेंबर-**

श्री वेताळेश्वर शिक्षण संस्था अंतर्गत लातूर कॉलेज ऑफ फार्मसी, हासेगाव, एसव्हीएसएस लातूर कॉलेज ऑफ फिजिओथेरपी यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय सेवा योजना दिनानिमित्त आपत्ती व्यवस्थापन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. संस्थाध्यक्ष भीमाशंकर बावगे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. लातूर येथील जिल्हा आपत्ती व्यवस्थापक अधिकारी डॉ. साकिब उस्मानी, पुणे येथील एनडीआरएफ ५ वी बटालियन टीम चे अधिकारी इन्स्पेक्टर राजू प्रसाद, सब इन्स्पेक्टर मलकोटगी शिवलिंगा, ए.एस.ढोकरे, आयएचव्ही टीम यांची प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. सचिव वेताळेश्वर बावगे, संचालक नंदकिशोर बावगे, आत्माराम मुलगे, प्राचार्य डॉ. नितीन लोणीकर, फिजिओथेरपीचे प्राचार्य वीरेंद्र मेश्राम, ज्ञानसागर विद्यालय मुख्याध्यापक कालिदास गोरे, नर्सिंग महाविद्यालयाच्या प्राचार्या क्षितिजा माली, प्राचार्य आनंद शेडगे, रासोयोचे कार्यक्रम अधिकारी प्रा. एस. कराड आदी उपस्थित होते. आपत्ती व्यवस्थापन कार्यक्रमात आपत्ती निवारणाचे महत्त्व आणि त्याबाबतची सजगता वाढवण्यासाठी प्रत्यक्ष डेमो दाखवण्यात आले. या डेमोद्वारे विद्यार्थ्यांना आणि उपस्थितांना आपत्तीच्या वेळी आवश्यक उपाययोजना, प्राथमिक उपचार, बचाव कार्य, आणि त्वरित निर्णय घेण्याच्या पद्धती शिकवल्या गेल्या. अशा प्रकारच्या प्रत्यक्ष डेमो मुळे आपत्ती व्यवस्थापनाबद्दल माहिती मिळाली आणि आपत्कालीन परिस्थितीत कसे वागावे, याची योग्य तंत्रे समजतात, जे खूप उपयुक्त ठरते. याप्रसंगी लातूर कॉलेज ऑफ फार्मसी हासेगाव महाविद्यालयासह ज्ञानसागर विद्यालय हासेगांव, लातूर कॉलेज ऑफ फिजिओथेरपी हासेगाव, गुरुनाथ बावगे इंटरनॅशनल इंग्लिश स्कूल हासेगाव, सर्व प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी, रासोयोचे स्वयंसेवक व विद्यार्थी उपस्थित होते. सूत्रसंचालन आणि आभार प्रा. बालाजी खवले यांनी केले.

### शिवनेरी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिवस साजरा

**शिरूर अनंतपाळ, दि. २५ सप्टेंबर-**

येथील शिवनेरी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना सप्ताहाच्या निमित्ताने महाविद्यालयामध्ये सप्ताह दरम्यान व्यसनमुक्ती, पर्यावरण जागृती, आपत्ती व्यवस्थापन, स्वच्छता मोहीम, वृक्ष लागवड आदी कार्यक्रमाचे आयोजन करून विद्यार्थ्यांमध्ये नवचैतन्य जागृती करून, समाजसेवा व त्यागाची भावना निर्माण करण्यासाठी या सप्ताह दरम्यान विविध व्यक्तीने विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या सप्ताह्यचा समारोप २४ सप्टेंबर हा राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिवस साजरा करून सप्ताहाचा समारोप करण्यात आला. यावेळी महात्मा गांधी व राष्ट्रसंत गाडगेबाबा महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अरुण धालगडे हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून माजी कार्यक्रमाधिकारी तथा राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. धुमाळे डि.के हे होते. यावेळी कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. अमोल इंगळे, डॉ. पांडुरंग मुठ्ठे, प्रा. प्रेमदास जाधव, प्रा. हनमंत सोनकांबळे, प्रा. डॉ. उज्वला पाटील उपस्थित होते. यावेळी विद्यार्थ्यांना प्रा.डॉ. डी. के. धुमाळे यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्थापने मागील काय उद्देश आहे. याविषयी मार्गदर्शन केले. प्रस्ताविक डॉ.अमोल इंगळे यांनी केले तर आभार प्रा.डॉ.पांडुरंग मुठ्ठे यांनी मानले.

# राष्ट्रीय महामार्गावर सर्वपक्षीयांचा रास्ता रोको

### आंदोलकांनी पेटवले टायर

**तभा वृत्तसेवा,**
**औसा, दि.२५ सप्टेंबर-**

सोयाबीनचे उत्पादन घेण्यासाठी एकरी २४ हजार रुपये खर्च शेतकऱ्यांना करावा लागतो तर उत्पादनातून २२ हजार रुपये हातात पडत आहेत. निसर्गाच्या व मिळणाऱ्या बाजारभावामुळे शेतकरी नुकसानीत येऊन आर्थिक संकटात सापडत कर्जबाजारी होत आहेत. अशा शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी व सोयाबीनला ८५००रुपयाचा भाव द्यावा, अशी मागणी करीत काँग्रेस, राष्ट्रवादी, शिवसेना, वंचित आघाडी, छावा संघटना, शेतकरी संघटना अशा सर्वपक्षांच्या राष्ट्रीय महामार्गावर बुधवार दि. २५ रोजी औसा येथील हाश्मी चौकात दोन तास रास्ता आंदोलन केले. यावेळी आंदोलकांनी रस्त्यावर टायर पेटविले तर पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप करुन जळके टायर हटविले.

छावा संघटनेचे प्रदेशाध्यक्ष विजयकुमार घाडगे-पाटील औसा येथील तहसिल कार्यालयासमोर शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी व सोयाबीनला ८५०० हजार भाव द्यावा. या मागणीसाठी गेल्या आठ दिवसापासून आमरण उपोषण करीत आहेत. त्यांची प्रकृती खालावली असून सरकारने शेतकऱ्यांच्या प्रश्नासाठी आंदोलन करणारे घाडगे पाटील यांच्या आमरण उपोषणाची अद्याप दखल घेतली नाही. याबद्दल सर्व पक्षांच्या नेतेमंडळींनी यावेळी निषेध व्यक्त केला. यानंतर रास्ता रोको आंदोलनास सुरुवात करण्यात आली. यावेळी सरकारविरोधी घोषणांनी परिसर दणाणुन गेला होता. काग्रेसच्या विद्या पाटील, शेतकरी संघटनेचे राजेंद्र मोरे अशा उपस्थित अनेक मान्यवरांनी सरकारवर कडाडून टिका करीत मनोगत व्यक्त केले.

> **आंदोलनाची झळ सरकारला बसणार : दिनकर माने**
>
> घटना पायदळी न तुडवता कायद्याचे संरक्षण करीत यापुढे तीव्र आंदोलन करणार आहोत. या आंदोलनाची ऊब एवढी असेल की याची झळ सरकारला बसल्याशिवाय राहणार नाही, असे मत माजी आ. दिनकर माने यांनी व्यक्त केले.

यावेळी शेतकऱ्यांच्या प्रश्नावर सोयाबीन परिषदेवर असलेले सदस्य याकडे लक्ष देतील का? या प्रश्नाला उत्तर देताना माजी आ. दिनकर माने म्हणाले, त्यांनी सोयाबीनची पेरणी केली आहे का. हे त्यांना अगोदर विचारा पेरणी केली असेल तरच त्यांना सोयाबीनचे कळेल. त्यांची जमिन बंजर आहे. आमची पिकणारी आहे. यामुळे समिती सदस्यांना सोयाबीनचे काही देणे घेणे नाही. असे उत्तर देत माजी आ. पाशा पटेल यांचे नाव न घेता त्यांचा खरपुस समचार माने यांनी आंदोलना दरम्यान घेतला. यावेळी तहसीलदार यांना सर्वपक्षाच्या वतीने निवेदन देण्यात आले. काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष श्रीशैल्य उटगे, शिवसेनेच्या जिल्हा संघटिका जयश्रीताई उटगे, राष्ट्रवादी काग्रेसचे जिल्हाध्यक्ष भरत सूर्यवंशी, संजय उजळंबे, सुरेश भुरे, दत्तोपंत सूर्यवंशी, शकील शेख, राजू कसबे, खुंदमिर मुल्ला, संगीता लातूरकर, धैयर्शील माने, मुजमील शेख, अंगद कांबळे, अनीस जहागीरदार, जयराज कसबे, बालाजी कांबळे, भगवान माकणे आदी सर्व पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते. यावेळी पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.



## जलसमाधी आंदोलन; प्रशासनाच्या सतर्कतेमुळे अनर्थ टळला

**तभा वृत्तसेवा,**
**शिरूर अनंतपाळ, दि. २५ सप्टेंबर-**

महाराष्ट्रातील राजकारणात आरक्षण या मुद्यावर अनेक मार्गांनी आंदोलने केली जात आहेत यातच शिरूर अनंतपाळ तालुक्यातील मौजे डोंगरगाव येथील मांजरा नदीच्या बॅरेजवर बहुसंख्येने धनगर समाजाचे तसेच ओबीसी समाजाचे लोक एकत्र येऊन आंदोलनात सहभागी झाले होते.

धनगर समाजाच्या एसटी आरक्षणाच्या संबंधी व खिलारे कुटुंबीयांचे खोटे जात प्रमाणपत्र रद्द करावे या मागणीसाठी गेल्या १५ दिवसापासून समाजाच्या वतीने लातूर येथे अनिल गोयकर व चंद्रकांत हजारे,तसेच पंढरपूर येथे सहा जण व नेवासा येथे काही समाज बांधवांनी आमरण उपोषण केले व २०१३ च्या सुमारास समाजातून आरक्षण आमलबजावणीसाठी प्रचंड उठाव झाला होता.त्यावेळेस भाजपा नेत्या द्वारे २०१४ च्या मंत्रिमंडळाच्या पहिल्या बैठकीत आरक्षणाचा निर्णय घेवू असे आश्वासन देण्यात आले होते. पण अद्याप राज्यात भाजपचेच सरकार असून देखील आजपर्यंत काहीही ठोस निर्णय न झाल्यामुळे समाज शासनावर उदासीन आहे म्हणून समाजातील तरुण उद्वेगाने जलसमाधी,रस्तारोखो व आमरण उपोषणासारखे निर्णय घेत आहेत. घटनेमध्ये धनगर जात ही एसटी मध्येच नोंदली गेली आहे पण लिहत असताना धनगड असे झाल्याने आजपर्यंत धनगर समाजाला डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी तरतूद केलेल्या सवलतीपासून समाज आजपर्यंत वंचित राहिला.दि.२३ रोजी मंत्री मंडळाच्या बैठकीत काहीतरी ठोस निर्णय होईल अशी आशा होती.पण बैठक संपन्न होवून देखील आमच्या मागण्याचा किंवा उपोषणकर्त्यांच्या प्रकृतिचा शासनाने कसलाही विचार न केल्यामुळे समाजातील तरुणाच्या भावणेचा उद्रेक होवून डोंगरगाव येथील महेश ज्ञानोबा भिंगोले व उजेड येथील तुकाराम जीवन काळे यांनी जलसमाधी घेण्याचा निर्णय घेतला. परंतु एनडीआरएफच्या जवानाचा प्रचंड बंदोबस्त असल्याने तरुणांना बॅरेज वर जाता अले नाही



त्या कारणाने बॅरेज च्या खालील बाजूस जलसमाधी घेण्याचा प्रयत्न प्रशासनाने हणून पडला व आमची मागणी शासनाकडे पाठवू असा शब्द प्रशासनाकडून देवून तरुणास जलसमाधी पासून प्रवृत्त केले. यावेळी वैशंपायन जागले,पंडित लवटे,किशन भोजने,कामगुंडा, रयत क्रांती संघटनेचे जिल्हाध्यक्ष तथा ओबीसी नेते शिवाजीराव पेठे, नागनाथ बोडके, जयद्रथ शेंडगे,नरसिंग शेंडगे,शिवाजी हजारे,हणमंत गायकवाड, माधव कात्रे,दुष्यंत काळे,गुरुलिंग स्वामी,बालाजी लव्हे, राहुल मेहकरे, बळवंत वाघमारे,सतीश कोरे उपस्थित होते. यावेळी अनर्थ घडू नये म्हणून नायब तहसीलदार लालासाहेब कांबळे, तलाठी गणेश राठोड, पोलिस निरीक्षक विठ्ठल दराडे त्यांच्या टीमसह, अग्निशमन दलाचे पथक बचाव कार्यासाठी सुसज्ज होते.

## अतिवृष्टीनंतर पालिकेची यंत्रणा गतिमान

### अवघ्या काही तासात परिस्थिती नियंत्रणात

**लातूर, दि. २५ सप्टेंबर-**

मंगळवारी पहाटे व सायंकाळी शहरात जोरदार पाऊस झाला. यानंतर शहरातील सखल भागात पाणी साठले.

कांही घरातही पाणी शिरले होते.यानंतर मनपाच्या अधिकारी व कर्माचाऱ्यांनी तात्काळ घटनास्थळी रवाना होत उपाययोजना केल्या व परिस्थिती पूर्वपदावर आणली.

मंगळवारी पहाटे व सायंकाळी ५ ते ७ या कालावधीत शहरात जोरदार पाऊस झाला. यामुळे इस्लामपुरा,कॉइल नगर,नांदगाव वेस,डी मार्ट परिसर,रिंग रोड, राजीव गांधी चौकातील सह्याद्री हॉस्पिटल, विराट हनुमान, सौभाग्य नगर, रामरहीम नगर, उस्मानपुरा, नाना नानी पार्क या भागात पाणी साठले. इस्लामपुरा येथील २०,उस्मानपुरा भागात १० आणि तुळशीधाम परिसरातील ८ ते १० घरात पावसाचे पाणी शिरले होते.

याची माहिती मिळताच मनपाच्या आपत्ती व्यवस्थापन यंत्रणेमार्फत ३ अग्निशमन वाहने व २ इंजिन तसेच स्वच्छता विभागाचे ३ इंजिन व ६ जेसीबी मार्फत पाणी काढून देण्याची कार्यवाही करण्यात आली.अनेक ठिकाणी जेसीबीद्वारे पाण्याला रस्ता करून देण्यात आला.काही ठिकाणी इंजिन वापरून घरातील पाणी नाल्यात सोडण्यात आले. मनपा आयुक्त बाबासाहेब मनोहरे, उपायुक्त पंजाबराव खानसोळे यांच्यासह अधिकारी व कर्मचारी रात्रभर 'ऑन फिल्ड' होते. आयुक्तांनी आपत्ती व्यवस्थापन कर्मचाऱ्यांना वेळोवेळी सुचना केल्या.

ज्या भागातून नागरिकांचा दूरध्वनी आला त्या भागात तात्काळ अधिकारी व कर्मचारी पाठविले जात होते.यामुळे साठलेल्या पाण्याचा लवकर निचरा करून परिस्थिती पूर्वपदावर आणणे शक्य झाले. आपत्तीच्या काळात नागरिकांना पालिकेस माहिती देता यावी यासाठी मनपात आपत्ती नियंत्रण कक्ष कार्यरत आहे. आपत्तीच्या काळात नागरिकांनी ०२३८२-२५५५८५ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधून माहिती द्यावी,असे आवाहन मनपाच्या वतीने करण्यात आले आहे.

## मांजरा, तेरणा नदी काठावरील गावांना सतर्कतेचा इशारा

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, दि. २५ सप्टेंबर-**

मांजरा प्रकल्पाचा पाणीसाठा ९६.५ टक्के झाला आहे. पावसामुळे धरणात होणारी पाण्याची आवक पाहता धरण पाणी पातळी नियंत्रित करण्याच्या दृष्टीने २५ सप्टेंबर, २०२४ रोजी मांजरा प्रकल्पाचे २ दरवाजे हे ०.२५ मीटर उंचीने उघडून मांजरा नदीपात्रात १ हजार ७३० क्युसेक (४९.०० क्युमेक्स) इतका विसर्ग सोडण्यात आला आहे. तसेच निम्न तेरणा धरणाच्या पाणलोट क्षेत्रात पाण्याची पातळी नियंत्रित करण्योच्या दृष्टिने निम्न तेरणा १६ हजार ५ क्यूसेक (४५३.२ क्यूमेक्स) इतका विसर्ग नदीपात्रात सोडण्यात आला आहे. त्यामुळे मांजरा व तेरणा नदीकाठच्या गावाना, शेतकऱ्यांना, नदीकाठी वस्ती करुन राहिलेल्या नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

नागरिकांनी दुभती तसेच इतर जनावरे झाडाखाली, पाण्याच्या स्त्रोताजवळ, विद्युत खांबाजवळ बांधू नयेत. त्यांना सुरक्षित ठिकाणी बांधावे. आपल्या जनावरांना सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित करुन स्वतः सुरक्षित ठिकाणचा आसरा घ्यावा.

जलसाठ्याजवळ , नदीजवळ जावू नये. आपल्या मुलांना जलसाठ्यावर, नदीवर पोहण्यासाठी पाठवू नये. शाळा, महाविद्यालयातील शिक्षकांनी आपल्या विद्यार्थ्यांना याबाबत सूचित करावे. पुलावरुन , नाल्यावरुन पाणी वाहत असतांना कोणीही स्वतः किंवा वाहनासह पूल, नाला ओलांडण्याचा प्रयत्न करु नये. पूर प्रवण क्षेत्रात कोणीही जावू नये. पाऊस सुरु असतांना विजेच्या तारा, जुन्या इमारती कोसळण्याची शक्यता असते, तरी त्यापासून दूर राहण्याची खबरदारी घ्यावी. असे आवाहन लातूर जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणमार्फत करण्यात आले आहे.

## जिल्हाधिकाऱ्यांनी केली नागझरी बॅरेजची पाहणी

### एनडीआरएफ पथकाच्या शिबिरास भेट

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, दि. २५ सप्टेंबर-**

गेल्या दोन दिवसांपासून होत असलेल्या पावसामुळे निम्न तेरणा प्रकल्प, मांजरा धरण, तेरणा आणि मांजरा नदीवरील बॅरेजच्या पाणी पातळीत वाढ होत आहे. या अनुषंगाने संभाव्य पूर परिस्थितीचा सोमवारी रात्री दूरदृश्य प्रणालीद्वारे आढावा घेतल्यानंतर जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी आज मांजरा नदीवरील नागझरी बॅरेजला भेट देवून बॅरेज आणि नदीच्या पाणी पातळीची माहिती घेतली. तसेच संभाव्य पूर परिस्थितीच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या उपाययोजनांचा आढावा घेतला.



जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी डॉ. साकेब उस्मानी, पाटबंधारे विभागाचे शाखा अभियंता आशिष चव्हाण, गावातील सरपंच, मंडळ अधिकारी, तलाठी, ग्राम सेवक यावेळी उपस्थित होते.

एनडीआरएफ पथकामार्फत नागझरी येथे आयोजित शोध व बचाव प्रशिक्षणालाही जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी यावेळी भेट दिली. जिल्ह्यात एनडीआरएफ पाचवी बटालियनमार्फत आपत्ती व्यवस्थापन विविध ठिकाणी आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षणाचे आयोजन केले जात आहे. नागझरी येथील प्रशिक्षण भेटीवेळी एनडीआरएफ पथकाचे पथक प्रमुख इन्स्पेक्टर राजू प्रसाद, सब इन्स्पेक्टर शिवलिंग आप्पा यांनी जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांना प्रशिक्षण शिबिराबाबत माहिती दिली. जिल्ह्यात १८ ते ३० सप्टेंबर २०२४ या कालावधीत एनडीआरएफ पथकाद्वारे पूर परिस्थितीमध्ये शोध व बचाव कार्याबाबत स्थानिकांना प्रशिक्षण देण्यात येत आहे. या प्रशिक्षणाचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक यावेळी दाखविण्यात आले. तसेच खोल नदीपात्रात किंवा पुरामध्ये अडकलेल्या व्यक्तींच्या बचाव कार्यामध्ये बोटीच्या वापराचे प्रात्यक्षिकाप्रसंगी जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी स्वतः बोटीमधून जावून नदीपात्राची पाहणी केली. सध्या जिल्ह्यात पूर परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता असल्याने आपत्कालीन परिस्थितीत एनडीआरएफ पथकाची मदत घ्यावी लागू शकते, असे जिल्हाधिकारी म्हणाल्या.

नदीपात्रात पाण्याची आवक आणि विसर्ग याचे योग्य नियोजन करून पूर स्थिती उद्भवू नये, यासाठी काळजी घेण्याच्या सूचना जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांना दिल्या. नदीपात्रामध्ये नागरिकांनी जावू नये, असे आवाहन करण्यात आले आहे. याबाबत ग्रामस्तरावर सर्व नागरिकांना माहिती देवून कपडे धुणे, जनावरे धुण्यासाठी नागरिक नदीपात्रात जाणार नाहीत, याची खबरदारी घ्यावी, असे जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे म्हणाल्या.

## कर्ज वसुलीच्या नोटीसांमुळे शिरूर अनंतपाळमधील शेतकरी धास्तावला

**तभा वृत्तसेवा,**
**शिरुर अनंतपाळ, दि. २५ सप्टेंबर-**

शासन कर्ज माफी देणार या भरवशावर बसलेल्या शेकडो शेतकऱ्यांच्या खात्यावर लाखोंचा कर्जाचा डोंगर उभारला असून वसुलीसाठी सर्वच बँकाकडून शेतकऱ्यांना नोटीसा बजावल्या जात असल्याने शेतकरी धास्तावले आहेत.

येथील भारतीय स्टैट बँकेतून शेतकऱ्यांनी शेती विकसित करण्यासाठी स्वताच्या शेतीवर पिक कर्ज काढले आहे. मागील सरकारच्या काळात शेतकऱ्यांना कर्ज माफी देण्यासाठी सरकारने घोषित केले यात मोजक्याच शेतकऱ्याना प्रत्यक्ष माफीचा लाभ मिळाला मात्र त्यावेळी कोरोना महामारी संकटात संपूर्ण देश जगण्याची लढाई लढत होता मागील सरकार च्या काळात माफीतील शेतकऱ्यांच्या खात्यावर पैसे टाकले नसल्याने अनेक शेतकरी कर्ज माफी योजनेच्या लाभापासून वंचित राहिले असून कर्ज माफी लाभ मिळाला नसलेल्या शेतकऱ्यांचे कर्ज कमी मात्र बॅकेकडून व्याजाचा डोंगर लाखो रुपयांनी चढवला आहे, आशा शेतकऱ्यांना सर्वच बॅकेकडून कर्ज वसुली प्रकरणे निकाली काढण्यासाठी दि २८/९/२०२४ ला निलंगा लोकअदालत येथे उपस्थित रहाण्यासाठी नोटीसा बजावण्यात आल्या आहेत. सध्या विधानसभा निवडणुका तोंडावर आल्याने सरकारकडून शेतकऱ्यांना कर्ज माफीची आशा आहे शेतकरी आगोदरच शेतीचे उत्पन्न घटल्याने आर्थिक संकटात सापडले आहेत, बँकेने कर्जाच्या दहा पट व्याजाची आकारणी करुन व्याजाचा डोंगर उभारला असून शेतकऱ्यांना ऐवढी कर्ज भरणे शक्य नाही सरकारने येणाऱ्या विधानसभा निवडणुकी आगोदर सरसकट कर्जमाफी देऊन शेतकऱ्यांना कर्ज मुक्त करावे, आशी मागणी रावसाहेब पाटील साकोळकर, अमर पाटील, दिपक येरोळकर यांच्या सह थकीत शेकडो शेतकऱ्यांनी केली आहे.